सद्यस्थितीत सदर शासकिय संस्थांच्या थकित अनुदाना बाबतचा गंभिर प्रश्न निर्माण झालेला आहे. सदर प्रश्नाबाबत वेळीच योग्य तो निर्णय झाला नाही तर अनेक समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण बऱ्याच पुरवठाधारकांचे पत्र आयुक्तालयास सुध्दा प्राप्त झालेले असून त्यांनी वेळीच थकित अनुदान अदा न केले गेल्यास संस्थेचा अन्नधान्याचा पुरवठा बंद करणार असले बाबत कळविलेले आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांचे पत्र क्र. १४५ दिनांक १२/०५/२०१५ अन्वये देवनार मुंबई येथे कार्यरत असलेली शासकिय मुलींचे विशेष पुनर्वसन केंद्र देवनार, मुंबई-८८ या संस्थेचा अन्नधान्य पुरवठा थकित अनुदान अद्याप अदा न केल्यामुळे पुरवठाधारकाकडून बंद करण्यात आला असले बाबत कळविणेत आलेले आहे. त्यामुळे या बाबतीत तात्काळ निर्णय होणे गरजेचे आहे. जर अन्नधान्य पुरवठा बंद झाला तर शासकिय संस्थेत दाखल लाभार्थी प्रवेशितांवर उपासमारीची वेळ येईल, त्यामुळे बऱ्याच समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे शासकिय संस्थांच्या सन २०११-१२ पासूनच्या थकित अनुदानाचा विचार करता व यापुढेही एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या तरतूदीनुसारच अनुदान वितरीत करण्यात आले तर खुप मोठ्या प्रमाणावर प्रलंबित अनुदानाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या शासकिय संस्थांना एकात्मिक बाल संरक्षण योजनेमधून वगळून यानंतर यापुढील अनुदान हे पुर्वी प्रमाणेच आयुक्तालय स्तरावरुन अदा केल्यास अनुदानाबाबत व इतर विषयी समस्या उद्भवणार नाहीत असे मत आहे. तसेच शासकिय संस्थांच्या बांधकामाचा व दुरुस्तीचा प्रश्न निर्माण झाल्यास तो एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या उपलब्ध तरतूदीतूनच भागविण्यात यावा असे मत आहे.

शासन निर्णय क्र. आरडी एच १०६६-६१११५/ मुंबई-३२/ दिनांक २४ ऑक्टोबर १९६६ नुसार स्वंयसेवी निरीक्षण गृहातील कर्मचाऱ्यांना आकृतीबंध मंजुर करण्यात आला असून शासन निर्णय क्रमांक निरीगृ-२००९/ प्र.क्र-१५७/ का-३ दिनांक २६ ऑगस्ट २०१० अन्वये निरीक्षण गृहातील कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतन श्रेणीप्रमाणे वेतन श्रेणी मंजुर करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे निरीक्षण गृहातील कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यात येते. मात्र एकात्मिक बाल संरक्षण योजनेकडून वेतन श्रेणी न अदा करता ते मानधन स्वरुपात अदा करण्यात येत असल्यामुळे स्वंयसेवी निरीक्षण गृहातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. यापुर्वी निरीक्षण गृहातील कर्मचाऱ्यांचे वेतन लेखाशिर्ष २२३५ -३०४१ योजनेत्तर योजना (३६) वेतन या बाबीमधून अदा करण्यात येत होते तथापी या योजनेचा समावेश एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये केला असल्यामुळे त्यांचे वेतन लेखाशिर्ष २२३५- ए-९१९ योजनांतर्गत योजना (३६) वेतन या बाबीमधून करण्यात येते. तथापी एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या निकषाप्रमाणे वेतन अदा केले जाते परंतू निरीक्षण गृहातील कर्मचारी हे १००% वेतन घेणारे कर्मचारी असल्यामूळे वेतनाच्या व कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या इतर लाभांच्या बाबतीत प्रश्न निर्माण झालेला आहे.

तेंव्हा एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या शासकिय संस्था तसेच स्वंयसेवी निरीक्षणगृहे आणि अनुरक्षण गृहे एकात्मिक बाल संरक्षण योजनेतून वगळून ते पुर्वी प्रमाणेच आयुक्तालय स्तरावर ठेवण्यात यावेत व आयुक्तालयामार्फत पुर्वीच्या पध्दतीने लेखाशिर्षनिहाय अनुदान अदा करण्यात यावे असे मत आहे तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार शासकिय संस्था तसेच स्वंयसेवी निरीक्षण गृहे व अनुरक्षणगृहे एकात्मिक बाल संरक्षण योजनेमधून वगळणे बाबत आपले स्तरावरुन योग्य तो निर्णय तथा पुढील आदेश होणेस विनंती आहे.

सोबत :-

१. थकित अनुदान मागणीचे शासकिय संस्थांचे पत्राच्या छायांकित प्रती.
२. एकात्मिक बाल संरक्षण योजनेत समाविष्ठ असलेल्या शासकिय संस्था, स्वंयसेवी निरीक्षणगृहे आणि अनुरक्षण गृहे यांची यादी.

आपला विश्वासू,

आयुक्त,
महिला व बाल विकास,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे करीता.

स्थळ प्रतिवर मा. आयुक्त, यांची स्वाक्षरी असे.

07/09/15

Maharashtra State Child Protection Society
(MSCPS)

OT. No: 562

Regd. No. 608/2012/Pune

Date: 01/07/2014

To,
Vivek Joshi,
Joint Secretary,
Women and Child Development Department,
Government Of India,
New Delhi.

Sub :- Financial Proposal for 2014-15

Ref :- Government of India, Ministry of women and child Development letter DO.No.14-1/2006-CW-II, Dated On 07th May 2014.

Respected Sir,

With reference of your letter we are sending you the Financial Proposal for implementation of integrated child protection scheme in Maharashtra for the financial year 2014-15 as per the revised financial Norms.

Kindly approve the same.

Member Secretary 1/7/14
Maharashtra State Child Protection Society, Pune

Maharashtra State Child Protection Society
Pandit Jawaharlal Nehru Udyog Kendra,
Golf Club Road, Yerwada, Pune-411 006.

INTEGRATED CHILD PROTECTION SCHEME (ICPS) PRAPOSED BUDGET 2014-2015

STATE : MAHARASHTRA

SR.NO.	TYPE'S OF HOME AND INSTITUSATION'S UNDER IN ICPS	TOTAL NO	PAGE NO.	AMOUNT (IN Rs.)
1	State Child Protection Society (SCPS)	1	03	20263000
2	State Adoption Resource Agency (SARA)	1	05	2540000
3	District Child Protection Unit's (DCPU)	35	07	218470000
4	Government Observation Home, Children Home, Special Home,After Care Home	40	79	94934100
5	NGO Observation Home, Children Home	41	163	229999614
6	State Adoption Agencys (SAA)	14	251	21700000
7	Open Shelter Home	3	281	7296600
8	Child Welfare Committee (CWC)	35	289	41387500
9	Juvenile Justice Board (JJB)	35	361	32987500
	TOTAL			669578314

Amount In Words : Sixty six corer ninety five lakhs seventy eight thousand three hundred forteen only.

MEMBER SECRETARY
Maharashtra State Child Protection Society
Pandit Jawaharlal Nehru Udyog Kendra,
Golf Club Road, Yerwada, Pune-411 006.

Prog Manager
Child Protection
Maharashtra State Child Protection Society
Pandit Jawaharlal Nehru Udyog Kendra,
Golf Club Road, Yerwada, Pune-411 006.

Maharashtra State Child Protection Society
(MSCPS)

Regd. No. 608/2012/ Pune Date: 29/1/ 2015

To,
Dr. Vivek Joshi,
Joint Secretary,
Government of India,
Ministry of Women & Child
Development, New Delhi-01

Subject: Budget Proposal for the year 2015-16

Respected Sir,

Herewith this letter we are furnishing budget proposal for the year 2015-16 according to the revised norms of ICPS. The total budgetary proposal for the year is 2015-16 is of Rs.1,16,89,76,600/- (in words one hundred sixteen crore Eighty Nine Lacs Seventy Six Thousand Six Hundred Only)Excluding 10% NGO share. The Details Of the budget proposal is enclosed along with this letter.

Member Secretary
&
Commissioner WCD Pune.

Total Budget for 2015-16

CENTRAL SHARE	895,937,475
STATE SHARE	273,039,125
NGO SHARE	56,261,900
	1,225,238,500

SR. NO	PARTICULAR	NUMBER OF UNIT	AMOUNT PER UNIT	TOTAL	CENTRAL SHARE 75%	STATE SHARE 25%
1	SCPS	1	23,863,000	23,863,000	17,897,250	5,965,750
2	SARA	1	2,855,000	2,855,000	2,141,250	713,750
3	DCPU	36	6,338,000	228,168,000	171,126,000	57,042,000
4	GOVT. HOMES	34	5,554,000	327,686,000	245,764,500	81,921,500
	Total			**582,572,000**	**436,929,000**	**145,643,000**

SR. NO	PARTICULAR	NUMBER OF UNIT	AMOUNT PER UNIT	TOTAL	CENTRAL SHARE 75%	STATE SHARE 15%	NGO SHARE 10%
5	NGO HOMES	51	5,554,000	472,090,000	354,067,500	70,813,500	47,209,000
6	SAA	17	1,785,000	30,345,000	22,758,750	4,551,750	3,034,500
	Total			**502,435,000**	**376,826,250**	**75,365,250**	**50,243,500**

SR. NO	PARTICULAR	NUMBER OF UNIT	AMOUNT PER UNIT	TOTAL	CENTRAL SHARE 90%	STATE SHARE 0%	NGO SHARE 10%
7	OPEN SHELTER	20	3,009,200	60,184,000	54,165,600		6,018,400
	Total			**60,184,000**	**54,165,600**	-	**6,018,400**

SR. NO	PARTICULAR	NUMBER OF UNIT	AMOUNT PER UNIT	TOTAL	CENTRAL SHARE 35%	STATE SHARE 65%
8	CWC	39	1,182,500	46,117,500	16,141,125	29,976,375
10	JJB	36	942,500	33,930,000	11,875,500	22,054,500
	Total			**80,047,500**	**28,016,625**	**52,030,875**

Grant Total		**1,225,238,500**	**895,937,475**	**273,039,125**	**56,261,900**

कार्यक्रम व्यवस्थापक (बाल संरक्षण) 30/1/15
महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था, पुणे.

सदस्य सचिव 31/1/15
महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था
तथा आयुक्त,
महिला व बाल विकास विभाग

95

२५ वि, ३८ २७/डीव्ही

Maharashtra State Child Protection Society
(MSCPS)

Regd. No. 608/2012/Pune

Date: 2/1/2016

प्रती,
मा,प्रधान सचिव.
महिला व बालविकास विभाग, मंत्रालय.
नविन प्रशासकीय इमारत
महाराष्ट्र शासन, मुंबई.

22/2016
11 28

विषय : महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था पुणे अंतर्गत संस्था व कार्यालयाकरिता केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शिकेनुसार सन २०१४-१५ पासून अनुदान मंजूर करण्यास मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-केंद्रशासन पत्र क्र.१४-३/२०१२ /C.W.II (VOI-IV) दि.०३-०३-२०१४

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शिकेनुसार (GUIDELINE) माहे एप्रिल २०१४ पासून अनुदान मंजुरीबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत दि ०२-०६-२०१५ रोजी झालेल्या प्रकल्प मंजूर समितीच्या बैठकीत मान्यता दिलेनुसार वित्त विभागास मंजूरीसाठी सादर करावयाचा प्रस्ताव या पत्रासोबत सविनय सादर.

१४.१.१६

सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था.

तथा
सदस्य सचिव
आयुक्त
महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था
(महिला व बाल विकास विभाग, पुणे)
तथा आयुक्त,
महिला व बाल विकास विभाग

सोबत:- प्रस्ताव २ प्रति

प्रत:- १. मा. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य वाल सरक्षण संस्था, पुणे.

महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था, पुणे

विषय : केंदशासनाचे सुधारीत मार्गदर्शीकाप्रमाणे (Gile Line) अनुदान मंजुरीस सन २०१४—१५ पासून मान्यता मिळणेबाबत...

प्रस्ताविक :—

केंदशासन पुरस्कृत एकात्मिक बालसंरक्षण योजना महाराष्ट्र राज्यात केंद्र व राज्य शासन हे संयुक्तपणे अंमलबजावणी करीत आहे.

महाराष्ट्र राज्य करीता महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था ही सोसायटी कायदा सन २०१२ मध्ये स्थापन झाली आहे. एकात्मिक बाल संरक्षण योजनाची महाराष्ट्रात अंमलबजावणी केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या दरम्यान झालेल्या सामजंस्य करार नुसार होत आहे. सामजस्य करारानुसार केंद्र व राज्याचा ICPS करीता आवश्यक असणारा निधी केंद्राच हिस्सा व राज्य हिस्सा याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.

केंद्र शासनाचे पत्र क्र. १४—३/२०१२/ CW II(Vol. IV) दि. ०३/०३/२०१४ अन्वये एप्रिल २०१४ पासून सुधारीत दराने अनुदान मंजुरीबाबतचे आदेश निर्गमित केलेलचे कळविले आहे.

सुधारीत दराने अनुदान मंजुरीसदंर्भात महाराष्ट्र राज्य बालसंरक्षण संस्थाचे दि.०२/०६/२०१५ चे प्रकल्प मंजुरी समितीच्या बैठकीत सुधारीत दराने अनुदान मंजुरीबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास पाठविण्याबाबत मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे तपशीलवार माहिती सादर करण्यात येत आहे.

२४५ मु/हिनि

महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था पुणे अंतर्गत कार्यरत संस्थाना जुन्या व सुधारित दराने देय असणारी रक्कम खालीलप्रमाणे ..

अ क्र.	संस्था	संख्या	जुन्या दराने रक्कम रु. (हजारात)	नवीन दराने रक्कम रु. (हजारात)	अतिरिक्त भर प्रति वर्षी रु.(हजारात)
१	महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था	१	१,०२,६६	२,२६,७८	१,२४,१२
२	राज्य दत्तक ग्रहण स्त्रोत संस्था	१	१८,४६	२२,०५	३,५९
३	जिल्हा बाल संरक्षण कक्ष	३६	१३,२६,९६	२०,५८,१२	७,३१,१६
४	शासकीय संस्था	४०	५,६८,८१	१३,३६,८०	७,६७,९९
५	स्वंयसेवी संस्था	४४	१०,१९,४७	१९,२२,३६	९,०२,८९
६	दत्तक ग्रहण संस्था	१७	१,२४,९५	२,६३,५०	१,३८,५५
७	खुले निवारा गृह	३	२८,८९	५९,९७	३१,०८
७	बाल कल्याण समिती	३९	२,०८,२६	४,२१,२०	२,१२,९४
९	बाल न्याय मंडळ	३६	१,४९,०४	३,०२,४०	१,५३,३६
	एकुण		३५,४७,५०	६६,१३,१८	३०,६५,६८

सुधारित मार्गदर्शिकेनुसार प्रतिवर्षी भर रु. ३०,६५,६८,०००/- असुन सामंजस्य करारानुसार महाराष्ट्र शासनावरील अतिरिक्त भर रु. ८,०१,०२,०००/-(अक्षरी : आठ कोटी एक लाख दोन हजार फक्त)इतका होत आहे.

अतिरिक्त भार परिगणना करताना खालील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत

१. संस्थांची प्रवेशितांची मंजूर संख्या.

२. महाराष्ट्रातील जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ.

३. महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थाचे ३६ जिल्हेनुसार राज्य कार्यालयांचे सुधारित अनुदान .

४. वार्षिक भार परिगणना करताना आवर्ती खर्च विचारात घेतला आहे.

५. MOU नुसार केंद्र व राज्य सरकारचा हिस्सा.

सन २०१४-१५ करिता सुधारित अनुदान मंजूरी करिता प्रत्यक्ष झालेला अनुदेय खर्च विचारात घेऊनच अनुदान फरकाची रक्कम निश्चित करण्यात येईल.

२४७

महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था अंतर्गत कार्यरत कर्मचारी मानधनावर काम करत आहेत.सदर चे मानधन इतर संस्था/शासकीय कर्मचारी यांना मिळणा-या वेतनाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. एकात्मिक बाल संरक्षण योजनाचे कार्य हे बाल संरक्षण या अत्यंत संवेदनशील बाबीवर कार्य करीत आहेत. बाल संरक्षण हि विशेष बाब असुन त्या करिता बालकांचे समस्यां संदर्भात चौवीस तास कार्यरत असणे आवश्यक असते.

केंद्र शासनाच्या इतर योजनेच्या तुलनेत ICPS अंतर्गत काम करणारे कर्मचा-यांचे वेतन हे अत्यंत कमी असुन जिल्हा स्तरावर काम करीत असल्याने अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते त्याचा परिणाम कर्मचा-याच्या कार्य क्षमतेवर होत असुन योजना प्रभावीपणे राबविणे शक्य होत नाही.

बालगृहे/निरीक्षण गृहे/ दत्तक गृहे इ. बाबत असे नमूद करण्यात येते कि संस्थे असणारे प्रवेशिताची परिपोषण सोयीसुविधा यात प्रामुख्याने जीवनास आवश्यक असणारे बाबीचा समवेश असुन संस्थाना नियमाप्रमाणे प्रवेशिताकरिता सोयीसुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.याकरिता प्रत्यक्ष होणारे खर्चाच्या तुलनेत मंजूर केले जाणारे अनुदान अत्यंत कमी असल्यामुळे संस्थाना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते आहे केंद्र शासनाच्या सुधारित दरानुसार अनुदान मंजूरी संदर्भात मागणी संस्थाकडून करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन सुधारित दराने सन२०१४-१५ पासून सुधारित दराने अनुदान मंजूर करणेस मान्यता मिळावी.

१५.१.१६

सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था
तथा आयुक्त,
महिला व बाल विकास विभाग

२२८ ~~३०१/हिवि~~

स्मरणपत्र-१ /महत्त्वाचे

महाराष्ट्र शासन

क्र.ICPS-२०१४/प्र.क्र.१४४/का-८
महिला व बाल विकास विभाग,
नवीन प्रशासन भवन, ३ रा माळा,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १८ जुलै,२०१६.

प्रति,

आयुक्त,
महिला व बाल विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय : केंद्रसहाय्यित एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या सन २०१४-१५ च्या सुधारित आर्थिक निकषानुसार खर्च करण्यास परवानगी मिळणेबाबत.
संदर्भ : शासन समक्रमांक पत्र दि. २४.६.२०१६.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन पत्रान्वये नियोजन विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत आपल्याकडून माहिती/खुलासा तात्काळ उपलब्ध करून देणेबाबत विनंती करण्यात आली होती. सदर सुधारित निकषाबाबत न्यायालयीन प्रकरणातदेखील विचारणा झालेली आहे. मात्र अद्यापी माहिती उपलब्ध न झाल्याने सदर प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास पुन्हा सादर करण्यास विलंब होत आहे.

नियोजन विभागाकडूनउपस्थित केलेले मुद्दे पुन्हा नमुद करत असून आपला खुलासा/माहिती तात्काळ सादर करावा, ही विनंती.

१. विभागाने NGO निरीक्षणगृहे ४४ नमुद केले आहेत. तथापि, केंद्रशासनाने त्यांचे दि. ३०.३.२०१६ च्या पत्राद्वारे ४० NGO Runs Homes करिता अनुदान दिलेल आहे. त्याचप्रमाणे SAA चे संख्येत फरक (१७/१४) आहे. याबाबत खुलासा करावा.
२. मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्थांची नावे नमुद करावीत. एकूण शासकीय व NGO मध्ये भरलेली व रिक्त पदे किती आहेत.
३. मंजूर बालकांच्या क्षमतेप्रमाणे सद्यस्थितीत शासकीय व स्वयंसेवी संस्थांमधील बालकांची संख्या संस्थानिहाय द्यावी.
४. स्वयंसेवी संस्थांना मान्यता किती वर्षाकरिता देण्यात आलेली आहे, त्यांना पूर्वमंजूरी दिलेली आहे काय?
५. सदर माहितीचे संगणकीकरण असल्यास शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे तसेच सर्वंकष बालगृहाबाबत मागविलेली माहिती अद्यापि अप्राप्त आहे.

आपला,

(सुरेन्द्र प्र.चानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

DCR 22/7/16 Reminder

18/7/16

प्रत - आवश्यक कार्यवाहीकरिता
उपायुक्त (बालविकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे.
विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण सोसायटी, पुणे.

V Tribhuwan 19/7

२५)

MAHARASHTRA STATE CHILD PROTECTION SOCIETY
Woman & Child Development Department
(Under Integrated Child Protection Scheme)
Contact no. 8855881084/8483054262 E-Mail I.D-mscps.state@gmail.com

जा.क्र.मराबासं/लेखा/सुधारित प्रस्ताव/२०१६-१७/ दि. १९.९.२०१६

प्रति,
मा.प्रधान सचिव,
महिला व बाल विकास विभाग ,
नवीन प्रशासकीय इमारत,
मंत्रालय,मुंबई -३२

विषय:- केंद्र सहाय्यित एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या सन २०१४-१५ च्या सुधारित आर्थिक निकषानुसार खर्च करण्यास परवानगी मिळणेबाबत....
संदर्भ:- शासन पत्र ICPS-२०१४/प्र.क्र.१४४/का-८ दि.२४/०६/२०१६ व दि.१८/०७/२०१६

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्राच्या अनुषगाने खालीलप्रमाणे मुद्देनिहाय माहिती मादर करण्यात येत आहे.

मुद्दा क्र.१ विभागाने NGO निरीक्षण गृह ४४ नमूद केले आहेत तथापि केंद्रशासनाने त्यांचे दि.३०/०३/२०१६ पत्रानुसार ४० NGO runs homes करिता अनुदान दिलेले आहे.याचप्रमाणे SAA चे संखेत फरक (१७/१४) आहे याबाबत खुलासा करावा.

महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी पुणे ची निर्मिती सन २०१२-१३ मध्ये झालेली असून त्यानंतर एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत समाविष्ठ करण्यात आलेल्या संस्थाचा तपशील खालीलप्रमाणे ..

१. शासकीय संस्था (निरीक्षण१२+ बालगृहे २० + अनुरक्षण गृहे ६+विशेष गृह २) असे एकूण ४०
२. स्वयंसेवी संस्था (निरीक्षण/बालगृहे ४३ + अनुरक्षण गृहे १) असे एकूण ४४
३. दत्तक ग्रहण संस्था १७
४. खुले निवारा गृहे ३

वरील संस्थाना सन २०१२-१३ पासून अनुदान मंजूर करून त्याप्रमाणे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. मात्र दि. २५/०३/२०१३ रोजीच्या प्रकल्प मंजूर समितीच्या बैठकीच्या निर्णयानुसार, सन २०१२-१३ पासून खालील संस्थाचे अनुदान बंद करण्यात आले होते. त्यानुसार राज्य शासनाने कळविले होते.

- निरीक्षण गृह/बालगृह (३)

१. बळीराम नाईक शिक्षण प्रसारक मंडळ,संचलित सरस्वती मुलींचे बालगृह/निरीक्षण गृह सावरकर नगर,हिंगोली.
२. बसुंधरा सेवा प्रतिष्ठान संचलित मुलींचे बालगृह/निरीक्षण गृह,अंबेजोगाई,जि-बीड.
३. संधी निकेतन शिक्षण संस्था संचलित मुलांचे बालगृह/निरीक्षण गृह आनंदनगर जि नांदेड

~~२५५/दिवि~~
~~स्था दिवि~~

२५३

- विशेष दत्तक ग्रहण संस्था (३)

१. ज्योतिबा फुले सेवा ट्रस्ट संचलित सुनिता गुत्ते शिशुग्रह नांदेड

२. पिपल एज्युकेशन सोसायटी संचलित ममता शिशुगृह बुलढाणा

३. पटेल बहुद्देशीय शिक्षण संस्था संचलित नॅशनल शिशुग्रह कोंढाली ता-काटोल जि-नागपूर

वरील ६ संस्थाचे कामकाज समाधानकारक नाही या कारणास्तव राज्य शासनाने सदर संस्था चे अनुदान थांबविलेले होते.तथापि सदर संस्थाची पुनश्च तपासणी करण्यात आली व शासनपत्र क्र. बालगृह -२०१३/प्र.क्र.३२६/ का-८ दि.०६/०८/२०१४ अन्वये ४ संस्थाचे कामकाज समाधान कारक असलेमुळे प्रलंबित अनुदान अदा करण्यास मान्यता दिली आहे.उर्वरित २ संस्थाबाबत शासनाच्या आदेशानुसार आयुक्त स्तरावर तपासणी करून सदर संस्थाचे अनुदान मंजूर करणेबाबत मान्यता दिलेनुसार दि. ०२/०६/२०१४ रोजीच्या प्रकल्प मंजूर समितीच्या बैठकीत माहे सप्टेंबर २०१४ पासून अनुदान अदा करणेस मंजुरी दिलेली आहे.

दि.०४/०२/२०१६ रोजीच्या PAB च्या बैठकीत सदर ६ संस्थाबाबत उपस्थित केलेल्या आक्षेपाबाबतचा अहवाल केंद्र शासनास पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे. पुढील PAB च्या बैठकीत त्याबाबतचा निर्णय अपेक्षित आहे.

त्यामुळे स्वयंसेवी निरीक्षण गृह ४४ मधून वरील नमूद केलेले ३ निरीक्षणगृह/बालगृह वगळण्यात आले तसेच अनुरक्षण गृह (१)महाराष्ट्र राज्य परिविक्षा अनुरक्षण संघटना संचलित अनुरक्षण गृह चेबूर, मुंबई यास एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत केंद्राकडून सदर अनुरक्षण गृहास तरतूद नमूद केलेली नसल्याने ती संस्था वगळण्यात आलेली आहे.त्यामुळे स्वयंसेवी निरीक्षण गृहाची संख्या ४० येते.

याचप्रमाणे एकूण विशेष दत्तक संस्था १७ मधून वरील नमूद केलेल्या ३ संस्था वगळण्यात आलेल्या असल्याने विशेष दत्तक संस्थाची संख्या १४ येते.तथापि ज्योतिबा फुले सेवा ट्रस्ट संचलित सुनिता गुत्ते शिशुग्रह नांदेड यांचे बाळ विक्री प्रकरणामुळे नोंदणी प्रमाणपत्र दि.०५/०८/२०१६ रोजी रद्द करण्यात आले आहे.

दि.०२/०६/२०१४ रोजीच्या प्रकल्प मंजूर समितीच्या मंजुरीनुसार स्वयंसेवी संस्था ४४ व दत्तक ग्रहण संस्था १७ करिताची २०१५-१६ अनुदान मागणी प्रस्ताव (सुधारित दराने)केंद्रशासनास सादर केला आहे.

मुद्दा क्र.२ मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्थाची नावे नमूद करावीत,एकूण शासकीय व NGO मध्ये भरलेली व रिक्त पदे किती आहेत

सविस्तर माहिती सोबत सादर केली आहे .

मुद्दा क्र. ३ मंजूर बालकाच्या क्षमते प्रमाणे सद्यास्थितीत शासकीय व स्वयंसेवी संस्थामधील बालकांची संख्या संस्थानिहाय द्यावी.

सविस्तर माहिती सोबत सादर केली आहे .

~~१०७/टिवि~~
~~जमा टिवि~~
३५५

,द्दा क्र.४ स्वयंसेवी संस्थाना मान्यता किती वर्षाकरिता देण्यात आलेली आहे.त्यांना पूर्व मंजुरी दिलेली आहे काय?

एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत असणाऱ्या एकूण ४४ स्वयंसेवी संस्थाना बाल न्याय धिनियमा अंतर्गत पूर्वीच मान्यता दिलेल्या आहेत तथापि बाल न्याय अधिनियम २००० नवीन निर्गमित ाल्याने शासनाने त्यानुसार बालगृह/निरीक्षण गृह यांना शासन निर्णय क्र.बान्याय-२००२/प्र.क्र.१८३/का-३ त्रालय मुंबई. दि.२५/०२/२००४ अन्वये सदर संस्थाना निरीक्षणगृह/बालगृह/विशेष गृह म्हणून घोषित लेले आहे मात्र सदर शासन निर्णयात मान्यता किती वर्षाकरिता देण्यात आली याबाबतचा कालावधी नमूद ाही.

द्दा क्र.५ सदर माहितीचे संगणकीकरण असल्यास शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे तसेच यापूर्वी बालगृहाबाबत मागविलेली माहिती अद्याप अप्राप्त आहे.

संगणकीकृत केलेली माहिती जिल्हा स्तरावरून प्राप्त झाली आहे. माहितीचे एकत्रीकरण व पासणी करण्यात येत आहे.एकत्रीकरण पूर्ण होताच संगणकीकृत केलेली माहिती शासनास सादर रण्यात येईल.

सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था पुणे.
तथा आयुक्त
महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे.

Dlc Tambde

19/8/16. 19/08/2016 19/8/16

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१३	२.१.३.	**नियोजन आणि संस्थाविषयक व्यवस्था**	प्रस्तावना असल्याने अभिप्राय निरंक

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१	२	३	४
१३,१४	२.१.३.१	**काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना न हेरणे/शोध न घेणे** भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षाच्या अहवालाच्या (सामान्य आणि सामाजिक क्षेत्र) परिच्छेद ४.१.६.१ मध्ये काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची संख्या निर्धारीत करण्यासाठी यंत्रणेचा अभाव असल्याचे नमूद केले होते. त्यावेळी तत्कालीन प्रधान सचिव, W&CD यांनी आश्वसित केले होते (ऑक्टोबर २०१२) की, संस्थात्मक काळजी घेण्याची गरज असणा-या मुलांचा शोध घेण्यासाठी, अंगणवाडी कार्यकर्ते आणि व्यावसायिक (तज्ञ) व्यक्तिची मदत घेऊन काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची गणना केली जाईल. पुढे लेखापरीक्षने केलेल्या तपासात असे आढळून आले की, आयुक्त W& CD यांनी अंगणवाडी कार्यकर्त्यांच्या मदतीने ०१ ऑक्टोबर २०१३ ते १५ ऑक्टोबर २०१३ या कालावधीत काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना जारी केल्या होत्या (सप्टेंबर २०१३). हा सर्वेक्षण अहवाल आयुक्त, W&CD यांनी डिसेंबर २०१३ पर्यंत एकत्रित करावयाचा होता. आयुक्तांना, ३५ पैंकी फक्त आठ जिल्हयामधून हा अहवाल प्राप्त झाला होता. (मे २०१५),ज्यामध्ये ६,६६० बालकांना (मुले:३,४८२; मुली: ३,१७८) काळजी आणि सरंक्षणाची गरज असल्याचे आढळून आले होते. आयुक्तांना २७ जिल्हयांसबंधी कोणताही	राज्यामध्ये विविध स्वयंसेवी संस्थामार्फत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी बालगृह कार्यान्वित करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत होते.या प्रस्तांवावर कार्यवाही करण्यासाठी तसेच राज्यामध्ये बालगृहांची संख्या निश्चित करण्याच्या उददेशाने शासनाने अंगणवाडी सेविकांच्या मार्फत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला.परंतु अशा प्रकारचा निर्णय केवळ बालगृहांची संख्या निश्चित करण्यासाठी घेण्यात आलेला होता.सदर सर्वेक्षणामध्ये अहवालात नमुद केल्याप्रमाणे ६६६० बालकांना काळजी व संरक्षणाची गरज असल्याचे आढळून आले.या बालकांना संस्थात्मक काळजीसाठी दाखल करण्याची कोणतेही कार्यवाही केली नाही असे नमुद करण्यात आले आहे.तथापि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्व बालकांना संस्थात्मक काळजीची गरज असते असे नाही.अशी बालके संबंधित जिल्हयाच्या बाल कल्याण समिती यांचे समोर सादर होवून बाल कल्याण समिती या मुलांच्या सामाजिक पुन:स्थापन आणि पुर्नवसन या दृष्टीकोनातून निर्णय घेते.बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार सदर अधिनियमाच्या कलम ३ मध्ये मुलांचा कुटुंबातील हक्क यास प्राधान्य देण्यात आलेले असून अशा मुलांना अंतिम पर्याय म्हणून संस्थात्मक काळजी साठी दाखल करण्याची तरतुद आहे.तसेच बाल कल्याण समितीला सदर अधिनियमांतर्गत प्रथम न्याय दंडाधिकारींचे अधिकार असल्याने अशा बालकांच्या बाबतीत संपूर्ण निर्णय घेण्याकरीता सदरची समिती सक्षम प्राधिकरण आहे.अधिनियमाच्या कलम ३१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे काळजी व संरक्षणाची गरज असलेले मुल हे खालील व्यक्ती व संस्था बाल कल्याण समितीसमोर सादर करु शकते. १.कोणताही पोलीस अधिकारी किंवा विशेष पोलीस पथक,जिल्हा बाल

		अहवाल प्राप्त झाला नसूनही W&CD कडून ६,६६० बालकांना संस्थात्मक काळजीसाठी दाखल करण्याची कुठलीही कारवाई केली गेली नव्हती. शासनाने असे नमूद केली की, प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे आणि निधीच्या कमतरतेमुळे अंगणवाडी कार्यकर्त्यांना अडचणीचा सामना करावा लागला होता. पुढे असेही सांगितले की, MSCPS च्या मदतीने सर्वेक्षण केले जाईल. शासनाने सादर केलेले उत्तर वस्तूस्थितीवर आधारीत नव्हते कारण, लेखापरीक्षेने पुढे केलेल्या तपासणीत असे आढळून आले की, MSCPS सुध्दा काळजी आणि संरक्षणची गरज असलेल्या बालकांना शोधण्यास पर्याप्तपणे सक्षम नव्हती कारण, काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना शोधण्याची आणि निम्न आणि जिल्हा पातळीवर बाल संरक्षण आराखडा तयार करण्याची जबाबदारी असलेले तिच्या नियंत्रणाखालील जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU) आणि विविध बाल संरक्षण समित्या[११] अशा प्रकारची कार्ये पार पाडण्यास, मनुष्यबळाच्या[१२] आणि निधीच्या अतीव कमतरतेमुळे किंवा गाव/प्रभाग आणि गट स्तरावर आवश्यक तितक्या संख्येत समित्या न गठीत केल्यामुळे सुसज्ज नव्हत्या.	संरक्षण कक्षाचा अधिकारी किंवा पोलीस निरीक्षक ज्यांची नियुक्ती कामगार कायद्याच्या अंतर्गत झाली आहे. २.समाज सेवक. ३.चाईल्ड लाईन सेवा किंवा मान्यता प्राप्त स्वंयेसेवी संस्था. ४.बाल कल्याण अधिकारी किंवा परिवीक्षा अधिकारी. ५.मुल स्वत: ६.कोणतीही परिचारिका वैद्यकीय अधिकारी, नर्सिग होम, दवाखाना, प्रसुतीगृहाचे व्यवस्थापक. वरील तरतुदीचे अवलोकन करता महिला व बाल विकास यांना काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना संस्थेमध्ये दाखल करण्याबाबत कोणतेही अधिकार नाही.तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक शोधणे ही विभागाची जबाबदारी नाही यासाठी अधिनियमांतर्गत अशी बालके निदर्शनास आल्यास त्यांना बाल कल्याण समितीसमोर सादर करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे.अशा प्रकारची बालके नियमितपणे बाल कल्याण समितीसमोर सादर होवून समितीने निर्णय वेतल्यास या बालकांना संस्थात्मक काळजीसाठी दाखल करण्याची कार्यवाही बाल कल्याण समितीकडून करण्यात येते. एकात्मिक बाल संरक्षण योजनेअंतर्गत जिल्हा स्तरावर जिल्हा बाल संरक्षण संस्था स्थापन करण्यात आलेले असून गाव पातळीवर एकुण २०६५१ ग्राम बाल संरक्षण समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

११ गट स्तरीय बाल संरक्षण समितया आणि प्रभाग/गाव पातळीवरील बाल संरक्षण समित्या

१२ 35 DCPUS मध्ये 432 मंजुर पदापैकी 276 पदेरिक्त होती. राज्यात गठीत करवयाच्या 39,693 गावस्तरीय बालसंरक्षण समित्यांपैकी फक्त 18,850 समित्या गठीत केल्या होत्या. तसेच,गठीत करावयाच्या 333 गटस्तरावरील बाल संरक्षण समित्यांपैकी, सप्टेंबर 2015 पर्यंत फक्त 130 समित्या गठीत केल्या होत्या.

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१४	२.१.३.२	**शहरी क्षेत्रातील रस्त्यावर राहणा-या मुलांचे सर्वेक्षण न करणे :-** शहरी क्षेत्रात रस्त्यावर राहणा-या मुलांचे संरक्षण करण्यासाठी तसेच त्यांना सामान्य आयुष्य जगण्यास मदत करण्याच्या दृष्टीने राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आणि W&CD चे प्रधान सचिव हे सदस्य सचिव असलेले १० सदस्यांचे एक राज्य स्तरीय कृतीदल (SLTF) विभागाने गठित केले (फेब्रुवारी २०१४) SLTF ने राज्यातील सर्व महानगरपालिकांना १५ दिवसाच्या आत एक विशेष कृती दल स्थापित करुन त्यांच्या क्षेत्रातील रस्त्यावर राहणा-या मुलांचे सर्वेक्षण करुन त्यांना एक अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. (जुलै २०१४) लेखा परिक्षा तपासणीत असे आढळून आले की, मे २०१५ पर्यंत राज्यातील २६ महानगर पालिकांपैकी फक्त एका महानगरपालिकेने (पुणे) सर्वेक्षण करुन रस्त्यावर राहणा-या १,७५४ मुलांना[१३] हुडकुन काढले होते , आणि त्यांनी अंमलबजावणी केलेल्या " नेस्ट " योजनेखाली / कार्यक्रमा अंतर्गत	महिला व बाल विकास विभागाचा शासन निर्णय क्र.बालगृ- २०१४/प्र.क्र. ०६/का-८/दि.१० फेब्रुवारी २०१४ अन्वये रस्त्यावर राहणा-या मुलांचे संरक्षण करण्यासाठी राज्याचे मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय कृतीदल स्थापन करण्यात आला होता. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने शासन पत्र क्र. ३ फेब्रुवारी २०१५ अन्वये दिनांक.२/७/२०१४ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय कृतीदल स्थापन करण्याबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सादर करण्यात आले होते . त्यामध्ये **खालील प्रमाणे निर्णय** घेण्यात आले. (१). नागरी भागात रस्त्यावर राहणा-या बालकांच्या पुनर्वसनाची संपूर्ण जबाबदारी ही संबधित महानगरपालिकेची असल्याने मुंबई महानगरपालिकेने यासंदर्भात पुढील १५ दिवसात विशेष कृती दलाची स्थापना करावी. (२). सदर कृती दलाची स्थापना केल्यानंतर महानगरपपालिकांनी रस्त्यावर राहणा-या बालकांच्या पुनर्वसनासाठी विशेष कृतीदलाच्या मांध्यमातून उपाय योजना करावी व अहवाल राज्यकृतीदलाला सादर करावा. (३) राज्यात इतर महानगर पालिकांनी त्याचे कार्यक्षेत्रात रस्त्यावर राहणा-या मुलांचे सर्वेक्षण करुन घ्यावे व अहवाल राज्यकृतीदल यांना सादर करावा. त्यानुसार सदर प्रकरणी पुणे महानगर पालिका आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दिनांक.२४/५/२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. तथापि त्याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

		त्यांच्या निवा-याची सोय केली होती. शासनाने सांगितले की, रस्त्यावर राहणा-या मुलांचे शक्य तितक्या लवकर सर्वेक्षण करण्याचे निर्देश महानगरपालिकांना देण्यात आले होते.	वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने केवळ पुणे महानगरपालिका यांनी सदरचे कार्य हाती घेतलेले आहे.त्यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यावर त्यांना पुढील सुचना देण्यात येतील. आयुक्त महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.५४४८ दिनांक.१३/१०/२०१६ अन्वये २६ महानगरपालिकांना रस्त्यावर राहणा-या बालकांच्या संरक्षण व जपणूकी करिता कृतीदलाची स्थापना करण्यात येऊन त्याबाबतचा लेखी अहवाल मागविण्यात आलेला आहे.

१३ सहा वर्षापर्यंतच्या वयोगटातील ९०८ मुले आणि सहा ते १४ वर्षे वयोगटातील ८४६ मुले

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१५	२.१.३.३	**पुनर्वसन आणि काळजी आराखडा तयार न करणे.** W&CD ने सर्व CWC,JJB आणि DW&CDOS ना भावनिक आणि मानसिक आधाराच्या गरजा शैक्षणिक आणि प्रशिक्षणाच्या गरजा आरोग्य विषयक गरजा कौशल्य धार्मिक विश्वास इ.बाबी विचारात घेवून CCI च्या परिवीक्षा अधिकाऱ्यांनी [१४] स्वतंत्र पुनर्वसन आणि काळजी आराखडा तयार करावे असे निर्देश दिले होते (डिसेंबर २०११). पुनर्वसन आणि काळजी आराखडे हे वैद्यकीय अधिकारी शिक्षक व्यवसाय प्रशिक्षण निदेशक आणि CCI चे अधिक्षक सम्मिलित असलेल्या समितीने मंजूर करावयाचे होते.लेखापरिक्षेला आढळून आले की निवड केलेल्या ९३ CCI पैकी ८४ CCI नी मुलांसाठी पुनर्वसन आणि काळजी आराखडे तयार केले नव्हते. CCI मध्ये राहणाऱ्या मुलांच्या बाबतीत पुनर्वसन आणि काळजी आराखडे तयार करण्याच्या सूचना सर्व CCI ना देण्याबाबत DW&CDOs नां निर्देश देण्यात आले आहेत,असे शासनाने सांगितले. लेखापरिक्षेने पडताळणी केलेल्या CCI पैकी ९० टक्के CCI नी पुनर्वसन आणि काळजी आराखडे तयार केलेले नसणे या वस्तुस्थितीवरुन बालकांना आवश्यक असलेल्या विशिष्ठ गरजांविषयी W&CD आणि अंमलबजावणी करण्यास जबाबदार असणाऱ्यांची असंवेदनशीलता स्पष्टपणे दर्शविली गेली.	बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियमांतर्गत निरीक्षणगृह/विशेषगृह/बालगृह/दत्तक संस्था/अनुरक्षणगृह या संस्थामध्ये दाखल होणाऱ्या बालकांच्या बाबतीत बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियमातील तरतुदीनुसार दाखल मुलांच्या काळजी व पुर्नवसनासाठी **सर्वांगिन काळजी व संरक्षण आराखडा (Comprehensive Care Plan) शासन निर्णय दि.२२.१२.२०११ अन्वये निश्चित करण्यात आला आहे.** तसेच शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरीता सर्व बाल कल्याण समिती आणि बाल न्याय मंडळ यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत २६४ संस्थांनी पुनर्वसन व काळजी आराखडा तयार केलेला आहे. सदर शासन निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी संबंधित यंत्रणांना आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. २४२ दिनांक ०१.०६.२०१६ अन्वये कळविण्यात आलेले आहेत.

१४ परिविक्षा अधिकारी म्हणजे राज्य शासनाने अपराध्याचा परिविक्षा काल अधिनियम,१९५८(१९५८चा २० वा) अंतर्गत नियुक्त केलेला अधिकारी

<table>
<tr><th>सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र</th><th>परिच्छेद क्रमांक</th><th>परिच्छेदाचा तपशील</th><th>विभागाचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td>१५,१६,१७</td><td>२.१.३.४.</td><td>संस्थात्मक व्यवस्थेतील कमतरता
JJ अधिनियमात विहित केलेल्या सस्थात्मक व्यवस्थेबरोबर तुलना केली असता लेखापरिक्षकाना या योजनेतील व्यवस्थेत मोठ्या कमतरता आढळून आल्या ज्या तक्ता २.१.२ मध्ये दशविल्या आहेत
तक्ता २.१.२ संस्थात्मक व्यवस्थेतील मोठ्या कमतरता
<table>
<tr><th>मंडळे / समित्या</th><th>लेखापरिक्ष निष्कर्ष आणि w&CD</th></tr>
<tr><td>राज्य सल्लागार मंडळ</td><td>(i) राज्य शासनाने MJJ नियमांच्या नियम ११(१A) चे उल्लंघन करुन चार शासकिय आणि पाच अशासकिय सदस्यांऐवजी फक्त तीन शासकिय सदस्य असलेले सल्लागार मंडळ पुनर्गठीत केले होते. (सप्टेंबर २०१३) अशासकिय सदस्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे शासनाने सांगितले. तसेच राज्य शासनाने निवृत्त सचिव किंवा न्यायालयाच्या न्यायाधिशांऐवजी सेवेत असलेल्या W&CD च्या प्रधान सचिवांना अध्यक्ष म्हणून पदनिर्देशित केले ज्यामुळे फक्त MJJ नियमांचेच उल्लंघन झाले असे नाही तर हितसंघर्षाची परिस्थिती निर्माण झाली.</td></tr>
<tr><td></td><td>(ii)राज्य सल्लागार मंडळ हे शासनाला, बालगृहांची स्थापना आणि अनुरक्षण, साधन संपत्तीला चालना देणे, काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी आणि विधिसंघर्षग्रस्त बालकांसाठी शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन</td></tr>
</table></td><td>महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ आणि सुधारीत नियम २०११ यामध्ये राज्य सल्लागार मंडळाबाबत करण्यात आलेली तरतूद ही बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० आणि सुधारीत अधिनियम २००६ च्या अनुषंगाने करण्यात आलेली होती. त्यानुसार राज्य सल्लागार मंडळावर अशासकिय सदस्यांची नेमणूक करण्यात आलेली होती. तसेच सल्लागार मंडळाच्या नियमीत बैठकी आयोजित करण्यात येत होत्या. तथापि, राज्य सल्लागार मंडळाचे अध्यक्ष यांचा कालावधी संपुष्टात आल्याने तसेच सदर मंडळावर काम करण्यास निवृत्त न्यायाधीश इच्छुक नसल्याने अध्यक्ष पदावर निवड करता आलेली नाही. तथापि राज्यातील बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळावर सदस्यांचा कालावधी संपुष्टात आल्याने नविन सदस्यांची नियुक्ती करण्याकरिता राज्य सल्लागार मंडळाच्या नियमीत बैठका होणे आवश्यक होते. बाल कल्याण समिती आणि बाल न्याय मंडळावर नविन सदस्यांची नेमणूक झाली नाही तर त्याचा परिणाम काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांबाबत योग्य तो निर्णय घेण्यामध्ये होणार होता. या बाबीचा विचार करुन शासनाने राज्य सलागार मंडळाचे कामकाज सुरु राहण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात अध्यक्ष पदाचा कार्यभार सचिव, महिला व बाल</td></tr>
</table>

			यांच्या सुविद्यांची तरतूद करणे याविषयी सल्ला देते, लेखापरीक्षेला असे आढळून आले की मार्च २०१० ते डिसेंबर २०१४ दरम्यान राज्य सल्लागार मंडळाच्या झालेल्या १३ बैठकांमध्ये फक्त cwc, JJB आणि जिल्हा सल्लागार मंडळाच्या सदस्यांच्या नियुक्तिविषयी चर्चा करण्यात आली होती	विकास यांचेकडे देण्यात आला होता. केंद्र शासनाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ नव्यानेच कार्यान्वीत केला असून सदरचा अधिनियम कार्यान्वीत करण्यात आल्याने यापुर्वीचा अधिनियम २००० आणि सुधारीत अधिनियम २००६ रद्दबद्दल करण्यात आला आहे. त्यामुळे या कायद्यांमधील तरतूदी आपोआपच रद्द झाल्या आहेत. बाल न्याय अधिनियम २०१५ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाचे नियम तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच सद्यास्थितीत राज्य सल्लागार मंडळा ऐवजी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००७ मधील नियम ९१ अन्वये निवड समिती गठित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
		बाल कल्याण समिती	(i)३५ cwc पैकी १४ cwc मध्ये आणि ३५ cwc पैकी एका cwc मध्ये २०११ पासून अनुक्रमे एक आणि दोन सदस्यांची कमतरता होती जे jj अधिनियमाच्या कलम २९ (१) च्या विरुध्द होते शासनाने जून २०११ पासून सदस्य नियुक्त न केल्याबाबत विशिष्ट कारण न देता असे सांगितले की, सदस्य नियुक्तिसाठी संबंधित जिल्हयांकडून आवेदने मागविण्याची कार्यवाही केली जाईल.	आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्याकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन अधिसूचना दिनांक ०२.०४.२०१३, दिनांक ०१.०१.२०१४,दि.०६.०६.२०१४ दिनांक २४.०७.२०१६, दिनांक ११.०८.२०१४ व दिनांक १८.११.२०१४ अन्वये राज्यातील सर्व बाल कल्याण समित्यांसाठी अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदरील नियुक्ती करतांना प्रत्येक बाल कल्याण समितीवर कमीत कमी ३ सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. तसेच बाल कल्याण समित्यावर अध्यक्ष व ४ सदस्य असावेत यासाठी आयुक्त महिला व बाल विकास पुणे यांच्याकडून वेळोवेळी नामांकने मागविण्यात आलेली होती. तथापि, बाल कल्याण समितीवर नियुक्ती झाल्यानंतर काही सदस्यांनी आपल्या पदाचा परस्पर राजीनामा दिलेला आहे तर काही सदस्यांना पदाचा दुरुपयोग

				केला या कारणाने त्यांना पदावरुन बडतर्फ करण्यात आलेले आहे. त्यामुळे काही जिल्हयांमध्ये बाल कल्याण समिती सदस्यांच्या जागा रिक्त असल्याचे दिसून येते. रिक्त असलेल्या जागांवर नियुक्ती करणेसाठी नामांकने सादर करणेबाबत आयुक्त कार्यालयास कळविण्यात आलेले आहे. तसेच बाल न्याय अधिनियम,२०१५ मधील तरतूदीनुसार प्राप्त नामांकने शिफारशीसाठी निवड समितीस सादर करण्यात येतात. त्यानुसार राज्यस्तरीय निवड समिती गठित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
			(ii) २०१०-१५ दरम्यान ३५ cwc पैकी एकाही cwc ने बालकांच्या प्रलंबित प्रकरणांबाबत अर्धवार्षिक अहवाल राज्य शासनाला सादर केले नव्हते ज्यामुळे MJJ नियमांच्या नियम ७ B (१०) चे उल्लंघन झाले होते शासनाने सांगितले की, सर्व cwc ना प्राप्त झालेल्या, निपटारा झालेल्या आणि प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा आवश्यक अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत उत्तरावरुन असे स्पष्ट निर्देशित होते की, cwc कडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे पुनर्विलोकन करण्यात शासन उदासिन आहे.	बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे निरीक्षण व मुल्यमापन करण्याचे अधिकार बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम अन्वये आयुक्त, महिला व बाल विकास यांना आहेत. तथापि, आयुक्त कार्यालयाने दिनांक १५.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदरील अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना प्रदान केले आहेत. तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यिांच्याकडून याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.
			(iii) MJJ नियम, २०११ च्या नियम ८ (८) नुसार, काळजी व संरक्षण करण्याची गरज असलेल्या बालकांच्या संबंधातील प्रकरणांचा अंतिम निकाल किमान तीन सदस्यांच्या आदेशाव्दारे देण्यात यावा वर्ष २०१४-१५ दरम्यान, नऊ पैकी पाच cwc नी निकाली काढलेल्या ६७५ प्रकरणांत[१५] निर्धारित तीन सदस्यांऐवजी फक्त दोन सदस्यांकडून निर्णय घेतला गेला होता शासनाने सांगितले की, cwc नां MJJ नियमांचे पालन करण्याच्या सूचना जारी केल्या आहेत, तथापि उत्तरात cwc कडून MJJ नियमांचे पालन केले जात नसल्याची कारणे ठळकपणे दिली नव्हती	बाल न्याय नियम, २०११ च्या नियम ८ (ग) नुसार, काळजी व संरक्षण करण्याची गरज असलेल्या बालकांच्या संबंधातील प्रकरणांचा अंतिम निकाल किमान तीन सदस्यांच्या आदेशाव्दारे देण्याची तरतूद आहे त्यानुसार प्रत्येक जिल्हयात १ अध्यक्ष व ४ सदस्य यांची नियुक्ती करण्याबाबत सन २०११ मधे शासनाला प्रस्ताव पाठविलेला आहे परंतु दिनांक २ एप्रिल २०१३ रोजीच्या अधिसुचननेनुसार ३१ जिल्हयात अध्यक्ष / सदस्यांची नियुक्ती झालेली आहे या नियुक्त झालेल्या बाल कल्याण समिती तील काही जिल्हयातील सदस्यांनी त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव राजीनामा दिलेला आहे तसेच काही

				सदस्यांच्या बाबत तक्रारी असल्याने त्यांचे निलंबन करण्यात आलेले आहे यामुळे २ सदस्य असल्याचे दिसून येत आहे.
				बाल कल्याण समितीने दिलेला राजीनामा आणि नवीन नियुक्ती करण्यासाठी लागणारा कालावधी यामुळे बाल कल्याण समितीतील सदस्यांची पदे रिक्त रहात आहेत. परंतु जिल्हामधे काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची प्रकरणे प्रलंबित राहू नये तसेच बालकांचे हक्क अबाधित ठेवण्याच्या दृष्टिने या बालकांच्या प्रकरणी त्वरीत निर्णय घेणे आवश्यक आहे अन्यथा सदर प्रकरण प्रलंबित राहिल्याने त्याचापरिणाम बालकाच्या एकंदरीत विकासावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच बालकांच्या बाबतीत असणा-या कायदयाचा विचार करता तसेच **बाल हक्क संहिताचे** In the best interest of child हे तत्व विचारात घेता अशा प्रकारची कृती बालकाच्या हिताच्या दृष्टिने शासनाने केलेली आहे तथापि ज्या बाल कल्याण समिती कडून महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०११ नियम ८ नुसार कार्यवाही करण्याबाबतचा सुचना सर्व बाल कल्याण समितीना देण्यात आलेल्या आहेत व सदर परिपत्रकानुसार कार्यवाही होते किंवा नाही याबाबतचे निरीक्षण जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत केले जाते.
		(iv) निवड केलेल्या नऊ पैकी चार cwc मध्ये मूळ दस्तऐवज (प्रकरणे नोंदवहया, हमीच्या नोंदवहय, अंतिम आदेशांच्या नोंदवहया इत्यादी) ठेवले		आयुक्तालयाचे दिनांक १५.६.२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये जिल्हा महिला वबाल विकास अधिकारी यांना मुल्यमापन

			नव्हते, ज्यामुळे MJJ नियम २०११ च्या नियम ८B चे उल्लंघन झाले, शासनाने सांगितले की cwc ना नियमांप्रमाणे दस्तऐवज ठेवण्याबद्दल निर्देश देण्यात आले आहेत.		करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत त्यानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडून त्याबाबतची खात्री करण्यात येत आहे. बाल कल्याण समितीने नियमानुसार दस्तावेज ठेवावे या करिता ३१ बाल कल्याण समितीच्या कामकाजात मदत करण्यासाठी एकात्मिक बाल संरक्षण योजना अंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटरची नेमणूक करण्यात आलेली आहे. दस्तएवेज ठेवण्याबाबत कळविण्यात आलेला आहे.
			(v) MJJ नियमाच्या नियम ८(२३) नुसार प्रत्येक cwc ने cci मधल्या प्रत्येक बालकाच्या प्रगतीचा वार्षिक आढावा घेणे आवश्यक असते, तथापि नऊ पैकी, चार[१६] cwc नी २०१०-१५ दरम्यान वार्षिक आढावा घेतला नव्हता. मुंबई शहर आणि परभणी येथील CWC मध्ये वार्षिक आढाव्याचे दस्तऐवज ठेवले जात नव्हते तर अहमदनगर येथे वर्ष २०१३-१४ पासून पुढे वार्षिक आढावा घेतला गेला होता, शासनाने सांगितले की, सर्व cwc नां त्यांनी घेतलेल्या वार्षिक आढाव्याचे प्रगती अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.		बाल कल्याण समिती यांनी बालगृहात दाखल केलेल्या बालकांच्या बाबतीत बालकांच्या प्रगतीचा आढावा अशा सुचना देण्यात आलेल्या होत्या तसेच या संदर्भात कार्यवाही होत असल्याची खात्री ही बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे मुल्यमापन करताना करण्यात यावी अशा ही सुचनाआयुक्तालयाने दिलेल्या आहेत, तसेच आयुक्तालयाचे दिनांक १५.६.२१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हयातील कार्यरत बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे निरिक्षण व मुल्यमापन करण्याचे अधिकारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेला आहे यानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे निरीक्षण व मुल्यमापन करीत आहे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ हा नवीन कायदा देशात दिनांक १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यात आल्याने त्यामधील तरतूदीनुसार बाल कल्याण समितीने काळजी व संरक्षणाच्या बालकांच्या प्रकरणी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी तसेच अधिनियमातील

			तरतूदीचे पालन करावे अशा सुचना अदिनांक १.६.२०१६ अन्वये बाल कल्याण समित्यांना देण्यात आयुक्तालयाचे परिपत्रक क्र. २४२ आलेल्या आहेत. (सोबत प्रत जोडण्यात आली आहे)
	निवड समिती	JJ नियमांच्या नियम ९१ नुसार राज्य शासनाने अधिकृत राजपत्रात अधिसूचीत करुन सात सदस्य असलेली एक निवड समिती पाच वर्षासाठी गठीत करावी. या निवड समितीने राज्य बाल संरक्षण कक्ष किंवा राज्य शासनाला राज्य सल्लागार मंडळ किंवा जिल्हा सल्लागार मंडळावर नियुक्त करण्यासाठी एका क्रमनामिकेची निवड करुन शिफारस करावयाची होती तथापि, सप्टेंबर २०१५ पर्यन्त राज्य शासनाकडून एकही निवड समिती गठित करण्यात आली नव्हती निवड समितीच्या सदस्यांच्या नियुक्तिसाठी नामनिर्देशने मागविण्यात आली असल्याचे शासनाने सांगितले	सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधे नमूद करण्यात आलेली तरतूद ही बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००७ नुसार नमूद करण्यात आलेली आहे तथापि बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० मधील कलम ६२ अन्वये राज्य शासनास त्यांचे स्वत:चे नियम तयार करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे त्यानुसार राज्य शासनाने सदर तरतुदीच्या अधिन राहून महाराष्ट्र राज्यासाठी सन २००२ आणि सुधारित अधिनियम २००६ नुसार सन २०११ मधे महाराष्ट्र राज्यासाठी नियमावली लागू करण्यात आलेली आहे त्यामुळे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००७ मधील तरतूदी महाराष्ट्र राज्यास लागू नाहीत असे मत आहे तसेच महाराष्ट्र राज्याकरिता लागू करण्यात आलेल्या स्वतंत्र नियमावली मध्ये निवड समिती गठित करण्याबाबत कोणतीही तरतूद नसल्याने सदर समिती गठित करण्यात आलेली नाही तथापि, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण)

				अधिनियम २००० मधील कलम ६२ नुसार राज्य सल्लागार मंडळाचे गठण करण्यात आलेले होते बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ मधील नियम १२ अन्वये बाल कल्याण समिती आणि बाल न्याय मंडळावर सदस्यांची नियुक्ती करण्याकरिता प्राप्त नामांकने सदर मंडळाच्या बैठकीत शिफारशीकरिता सादर करण्यात येत होती आणि त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिफारशीनुसार शासनाने सदस्यांची निवड केलेली आहे नियम २००७ मधील तरतुदी महाराष्ट्र राज्यास लागू नसल्याने शासनाने नियम (९१) नुसार निवड समिती गठित करण्याची कार्यवाही केलेली नाही मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिका प्रकरणी मा.न्यायालयाने शासनाने नियम २००७ मधील नियम ९१ नुसार कार्यवाही केलेली नसल्याचे आदेशात नमूद केले होते त्यानुसार राज्यस्तरीय निवड समिती Selection Committee गठित करण्या बाबत शासन स्तरावरुन कार्यवाही चालू आहे.
		बाल न्याय मंडळ	(i) JJ अधिनियमाच्या कलम ४(२) नुसार, JJB मध्ये एका न्यायिक दंडाधिका-याचा आणि दोन समाजसेवकांचा सदस्य म्हणून समावेश असावा. ज्या ३० जिल्हयांमध्ये JJB ही पूर्ण क्षमतेने काम करीत होती त्या व्यतिरिक्त तीन[१७] जिल्हयांमध्ये या मंडळात दोन सदस्यांची तर दोन[१८] जिल्हयांमध्ये एका सदस्याची कमतरता होती. शासनाने असे सांगितले की, पुणे आणि बीड येथील JJB मध्ये सदस्य नियुक्ती ही त्यांच्याच स्तरावर प्रलंबीत होती तर परभणी	शासन अधिसूचना दिनांक ५.११.२०१५ अन्वये पुणे आणि बीड येथील बाल न्याय मंडळाच्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली असुन, दोन्हीही बाल न्याय मंडळे पूर्ण क्षमतेने सुरु आहेत. सदयस्थितीत बाल न्याय मंडळ परभणी येथे नवीन सदस्य नियुक्तीचा प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. या आधि नियुक्त

			येथील नियुक्तीचा प्रस्ताव मुंबई उच्च न्यायालयात सादर केलेला होता. पुढे शासनाने असेही सांगितले की, अहमदनगर आणि जालना जिल्हयांमध्ये सदस्यांच्या नियुक्तीसाठी कार्यवाही केली जाईल.		करण्यात आलेल्या सदस्यांकडून बाल न्याय मंडळाचे कामकाज पाहिले जात आहे. बाल न्याय मंडळ अहमदनगर येथील दोन सदस्यांपैकी श्रीमती नीलमणी गांधी यांचे नामांकनास मा.उच्च न्यायालयाने असहमती दर्शविली असल्याने बाल न्याय मंडळाच्या एका रिक्त पदासाठी अन्य पात्र सामाजिक कार्यकत्यांची नामांकने आयुक्तालयास सादर करणेबाबत पत्र क्र.४४२० दिनांक १७.७.२०१४ व स्मरणपत्र क्र.७८४० दिनांक २६.११.२०१४ अन्वये जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, अहमदनगर यांना कळविण्यात आले आहे. राज्य सल्लागार मंडळाच्या दिनांक ३१.०८.२०१३ रोजी झालेल्या बैठकीत बाल न्याय मंडळ, जालना करीता दोन सामाजिक कार्यकर्त्यांची शिफारस करण्यात आलेली होती. त्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयाचे पत्र क्र.६६०८ दिनांक ०७.१०.२०१३ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला होता, तथापि, शासन अधिसूचना दिनांक ०३.०५.२०१४ नूसार सामाजिक कार्यकर्त्यांची इतर दोन सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.
			(ii) MJJ नियमाच्या नियम ६(९C) नुसार, विधीसंघर्षग्रस्त बालकांची चौकशी, पोलीसांकडून अंतिम अहवाल प्राप्त झाल्याच्या तारखेपासून चार महिन्याच्या (जो पुढे दोन महिन्यांकरीता याढविता येतो) आंत पूर्ण करावयाची असते. राज्यात २०१० मध्ये JJB कडे प्रलंबित असलेल्या २६,११६ प्रकरणांमध्ये घट होवून एप्रिल २०१५ अखेरीस ती १४,७५३ एवढी राहीली. परंतु, निवड केलेल्या नऊ जिल्हयांपैकी तीन[१९] जिल्हयात, डिसेंबर २०१३ मध्ये असलेल्या २,६७६ प्रकरणांत वाढ होवून एप्रिल २०१५ च्या अखेरीस ती ३,१८८ इतकी झाली		JJ अधिनियमाच्या कलम ४ (२) नुसार JJB मध्ये एका न्यायिक दंडाधिकाऱ्याचा आणि दोन समाजसेवकांचा सदस्य म्हणून समावेश आहे. बाल न्याय मंडळाचे अध्यक्ष हे न्याय विभागाचे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी अथवा समकक्ष न्यायाधिश असुन, सामाजिक कार्यकर्त्यांची इतर दोन सदस्य म्हणून नियुक्ती केली जाते.

			होती. JJB कडून प्रलंबीत प्रकरणांचे कालावधीनिहाय विश्लेषण मागविणेत आले होते जे जानेवारी २०१६ पर्यंत प्रतिक्षित होते. शासनाने सांगितले की, मुंबई उच्च न्यायालयाकडून JJB ला प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबद्दल वेळोवेळी सूचना जारी करण्यात आल्या आहेत.	बाल न्याय मंडळाचे अध्यक्ष हे न्याय विभागाचे न्यायदंडाधिकारी असल्याने, शासनाने मुंबई उच्च न्यायालयास राज्यातील बाल न्याय मंडळाकडे असणाऱ्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्या बददल विनंती केली आहे. सदरचा मुददा विधी व न्याय विभागाशी संबंधित आहे.
			(iii) MJJ नियमाच्या नियम ४A(१०) नुसार, JJB ने राज्य शासनांस तसेच, मुख्य न्यायिक दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिका-यांना प्रलंबित प्रकरणांचे अर्धवार्षिक अहवाल त्यांच्या बैठकीत पुनर्विलोकनासाठी किंवा आवश्यकता असल्यास अतिरिक्त मंडळे गठीत करणेसाठी सादर करावयाचे असतात. वर्ष २०१०-२०१५ दरम्यान ३५ पैकी एकाही JJB ने कोणतेही अर्धवार्षिक अहवाल राज्यशासनांस सादर केलेले नव्हते. शासनाने सांगितले की, JJB कडून शासनांला अर्धवार्षिक अहवाल सादर करण्यात येतील याची सुनिश्चिती करण्यासाठी कार्यवाही केली जाईल.सर्वोच्च स्तरावर (राज्य शासन) जबाबदारीचा अभाव असल्याचे या उत्तरावरुन स्पष्टपणे दिसते.	

१५ अहमदनगर २६७, लातूर १२१, उस्मानाबाद ३५,पुणे २३५ आणि परभणी १७

१६ लातूर, नागपूर, उस्मानाबाद आणि पुणे

१७ पुणे, परभणी आणि बीड

१८ अहमदनगर आणि जालना

१९ पुणे, परभणी आणि नांदेड

आयुक्त,
महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य,
२८, राणीचा बाग, पुणे

जाक्रमबाविआ/बावि/का-५/प्रप्र/बाकस/ परिपत्रक/ २०१६-१७/महाराष्ट्र राज्य पुणे/ 282 दिनांक : १.६.२०१६

परिपत्रक

राज्यातील बाल न्याय अधिनियम २०१५ अंतर्गत दाखल होणाऱ्या आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या संस्था प्रवेशाबाबत बाल कल्याण समितीने अवलंबवावयाच्या कार्य पध्दती बाबत .....

राज्यामध्ये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ ची अंमलबजावणी करण्यात येते. या अधिनियमातील कलम २९ (१) नुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या प्रकरणी त्यांच्या पुनर्वसन व सामाजिक पुनःस्थापनासाठी निर्णय घेण्याचे अधिकार अधिनियमातील कलम २७ (१) नुसार स्थापन करण्यात आलेल्या बाल कल्याण समितीस आहेत. त्यामुळे काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक समिती समोर सादर होवून त्याबालकास अधिनियमाच्या कलम ५० (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या बालगृहात दाखल करण्याचे अधिकारही बाल कल्याण समितीस आहेत. परंतु काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकास बालगृहात प्रवेश देण्याबाबत निर्णय घेताना अधिनियमातील काही तरतुदींचे पालन करणे आवश्यक असुनही बाल कल्याण समितीकडून अशाप्रकारचे पालन होताना दिसत नाही आणि त्यामुळे या अधिनियमाची परिणामकारक अंमलबजावणी होवू शकत नाही.

काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांबाबत निर्णय घेताना बाल कल्याण समिती कडून केवळ गरीबी, शिक्षणाची गरज असे निकष लावून बऱ्याच मुलांना बाल न्याय कार्यक्रमा अंतर्गत आणण्याचा प्रयत्न केला जातो आणि बालगृहांमध्ये दाखल केल्या जात आहे. केवळ गरीबी, शिक्षणाची गरज असे निकष लावून बालगृहात दाखल करण्यात आलेली बालके ज्या कालावधीत शाळांना सुट्टी असते अशा दिवाळी, उन्हाळी सुट्टीत आपआपल्या पालकांकडे परत जात असतात. या कालावधीकरीता त्यांचे पालक सक्षम असतात असे निदर्शनास येते. यामुळे अशा पालकांना अपात्र असलेले (unfit) किंवा असमर्थ पालक (incapacitated) ठरवून या बालकांना बालगृहात दाखल करण्यात येते. त्यामुळे काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकाबाबत संस्था प्रवेशाबाबतचा निर्णय घेताना अधिनियमाला अभिप्रेत असलेली बालगृहाची संकल्पना आणि बाल न्याय कार्यक्रमा अंतर्गत आलेल्या बालकाचे पुनर्वसन आणि सामाजिक पुनःस्थापन याची गरज याबाबींकडे पूर्णतः बाल

२८ ३१ दिवस

कल्याण समितीचे दूर्लक्ष होते. काही वेळेस बालकाला फार कमी कालावधीसाठी काळजी व संरक्षणाची गरज असते. परंतु या बाबींचा विचार बाल कल्याण समितीकडून करण्यात येत नाही. अशा पध्दतीने बालकांना बालगृहात दाखल करुन या बालकांचा कुटुंबात रहाण्याचा हक्क हिरावून घेतल्या जात असल्याचे निदर्शनास येते. काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक बालगृहात दाखल करण्यासाठीचे आदेश बाल कल्याण समितीकडून दिल्यानंतर त्या बालकाबाबतचा गृह चौकशी अहवाल आणि सामाजिक चौकशीचा अहवाल यांचा विचार करुन बालकांना संस्था प्रवेशाची गरज किती कालावधी साठी आहे ही बाब विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच वेळोवेळी याबाबत आढावा घेवून बालकांच्या आवश्यकतेनुसार यापुर्वी दिलेल्या आदेशामध्ये सुधारणा करणे अपेक्षित आहे. परंतु अशा प्रकारची कार्यवाही होत नसल्याने बालक बराच काळ संस्थेत राहुन कौटुंबिक वातावरणापासून वंचित रहातो.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील तरतुदींची अंमलबजावणी करताना अधिनियमाच्या कलम ३ मध्ये अमंलबजावणी करणाऱ्या सक्षम प्राधिकरणांनी खालील मार्गदर्शक तत्वांचा विचार करण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार बालकांचा संस्था प्रवेशासाठी निर्णय घेताना प्रवेशाबाबत बाल कल्याण समितीने खालील महत्वाची मार्गदर्शक तत्वे विचारात घेणे आवश्यक आहे.

- कलम ३(३) नुसार सहभागीतेचे तत्व (*Principle of participation*)
- कलम ३(४) नुसार बालकाचे हिताचे तत्त्व (*Principle of best interest*)
- कलम ३(५) नुसार कुटुंबाच्या जबाबदारीचे तत्व(*Principle of family responsibility*)
- कलम ३(१२) नुसार संस्था प्रवेश हा पुनर्वसनाचा अंतिम पर्याय (*Principle of institutionalisation as a measure of last resort*)
- कलम ३ (१३) नुसार बालकाची मायदेशी रवानगी आणि कुटुंबात प्रस्थापनाचे तत्व (*Principle of repatriation and restoration*)

तथापी बालकाला संस्थेत दाखल करण्याचे आदेश देताना बाल कल्याण समितीकडून या तत्वांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. समिती समोर येणाऱ्या काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या प्रत्येक बालकाला बालगृहात दाखल करणे हा एकमेव पर्यायाचा वापर बाल कल्याण समितीकडून केला जात आहे. पर्यायाने बाल कल्याण समिती केवळ येणाऱ्या बालकाला बालगृहात दाखल करणे किंवा प्रवेश नाकारणे एवढ्याच कामाकरीता सिमित असल्याचे चित्र दिसून येते. बालकाच्या संस्था प्रवेशामध्ये अधिनियमातील तरतुदींचा विचार करता बाल कल्याण समितीकडून बालगृहामध्ये प्रवेश देताना उपयोगात येत असलेल्या पध्दतीमध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या आहेत.

सध्याच्या प्रवेश पध्दतीतील त्रूटी

- बालगृहात दाखल झालेल्या बालकांची संख्या पहाता बहुतांश बालकांचे प्रवेश हे मान्यता प्राप्त संस्थेकडूनच बाल कल्याण समितीला सादर झालेल्या अर्जावरच होतात.

२८) २३/दि नि

- अधिनियमातील तरतुदीनुसार बालकाच्या बाबतीत कोणतीही चौकशी बाल कल्याण समितीकडून करण्यात येत नाही. काही वेळेस या संस्थेकडून मुल सादर केले जाते त्या संस्थेच्या सामाजिक कार्यकर्ता किंवा कर्मचारी यांचेकडून गृह चौकशी अहवाल सादर करण्यात येतो (या कर्मचाऱ्यांकडे पुरेशी शैक्षणिक पात्रता किंवा अनुभव नसतो) आणि या अहवालावरच बालक संस्थेत दाखल देण्याचे आदेश दिले जातात.
- संस्थांकडून जुन -जुलै या कालावधीतच जास्ती जास्त बालके बाल कल्याण समिती समोर सादर होवून त्यांना दाखल आदेश दिले जातात. या व्यतिरिक्तच्या कालावधीत केवळ पोलिस आणि चाईल्ड लाईन यांचे मार्फतच मुले सादर होत असतात. यावरुन या बालकांना पुनर्वसन व सामाजिक पुन:स्थापनाची गरज नसून शिक्षणाची गरज असल्याचे दिसून येते. यामुळे बालगृहांचा केवळ वसतीगृह म्हणून उपयोग होताना दिसत आहे.
- संस्थेकडून १०० ते १५० बालके एका वेळेस (केवळ कागदपत्रे सादर करण्यात येतात प्रत्यक्षात बालक सादर होत नाही) बाल कल्याण समिती समोर सादर करण्यात येतात आणि बाल कल्याण समिती एकाच दिवसात या सर्व बालकांचा कोणताही सामाजिक तपास (Social Investigation) अहवाल किंवा चौकशी अहवाल न घेता या मुलांचे बालगृहात दाखल करण्याचे आदेश निर्गमीत करते.
- संस्थेकडून सादर होणाऱ्या गृह चौकशी अहवालामध्ये एकाच प्रकारचा अहवाल केवळ नाव व तत्सम बाबी बदलुन दिल्या जातो. या अहवालाबाबत कोणतीही शहनिशा बाल कल्याण समिती कडून केल्या जात नाही
- काही वेळेस बाल कल्याण समितीच्या एकाच सदस्याकडून संस्थेस भेट देवून कोणतीही चौकशी न करता केवळ संस्थेच्या अर्जावर दाखल करण्याचे अभिप्राय नोंदविण्यात येतात. परंतु सदस्याने अशा प्रकारच्या घेतलेल्या निर्णयाबाबत समितीच्या बैठकीत त्यास मान्यता घेण्यात येत नाही
- ज्या बालकांना संस्थेत दाखल करण्यात येत आहे अशा बालकांना अधिनियमाच्या कोणत्या कलमाखाली दाखल करण्यात आले आहे हे आदेशात नमूद नसते. काही वेळेस दाखल आदेशावर केवळ एका सदस्याची स्वाक्षरी असते. काही आदेशावर स्वाक्षरी तसेच दिनांक व जावक क्रमांक आढळून येत नाही
- बाल कल्याण समिती समोर बालक सादर झाल्यानंतर प्रथम त्या बालकांस कुटुंबात प्रस्थापीत होण्यासाठी बाल कल्याण समितीकडून प्रयत्न करणे आवश्यक असते. असे प्रयत्न करुनही बालकाचे कुटुंब मिळत नसेल तर या बालकाला संस्थाबाहय सेवा उपलब्धतेसाठी प्रयत्न करावा लागतो व अंतिम पर्याय म्हणून संस्थेत दाखल करावे असे कायद्याला अभिप्रेत आहे परंतु अशा प्रकारची कार्यवाही न होता बाल कल्याण समितीकडून बालकाला बालगृहात दाखल करण्याबाबत प्राथमिकता दिली जाते.
- बहुतकरुन बाल कल्याण समिती समोर दाखल होणारी बालके यांना शिक्षणासाठी तेथे आणलेले असते. परंतु या बालकांना अधिनियमाच्या कलम २ (१४) (v) नुसार मुलाची काळजी घेण्यासाठी अपात्र असलेल्या (unfit) किंवा असमर्थ पालकाचे बालक असे दाखवून काळजी व संरक्षणाच्या व्याख्येत बसवून बालगृहात दाखल करण्यात येते.
- बाल कल्याण समितीकडून बालगृहात दाखल करण्याचे आदेश निर्गमीत करताना त्या बालकास पुनर्वसन आणि सामाजिक पुन:स्थापनाची गरज आहे किंवा नाही याची खात्री न करता संस्था प्रवेश देण्यात येतो.
- बालकाच्या संस्था प्रवेश प्रकरणी बाल कल्याण समितीमध्ये कोणत्याही प्रकारची चर्चा होवून निर्णय घेतला जात नाही.
- बालकाला संस्थेत दाखल करण्याबाबतची प्रवेश पध्दती याबाबत कोणतेही निकष बाल कल्याण समितीकडून पाळले जात नाहीत. सदरहु बाब नियमबाहय आहे.

बालकांच्या संस्था प्रवेश पध्दती बाबत बाल कल्याण समिती कडून वरील प्रमाणे कार्यवाही होत असल्याने बाल न्याय कायद्यात पुनर्वसन व सामाजिक पुन:स्थापनाची गरज नसलेली मुले दाखल होत आहेत आणि अशा बालकांना संस्था प्रवेश देवून बालकाचा कुटुंबात रहाण्याचा हक्क हिरावून घेण्यात येत आहे. तसेच बाल न्याय कार्यक्रमावर अनाश्यक ताण पडून

२९३ ३५/हिंदी

कार्यक्रमाचा दर्जा राखला जात नाही. यामुळे बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ ची परिणामकारक अंमलबजावणी राज्यात होताना दिसत नाहीत. बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ नुसार कायद्यामध्ये अभिप्रेत असलेली व्याख्या आणि प्रवेश कार्यपध्दती अभिप्रेत आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व सरंक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम २ (१४) मध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलाबाबतची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

१. ज्यांना घर किंवा निवारा नाही, निर्वाहाचे साधन नाही
२. कामगार कायदायाच्या उल्लंघनाने झालेले बाल कामगार, भिक मागत असलेले आणि रस्त्यावर रहाणारी
३. मुले अशा व्यक्तीं बरोबर (जी मुलाचे पालक असो किंवा नसो) रहातात आणि अशी व्यक्तीः
   i) मुलास हानी पोहचवित असले, मुलाचे शोषण करीत असले, मुलावर अत्याचार करीत असेल, मुलाकडे दूर्लक्ष करीत असेल किंवा त्याबेळेस बालकांच्या संरक्षणासाठी असणाऱ्या कायद्याचे उल्लंघन करीत असेल
   ii) जीवे मारण्याची धमकी देत असेल, हानी पोहचवीत असेल, किंवा मुलाचे शोषण करीत असेल किंवा असे करण्याची शक्यता असेल
   iii) व्यक्तीने एखाद्या बालकास किंवा बालकांना ठार मारले असेल, अत्याचार केला असेल, दुर्लक्षित केले असेल आणि अशाप्रकारची शक्यता मुलाच्या बाबतीत होणार असेल
४. मानसिकदृष्टया आजारी, मतिमंद, अपंग किंवा दुर्धर किंवा असाध्य आजाराने ग्रस्त आणि अशा मुलाची काळजी घेण्यासाठी कोणीही सहाय्य करण्यास नसेल किंवा पालक काळजी घेण्यास असमर्थ असतील असे सक्षम प्राधिकरणाच्या निदर्शनास आले असेल तर
५. पालक असलेल्या बालकांच्या बाबतीत बालकास काळजी व संरक्षणाची गरज असून पालक हे काळजी व संरक्षण करण्यासाठी असमर्थ असल्याचे समितीच्या निदर्शनास आल्यास
६. पालक नसलेले किंवा काळजी घेण्याकरीता कोणतीही व्यक्ती इच्छूक नसल्याने किंवा पालकांनी सोडून दिल्याने किंवा परित्याग केल्याने
७. हरविलेले किंवा पळून गेलेले किंवा किंवा प्रयत्न करुनही पालकांना न सापडलेले
८. अत्याचरीत, छळ झालेले, लैंगिक किंवा बेकायदेशीर कृतीसाठी अत्याचारीत किंवा होण्याची शक्यता असलेले,
९. असुरक्षित किंवा मानवी व्यापार अथवा मादक पदार्थांच्या दुरुपयोगासाठी समाविष्ठ होण्याची शक्यता असलेले आणि तिचे पालक, कुटुंबातील व्यक्ती, किंवा इतर कोणतीही व्यक्ती लग्नविधीला जबाबदार असतील
१०. गैरवाजवी फायद्याकरीता छळ करण्यात आलेले किंवा त्याची शक्यता असलेले
११. सशस्त्र संघर्ष, नैसर्गीक आपत्ती, नागरी अशांतता यांच्या प्रभावास बळी पडलेले
१२. लग्नाच्या वयाच येणापुर्वी लग्नामुळे सुस्पष्ट धोका निर्माण झालेले आणि तिचे पालक, कुटुंबातील व्यक्ती, किंवा इतर कोणतीही व्यक्ती लग्नविधीला जबाबदार असतील

उपरोक्त प्रमाणे कायद्यात काळजी व संरक्षणाच्या मुलांची व्याख्या केली आहे. तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलाबाबत अवलंबवयाची कार्यपध्दती याबाबत कायद्यामध्ये पुढीलप्रमाणे तरतुद करण्यात आली आहे.

- कलम ३१ (२) अन्वये राज्य शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार चौकशी कालवधीत बालकाला बालगृहामध्ये किंवा योग्य संस्थेमध्ये (Fit Institute), योग्य व्यक्ती (Fit person) यांचेकडे सोपविण्यात यावे.
- कलम ३२ (१) अन्वये ज्या संस्था, व्यक्ती, पोलिस ऑफीसर, नर्सिंग होम, रुग्णालय, प्रसुतीगृह यांनी मुलाचा ताबा घेतलेला असेल अशांनी २४ तासाच्या आत प्रकरणानुसार चाईल्ड लाईन, जवळचे पोलिस स्टेशन, बाल कल्याण समिती किंवा जिल्हा बाल संरक्षण कक्षापैकी एकाकडे माहिती देणे किंवा एखाद्या मान्यता प्राप्त संस्थेत दाखल करणे बंधनकारक आहे

२९५

कलम ३३ (२) अन्वये ३२ (१) नुसार ताब्यात घेतलेल्या मुलाची माहिती बालकाच्या प्रकरणानुसार संबधित यंत्रणांनी केंद्र शासनाच्या पोर्टलवर Uploaded करणे बंधनकारक आहे.

कलम ३६ (१) अन्वये बाल कल्याण समिती समोर बालक सादर झाल्यानंतर समिती बालकाबाबत चौकशी करुन त्यानंतर बालकाला बालगृह/ योग्य संस्थेमध्ये (Fit Institute)/योग्य व्यक्ती (Fit person) यांचेकडे सुपूर्त करण्याबाबत आदेश देईल

कलम ३६ (२) अन्वये बालकाबाबतचा सामाजिक तपास (Social Investigation) १५ दिवसात पूर्ण करुन बालक बाल कल्याण समितीसमोर दाखल झालेल्या दिनांकापासून ४ महिन्याच्या आत अंतिम आदेश देईल

कलम ३६ (३) अन्वये बालकाबाबत प्राप्त झालेल्या चौकशी अहवालानुसार बालकाला कोणतेही कुटुंब किवा आधार नसल्याची समितीची खात्री झाल्यानंतरच या बालकाला बालगृहामध्ये किवा योग्य संस्थेमध्ये (Fit Institute), योग्य व्यक्ती (Fit person) यांचेकडे सोपविण्यात यावे.

कलम ३६ (३) अन्वये बालकास बालगृहात दाखल केले नंतर समितीने सदर प्रकरणाचा नियमीतपणे आढावा घ्यावा असे नमूद आहे.

अधिनियमाच्या प्रकरण ७ मध्ये बाल न्याय कार्यक्रमात दाखल होणाऱ्या बालकाच्या पुनर्वसन आणि पुनःस्थापनाबाबत तरतुद करण्यात आली आहे. या प्रकरणातील कलम ३९ (१) नुसार बालकाच्या पुनर्वसन आणि सामाजिक पुनःस्थापनाची कार्यपध्दती ही प्रत्येक काळजी आराखडा (Care Plan) यावर निर्धारीत असावी . असा आराखडा तयार करताना बालकाचे कुटुंब किवा पालक (Guardian) यांचेमध्ये पुनःस्थापन, दत्तक विधान, दत्तक संगोपन (Foster Care) अथवा प्रायोजकत्व (Sponsorship) यावर आधारीत असावा.

अधिनियमाच्या कलम ४० (१) नुसार बाल न्याय कार्यक्रमात दाखल झालेल्या बालकाचे संरक्षण आणि पुनःस्थापन हे सर्वात महत्वाचे उद्दीष्ट आहे. त्यामुळे काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक बाल कल्याण समिती समोर आल्यानंतर बालकाबाबतचा सामाजिक तपास (Social Investigation) अहवाल विचारात घेवून त्यानुसार बालकास संरक्षण व पुनःस्थापनेची गरज असल्याबाबत खात्री करण्यात यावी व अंतिम पर्याय म्हणून बालगृहात दाखल करण्यात यावे.

उपरोक्त बाबी विचारात घेता काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना बालगृहामध्ये दाखल करताना अधिनियमातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन होत नसल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व बाल कल्याण समिती यांना या परिपत्रकान्वये सुचित करण्यात येते की, कायद्यामध्ये नमूद केलेली मार्गदर्शक तत्वे आणि प्रवेशाबाबतच्या तरतुदी विचारात घेवून बाल न्याय कार्यक्रमा अंतर्गत दाखल होणाऱ्या काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या संस्था प्रवेशाबाबत खालील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी.

१. समिती समोर बालक सादर केलेनंतर कलम ३६ (१) अन्वये बालकाबाबत चौकशी करण्याचे आदेश देण्यात यावेत
२. कलम ३६ (२) अन्वये बालकाबाबतचा सामाजिक तपास (Social Investigation) १५ दिवसात पूर्ण करण्यात यावा
३. बालकाबाबतची चौकशी आणि सामाजिक तपास (Social Investigation) अहवाल प्राप्त झाल्यानंतर बालकांस कुटुंबात प्रस्थापीत होण्यासाठी बाल कल्याण समितीकडून प्रयत्न करण्यात यावा
४. प्रयत्न करुनही बालकाचे कुटुंब मिळत नसेल तर संस्थाबाहय सेवा ज्यामध्ये दत्तक विधान, दत्तक संगोपन (Foster Care) अथवा प्रायोजकत्व (Sponsorship) या पर्यायांचा प्राधान्याने विचार बालकाच्या पुनर्वसन आणि पुनःस्थापनासाठी करावा.

२८७ ४८/हेवि

५. अधिनियमाच्या कलम ४० (१) नुसार बाल न्याय कार्यक्रमात दाखल झालेल्या बालकाचे संरक्षण आणि पुनःस्थापन हे सर्वात महत्वाचे उद्दीष्ट समोर ठेवूनच सदर बालकास संरक्षण व पुनःस्थापनेची गरज असल्याबाबत खात्री करण्यात याची व अंतिम पर्याय म्हणून बालगृहात दाखल करण्यात यावे.

६. कलम २(१२) नुसार संस्था प्रवेश हा पुनर्वसनाचा अंतिम पर्याय (*Principle of institutionalisation as a measure of last resort*) या तत्वाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. कलम ३६ (३) अन्वये बालकाबाबत प्राप्त झालेल्या चौकशी अहवालानुसार बालकाला कोणतेही कुटुंब किंवा आधार नसल्याची समितीची खात्री झाल्यानंतरच या बालकाला बालगृहामध्ये किंवा योग्य संस्थेमध्ये (Fit Institute), योग्य व्यक्ती (Fit person) यांचेकडे सोपविण्याबाबत आदेश व्हावेत.

८. संस्थेत दाखल आदेश निर्गमीत करताना त्यामध्ये कोणत्या कलमाखाली बालक दाखल करण्यात आले आहे याबाबतची स्पष्ट तरतुद असणे आवश्यक आहे. तसेच दाखल आदेश विहित नमून्यामध्ये निर्गमीत करण्यात यावे. आदेशावर किमान ३ सदस्यांच्या सहया असाव्यात.

९. एखाद्या सदस्याने बालकाच्या संस्था प्रवेशाबाबत निर्णय घेतला असल्यास समितीच्या पुढील बैठकीस सदर निर्णयाबाबत चर्चा करुन बैठकीत घेण्यात यावी आणि त्यानुसार दाखल आदेश विहित नमून्यामध्ये निर्गमीत करण्यात यावे.

१०. बाल कल्याण समितीने बैठकीत झालेली चर्चा आणि निर्णय या बाबतची लिखित स्वरुपातील प्रकरणनिहाय माहिती रोजनाम्याच्या स्वरुपात ठेवावी.

११. कलम ३९ मध्ये दाखल होणाऱ्या बालकाचे पुनर्वसन आणि पुनःस्थापनासाठी प्रत्येक बालकाचा स्वतंत्र असा काळजी आराखडा (Care Plan) तयार करणे संस्थास्तरावर बंधनकारक आहे. असा आराखडा तयार करताना बालकाचे कुटुंब किंवा पालक (Guardian) यांचेमध्ये पुनस्थापन, दत्तक विधान, दत्तक संगोपन (Foster Care) अथवा प्रायोजकत्व (Sponsorship) यावर आधारीत असावा. असा आराखडा प्रत्येक संस्थेने तयार केला असल्याबाबतची खात्री बाल कल्याण समितीने करावी आणि सदर आराखडयानुसार बालकाच्या प्रगतीबाबतची माहिती संस्था भेटीत तपासण्यात यावी.

१२. अधिनियमाच्या कलम २ (१४) (v) नुसार मुलाची काळजी घेण्यासाठी लायक नसलेले (unfit) किंवा असमर्थ पालकाचे (incapacitated) बालक निश्चित करताना सदर बालक हे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असल्याबाबत खात्री करुन त्याला कलम ३९ नुसार पुनर्वसन आणि सामाजिक पुनःस्थापनेची गरज आहे याबाबत खात्री करण्यात यावी. केवळ पालकांची आर्थिक परिस्थिती हालाकीची आहे किंवा गावात शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाहीत या कारणासाठी बालगृहात प्रवेश देण्यात येवू नये. त्याऐवजी अशा पालकांना शासनाच्या विविध विभागामार्फत कार्यरत वसतीगृहांची /सोजनांची माहिती देण्यात यावी.

१३. अधिनियमाच्या कलम २ (१४) (v) नुसार मुलाची काळजी घेण्यासाठी लायक नसलेले (unfit) किंवा असमर्थ पालक (incapacitated) याची व्याख्या करताना केवळ गरीबी हा निकष लावू नये असमर्थ पालक यामध्य खालील निकषांना प्राधान्य देण्यात यावे

- दुर्धर व असाध्य रोगाने पिडित असलेले पालक
- पालकांकडून बालकांचे हक्क डावलण्यात येत असून बालकांला भिक मागावयास लावणारे पालक
- अनैतिक व्यवसायात गुंतलेल्या महिला

२८९

- मुलांचा मानवी व्यापार करणारे पालक
- बालकांवर लैंगिक, शारिरिक, पाशवी, मानसिक अत्याचार करणारे पालक

१४. स्थलांतरीत कष्टकरी, ऊसतोड, बांधकामे, दगडांच्या खाणी, रस्ते बांधणी, शेती, कापूस वेचणी या निरनिराळया क्षेत्रात विविध जिल्हयातुन, राज्यातुन मोठया प्रमाणावर कुटुंबे स्थलातरीत होतात. यामुळे या कुटुंबातील बालकांना काळजी व संरक्षणाची गरज आहे अशी धारणा होवून या बालकांना बाल न्याय कार्यक्रमा अंतर्गत बांलगृहामध्ये दाखल करण्यात येते. परंतु प्रत्यक्षात या बालकांना कुटुंब असून ही बालके समाजाच्या प्रवाहातच असल्याने त्यांना पुनर्वसन व पुनःस्थापनेची गरज नसते. अशा परिस्थितीत त्यांची खरी गरज असते त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची. परंतु या करीता बालगृहात दाखल करणे हा पर्याय नाही. याकरीता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने त्यांच्या परिपत्रक क्र. मप्रशिप/सशिअ/नि वसतीगृह/२०१५-१६ २६४३ दिनांक १.१०.२०१५ अन्वये स्थलांतरीत कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी आणि ही बालके शिक्षणाच्या प्रवाहात यावी व त्यांचे स्थलांतरण रोखण्यासाठी हंगामी वसतीगृह वसतीगृहाच्या संकल्पनेची व्याप्ती वाढवून या योजने अंतर्गत अशा बालकांसाठी अन्न तसेच इतर सुविधा कुटुंबातच पुरविण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे अशा बालकांना या योजनेचा लाभ दिल्यास ती कुटुंबात राहातील केवळ शिक्षणासाठी बालगृहात दाखल करावे लागणार नाही. याकरीता स्थलांतरीत कष्टकरी, ऊसतोड, बांधकामे, दगडांच्या खाणी, रस्ते बांधणी, शेती, कापूस वेचणी या निरनिराळया क्षेत्रातील स्थलांतरीत कुटुंबातील बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी बाल कल्याण समितीने अशा बालकांना बालगृहात प्रवेश न देता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १.१०.२०१५ परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या योजनेचा लाभ घेण्यासाठी पालकांना उद्युक्त करावे जेणे करुन बालक कौटुंबिक वातावरणापासून वंचित रहाणार नाही.

१५. ज्या संस्थेने बालक समिती समोर सादर केले आहे त्या संस्थेला बालकाबाबतची चौकशी किंवा सामाजिक तपास अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात येवू नये त्याऐवजी सदर चौकशी किंवा सामाजिक तपास अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हयातील शासकीय संस्थामधील परिविक्षा अधिकारी किंवा जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना देण्यात यावेत.

वरील सुचनांचे काटेकारपणे पालन सर्व बाल कल्याण समितीने करावे. तसेच सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना याद्वारे परिपत्रकान्वये सुचित करण्यात येते की, त्यांनी बालगृहांची तपासणी करताना बालगृहामध्ये दाखल झालेल्या बालकांच्या प्रवेशाबाबत बाल कल्याण समितीने उपरोक्त दिलेल्या सुचनांचे पालन केले आहे किंवा नाही याबाबत खात्री करावी.

स्थळ प्रतीवर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी असे.

आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचेकरिता

प्रत :-
१. मा.प्रधान सचिव, महिला व बाल विकास मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रती :-
१. विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, पुणे, कोंकण, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर विभाग
२. अध्यक्ष / सदस्य बाल कल्याण समिती (सर्व)
३. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)

1 ३३७ १८ मुद्दा २ - २९३४ चे सदर्भ

"डिजिटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष २०१५"

परिपत्रक
महत्वाचे

जा.क्र.मअबाविआ/बाबि/का-५/बाकस.अ.ह/१५-१६/ ३२९
महिला व बाल विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.१.
दिनांक :- १५.०६.२०१५.

प्रति,
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)

विषय :- बाल कल्याण समितीचे निरिक्षण आणि मुल्यमापन करणेचे अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना प्रदान करणेबाबत

संदर्भ :- १.महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ मधील प्रकरण ३ कलम २९.
२. शासन निर्णय क्र.बालगृ-२०११/प्र.क्र.१५४/का-८ /दिनांक २८.०४.२०११.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना या परिपत्रकाव्दारे सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ मधील प्रकरण ३, कलम २९ नुसार प्रत्येक जिल्हयातील कार्यरत बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे निरिक्षण आणि मुल्यमापन आयुक्त, महिला व बाल विकास यांच्याकडून तिमाही तत्त्वावर करण्यात येईल. मुल्यमापनाचा अहवाल शासनांस सादर करण्यात येईल असे नमुद आहे. त्यानुसार बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे निरिक्षण करताना खालील बाबी निदर्शनांस येतात.

१. बाल कल्याण समितीने बालकांचे दाखल आदेश विहीत नमून्यात व विहीत मुदतीत म्हणजे नियम-२००२ मधील नमूना-८ व ९ मध्ये दिलेले नसतात.
२. संस्थेत दाखल करण्यात आलेल्या बालकांचा बाल कल्याण समितीमार्फत नियमित वार्षिक आढावा घेतला जात नाही.
३. समितीची बैठक नसेल अशा वेळी वैयक्तिक सदस्यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाला नंतरच्या समितीच्या बैठकीत अनुमोदन घेणे आवश्यक असताना ते घेतले जात नाही.
४. ० ते ६ या वयोगटातील बालकांना विहित कालावधीत दत्तकासाठी मुक्त करणे आवश्यक असताना विहित कालावधीचे पालन केले जात नाही. त्यामुळे संस्थेच्या दत्तक कामजात अनियमितता तसेच न्यायालयीन प्रकरणे उद्भवलेली आहेत. त्यामुळे समाजामध्ये विभागाची प्रतिमा मलीन होत आहे.
५. बालकांना रजेवर सोडताना नियमामध्ये दिलेल्या निदेशांचे बाल कल्याण समितीकडून पालन केले जात नाही.
६. बाल कल्याण समिती सदस्यांमध्ये योग्य समन्वय नसल्याने एकमेकांविरोधात व इतराकडून आयुक्तालयास समितीच्या कामकाजाबाबत गंभीर स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे अधिनियमाचे काम सुरळीतपणे होत नाही.

२-३ ४५/हि

७. बाल न्याय अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरावर कार्यरत असलेली यंत्रणा व बाल कल्याण समिती यांचेमध्ये योग्य समन्वय नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बालकांचे पुनर्वसनाचे काम योग्य पध्दतीने होत नाही.

८. तसेच, शासन निर्णय दि. २८.०४.२०११ नुसार राज्य सल्लागार मंडळाचे सदस्य सचिव तथा आयुक्त, महिला व बाल विकास यांनी स्वत: बाल कल्याण समितीच्या कामकाजाचा आढावा घ्यावा असे नमुद आहे. तसेच, ज्या बालकल्याण समितीकडुन त्रैमासिक अहवाल प्राप्त होणार नाहीत, अशा बाल कल्याण समितीविरुध्द यथोचित कार्यवाही करण्याबाबत अथवा सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत राज्य सल्लागार मंडळाच्या शिफारशींसह प्रस्ताव शासनास तत्परतेने सादर करावेत असेही नमुद आहे.

याशिवाय उपरोक्त नमूद बाबींविषयी महालेखापाल कार्यालय, मुंबई यांनी नोंदविलेले आक्षेप व बाल कल्याण समितीच्या कामकाजासंबंधी विविध जिल्हयांतून येणाऱ्या तक्रारी, त्याअनुषंगाने त्यावरील कार्यवाहीबाबतची प्रक्रिया शीघ्र गतीने होण्यासाठी, आयुक्तालयास सदरचे काम अधिक प्रभावीपणे करण्यासाठी व कायद्यामधील तरतुदींची पूर्णपणे अंमलबजावणी होणेसाठी महाराष्ट्र बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ मधील प्रकरण ३, कलम २९ नुसार आयुक्त, महिला व बाल विकास यांना प्राप्त असलेले अधिकार या परिपत्रकान्वये सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना प्रदान करण्यात येत असुन, त्यांनी जिल्हयांतील कार्यरत असलेल्या सर्व बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे निरिक्षण आणि मुल्यमापन करुन, प्रत्येक तिमाहीचा अहवाल नियमीतपणे आयुक्तालयास सादर करावा. सदर कामास प्रथम प्राधान्य देण्यात यावे. तसेच, सदर कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

स्थळप्रतीवर मा. आयुक्त यांची स्वाक्षरी असे

आयुक्त ५/१०/१५
महिला व बाल विकास,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरीता

प्रत माहितीस्तव सविनय सादर:-

१. खासगी सचिव, मा. मंत्री, महिला व बाल विकास विभाग, मुंबई
२. खासगी सचिव, मा. राज्यमंत्री, महिला व बाल विकास विभाग, मुंबई
३. मा.प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

प्रत :-

१. विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, पुणे / मुंबई / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती
२. अध्यक्ष/सदस्य, बाल कल्याण समिती (सर्व) मार्फत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, कार्यालय

परिपत्रक

क्र.मबाविआ/बावि/बाकस /का-५/१५-१६/५६४६
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ
महाराष्ट्र राज्य , पुणे-१
Email-dy.commissionercd@yahoo.com
दिनांक- २३.१०.२०१५

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० मधील कलम २९ अन्वये बाल कल्याण समिती गठीत करण्यात येते राज्यातील ३५ जिल्हांसाठी बाल कल्याण समिती गठित करण्यात आलेली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२, (८) नियम २०११ मधे नमूद तरतुदी नुसार देखभाल व संरक्षण करण्याची गरज असलेल्या बालकांवर संबंधातील प्रकरणाचा अंतिम निकाल तीन सभासदाच्या आदेशाव्दारे समितीच्या कार्यालयातून करण्यात येईल.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२, (२३) मधे नमूद नुसार समिती गृहामधील बालकाच्या प्रगतीचा आढावा घेईल.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०११ मधे मुख्य नियमांच्या नियम ७ नंतर, पुढील नियम जादा दाखल करण्यात आलेले आहेत यानुसार ९ ७ (ख) १० मधे नमूद नुसार अधिनियमाच्या कलम ३३ (३) अन्वये बंधनकारक असल्याप्रमाणे प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी, आयुक्त व राज्य सल्लागार मंडळ यांच्या मार्फत, राज्य शासनाला, त्यांच्या समोरील बाल प्रकरणांच्या बाबतीतील सहामाही माहिती पाठविणे,

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०११ मधील प्रकरण तीन एक ८ (ख) बाल कल्याण समितीचा अभिलेख - प्रत्येक समितीकडे या नियमांन्वये अथवा आदेशांन्वये विहित करण्यात आलेल्या नोंदवहयांबरोबरच, विहित नमुन्यातील पुढील नोंदवहया ठेवण्यात येतील

(एक) नमुना सतरा - छ मधील प्रकरण नोंदवही.

(दोन) नमुना सतरा - ज मधील संकीर्ण अर्ज नोंदवही.

(तीन) नमुना सतरा - झ मधील वचनपत्र नोंदवही.

(चार) बालकाला किंवा त्याच्या माता-पित्यांना नमुना सतरा - ञ मध्ये पुरविलेल्या, अंतिम निर्णयाच्या प्रतीची नोंदवही.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२, नियम २०११ मधे वर नमूद तरतूदी आहेत परंतु या तरतुदी नुसार बाल कल्याण समितीचे कामकाज होत नसल्याचे मा.महालेखापाल, महालेखाकार कार्यालय, मुंबई

२८/

३०७

यांनी राज्यातील ८ जिल्हयातील संस्थाच्या तपासणी केली त्यावेळी उपरोक्त नमूद तरतूदीनुसार बाल कल्याण समितीचे कामकाज होत नसल्याचे त्यांचा निदर्शनास आले, सदर बाब त्यांनी आयुक्तालयाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. तसेच सदरच्या बाबी लेखापरीक्षण अहवालात ही नमूद केलेल्या आहेत,

या अनुषंगाने सदर परिपत्रकाव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, आपल्या जिल्हयातील सर्व संस्था प्रमुख, अधिक्षक / अधिक्षिका यांना आपल्या स्तरावरुन परिपत्रकात नमूद तरतूदी नुसार कार्यवाही करणेबाबत सुचना देण्यात याव्यात व तसेच सनियंत्रण अधिकारी म्हणून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी बाल कल्याण समितीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून तरतूदीनुसार कामकाज होते कि नाही याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

उप आयुक्त (बा.वि.)
महिला व बाल विकास,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.यांचेकरिता

प्रत, माहिती तथा कार्यवाहीस्तव
१. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व) आपणास कळविण्यात येते की, वर नमूद तरतूदीनुसार कार्यवाही करावी
२. अध्यक्ष / सदस्य बाल कल्याण समिती (सर्व)
३. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी (सर्व)

क्र.मबाविआ/बावि/बाकस /का-५/१६-१७/२४०४
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ
महाराष्ट्र राज्य , पुणे-१
Email-dy.commissionercd@yahoo.com
दिनांक - २२.४.२०१६

प्रति,
मा.प्रधान सचिव
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला
मंत्रालय, पुणे ३२

विषय :- बाल कल्याण समितीचे निरीक्षण आणि मुल्यमापन अहवाल पाठविणेबाबत

उपरोक्त विषयाबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र. ३२६४ दिनांक १५.६.२०१५ अन्वये बाल कल्याण समितीचे निरीक्षण आणि मुल्यमापन करणे बाबत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना कळविण्यात आले होते, यानुसार जळगाव, नाशिक, सांगली, धुळे, वाशिम, सातारा, सिंधुदूर्ग, नागपूर, यवतमाळ या जिल्हयांचे प्राप्त झालेले अहवाल, व बाल कल्याण समिती कडून सन २०१०-२०११ ते २०१४-२०१५ या वर्षातील हाताळलेली प्रकरणे व निकाली काढलेली प्रकरणे याचा अहवाल सोबत जोडून अवलोकनार्थ सादर करीत आहे.

उप आयुक्त (बा.वि)
महिला व बाल विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे १.यांचेकरिता

निर्गमित केले
दिनांक -: २४/४/१६

क्र.मबाविआ/बावि/बाकस /का-५/१६-१७/
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
Email-dy.commissionercd@yahoo.com
दिनांक - २८.५.२०१६

प्रति,
मा.अध्यक्ष,राज्य सल्लागार मंडळ तथा
प्रधान सचिव
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला
मंत्रालय, पुणे ३२

विषय :- **भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या अहवालातील परिच्छेदाबाबत दिनांक २७.४.२०१६ रोजी लोकलेखा समितीसमोर विभागाच्या सचिवांची आयोजित केलेल्या साक्षीमध्ये मा.समितीप्रमुख यांनी दिलेल्या सूचना व मा.प्रधान सचिव (म. व बा.वि.) यांनी दिलेल्या आश्वासन पूर्तीबाबत**

संदर्भ:- शासन पत्र क्र.लेपक -२०१६/प्र.क्र.६२/का-३/दिनांक १८ मे २०१६

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२, २०११ मधील तरतूदीनुसार बाल कल्याण समितीने बालगृहांना भेटी देवून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना अहवाल सादर केलेले आहेत, बाल कल्याण समितीने दिलेल्या संस्था निरिक्षणाचे अहवाल आयुक्तालयास प्राप्त झालेले आहेत. सदरचे अहवाल पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर करण्यात येत आहेत.

अ.क्र.	जिल्हयाचे नाव	तपासणी अहवालाची संख्या
१	कोल्हापूर	०७
२	रायगड	०८
३	जळगाव	१०
४	गडचिरोली	०१

सोबत :- एकूण २६ संस्था तपासणी अहवाल व सहपत्रे

आपला विश्वासू

(बी.एल.मुंढे)
उप आयुक्त (बा.वि)
महिला व बाल विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

89

2016 jan cw

निर्गमित केले 130

५५

३१३

क्र.मबाविआ/बावि/बाकस /का-५/१६-१७/ ३६०९
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ
महाराष्ट्र राज्य , पुणे-१
Email-dy.commissionercd@yahoo.com
दिनांक - ३०.६.२०१६

प्रति,
मा.अध्यक्ष,राज्य सल्लागार मंडळ तथा
प्रधान सचिव
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला
मंत्रालय, पुणे-३२ मुंबई ३२

विषय :- बाल कल्याण समितीचे निरीक्षण आणि मुल्यमापन अहवाल

संदर्भ:- शासन पत्र क्र.संकीर्ण -२०१६/प्र.क्र.११६/का-३/दिनांक १८ जून २०१६

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२, २०११ मधील तरतूदीनुसार बाल कल्याण समितीने बालगृहांना भेटी देवून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना अहवाल सादर केलेले आहेत, बाल कल्याण समितीने दिलेल्या संस्था निरिक्षणाचे अहवाल आयुक्तालयास प्राप्त झालेले आहेत. सदरचे अहवाल पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर करण्यात येत आहेत.

अ.क्र.	जिल्हयाचे नाव	संस्था भेट /तपासणी अहवालाची संख्या
१	पुणे	१७
२	नंदूरबार	१५
३	परभणी	१४
४	सातारा	संस्था भेटीचे दिनांक पाठविलेले आहेत अहवाल नाहीत
५	वाशिम	संस्था भेटीचे दिनांक पाठविलेले आहेत अहवाल नाहीत

सोबत :- एकूण ४६ अहवाल

आपला विश्वासू

(बी.एल.मुंढे)
उप आयुक्त (बा.वि)
महिला व बाल विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

01C
15
30.६.२०१६

प्रत:- जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सातारा, वाशिम यांना कळविण्यात येते की, आपले जिल्हयातील बाल कल्याण समितीने दिलेल्या संस्था भेटीचे अहवाल पाठविण्यात यावेत.

2016 jan cw

निर्गमित केले
दिनांक -: ३०/६/१६

५७

३१५

क्र.मबाविआ/बाविं/बाकस /का-५/१६-१७/३६००
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ
महाराष्ट्र राज्य , पुणे-१
Email-dy.commissionercd@yahoo.com
दिनांक - ३०.६.२०१६

प्रति,
मा.प्रधान सचिव
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला
मंत्रालय, मुंबई ३२

विषय :- बाल कल्याण समितीचे निरीक्षण आणि मुल्यमापन अहवाल पाठविणेबाबत
संदर्भ:- शासन पत्र क्र.संकीर्ण -२०१६/प्र.क्र.११६/का-३/दिनांक १८ जून २०१६

उपरोक्त विषयाबाबत सविनय सादर करण्यात येते की, बाल कल्याण समितीचे निरीक्षण व मुल्यमापनाचे पुणे, सोलापूर, कोल्हापूर, मुंबई शहर, रायगड,अहमदनगर, बुलढाणा, गोंदिया, परभणी, या ९ जिल्हयाचे अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले आहेत सदरचे अहवाल सोबत जोडून अवलोकनार्थ सादर करीत आहे.

आपला विश्वासू

(बी.एल.मुंढे) ३०।६
उप आयुक्त (बा.वि)
महिला व बाल विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

०५
३०.६.२०१६

निर्गमित केले
दिनांक - ३०/६/१६

५९
३१७

जा.क्र.मबाविआ/बावि/बाकस /का-५/१६-१७/४६९२
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ
महाराष्ट्र राज्य , पुणे-१
Email-dy.commissionercd@yahoo.com
दिनांक - २६.८.२०१६

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला
मंत्रालय, मुंबई ३२

विषय :- **Criminal Writ Petition No.१९८८/२०१६**
बाल कल्याण समिती कडील प्रकरणाचा आढावा पाठविणे बाबत

संदर्भ :- शासन पत्र क्र. Wp-२०१६/ प्र.क्र.१२६/ का-०३/ दि. ५ जुलै २०१६

उपरोक्त विषयाबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार बाल कल्याण समिती कडे प्रलंबित असलेल्या प्रकरणां बाबतची १ एप्रिल २०१६ ते ३० जून २०१६ पर्यन्तची २५ जिल्हयांकडून माहिती प्राप्त झालेली आहे, सदरची माहिती सोबत जोडलेल्या तक्तात सादर करीत आहे.

स्थळ प्रतीवर मा.उप आयुक्त (बा.वि.) यांची स्वाक्षरी असे.

आपला विश्वासू

उप आयुक्त (बा.वि)
महिला व बालविकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचेकरिता

०१८
/५७
२६.८.२०१६

निर्गमित केले
दिनांक - २६/८/१६

६१

३१८

बाल कल्याण समितीने हाताळलेल्या प्रकरणाबाबत माहिती

कालावधी १ एप्रिल २०१६ ते ३० जून २०१६ पर्यन्त

अ.क्र.	जिल्हा	३१ मार्च २०१६ ला प्रलंबित प्रकरणे	हाताळलेली प्रकरणे	या कालावधीत संस्थेत दाखल बालके	दत्तकासाठी मुक्त केलेली बालके	पालकांच्या ताब्यात	इतर बालकांचे पुनवर्सन	प्रलंबित प्रकरणांची संख्या व कारणे
१	२	३	४	५	६	७	८	९
१	पुणे बाकस क्र.१	२८	८१३	४३३	७०	२६६	३०	१४ चौकशीसाठी प्रलंबित
	बाकस क्र.२	२८	४७०	७०	१०	६३	४७	२८ गृहचौकशीसाठी प्रलंबित
२	सातारा	२	८९६	८७७	०	८२८	०	२
३	सांगली	३३०	१३३	१९७	११	१२२	०	०
४	सोलापूर	०	३६७	५६७	४	६८७७	६३९८	०
५	कोल्हापूर	१३	१७०९	८०	०३	११५	१९ इतर संस्थेत बदलीवर पाठविले	८० चौकशीसाठी प्रलंबित
६	मुंबई बाकस क्र.१	१५१	८०५	६१४	७	३०७	२५०	२३४
	बाकस क्र.२	०	३५०	०	१२	२२२	०६८	४८ वर्ष तपासणी चौकशी अहवाल प्राप्त करुन घेणे
७	उपनगर	७३८	६६७	५९	९	१४२	६४	चौकशीसाठी प्रलंबित
८	ठाणे	०	५४८	१४३	४	२२५ ठाणे	१७५	१०६ गृहचौकशीसाठी प्रलंबित
९	रायगड	०	१९८	२२	४	१६	३	०
१०	रत्नागिरी	२१	३८३	४३	१	२५	०	२० प्रकरणे

६२

३२१

								प्रलंबित
११	नाशिक	२	१२३	९६	६	९०	२१	६ चौकशीसाठी प्रलंबित
१२	जळगाव	०	३६१	१५४	१	१६०	४६	०
१३	अहमदनगर	७	३७११	३७०४	११	१५	२	७
१४	धुळे	०	२२९	१६	१	२१०	२	१६ शिशुगृह व बालगृहात पुनर्वसनासाठी प्रयत्न
१५	वाशिम	०	५	०	०	०	५	०
१६	यवतामाळ	०	२५८	४३	२	४०	३	०
१७	बुलढाणा	०	२५	११	९	२	३	०
१८	नागपूर	१३	१८९	१८९	१२	७१	५	१३ पालकांचा शोध, पोलीस एस्कॉर्ट
१९	चंद्रपूर	३३०	४२४	७	०	२४	०	२९६ गृहचौकशीसाठी प्रलंबित
२०	गोंदीया	१	१३२	५	१	५	२२	१
२१	हिंगोली	१	७६२	३४	-	७२८		०
२२	लातूर	०	२३५	१४	५	३३	३	१
२३	नांदेड	०	८४	६५	४	९		०
२४	उस्मानाबाद.	०	११	३	०	७		०
२५	बीड	०	३६	२६	०	१०		०

उप आयुक्त (बा.वि)
महिला व बालविकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचेकरिता

जा.क्र.मबाविआ/बाबि/बाकस /का-५/१६-१७/५२५८
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ
महाराष्ट्र राज्य , पुणे-१
Email-dy.commissionercd@yahoo.com
दिनांक - ३०.९.२०१६

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला
मंत्रालय, मुंबई ३२

विषय :- बाल कल्याण समिती कडील प्रकरणाचा आढावा पाठविणे बाबत
संदर्भ :- शासन पत्र क्र. Wp-२०१६/ प्र.क्र.१२६/ का-०३/ दि. ५ जुलै २०१६

उपरोक्त विषयाबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांनी दिलेल्या निर्दशानुसार बाल कल्याण समिती कडे प्रलंबित असलेल्या प्रकरणां बाबतची १ एप्रिल २०१६ ते ३० जून २०१६ पर्यन्तची २५ जिल्हयांकडून प्राप्त झालेली माहिती आयुक्तालयाचे दि.२६.८.२०१६ रोजी शासनास सादर केलेली आहे, ४ जिल्हयांची माहिती सद्यस्थितीत प्राप्त झालेली आहे, उर्वरीत माहिती जिल्हयांची माहिती लवकरात लवकर प्राप्त करुन सादर करीत आहे प्राप्त माहिती सोबत जोडलेल्या तक्तात सादर करीत आहे.

आपला विश्वासू

उपआयुक्त (बा.वि)
महिला व बालविकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

BSEDED 200 - 19

३२५

बाल कल्याण समितीने हाताळलेल्या प्रकरणाबाबत माहिती

कालावधी १ एप्रिल २०१६ ते ३० जून २०१६ पर्यन्त

अ.क्र.	जिल्हा	३१ मार्च २०१६ ला प्रलंबित प्रकरणे	हाताळलेली प्रकरणे	या कालावधीत संस्थेत दाखल बालके	दत्तकासाठी मुक्त केलेली बालके	पालकांच्या ताब्यात	इतर बालकांचे पुनवर्सन	प्रलंबित प्रकरणांची संख्या व कारणे
१	२	३	४	५	६	७	८	९
१	सिंधुदूर्ग	०	३७	०	०	०	२५	१२ गृह चौकशी साठी प्रलंबित
२	नंदूरबार	०	१०७६	२२३	०	११३	७४०	०
३	भंडारा	०	७७	३०	३	७	२	३५ गृहचौकशी साठी प्रलंबित
४	जालना	०	०	०	०	०	०	०

उप आयुक्त (बा.वि)
महिला व बालविकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

०८८
१५
३०.९.२०१६

६९
३१७

जा.क्र.मबाविआ/बावि/बाकस /का-५/१६-१७/५५९४
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ
महाराष्ट्र राज्य , पुणे-१
Email-dy.commissionercd@yahoo.com
दिनांक - १०.१०.२०१६

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला
मंत्रालय, मुंबई ३२

विषय :- **Writ Petition No.१९८८/२०१६**
बाल कल्याण समिती कडील प्रकरणाचा आढावा पाठविणे बाबत
संदर्भ :- शासन पत्र क्र. Wp-२०१६/ प्र.क्र.१२६/ का-०३/ दि. ५ जुलै २०१६

उपरोक्त विषयाबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार बाल कल्याण समिती कडे प्रलंबित असलेल्या प्रकरणां बाबतची १ एप्रिल २०१६ ते ३० जून २०१६ पर्यन्तची २९ जिल्हयांकडून प्राप्त झालेली माहिती आयुक्तालयाचे दि.२६.८.२०१६, ३०.९.२०१६ रोजी शासनास सादर केलेली आहे, उर्वरित ६ जिल्हयांची प्राप्त माहिती सोबत जोडलेल्या तक्तात सादर करीत आहे.

आपला विश्वासू

उपआयुक्त (बा.वि)
महिला व बालविकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

०१८
१५
१०.१०.२०१६

निर्गमित केले
दिनांक :- १०/१०/१६

७१/१३८

३२८

बाल कल्याण समितीने हाताळलेल्या प्रकरणाबाबत माहिती

कालावधी १ एप्रिल २०१६ ते ३० जून २०१६ पर्यन्त

अ.क्र.	जिल्हा	३१ मार्च २०१६ ला प्रलंबित प्रकरणे	हाताळलेली प्रकरणे	या कालावधीत संस्थेत दाखल बालके	दत्तकासाठी मुक्त केलेली बालके	पालकांच्या ताब्यात	इतर बालकांचे पुनर्वसन	प्रलंबित प्रकरणांची संख्या व कारणे
१	२	३	४	५	६	७	८	९
१	अमरावती	०	२८६	२८६	०	०	२८६	०
२	अकोला	५	६७	५७	१	३१	०	०
३	वर्धा	३	१९३	६५	८	२६	१५	७९ ४ बालगृह प्रवेशासाठी ७५ बालसंगोपन गृहचौकशी करणेसाठी प्रलंबित
४	गडचिरोली	०	५०	०५	०	१०	०	०
५	औरंगाबाद	०	३२०	०	०	०	२५३	६७
६	घरभणी	०	१४६	०	०	०	१३१	१५

उप आयुक्त (बा.वि)
महिला व बालविकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

१८
१५

महाराष्ट्र शासन

६१ वर्षे

क्रमांक :- भानिम-२०१६/प्र.क्र१४२/का-११
महिला व बाल विकास विभाग,
३ रा मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : २९.११.२०१६

प्रति,
सह सचिव / उप सचिव,
विधी व न्याय विभाग.
मंत्रालय,मुंबई-३२.

विषय : भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचा ३१ मार्च,२०१५ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल - सामान्य आणि सामाजिकक्षेत्र अहवाल स्पष्टीकरणात्मक जापने लोकलेखा समितीकडे पाठविण्याबाबत.

संदर्भ : उप सचिव, वित्त विभाग मंत्रालय,मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.भानिम-२०१६/प्र.क्र.११७ /लोलेस, दिनांक १८ ऑगस्ट,२०१६.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भात नमुद केलेल्या पत्रान्वये , भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचा ३१ मार्च,२०१५ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल या संदर्भात प्राप्त झालेल्या वर्ष २०१६ चा अहवाल क्रमांक ४ च्या परिच्छेद क्रमांक २.१.३.४ "संस्थात्मक व्यवस्थेवरील कमतरता बाल न्याय मंडळ क्रमांक (iii) (पृष्ठ क्र.१७) मध्ये आपल्या विभागाच्या काही मुद्दयांचा अंर्तभाव झाल्याचे निदर्शनास येते. सदर परिच्छेदासंदर्भातील स्पष्टीकरणात्मक जापने भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचेकडून संमत करुन तात्काळ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविण्याची व्यदस्था करणेस विनंती आहे. तदनुषंगाने सदर परिच्छेदात नमुद करण्यात आलेल्या आपल्या विभागाशी संबंधित बाबीवर उपरोक्त शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची एक प्रत या विभागास अग्रेषित करावी ही विनंती.

सहपत्र:- वर्ष २०१५ चा अहवाल क्र.४

आपला,

O/C (रा.ब.विचारे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीकरिता :-

अवर सचिव (लो.ले.स) महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन,मुंबई.

C:\Users\devidas.bahulikar.MAHAGOV\Desktop\जानवळकर-२०१५\पत्र का.११ सन २०१६.docx

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील .क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१७,१८	२.१.३.५	**मान्यता नसलेल्या बाल काळजी संस्थांचे कामकाज.** JJ अधिनियमाच्या कलम ३४ (३) मधील तरतूदीनुसार बाल काळजी गृहातील मुलांना सेवा पुरविताना संगोपनाचा किमान दर्जा राखण्याच्या उद्देशाने काळजी आणि संरक्षणाची गरज असलेली मुले दाखल करण्यात येणाऱ्या सर्व CCI ची नोंदणी अनिवार्य केली आहे. JJ अधिनियमाखाली नोंदणी न केलेल्या CCI मध्ये बालकांबरोबर मोठ्या प्रमाणावर झालेले दुर्वतन आणि उपेक्षा यांच्या घटना लक्षात घेता केंद्रीय मंत्रालयाने जुलै, २०१४ मध्ये ज्या संस्था काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी निवासाची सोय उपलब्ध करुन देतात त्यांनी त्यांची JJ अधिनियमांतर्गत नोंदणी करण्याच्या जबाबदारी विषयी त्यांचे ध्यानाकर्षण करण्याबद्दल सर्व राज्य सरकारांना विनंती केली. राज्यांना हे काम दोन महिण्यात पुर्ण करुन याबाबतची माहिती केंद्रीय मंत्रालयाला सादर करावयाची होती. तद्नुसार आयुक्त, W&CD यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून राज्यातील सर्व CCI नां ज्या अनुदाने प्राप्त करित होत्या अथवा नव्हत्या, ऑक्टोबर, २०१४ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करण्याची विनंती केली. १५ डिसेंबर, २०१४ पर्यंत १८६५ CCI नी ऑनलाईन नोंदणीसाठी आवेदने केली होती त्यापैकी १,२३० CCI ची संस्था चालविण्यासाठी JJ अधिनियमांतर्गत किंवा इतर दुसऱ्या अधिनियमांतर्गत आधिच नोंदणी झाल्याचे आढळून आले. अशा प्रकारे राज्यातील उर्वरित ६३५ CCI या JJ अधिनियमांतर्गत नोंदणीविना कार्यरत होत्या. यावरुन ही वस्तूस्थिती स्पष्ट झाली की, राज्यात कुठल्याही वैद्य नोंदणीशिवाय कार्यरत असलेल्या CCI	JJ अधिनियमाच्या कलम ३४ (३) नुसार कार्यरत असलेल्या अनुदानित विनाअनुदानित १२३० संस्थांपैकी १०६९ एवढया संस्थांनी नोंदणी प्रमाणपत्र घेतलेले आहेत. तरीही राज्यात मोठया प्रमाणावर बालकांच्या निवासी संस्था नोंदणी प्रमाणपत्र न घेता कार्यरत असल्याने शासनाने दिनांक ३० जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व संस्थांचे नव्याने ऑनलाईल नोंदणीकरण करणे बाबत सुचित केलेले होते. (शासन निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे). सदर नोंदणीकरणामुळे राज्यामध्ये बालकांसाठी किती निवासी संस्था कार्यरत आहेत याबाबतची माहिती घेण्याच्या दृष्टीने सदर कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्यामध्ये वृत्तपत्रातून जाहिराती प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सोबत वृत्तपत्रातील जाहिरातीची प्रत जोडण्यात येत आहे. JJ अधिनियमांतर्गत नोंदणी विना कार्यरत असलेल्या जिल्हयातील बाल विकास क्षेत्रात काम करीत असलेल्या अनधिकृत व बेकायदेशीर संस्थाचा शोध घ्यावा आणि अशा संस्था चालकांवर /व्यस्थापकांवर कायदेशीर कारवाई करावी तसेच याबाबत सर्व पोलीस ठाण्यांना अनाधिकृत व बेकायदेशीर संस्थावर कडक कारवाई करावे असे आयुक्तालयाचे पत्र दिनांक १४.६.२०१०, ९.१.२०१२, ४.२.२०१४ अन्वये विभागीय उपआयुक्त, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सर्व यांना कळविण्यात आलेले आहे.

		हूडकून काढण्यासाठी W&CD ने स्वत:चे असे कुठलेही प्रयत्न केले नव्हते. शासनाने असे नमूद केले की, सर्व CCI ची (नोंदणी केलेल्या अथवा न केलेल्या) नव्याने तपासणी केली जाईल आणि तपासणीनंतर त्यांच्या योग्य नोंदणी आणि मान्यतेबाबत धोरण आखले जाईल. **शिफारस २ :** (i) शासनाने काळजी आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकांचे सर्वेक्षण करण्यासाठी आणि शोध घेण्यासाठी एक भक्कम पथदर्शी आराखडा आखण्याची आणि सर्वसमावेशक बाल संरक्षण आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. बाल काळजी संस्थांमधील प्रत्येक बालकाचा पुनर्वसन आणि काळजी आराखडाही तयार करावा आणि त्याच्या प्रगतीचे ठराविक काळाने पुनर्विलोकन करावे आणि (ii) शासनाने सर्व बाल काळजी संस्थांची तपासणी पूर्ण करावी जेणेकरुन या संस्थांच्या नोंदणीसाठीचे आणि मान्यता देण्याचे राज्याचे धोरण लवकर तयार करता येईल.	दिनांक १३ जुलै २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार त्रयस्थ विभगामार्फत बालगृहाची तपासणी करण्यात आली सदर तपासणी अहवाल नुसार अ,ब,क,ड श्रेणी मध्ये वर्गवारी करण्यात आली तथापि विभागाने कार्यवाही करण्यापुर्वी बाल गृहे संस्था चालकानी मा.न्यायालयात प्रकरणे दाखल केल्यामुळे विभागास पुढील कार्यवाही करता आला नाही सद्यस्थितीत सदर बालगृहाची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. **शिफारसीवरील अभिप्राय :-** शासन निर्ण दि.२२.१२.२०११ अन्वये राज्यातील सर्व संस्थांनी बालकांच्या पुनर्वसनासाठी सर्वांगिण काळजी व संरक्षण आराखडा तयार करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित यंत्रणांना आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.२४२, दिनांक १.६.२०१६ अन्वये कळविण्यात आलेले आहे. शासन निर्णय दिनांक १३.७.२०१५ अन्वये राज्यातील सर्व स्वयंसेवी संस्थांचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करण्यात येऊन त्यांचे अ,ब,क अशी वर्गवारी करण्यात आलेली आहे. तथापि काही स्वयंसेवी संस्था चालक संघटनांनी सदर तपासणी विरोधात मा.न्यायालयात याचिका दाखल केलेली असल्यामुळे सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

अ.क्र. १९ पृष्ठ क्र. २०३५ ३३५

राज्यात बालकांच्या कल्याणासाठी सुरू असलेल्या सर्व निवासी व अनिवासी तसेच अनुदानित व विनानुदानित तत्वावरील संस्थांचे नोंदणीकरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-बालगृ-२०१४/प्र.क्र.९९/का-८
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
तारीख-३० जुलै, २०१४.

प्रस्तावना :-

राज्यात बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व सुधारित अधिनियम २००६ मधील कलम ३४(१) मधील तरतुदीनुसार बालकांच्या निवासी व अनिवासी तसेच अनुदानित व विनानुदानित तत्वावरील संस्था बालकांच्या कल्याणाकरिता चालविण्यात येतात. अशा सर्व संस्थांचे नोंदणीकरण होणे आवश्यक आहे. तथापि राज्यात मोठ्या प्रमाणावर बालकांच्या कल्याणाकरिता सुरू असलेल्या निवासी व अनिवासी तसेच अनुदानित व विनानुदानित अनोंदणीकृत संस्था कार्यरत आहेत. राज्यात शासनाकडे नोंदणीकृत नसलेल्या परंतु अनधिकृतपणे चालविण्यात येणाऱ्या बालकांच्या संस्थेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार घडत असल्याबाबतच्या घटना नुकत्याच उघडकीस आलेल्या आहेत. उदा.चंद्रप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट,कर्जत. अशा घटनांमुळे महिला व बालविकास विभागाची नाहक बदनामी होऊन घटनेची संपूर्ण जबाबदारी या विभागावर पडते परंतु प्रत्यक्षात अशा संस्थांवर नोंदणीकृत नसल्यामुळे विभागाद्वारे कारवाई करता येत नाही. त्यामुळे अशा संस्था महिला व बालविकास विभागाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली येणे आवश्यक आहे. त्याकरिता राज्यात बालकांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या सर्व संस्थांचे नव्याने नोंदणीकरण होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व सुधारित अधिनियम २००६ मधील कलम ३४(१) मधील तरतुदीनुसार बालकांच्या कल्याणाकरिता चालविण्यात येणाऱ्या बालकांच्या निवासी व अनिवासी तसेच अनुदानित व विनानुदानित तत्वावरील सर्व संस्थाची नव्याने नोंदणी करणे आवश्यक असल्याने बालकांच्या कल्याणाकरिता राज्यात सुरू असलेल्या खालील सर्व संस्थांनी नोंदणी करणे आवश्यक आहे.

१. ज्या संस्था फक्त मुलांकरिता संस्था चालवितात अशा सर्व संस्थांनी नोंदणीकरण करणे आवश्यक आहे.

२. ज्या संस्था फक्त मुलींकरिता संस्था चालवितात अशा सर्व संस्थांनी नोंदणीकरण करणे आवश्यक आहे.

३. ज्या संस्था मुलां-मुलींकरिता संस्था चालवितात अशा सर्व संस्थांनी मुला व मुलींचे वेगवेगळे नोंदणीकरण करणे आवश्यक आहे.

४. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पुढील दोन महिन्याच्या आत अशा संस्थांनी नोंदणीकरण करणे आवश्यक राहील.

५. ज्या संस्था शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पुढील दोन महिन्यांच्या आत नोंदणीकरण न करता मुलांना संस्थेत ठेवतील अशा संस्थावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३३७ ~~१२७~~/टिवि
~~स्वीवि~~

शासन निर्णय क्रमांकः बालगृ-२०१४/प्र.क्र.९९/का-८

या विषयी विभागाने स्वयं नोंदणी (Self Registration) ची पध्दत अवलंबिली आहे. त्यामुळे नोंदणीसाठी शासनाच्या कोणत्याही कार्यालयात न जाता खालील वेबसाईटवर स्वत: नोंदणी करता येईल.

राज्यात बालकांच्या कल्याणाकरिता बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व सुधारित अधिनियम २००६ मधील कलम ३४(१) मधील तरतुदीनुसार सुरू असलेल्या सर्व संस्थांनी www.icds.gov.in/wcdchild यासंकेतस्थळावर असलेल्या ऑनलाईन नोंदणी प्रणालीवर स्वत: नोंदणी करावी.नोंदणी करताना/ माहिती भरताना कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवल्यास त्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी Helpline ची व्यवस्था आयुक्त, महिला व बालविकास,पुणे यांचेकडून स्वतंत्रपणे करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८०११२२४१६९२३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uke Ujjwal

Digitally signed by Uke Ujjwal
DN: c=IN, o=ALL INDIA SERVICE, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Uke Ujjwal
Date: 2014.08.07 12:36:29 +05'30'

उज्ज्वल उके
प्रधान सचिव

प्रत,

१. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा.मंत्री,महिला व बाल विकास ,यांचे खाजगी सचिव.
३. मा.प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग,यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई.
४. उपसचिव (श्री.चव्हाण),महिला व बालविकास विभाग,यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई.
५. उपसचिव (श्री.हजारे),महिला व बालविकास विभाग,यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई.
६. सर्व विभागीय उपआयुक्त,महिला व बालविकास विभाग.
७. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
८. सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी / ग्रामीण).
९. निवड नस्ती, कार्या.-८

परि क.
२.१.३५ – वृत्तपत्रांची जाहिरात

मिळाल्याने... वर्षभरापासून सुरू असलेल्या पाठपुराव्यास यश मिळाले आहे, याचे समाधान आहे. या उपकेंद्रासाठी आधी जागा ताब्यात घेण्यात आली. अन्य प्रक्रिया सुरू केली होती; परंतु मान्यतेअभावी काम सुरू करण्यात अडचणी होत्या. आता सर्व मुद्दे निकाली निघाले आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील अद्ययावत उपकरण केंद्राचे उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे, कुलसचिव डॉ. नरेंद्र कडू, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी. डी. ढवळे उपस्थित होते. विद्यार्थी, संशोधन संस्था आणि उद्योगांना या केंद्राचा सशुल्क वापर करता येणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : अद्ययावत उपकरण केंद्राची राज्य
माहिती देताना कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी नाममात्र दरात ही उपकरणे उपलब्ध असतील.

शंकरनारायणन म्हणाले, "राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी पुरविण्याचे आव्हान आपल्यापुढे आहे. संशोधकांनी त्यावर उपाय शोधला पाहिजे. नावीन्यपूर्ण संशोधन क्षेत्रात सरकार गुंतवणूक करीत आहे. त्यामुळे दारिद्र्य, निरक्षरता, आरोग्य कुपोषण याचेही निर्मूलन संशोधन हे शकेल. बारावीनंतर विद्यार्थ्यांचे विज्ञ शाखेकडे जाण्याचे प्रमाण कमी आ तरुणांना मूलभूत विज्ञान आणि संशो क्षेत्राकडे आकर्षित केले पाहिजे."

डॉ. गाडे म्हणाले, "संशो कार्यावरून विद्यापीठाची श्रेणी निश्चि होते. त्यासाठी उपकरण केंद्र फायदेश

महाराष्ट्र शासन,
महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य

जाहीर आवाहन
बालकांच्या निवासी संस्थांची ऑनलाईन नोंदणी

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व सुधारित २००६ मधील कलम २ (d) मध्ये व्याख्या केलेल्या अनाथ, निराधार, निराश्रित, एक पालक असलेल्या, दुर्लक्षित, दुर्बल, दोन्ही पालक आहेत पण ते अपंग/ अंध/ एचआयव्हीग्रस्त/ तुरुंगात/ दुर्धर आजाराने ग्रस्त आहेत, अशा पालकांची मुले/ हातून गुन्हा घडणारी मुले/ गुन्ह्यात अडकलेली मुले/ बालकामगार/ भिक्षा मागणारी मुले/ मतिमंद/ एचआयव्हीग्रस्त/ एक पालक असलेली/ व पालक नसलेली या काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या, तसेच विधी संघर्षग्रस्त मुले यांच्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाची, यापूर्वी मान्यता/ नोंदणी प्रमाणपत्र घेतलेल्या, तसेच मान्यता/ नोंदणी प्रमाणपत्र न घेतलेल्या बालकांच्या सर्व निवासी, अनुदानित/ विनाअनुदानित संस्थांची महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाकडे नोंदणी करणे आवश्यक असल्याने **महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभागाच्या दि. ३० जुलै २०१४ च्या शासन निर्णयानुसार अशा संस्थांची नोंदणी करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आलेली आहे.**

नोंदणी फॉर्म/ नमुन्यातील प्रत्येक मुद्याची माहिती भरणे आवश्यक राहील. अर्धवट भरलेले फॉर्म स्वीकारले जाणार नाहीत. ज्या संस्था शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पुढील दोन महिन्यांच्या आत नोंदणीकरण न करता बालकांना संस्थेत ठेवतील, अशा संस्थांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

याविषयी विभागाने स्वयं नोंदणी (Self Registration) ची पद्धत अवलंबिली आहे त्यामुळे नोंदणीसाठी शासनाच्या कोणत्याही कार्यालयात न जाता संस्थेच्या जबाबदार व माहितगार पदाधिकारी यांनी खालील वेबसाईटवर स्वतः नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी उपआयुक्त (बाल विकास), महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या ०२०-२६३३०३७४ या दूरध्वनीवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

नोंदणी करण्यासाठी वेबसाईटचा पत्ता पुढीलप्रमाणे : www.icds.gov.in/wcdchild

आयुक्त,
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकरिता

डी.जी.आय.पी.आर. २०१४-२०१५/१७८५

DIRECTORATE OF TECHNICAL EDUCATION,
MAHARASHTRA STATE
3, MAHAPALIKA MARG, POST BOX NO. 1967, MUMBAI-400 001.
Helpline Phone No.: 022-2262 6853/54 Fax : 022-26692102 Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

'सर्वांसाठ

'सकाळ'तर्फे आ

पुणे, ता. १३ : 'सर्वांस पाणी' या विषयावरील गणेशोत्स देखावा स्पर्धा आणि पाणी बचती संदेश सर्वदूर पोचविणारी 'जलदिं अशा स्वरूपाचा सामाजिक बांधिल जोपासणारा उपक्रम 'सकाळ' यंदाच गणेशोत्सवानिमित्त राबविणार अ पोलिसांच्या आरोग्याच्या दृष्ट महत्त्वपूर्ण असणारा 'तंदुरुस्त बंदोबस्त' हा उपक्रमही यंदा वेगव प्रकारामध्ये होणार आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमी समाजहिताच्या दृष्टीने महत्त्वा विषयांवर राबविण्यात येणा विविध उपक्रमांची घोषणा बुध

महापारेषण
वीज बंद निवेदन

गुरुवार दिनांक १४/८/ रोजी दुरुस्तीकरीता २ वाहिन्यांमधून विद्युत पुरवठा भाग बंद ठेवण्यात येणार आ १३२ केव्ही उपकेंद्र, गणेश ०९.०० ते १५.००-

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१	२	३	४
१८	२.१.४	**बाल काळजी संस्थांमधील संगोपनाचा दर्जा** CCI नी बालकांना पुरवावयाच्या भैतिक मुलभूत सुविद्या, कपडे आणि बाडबिस्तरा, आहार, वैद्यकीय काळजी, शिक्षण, व्यवसाय प्रशिक्षण इत्यादीबाबतचा किमान दर्जा JJ अधिनियम आणि MJJ नियमांत विहित केला आहे	प्रस्तावना असल्याने अभिप्राय नाहीत

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१८	२.१.४.१	**मुलभूत सुविधाच्या प्रमाणकांची अपर्याप्तता** MJJ नियम २०११ आणि w&CD च्या डिसेंबर २०११ च्या निर्णयात CCIमध्ये द्यावयाच्या सुविधांबाबत वेगवेगळे विनिर्देश दिलेले आहेत.लेखापरिक्षेने विभागीय अधिका-यांबरोबर केलेल्या ९३ CCI च्या संयुक्त तपासणी मध्ये खाली अपर्याप्तता आढळून आल्या. * सर्व ९३ CCI मध्ये शयनशाला होत्या परंतु ५७ शयनशालांमध्ये विनिर्देशीत असलेली प्रतिबालक ४० चौ फुट एवढी आवश्यक जागा नव्हती. * ९३ पैकी ३४ CCI मध्ये वर्गखोल्या नव्हत्या.उर्वरीत ५९ CCI पैकी ३६ CCI मध्ये दर २५ मुलांसाठी विनिर्दिष्ट असलेली ३०० चौ.फुटाची वर्ग खोली नव्हती. *८३ CCI[२०] पैकी ४४ मध्ये कार्यशाळा नव्हत्या.उर्वरीत ३९ CCI पैकी २३ मध्ये कार्यशाळेची जागा विनिर्दीष्टीत प्रती CCI ५०० चौ.फुट एवढी नव्हती. *सर्व ९३ CCI मध्ये शौचालये होती परंतु त्यापैकी ३५ CCI मध्ये विनिर्दीष्टीत सात मुलांस एक या आवश्यक प्रमाण ती नव्हती. *सर्व ९३ CCI मध्ये स्वच्छतागृहे होती परंतु त्यापैकी २७ CCI मध्ये विनिर्दीष्टीत १० मुलांस एक या आवश्यक प्रमाण ती नव्हती. *९३ पैकी ४५ CCI मध्ये अग्नीशमन व्यवस्था नव्हती *खेळाचे मैदान आजा-यासाठी खोली कुपणाची भिंत भोजन कक्ष अधिक्षकांचे निवासस्थान इत्यादी इतर सुविधा CCI मध्ये जरी मोठया प्रमाणात उपलब्ध होत्या तरी या सुविधांसाठीची विनिर्दीष्टके MJJ नियमांतही सम्मिलित नव्हती किंवा W&CD ने त्यांच्या कुठल्याही निर्णयात ती स्वतत्रपणे अधिसूचीतही केली नव्हती. *MJJ नियम आणि डिसेंबर २०११ च्या w&CDच्या निर्णयाचे पालन करत नसल्याबदद्ल CCI विरुध्द कारवाई केली जात होती असे शासनाने सांगितले.	परिच्छेदात नमुद केल्यानुसार बालगृहांना आवश्यक असणा-या निवासी सुविधांबाबत शासन निर्णय दिनांक २२ डिसेंबर २०११ मधील परिशिष्ट अ मधील अनु क्र. ९ मध्ये व शासन निर्णय दिनांक १३ जुलै २०१५ निकष नमूद केलेले आहेत त्यानुसार दिनांक २२ डिसेंबर २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार त्रयस्थ विभागामार्फत बालगृहाची तपासणी करण्यात आली, सदर तपासणी अहवालानुसार अ, ब, क,ड श्रेणीमधे बालगृहाची वर्गवारी करण्यात आली तथापि विभागाने कार्यवाही करण्यापुर्वीच बालगृह संस्था चालक यांनी मा.न्यायालयात प्रकरणे दाखल केल्यामुळे विभागास पुढील कार्यवाही करता आलेली नाही, सद्यस्थितीत सदर बालगृहाची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

[२०] ज्यासाठी कार्यशाळा विहित केल्या नाहीत अशा १० विशेष दत्तक अभिकरणांव्यतिरिक्त

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१८,१९	२.१.४.२	**कपडे आणि बाडबिस्त-यांच्या प्रमाणकांचे पालन न करणे** MJJ नियम ३६ अनुसार राज्य शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार बालकांना कपडे आणि बाडबिस्तरा पुरवावयाचा होता.W&CD ने कपडे[२१] आणि बाडबिस्त-याचे[२२] प्रमाण विहित केले (ऑगस्ट २००६)होते जे फक्त शासनाव्दारे चालविल्या जाणा-या CCI साठीच लागू होते.निवड केलेल्या ८३[२३] CCI च्या (शासनाव्दारे चालविल्या जाणा-या :१३: NGO व्दारे चालविल्या जाणा-या :७०) दस्तऐवजांच्या तपासणीत खाली बाबी आढळूनआल्या. *वर्ष २०१०-१५ दरम्यान शासनाव्दारे चालविल्या जाणा-या १३ पैकी सर्वच CCI मध्ये बाडबिस्ता-याच्या प्रमाणाचे संपूर्णत: पालन केले गेले नव्हते. *वर्ष २०१०-१५ मध्ये NGOs कडून चालविल्या जाणा-या ७० पैकी ६४ CCI मध्ये बालकांना पुरविलेले कपडे W&CD ने विहीत केलेल्या प्रमाणानुसार नव्हते.तसेच याच कालावधीत NGO कडून चालविल्या जाणा-या ७० पैकी ६५ CCI मध्ये बालकांना पुरविलेला बाडबिस्तरा हा W&CDने विहीत केलेल्या प्रमाणानुसर नव्हता. शासनाव्दारे चालविल्या जाणा-या CCI नी सुध्दा कपडे आणि बाडबिस्त-याबाबतच्या प्रमाणांचे पालन न करणे यावरुन CWC जिल्हा सल्लागार मंडळ आणि W&CD कडून केल्या जाणा-या निरीक्षण आणि सनियंत्रणातील अपपर्याप्तता दर्शविली गेली.तसेच NGO कडून चालविल्या जाणा-या CCI साठी W&CD ने बाडबिस्तरा आणि कपडयांचे कोणतेही प्रमाण विहीत केले नव्हते.जे MJJ नियमांच्या विरुध्द होते . शासनाने सांगितले की, कपडे आणि बाडविस्त-याच्या विहीत प्रमाणांचे सर्व CCI कडून पालन केली जात होते याची सुनिश्चिती करण्यासाठी निर्देश देण्यात येत होते.	परिच्छेदात नमुद केल्यानुसार बालगृहातील प्रवेशितांना आवश्यक असणा-या कपडे बिछाना बाडबिस्तारा बाबत शासन निर्णय दिनांक १३ जुलै २०१५ मधील निकषानुसार त्रयस्थ विभागामार्फत बालगृहाची तपासणी करण्यात आली, सदर तपासणी अहवालानुसार अ, ब, क,ड श्रेणीमधे बालगृहाची वर्गवारी करण्यात आली तथापि विभागाने कार्यवाही करण्यापुर्वीच बालगृह संस्था चालक यांनी मा.न्यायालयात प्रकरणे दाखल केल्यामुळे विभागास पुढील कार्यवाही करता आलेली नाही, सद्यस्थितीत सदर बालगृहाची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

२१ मुलांसाठी शर्ट आणि पँट, मुर्लीसाठी सलवार कमीज,शाळेचा गणवेष,बुट/चप्पल मोजे, दप्तर इ.

२२ गाद्या,उशा,बिछाने,चादरी इ.

२३ ज्या विशेष दत्तक अभिकरणांना ही प्रमाणके लागू नव्हती वगळून

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१९,२०	२.१.४.३	**पोषण आणि आहार यासाठी विहीत केलेल्या प्रमाणातील अपर्याप्तता** MJJनियमांच्या तरतुदीनुसार CCI मध्ये राहणा-या बालकांसाठी आहाराचे प्रमाण राज्य शासनाने निश्चित करावयाचे होते.संतुलीत आणि पोषक आहाराच्या सुनिश्चितीतेसाठी आहाराचे प्रमाण हे पोषण आहार तज्ञांच्या सल्ल्यानुसार ठरवायाचे हेते .निवड केलेल्या ९३ CCI च्या (शासनाव्दारे चालविल्या जाणा-या ;१३ आणि NGO कडून चालविल्या जाणा-या ८०:)दस्तऐवजांच्या तपासणीत खालील बाबी आढळून आल्या: *ऑगस्ट २००६ मध्ये जारी केलेल्या निर्णयाव्दारे W&CD ने शासनाव्दारे चालविल्या जाणा-या CCI साठी आहाराचे प्रमाण विहीत केले होते. परंतु MJJ नियमांमध्ये तरतुद असतांनाही NGO कडून चालविल्या जाणा-या CCI साठी आहाराचे कोणतेही प्रमाण विहीत करण्यात आले नव्हते. *ऑगस्ट २००६ मध्ये W&CDकडूल जारी केलेल्या आहाराच्या प्रमाणामध्ये बालकांला त्याच्या वयानुसार किती उष्मांक द्यावे याचे प्रमाण विहीत केले नव्हते.	शासन निर्णय क्र संकिर्ण -२००५/प्रक्र २१०/का-३.दिनांक ९ ऑगस्ट २००६ अन्वये सर्व शासकीय संस्थांकरिता आहाराचे प्रमाण निश्चीत करण्यात आलेले आहे. स्वयंसेवी संस्थांना महाराष्ट्र राज्य बाल नियम २००२ नियम ४८ अन्वये बालकांना आहार संतुलित पोषक व वैविध्यपूर्ण असावा या साठी सुटीच्य किंवा सणाच्या दिवशी पुरविण्यात यावयाचा विशेष आहार आणि आजारी बालकांना आणि मुलांना देणे आवश्यक असेल असा आहार यासह मुलांच्या आहाराचे परिमाण राज्य शासन पोषण तज्ञांशी विचार विनियम करुन ठरवील आणि संस्थांनी त्यांचे पालन केले पाहिजे असे नमुद आहे. तथापि त्यानुसार कार्यवाही झालेली नव्हती. बाल न्याय अधिनियम २०१५ निर्गमित झाला असून त्याचे केंद्र शासनाने (Model Rule) सप्टेंबर २०१६ मध्ये प्रसिध्द केलेले असून त्यामध्ये आहाराचे प्रमाण विहीत करण्यात आलेले आहे.राज्य शासनामार्फत Model Rules बाबत कार्यवाही सुरु आहे.राज्य शासनाने प्रसिध्द केलेनंतर Model Rules नुसार स्वयंसेवी संस्थांना विहीत प्रमाणानुसार आहार देण्यात येईल.

		*वर्ष २०१०-१५ दरम्यान शासनाव्दारे चालविल्या जाणा-या १३ CCIपैकी एका CCI ने आहारात चिकन/मटण/मासे/अंडी आणि चार CCI ने दही/ताक दिले नव्हते. * NGO कडून चालविल्या जाणा-या CCIच्या वर्ष २०१०-१५ च्या साठा आणि आहार नोंदवहयांची तपासणी केली असता असे आढळून आले की ७०[२४] पैकी ५४ CCI मध्ये दही/ताक दिले नव्हते.तसेच शासनाव्दारे चालविल्या जाणा-या CCI साठीच्या आहार प्रमाणात विहीत केले असूनही ८० पैकी १४ CCI मध्ये दूध दिले गेले नव्हते आणि २४ CCI मध्ये चिकन/मटण/मासे/अंडी दिली गेली नव्हती. *अशा प्रकारे MJJ नियमांखाली आवश्यक असूनही NGOs कडून चालविल्या जाणा-या CCI साठी आहाराचे प्रमाण विहीत केले नसल्यामुळे बालकांना संतुलीत आणि पोषक आहार पुरविला जाण्याची खात्री होऊ शकली नव्हती. *अंतिम बैठकीत प्रधान सचिव W&CD यांनी वस्तुस्थिती मान्य केली (ऑक्टोबर २०१५)आणि नमुद केली की उष्मांक मुल्यांच्या आधारावर पोषण तज्ञांच्या मदतीने आहारावरील खर्चाचे विश्लेषण केले जाईल.शासनाने सांगितले की १३ जूलै २०१५ च्या शासन निर्णयाव्दारे W&CD चा ऑगस्ट २००६ चा निर्णय NGO कडून चालविल्या जाणा-या CCI ना देखील लागू करण्यात आला आहे.	

[२४] १० विशेष दतक अभिकरणांसाठी दही/ताक विहित केले नव्हते

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
२०	२.१.४.४	**काळजी आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांपासून विधिसंघर्षग्रस्त बालकांना वेगळे न ठेवणे.** JJ नियम २००७ च्या नियम ४० अनुसार विधिसंघर्षग्रस्त बालके आणि काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची निवास व्यवस्था ही वेगवेगळया जागी असावी.तथापि MJJनियमात विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी आणि काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी वेगळी व्यवस्था असण्याबदद्ल विहित केले नव्हते. परंतु JJ अधिनियमाच्या कलम ६८ अनुसार कुठल्याही बाबीवर जर राज्याने नियम केले नसतील तर JJ नियम २००७ लागु होतील.तथापि लेखापरीक्षेला असे आढळून आले की, ९३ CCI पैकी १० CCI मध्ये विधिसंघर्षग्रस्त बालके आणि काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची निवास व्यवस्था एकाच जागी केलेली होती. शासनाने असेही नमुद केले की, काळजी आणि संरक्षणाची गरज असलेली बालके आणि विधीसंघर्षग्रस्त बालकांना	बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियमा अंतर्गत तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण नियमावली यामध्ये विधीसंघर्षग्रस्त व काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना त्यांच्या वयोगटानुसार स्वतंत्र निवासव्यवस्था करण्याबाबत तरतुद आहे. राज्यामधील विधीसंघर्षग्रस्त बालकांचा आढावा घेतला असता ब-याच निरीक्षणगृहात विधीसंघर्षग्रस्त बालकांची संख्या अत्यंत अल्प अढळून आली.तसेच काही निरीक्षणगृहांमध्ये बालकांच्या संख्येपेक्षा कर्मचा-यांची संख्या अधिक असल्याचे आढळून आले.निरीक्षणगृहातील कर्मचा-यांच्या वेतनावरील संपूर्ण खर्च हा शासन करीत असल्याने या कर्मचा-यांच्या सेवा पूर्णपणे वापरात याव्यात या उदद्ेशाने शासनाने शासन निर्णयक्रबान्याय-२००२/प्र.क्र.१८३/का३ दिनांक २५/२/२००४ अन्वये सर्व निरीक्षणगृहे ही निरीक्षणगृहे/बालगृहे म्हणून घोषीत करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला.तथापि असा निर्णय धेतांता विधीसंघर्षग्रस्त बालक आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक यांची स्वतंत्र निवास व्यवस्था असावी अशा सुचना निर्गमित करण्यात आल्या. निरीक्षणगृह हे एकाच संस्थेमार्फत कार्यरत असल्याने तसेच सदर संस्थेला/निरीक्षणगृह/बालगृह अशा मान्यता असल्याने विधीसंघर्षग्रस्त आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेले अशा दोनही प्रकारची बालके या संस्थेमध्ये दाखल होतात.बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण हा कायदा संपूर्णपणे बाल

		मुख्यत्वे रात्री वेगळे ठेवले जात होते.तसेच विधीसंघर्षग्रस्त बालकांची संख्या कमी होती आणि त्यांचे वास्तव्य साधारणपणे मर्यादीत कालावधीसाठी असणार होते. हे उत्तर स्विकारणीय नाही कारण विधिसंघर्षग्रस्त बालके गुन्हेगारी प्रवृत्तीची असतात तसेच लैंगिक अत्याचार,नशाखोरी विध्वंसक कृत्ये चोरी इ.सारखी इतर गुन्हेगारी कृत्ये करण्याबरोबरच ते इतर सहवासीयांना सहज प्रभावित करु शकतात.याकरीता त्यांना फक्त रात्री वेगळे न ठेवता पूर्णवेळ वेगळे ठेवण्याची आवश्यकता आहे.	हक्कांवर आधारीत असून या संस्थे मुलांच्या बाबतीत भेदभाव करण्यात येऊ नये असे तत्व बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ च्या कलम ३ मध्ये नमुद आहे.त्यामुळे एकाच संस्थेमध्ये विधीसंघर्षग्रस्त बालक आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक यांच्यामध्ये भेदभाव केल्यास त्याचा परीणाम बालकांच्या मनावर होऊन या बालकांची पुनर्वसन करण्यामध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.तसेच अशा कृतीमुळे अधिनियमातील तत्वांचे उल्लंघन होईल.अधिनियमामध्ये नमुद केल्याप्रमाणे बालकांसाठी मैत्रीपुर्ण वातावरण निर्माण करणे बालकांच्या विकासाच्या आणि पुनर्वसनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. त्यामुळे विधिसंघर्षग्रस्त बालकांच्या हातून घडलेल्या गुन्ह्यामुळे निर्माण झालेला न्यूनगंड काढून टाकण्यास मदत मिळते.

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
२०,२१	२.१.४.५	**सुरक्षेतील त्रृटी** डिसेंबर २०११ च्या W&CD च्या शासन निर्णयात असे विनिर्दीष्ट केले होते की, CCI ने बालकांच्या संरक्षण आणि सुरक्षेसाठी जागेभोवती भिंतीचे कुंपण घालावे आणि २४ तास सुरक्षा रक्षक आणि योग्य प्रकाश व्यवस्था ठेवावी. निवड केलेल्या नऊ जिल्हयांपैकी आठ[२५] जिल्हयातील दस्तऐवजांची चाचणी तपासणी करतांना असे आढळून आले की ७७[२६] CCI पैकी २५[२७] CCI मधुन वर्ष २०१० -१५ दरम्यांन एकुण ११,६६८ बालकांपैकी ५५८ बालके फरार झाली होती. ५५८[२८] बालकांपैकी फक्त ४० बालकांचा शोध लागला होता.तर उर्वरीत ५१८ बालकांचा जून २०१५ पर्यंत शोध लागला नव्हता.पळून गेलेल्या बालकांची टक्केवारी नागपूर येथे सर्वाधीक (४७ टक्के) होती.त्या खाले ाखाल टक्केवारी पुण्याची (३३ टक्के) होती.लेखापरिक्षेने विभागी कर्मचा-यं ाबरेबर केलेल्या संयुक्त निरीक्षणात आढळून आले की, २५ CCI पैकी २२ CCI मधील सुरक्षा व्यवस्था, सुरक्षा रक्षक उपलब्ध नसणे, कमी उंचीच्या कुंपणांच्या	नवजीवन शासकीय महिला वसतिगृह आणि विशेष बालगृह देवनार येथे शासन निर्णय दिनांक ९.११.२०१२ नुसार खाजगी सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत शासन निर्णय दिनांक १३ जुलै २०१५ निकष नमूद केलेले आहेत त्यानुसार त्रयस्थ विभागामार्फत बालगृहाची तपासणी करण्यात आली, सदर तपासणी अहवालानुसार अ, ब, क,ड श्रेणीमधे बालगृहाची वर्गवारी करण्यात आली तथापि विभागाने कार्यवाही करण्यापुर्वीच बालगृह संस्था चालक यांनी मा.न्यायालयात प्रकरणे दाखल केल्यामुळे विभागास पुढील कार्यवाही करता आलेली नाही, सद्यस्थितीत सदर बालगृहाची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. बालगृहांमध्ये खाजगी सुरक्षा रक्षक नेमणेबाबतचा प्रस्ताव कार्यवाहीत आहे

		भिंती आणि कुपणाच्या भिंतींना काटेरी तार नसणे यामुळे अपुरी होती. २५ CCI पैकी सात मध्ये (शासनाव्दारे चालविल्या जाणा-या चार आणि NGO कडून चालविल्या जाणा-या तीन वर्ष २०१०-१५ दरम्यान प्रत्येक वर्षी मुले पळून गेली होती जे अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांचा अभाव असल्याचे दर्शविते. शासनाने असे सांगितले की, CCI च्या वातावरणात मुले रुळावी यासाठी DCPUs आणि NGOs कडून विविध उपक्रम जसे की, समुपदेशन आर्ट ऑफ लिव्हींग या संस्थेतर्फे कार्यशाळा अयोजित करणे इत्यादी राबविण्यात येत होते.मुलांच्या संरक्षणासाठी खाजगी सुरक्षारक्षक आणि पोलीसही तैनात केले होते. हे उत्तर योग्य वाटत नाही. कारण लेखापरिक्षेने २२ CCI च्या केलेल्या संयुक्त तपासणीत या CCI मध्ये कोणतेही सुरक्षा रक्षक तैनात केल्याचे आढळून आले नव्हते.	

[२५] अहमदनगर,लातूद, मुंबई शहर, नागपूर,पुणे, परभणी, उस्मानाबाद आणि यवतमाळ

[२६] १० विशेष दत्तक अभिकरणे आणि नांदेड जिल्हयातील सहा CCI वगळून

[२७] HIV ग्रस्त मुलांसाठी : ३ गृहे, मानसिक अपंग मुलांसाठी : ३ गृहे, ११ निरिक्षण गृहे बाल गृहे आणि ८ बालगृहे इत्यादि

[२८] शासनाकडून चालविल्या जाणा-या सात मधील: ३१२ आणि NGO कडून चालविल्या जाणा-या १८ मधील:२४६

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
२१,२२	२.१.४.६	**मानसिकरित्या अपंग असलेल्या बालकांसाठीच्या गृहांचे अपर्याप्त कामकाज.** अपंग व्यक्ति (समान संधी,हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ च्या अंमलबजावणीसाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहायता विभाग (SJSA) हा नोडल विभाग असल्याचे विचारात घेऊन राज्यातील मानसिकरित्या अपंग असणाऱ्या बालकांसाठीच्या (MDC) १९ गृहाचे प्रशासकीय नियंत्रण W&CD कडून SJSA ला हस्तांतरित करण्यासाठी W&CD ने मे २०१२ ते जानेवारी २०१४ दरम्यान शासन निर्णय जारी केले होते. ९३ CCI मध्ये MDC साठी सहा[२९] बालगृहे होती.ज्यांची लेखापरिक्षेने विभागीय अधिकाऱ्यासोबत संयुक्तरित्या तपासणी केली होती.लेखापरिक्षेला असे आढळून आले की, SJSA कडे नियंत्रणाचे हस्तांतरण होऊनही MDC साठीची ही सहा गृहे संभाषणतज्ञ, चिकित्सालयीन मानसोपचारतज्ञ,व्यवसाय समुपदेशक,विशेष शिक्षक अशा प्रशिक्षित कर्मचाऱ्याविंना जे कर्मचारी अशा गृहात भारतीय पुनर्वसन मंडळ अधिनियम १९९२ अंतर्गत कार्यरत असणे आवश्यक होते, कार्यरत होती. SJSA हे मानसिक दुर्बलतेसहीत सर्व प्रकारच्या दुर्बलतांशी संबंधित प्रकरणे हाताळात असल्याने MDC साठीच्या बालगृहांचे प्रशासकीय नियंत्रण W&CD कडून SJSA ला हस्तांतरण करण्याचा मुख्य उददेश मोठया प्रमाणात असफल झाला आणि MDC च्या समस्या कायम राहिल्या. SJSA ने सांगितले (जून २०१५) की, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या नियुक्तिसाठी १०० टक्के वेतन अनुदाने मंजूर करण्यात आलेली होती . लेखापरिक्षेला पुढे असेही आढळून आले की,MDC साठी असलेली उपरोक्त १९ बालगृहे ही अगोदरच त्यांच्या पूर्ण क्षमतेने कार्यरत होती.परिणामी सहा सर्वसाधारण बालगृहात रहातअसलेली ९४ MDC[३०] ना MDC साठी विशेषत्वाने निर्धारित केलेल्या या १९ बालगृहामध्ये सामावून घेणे शक्य झाले नाही.तसेच या सहा सर्वसाधारण बालगृहामध्ये MDC च्या विशिष्ट गरजा पूर्ण करणाऱ्या सुविधा नव्हत्या. तसेच,१८ वर्षावरील ३० MDC मुली पुणे येथील मुर्लीसाठीच्या एका[३१] शासकीय CCI मध्ये रहात होत्या.जिथे विशेष शौचालयाची आणि स्नानगृहाची सोय नव्हती.परिणामी भोजनकक्षाचे विशेष शौचालय आणि स्नानगृहात रुपांतर करण्यात आले होते.तर शयनशालेचा वापर जेवणासाठी आणि झोपण्यासाठी करण्यात येत होता.प्रादेशिक उपआयुक्त पुणे यांनी आयुक्त W&CD पुणे यांना या मुर्लीच्या आवश्यक काळजी आणि पुनर्वसनासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्याबाबत सादर केलेल्या (जुलै २०१४) एका प्रस्तावाची सप्टेबर २०१५ पर्यत दखल घेतली गेली नव्हती.तसेच MDC च्या विशेष गरजा पुर्ण होण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्हयात MDC साठी किमान एक बालगृह उघडण्याचा SJSA चा निर्णय (जानेवारी २०१४),जून २०१५ पर्यत फलद्रुप झाला नव्हता. शासनाने वस्तुस्थिती स्विकारत असे सांगितले असे सांगितले की,SJSA अंतर्गत MDC साठी असलेली बालगृहे पूर्ण क्षमतेने भरली असल्यामूळे MDC नां सर्वसाधारणपणे गृहांमध्ये सामावून घेण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.	सामाजिक न्याय विभागाशी संबंधित आहे.

२९अहमदनगर:एक, उस्मानाबाद:दोन, लातूर:एक, नागपूर:एक आणि पुणे: एक

३० मुंबई शहर :५६,पुणे : ३६ आणि लातूर दोन

३१ मुंडवा,पुणे येथे मुर्लीसाठी असलेले शासकीय बालगृह/निरिक्षणगृह

७५/पावे

महाराष्ट्र शासन

क्रमांक :- भानिम-२०१६/प्र.क्र.१४२/का-११
महिला व बाल विकास विभाग,
३ रा मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : ३०.११.२०१६

प्रति,
सह सचिव,/उप सचिव
सामाजिक न्याय विभाग.
मंत्रालय,मुंबई-३२.

विषय : भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचा ३१ मार्च,२०१५ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल - सामान्य आणि सामाजिकक्षेत्र अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लोकलेखा समितीकडे पाठविण्याबाबत.

संदर्भ : उप सचिव, वित्त विभाग मंत्रालय,मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.भानिम-२०१६/प्र.क्र.११७/लोलेस, दिनांक १८ ऑगस्ट,२०१६.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भात नमुद केलेल्या पत्रान्वये , भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचा ३१ मार्च,२०१५ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल या संदर्भात प्राप्त झालेल्या वर्ष २०१६ चा अहवाल क्रमांक ४ च्या परिच्छेद क्रमांक २.१.४.६ मानसिकरित्या अपंग असलेल्या बालकांसाठीच्या गृहांचे अपर्याप्त कामकाज" (पृष्ठ क्र.२१) मध्ये आपल्या विभागाच्या काही मुद्ददयांचा अंर्तभाव झाल्याचे निदर्शनास येते. सदर परिच्छेदासंदर्भातील स्पष्टीकरणात, ज्ञापने भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचेकडून संमत करुन तात्काळ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविण्याची व्यवस्था करणेस विनंती आहे. तदनुषंगाने सदर परिच्छेदात नमुद करण्यात आलेल्या आपल्या विभागाशी संबंधित बाबीवर उपरोक्त शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची एक प्रत या विभागास अग्रेषित करावी ही विनंती.

सहपत्र:- वर्ष २०१५ चा अहवाल क्र.४

आपला,

1/12/16

30/11/16

(रा.ब.विचारे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीकरिता :-

अवर सचिव (लो.ले.स) महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन,मुंबई. प्रधान कार्यालय, नागपूर.

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
२२	२.१.४.७	**सहवासिना व्यावसायिक प्रशिक्षण न देणे** MJJ नियमांच्या नियम १६(९) आणि २९ (४) नुसार CCI मध्ये राहणा-या सहवासिंना, प्रशिक्षकांकडून किंवा बाहय स्त्रोतांकडून उपयोगी, आधुनिक आणि व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यात यावे. २००७-१२ दरम्यान CCI च्या सहवासिंना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात न आल्याविषयी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या मार्च २०१२ रोजी संपलेलया वर्षासाठीच्या, अहवालाच्या (सामान्य आणि सामाजिक क्षेत्र)परिच्छेद ४.१.१४.१ मध्ये भाष्य केले होते. ८३ CCI[३२] च्या संयुक्त तपासणीत मागील वर्षाच्या तुलनेत कुठलीही लक्षणीय सुधारणा दिसून आली नव्हती. ८३ CCI पैकी, ४२ CCI मध्ये (शासनाकडून चालविलेल्या : नऊ आणि NGO कडून चालविलेल्या : ३३) २०१०-१५ दरम्यान प्रशिक्षण सुविधेची व्यवस्था न केल्याने (गृहांतर्गत किंवा खाजगी संस्थांद्वारे) नियोजित २,३७१ मुलांपैकी एकालाही व्यावसायिक प्रशिक्षण दिले गेले नव्हते. ऊर्वरीत ४१ CCI मध्ये, या CCI मध्ये राहणा-या सरासरी १,५१३ मुलांपैकी फक्त ७३५ मुलांना (४९टक्के) प्रशिक्षण दिले होते. मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण न दिल्यामुळे फक्त MJJ नियमांचे	आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.मबाविआ / बावि / का-५ / २०१६-१७ / सामंजस्य करार / आयटीआय / व्या.प्रशिक्षण / ५१२५ / दिनांक २१.०९.२०१६. अन्वये सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना निरिक्षणगृहे, विशेषगृहे, अनुरक्षणगृहे शासकीय बालगृहे यांमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत (आयटीआय) व्यायवसायिक प्रशिक्षण देणेकरीता करण्यात आलेल्या सांमजस्य करार (MOU) अतर्गत देण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींची माहिती सादर करणेबाबत कळविणेत आलेंले आहे. याबाबत राज्यातील काही जिल्हयांनी प्रवेशितांना व्यावसायिक प्रशिक्षण देणेसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था व काही अशासकीय संस्थांचे मदतीने प्रयत्न केलेले आहेत. त्यामध्ये खालीलप्रमाणे व्यावसायिक प्रशिक्षणाचा समावेश आहे. १. लॅब टेक्निशिअन २. एम.एस.सी.आय.टी. ३. पार्लर प्रशिक्षण. ४. मेहंदी प्रशिक्षण ५. फॅशन डिझाईनिंग ६. शिलाई ७. ज्वेलरी ८. ऑटोमोबाईल ९. हॉटेल मॅनेजमेंट १०. स्पा ११. लेदर पर्स तयार करणे १२. रुग्ण परिचारिका १३. मॅक्रम फॅब्रिक्स १४. एम्बॉयडरी १५. भरतकाम १६. तोरण तयार करणे १७. ओरोगामी १८. पेपर बॅग्ज तयार करणे १९. फूले तयार करणे २०. टाईब अँड डाईंग २१. हस्तकला प्रशिक्षण २२. ए. सी. रिपेअरिंग २३. लॅब टेक्निशिअन २४. मोबाईल दुरुस्ती २५. मेणबत्ती तयार करणे २६. ग्रिटिंग्ज कार्ड तयार करणे २७. वेल्डिंग २८. फिटर २९. मोटर

		उल्लंघन झाले आहे असे नाही तर, त्यांना लाभकारी रोजगार प्राप्त होण्याच्या शक्यता वाढविण्याच्या संधीपासून मुले वंचित राहिली. शासनाने सांगितले की, औद्यो प्रशिक्षण संस्था आणि खाजगी प्रशिक्षण संस्थांद्वारे CCI व्यावसायिक प्रशिक्षण देईल याची खात्री करण्याचे निर्देश आयुक्त, W&CD यांना देण्यात आले आहेत.	मॅकॅनिकल ३०. ईलेक्ट्रिशिअन ३१. रेफ्रिजरेटर दुरुस्ती ३२. प्लंबर ३३. डिझेल मूकॅनिकल ३४. टूल मेकिंग ३५. डाय आर्मीचर वायरिंग ३६. हाऊस किपिंग ३७. पेंटिंग्ज ३८. मोटार सायकल दुरुस्ती ३९. बागकाम प्रशिक्षण ४०. फोटो लॅमिनेशन ४१. चायनिज कूकिंग ४२. ऊटणे, आकाश कंदिल तयार करणे. राज्यातील विविध निरिक्षणगृहे, विशेषगृहे, अनुरक्षणगृहे शासकीय बालगृहांमधील ८७७ प्रवेशितांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत व्यावसायिक प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला असुन, २०५ प्रवेशित सध्या विविध व्यावसायिक प्रशिक्षण घेत आहेत.

[३२] १० विशेष दतक अभिकरणांव्यतिरिक्त

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
२२,२३	२.१.४.८	**बाल काळजी संस्थांमधून मुक्त केलेल्या मुलांचे अपर्याप्त पुनर्वसन** बालकांची विशेषगृहे / बाल गृहातून मुक्तता झाल्यावर अनुरक्षण गृहे त्यांची काळजी घेतात जेणेकरुन त्यांना सचोटीने, उद्योगी आणि उपयोगी जीवन जगता येईल. MJJ नियम, २०११ च्या नियम १८ (२) आणि (४) मध्येही १८ वर्षावरील मुलांसाठी अनुरक्षण गृहे प्रस्थापित करण्याविषयी तरतूद आहे. राज्यांमध्ये नऊ (शासनाद्वारे चालविली जाणारी सहा आणि NGOs कडून चालविली जाणारी तीन) अनुरक्षणगृहे आहेत. लेखापरिक्षेला असे आढळून आले की, शासनाकडून चालविल्या जाणा-या सहा अनुरक्षणगृहांपैकी चार अनुरक्षणगृहांमध्ये ४०० बालकांना सामावून घेण्याची क्षमता होती. तथापि, २०१२-१५ दरम्यान निकृष्ठ सुविधा आणि पर्याप्त पायाभूत सुविधांच्या अभावामुळे या चार अनुरक्षणगृहांमध्ये फक्त २२ ते ४१ टक्केच मुले प्रत्यक्षात रहात होती. परिणामी, या चार अनुरक्षण गृहानी विविध शासकीय, अशासकीय, खाजगी आणि इतर सामाजिक अभिकरणांशी प्रभावी समन्वय साधून अशा मुलांना समाजात एकरुप करुन त्यांचे पुनर्वसन करावयाचे असूनही मोठया प्रमाणावर ते साध्य होवू शकले नव्हते.	बालगृहातील काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या ज्या बालकांचे योग्य प्रकारे पुनर्वसन झाले नाही अथवा जी बालके पूर्ण अनाथ आहेत, अशा १८ ते २१ वयोगटातील बालकांना बाल कल्याण समितीमार्फत अनुरक्षणगृहामध्ये प्रवेश दिला जातो. राज्यामध्ये शासकीय ०६ तर स्वयंसेवी संस्थेमार्फत सुरु असलेली ०२ अशी एकुण ०८ अनुरक्षणगृहे असुन, त्यामध्ये १७८ बालके दाखल आहेत. After Care Homes Parents & other relatives 341 मुले

		लेखापरिक्षेला असे आढळून आले की, W&CD ने १,१०७ CCI कडून CCI मध्ये राहणारी १६ ते १८ वयोगटातील मुले, गेल्या पाच वर्षात CCI सोडलेली मुले आणि त्यांच्या पुनर्वसनाच्या स्थितीविषयीची माहिती मागितली होती (डिसेंबर, २०१३) W&CD या माहितीचा वापर मुलांच्या पुनर्वसनाची भविष्यातील योजना आखण्यासाठी करायचा होता, तथापि, ऑक्टोबर २०१५ ला १,१०७ CCI पैकी ७४० CCI कडून ही माहिती प्रलंबित होती. तसेच, ११०७ CCI पैकी ३६७ CCI नी ज्या ३९० अनाथ मुलांना अनुरक्षण गृहांमध्ये प्राथम्याने प्रवेश द्यावयाचा होता त्यांचा स्थितीदर्शक अहवाल सादर केला होता. तथापि, संबंधित DW&CDOs नी या अनाथ मुलांना अनुरक्षणगृहांमध्ये दाखल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यासाठी कोणतीही कार्यवाही सुरु केली असल्याचे दर्शविणारे कोणतेही पुरावे नव्हते. यावरुन, CCI मधून मुक्त केलेल्या किंवा मुक्त होण्याची शक्यता असणा-या मुलांच्या पुनर्वसनाचा प्रश्न जिल्हा पातळीवर किंवा वरिष्ठ (Apex) पातळीवर गंभीरपणे हाताळला गेला नव्हता हे स्पष्ट होते. तसेच, दोन वर्षापेक्षा अधिक काळापासून आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्यामुळे हि प्रक्रिया आधीच निष्फळ ठरली. कारण वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मोठया संख्येत मुले अगोदरच CCI मधून मुक्त झाली असतील आणि आता या टप्प्यावर त्यांचा शोध घेणे कदाचित खूचप कठीण होईल.	

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
२३,२४	२.१.४.९	**अनाथ प्रमाणपत्रे जारी करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी न करणे.** वयाच्या १८ वर्षानंतर CCI सोडणारी अनाथ मुले कुठल्याही कायदेशिर अधिकारपत्राच्या अभावी, विविध शैक्षणिक, अर्थिक आणि सामाजिक फायद्यांपासुन वंचित राहतात. या अनाथ मुलांना येणाऱ्या अडचणी विचारात घेता, W&CD ने एक शासन निर्णय जारी केला (जून, २०१२) ज्याद्वारे CWC/ JJB ने जारी केलेल्या प्रवेश आदेशात अनाथ म्हणून घोषीत केलेल्या मुलांना अनाथ प्रमाणपत्रे जारी करण्यात यावीत असा निर्णय घेण्यात आला होता. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, सप्टेंबर, २०१२ ते फेब्रुवारी, २०१५ दरम्यान अनाथ प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी १७ CCi नी (१६ जिल्ह्यामधील) त्यांच्या संबंधित DW&CDOs कडून पाठविलेले ८८ प्रस्ताव आयुक्त W&CD यांनी केस शिट (पार्श्वभुमी पत्रिका), छायाचित्र, CWC/ JJB चे प्रवेश आदेश इत्यादी उपलब्ध नाहीत अशा विविध कारणांनी परत पाठविले होते. परिणामी सप्टेंबर, २०१५ पर्यंत ८८ मुलांना अनाथ प्रमाणपत्रे जारी केली गेली नव्हती.	दिनांक १६ जून, २०१२ च्या शासन निर्णयातील क्र. २ (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळ यांचेमार्फत प्रवेशितांना संस्थेमध्ये दाखल करण्यासाठी देण्यात आलेल्या दाखल आदेशामध्ये प्रवेशित अनाथ असल्याचा निर्देशस असणे आवश्यक अशी तरतूद असल्याने आयुक्तालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करताना दाखल आदेशामध्ये सदर बाब नमूद नसल्याने प्रस्ताव जिल्ह्यास परत पाठविण्यात आलेले होते. तथापि, बऱ्याच प्रस्तावांमध्ये सदरचा शासन निर्णय निर्गमीत होण्यापुवी बालक अनाथ असल्याबाबत आदेशात नमूद करण्याबाबत कोणत्याही सुचना बाल कल्याण समिती किंवा बाल न्याय मंडळ यांना निर्गमीत केलेल्या नसल्याने सदर अडचणी अनाथ प्रमाणपत्र देताना निर्माण झालेली होती. या अडचणीचा विचार करुन शासनाने दिनांक ६ जून, २०१६ च्या शासन निर्णयानुसार अनाथ प्रमाणपत्र देण्यासाठी निश्चीत केलेल्या निकषामध्ये खालील प्रमाणे बदल केलेले आहेत. सोबत प्रत जोडण्यात आलेली आहे. १. आई-वडीलांचा शोध घेवून, त्यापैकी कोणीच ह्यात नसल्याबाबतची खात्री संबंधीत यंत्रणेस झाली असणे व त्याबाबतचे संस्थेचे अधिक्षक यांचे प्रमाणपत्र जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रमाणित करावे. २. संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीने सदर लाभार्थ्यांचे आई-वडील ह्यात नसल्याचे व लाभार्थी अनाथ असल्याचे चौकशी अंती प्रमाणित करुन देणे आवश्यक (त्यासाठी बाल कल्याण समितीने जन्म-मृत्यू नोंद रजिस्टर, शाळा सोडल्याचा दाखला, प्रवेश निर्गम रजिस्टरचा दाखला यापैकी एक ग्राह्य धरावे.) वरील प्रमाणे सुधारीत निकषानुसार प्रस्ताव सादर करणे बाबत राज्यातील सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना आयुक्तालयाचे पत्र क्र. ३४५४ दिनांक २३ जून, २०१६ अन्वये कळविण्यात आलेले आहे. सोबत प्रत जोडण्यात आलेली आहे. सुधारीत निकषानुसार प्राप्त प्रस्तावावर कार्यवाही करुन प्रमाणपत्र वितरीत करणेत येत आहेत .

		अनाथ प्रमाणपत्रे जारी न करण्यासाठी शासनाने प्रामुख्याने (i) CCI मध्ये प्रवेश घेताना CWC/ JJB कडून जारी करण्यात आलेल्या आदेशात "अनाथ" असे नमूद केले नव्हते, (ii) CCI मध्ये प्रवेश घेतल्यानंतर मुले अनाथ झाली होती, ही कारणे दिली होती. शासनाने पुढे असेही नमूद केले की, आयुक्त W &CD यांचेकडून जून, २०१२ च्या शासन निर्णयात काय बदल आवश्यक आहेत या बाबतीत एक प्रस्ताव मागविण्यात आला होता. हे उत्तर पटण्याजोगे नाही कारण, MJJ नियमांच्या नियम ८ (१२) नुसार CCI मध्ये प्रवेश घेते वेळी CWC ने मुलांच्या माता पिता किंवा पालकांचा पुर्ण तपशिल प्रपत्र viii मध्ये नमूद करणे आवश्यक होते. म्हणजेच, जर मुलांच्या माता-पिता/ पालकांची स्थिती CWC ने जारी केलेल्या आदेशात नमूद केली नसेल तर ती जबाबदारी CWC ची असते आणि CWC कडून झालेल्या चुकांचे परिणाम मुलांना भोगावे लागू नयेत, तसेच जून, २०१२ मध्ये W&CD ने शासनास निर्णय आखताना, एखादे मुल त्याच्या CCI च्या वास्तव्यादरम्यान अनाथ होवू शकते ही शक्यता विचारात घ्यायला हवी होती आणि त्याजोगे अनाथ प्रमाणपत्र जारी होण्यातील विलंब टाळावयास हवा होता.	

अनाथ प्रमाणपत्र देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१३/ प्र.क्र. १०९/ का-३,
नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ६ जून, २०१६.

वाचा :-१. शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र. संकिर्ण-२०११/ प्र.क्र. २०९/ का-३, दि. १६/०६/२०१२.

२. शासन निर्णय शुध्दीपत्रक, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक संकीर्ण-२०११/ प्र.क्र.२०९/का-३, दिनांक २१.१.२०१३

प्रस्तावना :

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत शासकिय/ स्वंयसेवी बालगृहात दाखल होणाऱ्या अनाथ मुलांना संस्थेतून बाहेर पडताना त्यांच्या जवळ जातीचे प्रमाणपत्र नसल्याकारणाने, त्यांना शैक्षणिक, अर्थिक, सामाजिक सवलती, अनूदान व विशेष लाभ मिळत नाहीत. त्यामूळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होतात, म्हणून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० नुसार मान्यता प्राप्त शासकिय व स्वंयसेवी (० ते १८ वयोगटासाठी कार्यरत, अनुदानित/ विनाअनुदानित) संस्थांमध्ये दाखल अनाथ असलेल्या मुलांना अनाथ असल्याचे प्रमाणपत्र देणेबाबतचा शासन निर्णय उपरोक्त वाचा क्रमांक १ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे आणि वाचा क्रमांक २ च्या शुध्दीपत्रकान्वये त्यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तथापि, अनाथ प्रमाणपत्र निर्गमित करतांना अनेक अडचणी येत असल्यामुळे वरील वाचा क्रमांक १ व २ मधील शासन निर्णय व शुध्दीपत्रक अधिक्रमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

उपरोक्त वस्तुस्थितीस अनुसरून उपरोक्त वाचा क्रमांक १ व २ मधील शासन निर्णय व शुध्दीपत्रक अधिक्रमित करण्यात येत असून खालीलप्रमाणे सुधारीत शासन निर्गमित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महिला व बाल विकास विभागामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यता प्राप्त (अनूदानित / विनाअनूदानित) संस्थांमध्ये दाखल असलेल्या अनाथ मुलांना "अनाथ प्रमाणपत्र" देण्याबाबत या शासन निर्णयान्वये मान्यता व सुचना देण्यात येत आहेत.

२. खालील निकष पुर्ण करणाऱ्या संस्थेतील अनाथ प्रवेशितांना अनाथ असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

१. आई-वडीलांचा शोध घेवून, त्यापैकी कोणीच हयात नसल्याबाबतची खात्री संबंधित यंत्रणेस झाली असणे व त्याबाबतचे संस्थेचे अधिक्षक यांचे प्रमाणपत्र जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रमाणित करावे.

३५७
३५७/निर्व

शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१३/ प्र.क्र. १०९/ का-३,

२. संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीने सदर लाभार्थ्यांचे आई-वडील हयात नसल्याचे व लाभार्थी अनाथ असल्याचे चौकशी अंती प्रमाणित करुन देणे आवश्यक (त्यासाठी बाल कल्याण समितीने जन्म-मृत्यू नोंद रजिस्टर, शाळा सोडल्याचा दाखला, प्रवेश निर्गम रजिस्टरचा दाखला यापैकी एक ग्राह्य धरावे.)

दाखला वितरीत करण्याची प्रक्रिया :-

१. वरील निकष पुर्ण करणारे मुल, ज्या संस्थेत आहे, त्या संस्थेच्या अधिक्षकांनी अनाथ प्रमाणपत्र मिळणेचा प्रस्ताव संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे सादर करावा.
२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, यांनी सदर प्रस्तावाची छाननी करुन, प्रस्ताव परिपुर्ण असल्यास, स्वंयस्पष्ट शिफारस करुन, उपायुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवावा.
३. उपायुक्त (बाल विकास), पुणे / आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी चांगल्या प्रतिच्या कागदावर सोबत जोडलेल्या प्रपत्रातील नमुन्यानुसार आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या छापील लेटर हेडवरती **अनाथ प्रमाणपत्र** स्वाक्षरी करुन वितरीत करावे.
४. आयुक्त, महिला व बाल विकास यांच्या मार्फत अनाथ प्रमाणपत्रासाठी एक संकेतांक विकसीत करण्यात यावा. सर्वसाधारणपणे ज्यामध्ये पहिली दोन अक्षरे (MH), महाराष्ट्र राज्य, पुढील दोन अक्षरे ज्या जिल्ह्यातील CWC / JJB आदेशान्वये बालक बालगृहात दाखल झाले आहे ते दर्शविल. संकेतामधील शेवटचा अंक हा अनाथ प्रमाणपत्राचा अनुक्रमांक दर्शविल.
   उदा. अहमदनगर (AH) तर पुढील अक्षर (N) हे (NGO) साठी व (G) हे शासकिय बालगृहासाठी दर्शविल. तसेच जिल्ह्यात एकापेक्षा जास्त बाल कल्याण समिती, अस्तित्वात असतील तर १,२,३, असे नमूद करण्यात यावे.
५. या बाबतचा अहवाल उपआयुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दरवर्षी शासनास सादर करावयाचा आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०६०६१५०२०८२६३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Varsha Gunvantrao Deshmukh

Digitally signed by Varsha Gunvantrao Deshmukh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5f62a8daa48a5e99f7397a7dc2bf74464957d252bd1d84413614a33e51d763d5, cn=Varsha Gunvantrao Deshmukh
Date: 2016.07.27 16:13:57 +05'30'

(वर्षा देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
२. सर्व मंत्रालयीन विभाग

३. संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
५. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
६. सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
८. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
९. निवड नस्ती / का-३.

३८१ १८१/दिवि १३/१८८३

शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१३/ प्र.क्र. १०९/ का-३,

प्रपत्र

अनाथ प्रमाणपत्र

संकेतांक क्रमांक

नवीन फोटो

नाव :-

प्रमाणित :- जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००या अंतर्गत बाल कल्याणाच्या संस्थेत दाखल असलेल्या प्रवेशितांसाठी ती "अनाथ" असल्याबाबतचा दाखला.

प्रमाणित करण्यात येते की, प्रवेशित नामे ---------- वय वर्षे ---------- अंदाजित जन्मदिनांक ---------- हा दिनांक ---------- पासून ---------- संस्था, मु. पो. ---------- ता. ---------- जिल्हा ---------- या शासनमान्य स्वयंसेवी / शासकीय बालगृहात त्या संस्थेतील प्रवेशित रजिस्टरमधील नोंदणी क्रमांक ---------- नुसार दाखल झालेला ---------- मुलगा / मुलगी अनाथ आहे.

संस्थेत दाखल होण्याची पार्श्वभूमी :- (वर्णन द्यावे)

सदर अनाथ मुलास / मुलीस शासकीय / निमशासकीय / खाजगी शिक्षण / प्रशिक्षण संस्था, महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था **(ITI)** कार्यालय इ. यामध्ये प्राधान्याने प्रवेश देण्यात यावे. तसेच सदर मुलास / मुलीस शासकीय / निमशासकीय / खाजगी कंपनी / व्यवसाय / कार्यालय या ठिकाणी नोकरीसाठी प्राधान्य द्यावे.

(१) त्याच्या आई वडिलांचा ठाव ठिकाणा सर्व मार्गांचा अवलंब करूनही अद्याप लागलेला नाही. किंवा लागण्याची शक्यता नाही. संबंधित प्रवेशित हा अनाथ असल्याचे प्रमाणित करीत आहे. तसेच त्याच्या जातीची माहिती नाही, असेही प्रमाणित करण्यात येत आहे.

किंवा

(२) त्याच्या (नांव व पत्ता) ---------- या नातेवाईकाचा शोध लागलेला असून, त्याचे प्रवेशिताशी नाते ---------- असे आहे. नातेवाईकाशी जात ---------- असल्याने, प्रवेशितांची जात ---------- असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच संबंधित प्रवेशित हा अनाथ (आई वडील नसलेला) असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

(क्र. (१) व (२) पैकी जे लागू नसेल ते खोडण्यात यावे.)

त्याचे भविष्य उज्ज्वल व्हावे, ही शुभेच्छा.

(गोल शिक्का)

स्वाक्षरी /-

उप आयुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास

आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३७२

जा.क्र.मबाविआपु/बावि/अनाथ प्र/२०१६-१७/का-५/३४५४
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
दिनांक :-२३ जुन, २०१६.

प्रति,
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
(सर्व)

विषय :- अनाथ प्रवेशितांना अनाथ प्रमाणपत्र निर्गमीत करणे बाबत . . .

संदर्भ :- शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१३/ प्र.क्र.२०९/ का-३, मंत्रालय मुंबई-३२, दिनांक ०६ जुन, २०१६.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत शासकिय / स्वंयसेवी बालगृहात दाखल होणाऱ्या अनाथ मुलांना संस्थेतून बाहेर पडताना त्यांच्याजवळ जातीचे प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांना शैक्षणिक, अर्थिक, सामाजिक सवलती व विशेष लाभ मिळत नसल्यामुळे अशा लाभार्थ्यांना अनाथ असल्याचे प्रमाणपत्र आयुक्तालय स्तरावरुन निर्गमीत करणे बाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये सुचित करण्यात आलेले आहे. (अधिक माहितीसाठी संदर्भिय शासन निर्णयाची प्रत या सोबत जोडण्यात येत आहे.)

त्यानुसार, या पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त शासकिय / स्वंयसेवी संस्था बालगृहातील पात्र लाभार्थ्यांचे सदर शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींनुसार अनाथ असले बाबतचे प्रमाणपत्र मिळणे बाबतचे प्रस्ताव नव्याने विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे मार्फत आयुक्तालयास सादर करावे.

(बी. एल. मुंढे),
उपआयुक्त (बाल विकास),
महिला व बाल विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत :- १. मा. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास विभाग, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
आपणास सुचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना सदर बाबत आपले स्तरावरुन सुचना देण्यात येवून तात्काळ प्रस्ताव सादर करणे बाबत कळविण्यात यावे.

३५ ३२१ मुद्दा क्र २.४.९.

३५५ अनाथ प्रमाणपत्र.

महिला व बाल कल्याण आयुक्तालय
म. रा. पुणे - १
क्र. ८४८०
दिनांक 09 JUL 2012
कार्या प्रपत्रांक - ५

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०११/प्र.क्र.२०९/का-३,
नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १६ जून, २०१२.

प्रस्तावना : बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत शासकीय / स्वयंसेवी बालगृहात दाखल होणाऱ्या अनाथ मुलांना संस्थेमधून बाहेर पडतांना त्यांच्याजवळ जातीचे प्रमाणपत्र नसल्याकारणाने, त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक सवलती, अनुदान व विशेष लाभ मिळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होतात, म्हणून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यता प्राप्त (अनुदानित / विनाअनुदानित) संस्थांमध्ये दाखल अनाथ असलेल्या मुलांना "अनाथ" असल्याचे प्रमाणपत्र देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय : महिला व बाल विकास विभागामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यता प्राप्त (अनुदानित / विनाअनुदानित) संस्थांमध्ये दाखल असलेल्या अनाथ मुलांला "अनाथ" असल्याचे प्रमाणपत्र देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता व सूचना देण्यात येत आहे.

२. खालील निकष पूर्ण करणाऱ्या संस्थेतील अनाथ प्रवेशितांना अनाथ असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

(१) आई-वडीलांचा शोध घेवून, त्यापैकी कोणीच हयात नसल्याबाबतची खात्री संबंधित यंत्रणेस झाली असणे व त्याबाबतचे संस्थेचे अधिक्षक यांचे प्रमाणपत्र आणि

(२) बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळ यांचेमार्फत प्रवेशितांना संस्थेमध्ये दाखल करण्यासाठी देण्यात आलेल्या, दाखल आदेशात प्रवेशित अनाथ असल्याचा निर्देश असणे आवश्यक.

दाखला वितरीत करण्याची प्रक्रिया :

(१) वरील निकष पूर्ण करणारे मुल, ज्या संस्थेत आहे, त्यास त्या संस्थेच्या अधिक्षकांनी **अनाथ** प्रमाणपत्र मिळणेचा प्रस्ताव संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे सादर करावा.

(२) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी सदर प्रस्तावाची छाननी करुन, परिपूर्ण असल्यास, स्वयंस्पष्ट शिफारस करुन, उप आयुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवावा.

(३) उप आयुक्त (बाल विकास) / आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचांगल्या प्रतीच्या कागदावर सोबत जोडलेल्या प्रपत्रातील नमुन्यानुसार आयुक्त, महिला व बाल विकास यांच्या छापील लेटर हेडवरती **अनाथ** प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन वितरीत करावे.

२७७ २६७/दिवि

(४) आयुक्त, महिला व बाल विकास यांच्यामार्फत अनाथ प्रमाणपत्रंसाठी एक संकेतांक विकसित करण्यात यावा. सर्वसाधारण ज्यामध्ये पहिली दोन अक्षरे (MH) महाराष्ट्र राज्य पुढील दोन अक्षरे ज्या CWC/JJB आदेशान्वये बालक बालगृहात दाखत झाले आहेत ते दर्शवील उदा. अहमदनगर (AH) तर पुढील अक्षर (N) हे (NGO) साठी व (G) हे शासकीय बालगृहासाठी दर्शविल. संकेतांकांमधील शेवटचा अंक हा अनाथ प्रमाणपत्राचा अनुक्रमांक दर्शवील.

याबाबतचा अहवाल उप आयुक्त (बाल विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास दरवर्षी सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१२०६१६१०००२८२५०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शं. शा. पढाळ)
शासनाचे उप सचिव

प्रत,
मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा) (लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व अध्यक्ष, बाल न्याय मंडळ.
सर्व अध्यक्ष, बाल कल्याण समिती.
मुख्य अधिकारी, दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी, माटुंगा, मुंबई.
महिला व बाल विकास विभागांतर्गत कार्यरत सर्व निरिक्षणगृहे, विशेष गृहे, अनुरक्षणगृहे, शासकीय बालगृहे व शासकीय संरक्षणगृहांचे अधिक्षक, (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत)
मंत्रालयातील सर्व विभाग,
सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, / का-३

प्र प त्र

अनाथ असण्याचे प्रमाणपत्र

३७८

संकेतांक क्रमांक

नविन फोटो

मुलांची स्वाक्षरी

नांव :

प्रमाणित : संस्थाचालकांमार्फत

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण), अधिनियम २००० या अंतर्गत
बाल कल्याणाच्या संस्थेत दाखल असलेल्या प्रवेशितांसाठी तो "अनाथ" असल्याबाबतचा दाखला.

प्रमाणित करण्यात येते की, प्रवेशित नामे ---------- वय वर्षे -------- अंदाजित जन्मदिनांक ---------- हा दिनांक ---------- पासून ---------- ---- संस्था, मु.पो.----------, ता.---------- जिल्हा ---------- या शासन मान्य स्वयंसेवी / शासकीय बालगृहात, त्या संस्थेतील प्रवेश रजिस्टरमधील नोंदणी क्रमांक ---------नुसार दाखल झालेला ---------- मुलगा / मुलगी अनाथ आहे.

संस्थेत दाखल होण्याची पार्श्वभूमी :- (वर्णन द्यावे)

सदर अनाथ मुलास / मुलीस शासकीय / निमशासकीय / खाजगी शिक्षण / प्रशिक्षण संस्था, महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI), कार्यालय इ. अथवा नोकरीमध्ये प्राधान्याने प्रवेश देण्यात देण्यात यावे, अशी शिफारस करण्यात येत आहे.

(१) त्याच्या आई-वडिलांचा ठाव-ठिकाणा सर्व मार्गांचा अवलंब करुनही अद्याप लागलेला नाही. किंवा लागण्याची शक्यता नाही. संबंधित प्रवेशित हा **अनाथ** असल्याचे प्रमाणित करीत आहे. तसेच त्याच्या जातीची माहिती नाही, असेही प्रमाणित करण्यात येत आहे.

किंवा

(२) त्याच्या (नांव व पत्ता) ---------- या नातेवाईकाचा शोध लागलेला असून, त्याचे प्रवेशिता नाते ---------- असे आहे. नातेवाईकाची जात ---------- असल्याने, प्रवेशिताची जात ---------- असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच संबंधित प्रवेशित हा अनाथ (आई वडील नसलेला) असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

(क्र. (१) व (२) पैकी जे लागू नसेल ते खोडण्यात यावे.)

त्याचे भविष्य उज्ज्वल व्हावे, ही शुभेच्छा.

स्वाक्षरी
उप आयुक्त (बाल विकास),
महिला व बाल विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

(गोल शिक्का)

जा.क्र.मबाविआपु/बाबि/अनाथ प्र/२०१६-१७/का-५/३४५४
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
दिनांक :- २३ जुन, २०१६.

प्रति,
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
(सर्व)

विषय :- अनाथ प्रवेशितांना अनाथ प्रमाणपत्र निर्गमीत करणे बाबत . . .

संदर्भ :- शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१३/ प्र.क्र.२०९/ का-३, मंत्रालय मुंबई-३२, दिनांक ०६ जुन, २०१६.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत शासकिय / स्वंयसेवी बालगृहात दाखल होणाऱ्या अनाथ मुलांना संस्थेतून बाहेर पडताना त्यांच्याजवळ जातीचे प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांना शैक्षणिक, अर्थिक, सामाजिक सवलती व विशेष लाभ मिळत नसल्यामुळे अशा लाभार्थ्यांना अनाथ असल्याचे प्रमाणपत्र आयुक्तालय स्तरावरुन निर्गमीत करणे बाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये सुचित करण्यात आलेले आहे. (अधिक माहितीसाठी संदर्भिय शासन निर्णयाची प्रत या सोबत जोडण्यात येत आहे.)

त्यानुसार, या पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त शासकिय / स्वंयसेवी संस्था बालगृहातील पात्र लाभार्थ्यांचे सदर शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींनुसार अनाथ असले बाबतचे प्रमाणपत्र मिळणे बाबतचे प्रस्ताव नव्याने विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे मार्फत आयुक्तालयास सादर करावे.

(बी. एल. मुंढे),
उपआयुक्त (बाल विकास),
महिला व बाल विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत :- १. मा. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास विभाग, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
आपणास सुचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना सदर बाबत आपले स्तरावरुन सुचना देण्यात येवून तात्काळ प्रस्ताव सादर करणे बाबत कळविण्यात यावे.

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
२४	२.१.४.१०	**बाळ काळजी संस्थांमध्ये अधिक्षकांची कमतरता.** CCI चे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी CCI चा अधिक्षक हा महत्वाचा कार्यकारी अधिकारी असतो.तो (i) CCI च्या संस्थात्मक कार्याचे कार्यक्रमांचे आणि कामकाजाचे नियोजन अंमलबजावणी आणि समन्वय साधणे (ii) मुलांना चांगल्या दर्जाचा आणि योग्य प्रमाणात आहर देण्यात येईल मुलांना त्यांच्य नैसर्गीक आणि गरजेनुसार शिक्षण आणि व्यावसायीक प्रशिक्षण मिळेल याची सुनिश्चिती करणे (iii)मुलांना प्रेम ममता देणारे आणि काळजी घेणारे घरगुती वातावरण देणे आणि नियम आणि नियमांच्या कक्षेत राहून शक्य त्या सर्व पध्दतीने बालहक्कांची खात्री व रक्षण करणे आणि (iv) संस्थेत सुरक्षित पिण्याचे पाणी योग्य स्वच्छता आणि आरोग्य राखणे बालकांच्या स्वास्थ्याची पुरेशी काळजी घेतली जाईल याची खात्री करणे इत्यादीसाठी जबाबदार असतो. मार्च २०१५ पर्यंत शासनाव्दारे चालविल्या जाणा-या सर्व ४३ CCI मध्ये अधिक्षकांच्या महत्वाच्या पदावर लक्षणीय कमतरता (४२.३ टक्के) होती. शासनाकडून चालविलेल्या CCI पैकी निवड केलेल्या १३ CCI मध्ये मार्च २०१५ पर्यंत	महिला व बाल विक ास विभागांतर्गत गट ब संवर्गातील सरळ सेवेच्या कोटयातील १४७ पदासंबंधीची निवड यादी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासनास प्राप्त झाल्याने यादीत समावेश असलेल्या शासकीय संस्थेत कार्यरत असलेली वर्ग २ ची पदे भरणबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र. ४९८६, दि.१४/९/२०१६ व अ.शा. पत्र क्र.५७६६,दि.२७/१०/२०१६ अन्वये शासनास कळविणेत आलेले आहे. सदर उमेदवाराच्या चारित्र्य पडताळणी, वैद्यकीय तपासणी इ.बाबत संबंधितांकडून अहवाल मागवण्यात आला आहे. जिल्हा परिविक्षा अधिकारी या संवर्गाच्या बिंदू नामावलीचे काम अंतिम टण्यात आले असून सदर संवर्गातील पदे पदोन्तीने भरणबाबतची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरु आहे. सद्यस्थितीत रिक्त पदांच्या तपशीलासाठी या सोबत संवर्ग व पदनिहाय यादी जोडण्यात आली आहे.

		अधिक्षकांचे महत्वाचे पद ३८ टक्क्यांपर्यंत रिक्त होते.तसेच १३ पैकी पाच CCI मध्ये अधिक्षकाचे पद पाच ते आठ वर्षे या काळाकरीता रिक्त होते.NGO कडून चालविल्या जाणा-या व वेतन आणि वेतनेतर प्रयोजनासाठी १०० टक्के अनुदान प्राप्त होत असलेल्या ४४ पैकी ४३ CCI मध्ये अधिक्षक हे महत्वाचे पद दोन ते नऊ वर्षाच्या कालावधीसाठी ४२.३० टक्के प्रमाणात रिक्त होते. **शिफारस ३ : शासनाने (i) सर्व बाल काळजी संस्थांसाठी भौतिक पायाभूत सुविधा, कपडे आणि बाडबिस्तरा, पोषण व आहार या संगोपनविषयक बाबींचा किमान दर्जा राखला जाईल आणि त्याचे काटेकोर पालन केले जाईल, (ii) विधिसंषघर्षग्रस्त बालके आणि काळजी व संरक्षणाची आवश्यकता असलेली बालके योग्य प्रकारे वेगळी ठेवली जातील आणि बाल काळजी संस्थांमधील सुरक्षा व्यवस्था इतकी बळकट असेल जेणेकरुन पलायनाच्या घटना टाळता येतील, आणि (iii) मानसिकरित्या दुर्बल बालकांसाठी असलेल्या गृहांमध्ये प्रशिक्षत कर्मचाऱ्यांसह आवश्यक सुविधा उपलब्ध असतील जेणेकरुन अशा बालकांच्या विशेष गरजा पूर्ण होतील, याची खात्री करावी.**	शिफारसीवरील अभिप्राय शासन निर्णय दिनांक १३.७.२०१५ अन्वये सर्व संस्थांची भौतिक सुविधांबाबत तपासणी करण्यात येऊन अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे. महिला व बाल विकास विभागाकडे मानसिकदृष्टया दुर्बल असलेल्या बालकांसाठी विशेष प्रशिक्षत कर्मचारी वर्ग नसल्यामुळे शासन निर्णय क्र.३३८, दिनांक ३०.५.२०१२ अन्वये एकूण १९ मतिमंद बालगृहे सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहेत.

महिला व बाल विकास विभागांतर्गत बाल विकास अंतर्गत शासकीय संस्थेत कार्यरत असलेल्या [illegible]
अधिकाऱ्यांबाबतची माहिती (दि-३०.९.२०१६ अखेर) ३८७ ~~७७~~

अ.क्र	पदनाम/कार्यालय/संस्थेचे नांव	जिल्हा	मंजूर पद	भरलेले पद	रिक्त पद
१	अधिक्षक, शासकीय मुलींचे पुनर्वसन केंद्र (निरीक्षणगृह/ विशेषगृह), देवनार, मुंबई	मुंबई उपनगर	१	०	१
२	अधिक्षक, शासकीय अपंग मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, उल्हासनगर-५, ठाणे	ठाणे	१	०	१
३	अधिक्षक, शासकीय मुलांचे वरिष्ठ बालगृह, शांतीभवन कॅम्प-५, उल्हासनगर, ठाणे	ठाणे	१	०	१
४	अधिक्षक, शासकीय मुलांचे कनिष्ठ बालगृह कुर्ला कॅम्प, उल्हासनगर-४, ठाणे	ठाणे	१	०	१
५	अधिक्षक, शासकीय मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, शांतीभवन, उल्हासनगर-५, ठाणे	ठाणे	१	१	०
६	अधिक्षक, शासकीय मुलींचे निरीक्षणगृह/ विशेषगृह, शांतीभवन कॅम्प-५, उल्हासनगर, ठाणे	ठाणे	१	०	१
७	अधिक्षिका, शासकीय मुलींचे निरीक्षणगृह/ विशेषगृह, मुंढवा, पुणे	पुणे	१	१	०
८	अधिक्षक, शासकीयपंडील जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्र मुलांचे निरीक्षणगृह/विशेषगृह, येरवडा, पुणे	पुणे	१	१	०
९	अधिक्षक, शासकीय मुलांचे वरिष्ठ बालगृह (अनुरक्षणगृह), येरवडा, पुणे	पुणे	१	०	१
१०	अधिक्षक, शासकीय मुलींचे वरिष्ठ बालगृह, शिरुर, पुणे	पुणे	१	०	१
११	अधिक्षक, शासकीय पुरुष राज्यगृह, कोल्हापूर	कोल्हापूर	१	०	१
१२	अधिक्षक, शासकीय मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, सोलापूर	सोलापूर	१	०	१
१३	अधिक्षक, शासकीय मुलांचे वरिष्ठ बालगृह, माळशिरस, सोलापूर	सोलापूर	१	०	१
१४	अधिक्षिका, शासकीय मुलींचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, नाशिक	नाशिक	१	०	१
१५	अधिक्षक, शासकीय मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, वाक, जळगांव	जळगांव	१	१	०
१६	अधिक्षिका, शासकीय मुलांचे वरिष्ठ बालगृह, अमरावती	अमरावती	१	१	०
१७	अधिक्षक, शासकीय मुलांचे कनिष्ठ (वर्गीकरण केंद्र) बालगृह, अमरावती	अमरावती	१	१	०
१८	अधिक्षक, शासकीय मुलांचे कनिष्ठ बालगृह, नागपूर	नागपूर	१	०	१
१९	अधिक्षक, शासकीय मुलींचे वरिष्ठ बालगृह, नागपूर	नागपूर	१	०	१
२०	अधिक्षक, शासकीय मुलांचे वरिष्ठ बालगृह, नागपूर	नागपूर	१	०	१
२१	अधिक्षक, शासकीय अस्थिव्यंग अपंग मुलांचे कनिष्ठ/ वरिष्ठ बालगृह, चंद्रपूर	चंद्रपूर	१	१	०
२२	अधिक्षक, शासकीय मुलींचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, पैठण, जि.औरंगाबाद	औरंगाबाद	१	१	०
२३	अधिक्षक, शासकीय मुलांचे वरिष्ठ बालगृह, औरंगाबाद	औरंगाबाद	१	१	०
२४	अधिक्षक, शासकीय मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, परभणी	परभणी	१	१	०
२५	अधिक्षक, शासकीय मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, मुरुड, जि.लातूर	लातूर	१	०	१
२६	अधिक्षक, शासकीय मुलींचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, लातूर	लातूर	१	०	१
	एकूण बाल विकास		२६	१०	१६

टिप :- महिला व बाल विकास विभागांतर्गत गट-ब संवर्गातील सरळसेवेच्या कोठयातील १४७ पदासंबधीची निवड यादी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासनास प्राप्त झालेली असल्याने यादीमध्ये समावेश असलेल्या उमेदवारांना नियुक्ती देताना शासकीय संस्थेतील अधिक्षक या गट-ब संवर्गातील सर्व रिक्त पदे प्राधान्याने भरण्याबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र.४९८६, दि-१४.९.२०१६ व अर्ध शासकीय पत्र क्र.५७६६, दि-२७.१०.२०१६ अन्वये शासनास कळविण्यात आलेले आहे.

३८९

महिला विकास अंतर्गत शासकीय संस्थेतील जिल्हा परिवीक्षा अधिकारी संवर्गातील अधिक्षक पदाबाबतची माहिती. ५ //वि.वे

अ.क्र	संस्थेचे नाव	जिल्हा	मंजूर	भरलेले	रिक्त
१	अधिक्षक, शास.निरीक्षणगृह, सिंधूदूर्ग	सिंधुदूर्ग	१	०	१
२	अधिक्षिका शा.मुलींचे कनिष्ठ बालगृह सांगली.	सांगली	१	०	१
३	अधिक्षक, शास. मुलांचे निरीक्षणगृह, धानोरा रोड, बीड	बीड	१	०	१
४	अधिक्षक, शास.वरिष्ठ मुलांचे बालगृह, जालना	जालना	१	०	१
५	अधिक्षक, शास.मुलांचे निरीक्षणगृह, जालना	जालना	१	०	१
६	अधिक्षक, शास.मुलांचे निरीक्षणगृह, वर्धा	वर्धा	१	१	०
७	अधिक्षक, शास.मुलांचे वरिष्ठ बालगृह, वर्धा	वर्धा	१	१	०
८	अधिक्षक, शास.मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह, नागपूर	नागपूर	१	०	१
९	अधिक्षक, शास.मुलांचे निरीक्षणगृह, चंद्रपूर	चंद्रपूर	१	०	१
१०	अधिक्षक, शास.मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह, गडचिरोली.	गडचिरोली	१	०	१
११	अधिक्षिका, शा.मुलींचे कनिष्ठ बालगृह, राहूरी, अहमदनगर	अहमदनगर	१	०	१
१२	अधिक्षिका, शास.मुलींचे निरीक्षणगृह/ बालगृह, अमरावती	अमरावती	१	०	१
१३	अधिक्षक, शास.मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह, अमरावती	अमरावती	१	०	१
१४	अधिक्षक, शास.मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह, अकोला	अकोला	१	०	१
१५	अधिक्षक.शा.मुलांचे कनिष्ठ/वरिष्ठ बालगृह, बुलढाणा	बुलढाणा	१	०	१
१६	अधिक्षक, शास.मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह, बुलढाणा	बुलढाणा	१	१	०
१७	अधिक्षक, शास.मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह, यवतमाळ	यवतमाळ	१	१	०
	एकूण		**१७**	**४**	**१३**

टिप :- जिल्हा परिवीक्षा अधिकारी या संवर्गाची बिंदूनामावलीचे काम अंतिम टप्प्यात आलेले असून सदर संवर्गातील पदे पदोन्नतीने भरणेबाबतची कार्यवाही आयुक्तालय स्तरावरुन सुरु आहे.

बाल विकास अंतर्गत स्वयंसेवी निरीक्षणगृहातील परिवीक्षा अधिकारी या संवर्गातील आस्थापना पदाबाबतची माहिती

३९१

अ.क्र	स्वयंसेवी संस्थेचे नाव व पत्ता	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
१	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना ठाणे संचलित मुलांचे निरीक्षण गृह/बालगृह भिवंडी जि.ठाणे	१	०	१
२	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना ठाणे संचलित मुलींचे निरीक्षण गृह/बालगृह भिवंडी जि.ठाणे	१	१	०
३	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित निरीक्षण गृह/बालगृह कर्जत	१	०	१
४	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित निरीक्षण गृह/बालगृह बोर्डिंग रोड जिल्हा उदयोग केंद्राजवळ रत्नागिरी	१	०	१
५	के.श्रीमती जानकीबाई (आक्का) तेंडूलकर महिलाश्रम लांजे संचलित मुलींचे निरीक्षणगृह/बालगृह लांजे जि.रत्नागिरी	१	०	१
६	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित.मुलांचे निरीक्षण गृह ११/६/२/६ शिवाजीनगर सिमला ऑफिस जवळ पुणे	१	०	१
७	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित/अतिरिक्त मुलांचे निरीक्षण गृह/बालगृह शिवाजी नगर सिमला ऑफिस जवळ पुणे	१	१	०
८	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलींचे निरीक्षण गृह/बालगृह नाना पेठ पुणे.	१	१	०
९	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे (निरीक्षणगृह) भिगवण रोड बारामती जि.पुणे	१	०	१
१०	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षण गृह सदर बाजार सातारा	१	०	१
११	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलींचे निरीक्षण गृह सातारा	१	०	१
१२	प्रादेशिक परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षणगृह पुणे कोल्हापूर रोड कोल्हापूर नाक्याजवळ कराड जिल्हा सातारा	१	०	१
१३	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना सांगली संचलित मुलांचे निरीक्षण गृह , मिरज रोड, सांगली.	१	१	०
१४	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना सांगली संचलित मुलींचे निरीक्षण गृह , मिरज रोड, सांगली.	१	०	१
१५	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षण गृह उत्तर सदर बाजार सोलापूर	१	१	०
१६	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलींचे निरीक्षण गृह सदर बाजार सोलापूर	१	१	०
१७	प्रादेशिक परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षण गृह पंढरपूर जिल्हा सोलापूर	१	१	०
१८	वा.बा. नवरंगे बालकाश्रम संचलित मुलींचे निरीक्षण गृह नवी पेठ पंढरपूर जिल्हा सोलापूर.	१	०	१
१९	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षण गृह बाल कल्याणसंकूल कोल्हापूर	१	१	०
२०	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलींचे निरीक्षण गृह बाल कल्याण संकूल कोल्हापूर	१	०	१
२१	कागल एज्यूकेशन सोसायटी,कागल संचलित मुलांचे बालगृह (निरीक्षण गृह) कागल जि. कोल्हापूर.	१	१	०
२२	जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना नाशिक संचलित मुलांचे निरीक्षणगृह /बालगृह त्र्यंबक रोड नाशिक	१	१	०
२३	जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना नाशिक संचलित मुलींचे निरीक्षणगृह /बालगृह त्र्यंबक रोड नाशिक	१	१	०
२४	प्रादेशिक परिवीक्षा व अनुरक्षण संघटना मालेगाव संचलित (निरीक्षणगृह)/बालगृह मालेगाव कॅम्प जि.नाशिक	१	०	१
२५	प्रादेशिक परिवीक्षा व अनुरक्षण संघटना मनमाड संचलित (निरीक्षणगृह)/बालगृह मनमाड जि.नाशिक	१	१	०
२६	जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना धुळे संचलित मुलांचे निरीक्षणगृह /बालगृह साक्री रोड मोगलाई धुळे.	१	१	०

~~२८३/टिप्पणी~~
३८३

अ.क्र	स्वयंसेवी संस्थेचे नाव व पत्ता	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
२७	जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना धुळे संचलित मुलींचे निरीक्षणगृह [illegible] रोड मोगलाई धुळे	१	१	०
२८	श्री स्वामी समर्थ महिला ग्रामिण विकास मंडळ नंदूरबार संचलित मुलींचे(निरीक्षणगृह)/बालगृह गिरीविहार सोसायटी नंदूरबार	१	०	१
२९	जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना जळगाव संचलित मुलांचे निरीक्षणगृह /बालगृह जिल्हा पेठ जळगाव	१	०	१
३०	जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना जळगाव संचलित मुलींचे निरीक्षणगृह /बालगृह जिल्हा पेठ जळगाव	१	१	०
३१	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना अहमदनगर, संचलित मुलांचे निरीक्षण गृह , झारे कर गल्ली ,अहमदनगर,	१	०	१
३२	जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना अहमदनगर, संचलित मुलींचे निरीक्षण गृह , झारे कर गल्ली अहमदनगर.	१	०	१
३३	प्रादेशिक परिविक्षा व अनुरक्षण संघटना संगमनेर , संचलित मुलांचे निरीक्षण गृह , संगमनेर ,अहमदनगर,	१	०	१
३४	प्रादेशिक परिविक्षा व अनुरक्षण संघटना श्रीरामपूर, संचलित मुलांचे निरीक्षण गृह , श्रीरामपूर, ,अहमदनगर,	१	१	०
३५	पीपल्स एज्युकेशन सोयायटी बुलढाणा संचलीत दिशा मुलींचे बालगृह(निरोक्षणगृह) एस.टी.स्टँडजवळ,वाशिम	१	०	१
३६	जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना औरंगाबाद संचलित मुलांचे निरीक्षणगृह/विशेष बालगृह एन-६१२ प्लॉटनं.७ सिडको, नवीन औरंगाबाद	१	०	१
३७	उपदेश बहुउददेशिय शिक्षण संस्था साकोली जिल्हा भंडारा संचलित (शासकीय)मुलांचे निरीक्षण गृह/बालगृह , भंडारा,	१	०	१
३८	बळीराम नाईक शिक्षण प्रसारक मंडळ सरस्वती मुलींचे (निरीक्षणगृह)/बालगृह थपटे तांडा,हिंगोली जि.हिंगोली	१	१	०
३९	वसुंधरा सेवा प्रतिष्ठान आंबेजोगाई संचलित सावित्रीबाई फुले मुलींचे (निरीक्षणगृह)/बागृह आंबेजागाई जि.बीड	१	०	१
४०	जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षणगृह उस्मानाबाद जि.उस्मानाबाद	१	०	१
४१	संधी निकेतन शिक्षण संस्था वडगांव ता. भोकर जिल्हा नांदेड संचलित (शासकीय) मुलांचे निरीक्षण गृह/बालगृह, आनंदनगर नांदेड,	१	१	०
४२	जिल्हा परिवीक्षा व अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह लेबर कॉलनी लातूर	१	१	०
४३	गणेश शिक्षण प्रसारक मंडळ अहमदपूर संचलीत मुलींचे निरीक्षणगृह/बालगृह,१८,कामधेनू पाईप इंडस्ट्री जवळ,अटीपार्क रोड एम.आय.डी.सी.रोड लातूर	१	०	१
४४	लक्ष्मी प्रतिष्ठान, परभणी संचलित मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह, परभणी	१	०	१
	एकूण	४४	१९	२५

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१	२	३	४
२४	२.१.५	**संनियंत्रण**	**----**

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१	२	३	४
२४,२५	२.१.५.१	**सामाजिक लेखापरीक्षा न करणे** MJJ नियमांच्या, नियम ८१ नुसार, राज्य शासनाने टाटा सामाजिक विज्ञान संस्था, राष्ट्रीय सार्वजनिक सहकार आणि बाल विकास संस्था, चाईल्ड लाईन इंडीया फाऊंडेशनइत्यादी, स्वायत्त संस्थांसह बालकांसाठी काम करणा-या अग्रगण्य संस्थाच्या मदतीने, बालगृहांच्या कामाकाजाचे संनियंत्रण आणि मुल्यमापन करण्यासाठी दरवर्षी सामाजिक लेखापरीक्षा करणे आवश्यक होते तथापि, आयुक्त , W&CD कडून DW&CD Os नां सामाजिक लेखापरीक्षा करण्याच्या सूचना उशीराने म्हणजे ऑगस्ट २०११ मध्ये दिल्या गेल्या, सूचना जारी केल्या असूनही, वर्ष २०११-१५ दरम्यान, निवड केलेल्या नऊ जिल्हयांपैकी एकाही जिल्हयाचे सामाजिक लेखापरीक्षा केली नव्हती , अशारितीने, बालगृहांच्या कामकाजाचे सनियंत्रण आणि मुल्यमापन करण्याच्या महत्वाच्या यंत्रणेची अंमलबजावणी होऊ शकली नाही. शासनाने असे सांगितले की, सामाजिक लेखापरीक्षेसंबंधी बाबींवर निर्णय घेण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती.	MJJ नियमांच्या, नियम ८१ मधे, बालकांसाठी कार्य करणा-या राष्ट्रीय सार्वजनिक सहकार व बाल विकास संस्था, भारतीय सामाजिक संस्था चाईल्ड लाईन इंडीया फाऊंडेशन, राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्था, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, निर्मला निकेतन, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ केंन्द्र व राज्य स्तरावरील समाजकल्याण मंडळे मान्यता प्राप्त विद्यापीठांचे गुन्हेगारी शास्त्र, समाजशास्त्र इत्यादी सारख्या स्वायत संस्था, व्यतिरिक्त मुलां साठी कार्य करणा-या आघाडीच्या संघटनांच्या सहकार्याने शासन प्रतीवर्षा गृहाच्या कामाकाजाचे संनियंत्रण आणि मुल्यमापन करील असे नमूद केलेल आहे. त्यानुसार व रिट पिटिशन १०२/२००७ च्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात सामाजिक लेखा परिक्षण करण्यासाठी संरचना नमूद केलेली आहे त्या प्रमाणे दिनांक २७ एप्रिल २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये. बाल गृह, बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती इत्यादी संस्थाचे सामाजिक लेखा परिक्षण करण्यासाठी राज्यसस्तरीय सामाजिक लेखा परिक्षण करण्यासाठी समिती गठित केलेली आहे, त्याची प्रत सोबत जोडली आहे. Principal Secretary / Secretary dealing with J J Act/ICPS/ representative — Chairperson Program Manager or Representative SARA — . Member Representative of NIPCCD/ State Social Welfare Board — Member NGO partner / Representative of CIF — Member Expert (Mental Health — Member Expert (Child Care & Protection) NGO — Member Commissioner dealing with JJ Act /ICPS — Member Secretary

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार, राज्यातील बालगृहांच्या तसेच बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती, विशेष बालन्याय पोलिस कक्ष आणि विशेष दत्तक स्त्रोत संस्था या संस्थांचे **सामाजिक लेखापरीक्षा करण्यासाठी राज्यस्तरीय सामाजिक लेखापरीक्षण समिती** स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्र . सालेप - २०१५/प्र.क्र.२००/का-८,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २७ एप्रिल, २०१६.

संदर्भ १. महिला व बाल विकास मंत्रालय , नवी दिल्ली, भारत सरकार यांचे D.O.No. ६-४/२०१५-CW-II दि. २३.६.२०१५ व ६-४/२०१५ CW-II of. २२.४.२०१५चे पत्र.
२.आयुक्तालय, महिला व बाल विकास, पुणे यांचे मबाविआ/बावि/बाकस/का-५/१५-१६/५०५३ दि.१५.९.२०१५ चे पत्र.

प्रस्तावना: संदर्भाधीन केंद्रशासनाच्या पत्रान्वये, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण), अधिनियम, २०००, नियम ३६ अन्वये सामाजिक लेखा समिती स्थापन होणे आवश्यक असल्याचे तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे, दाखल रिट पिटीशन (फौजदारी) क्रमांक १०२/२००७, तामिळनाडूतील अनाथालयातील मुलांचे शोषण , या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार, राज्यातील बालगृहांच्या तसेच बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती, विशेष बालन्याय पोलिस कक्ष आणि विशेष दत्तक स्त्रोत संस्था या संस्थांचे सामाजिक लेखापरीक्षा करण्यासाठी राज्यस्तरीय सामाजिक लेखापरीक्षण समिती स्थापन करणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. तसेच सदर सामाजिक लेखासमितीची संरचना देखील केंद्रशासनाकडून कळविण्यात आली आहे, त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार, गठित करण्यात येत असलेल्या समितीच्या संरचनेच्या अनुषंगाने, समिती सदस्य पुढीलप्रमाणे आहे :- (कृ.मा.प.)

अ. क्र.	केंद्रशासनाकडून सुचविलेली समिती संरचना	अंतिम संरचना	समितीतील पद
१	प्रधान सचिव/सेक्रेटरी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायद्याशी संबंधित,/ICPS/प्रतिनिधी	प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग	अध्यक्ष
२	कार्यक्रम व्यवस्थापक किंवा सारा प्रतिनिधी	कार्यक्रम व्यवस्थापक, MSCPS, पुणे.	समिती सदस्य
३	NIPCCD (national institute of Public Co-operation and Child Develpoment) चे प्रतिनिधी /राज्य समाज कल्याण मंडळ यांचे प्रतिनिधी	राज्य समाज कल्याण मंडळ यांचे प्रतिनिधी	समिती सदस्य
४	स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी/चाईल्डलाइन फांऊडेशन यांचे प्रतिनिधी	युनिसेफ, अंधेरी, मुंबई यांचे प्रतिनिधी	समिती सदस्य
५	तज्ज्ञ (मानसिक आरोग्य)	डॉ. अजिज अहमद कादरी मानसोपचारतज्ज्ञ, औरंगाबाद.	समिती सदस्य
६	तज्ज्ञ (मुलांची काळजी व संरक्षण) स्वयंसेवी संस्था	१.स्नेहालय, कब नं २३९, अमोनिया प्लॅटजवळ, एम. आय. डीय सी. निंबळक , अहमदनगर. २. माय होम इंडिया, ५ न्यू जगदीश भवन, कोलडोंगरी, स्वामी नित्यानंद मार्ग, कोस्टल गोवा हॉटेल मागे, अंधेरी –पूर्व मुंबई-४०० ०६९	समिती सदस्य समिती सदस्य
७	संचालक/आयुक्त (बालन्याय संबंधित/ICPS)	आयुक्त , महिला व बालविकास विभाग ,पुणे	सदस्य सचिव

उपरोक्त प्रमाणे गठित करण्यात येणा-या समितीची कार्ये केंद्रशासनाच्या दि. २२.४.२०१५ च्या पत्रामध्ये नमुद केल्यानुसार खालीलप्रमाणे असतील :-

१. राज्य समितीकडून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण आणि मूल्यांकन दर वर्षी करण्यात येईल. समितीकडून आस्थापना, बाल न्याय मंडळ आणि बाल कल्याण समिती यांचेकडील प्रलंबित प्रकरणे, विशेष बाल न्याय पोलिस पथकाची कार्यवाही विशेषत: बाल न्याय प्रशासनाचे कामकाज बालस्नेही वातावरणात

होत आहे याची खात्री करणे, राज्यात प्रभावी अंमलबजावणीसाठी इतर संबंधीत प्रकरणे यांचा परामर्श आढावा घेण्यात येईल.

२. प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक बालगृह, शिशुगृह यांच्या कामकाजाचा आढावा घेणे तसेच एकात्मिक बाल संरक्षण योजनेअंतर्गत कार्यरत - अनुरक्षण गृहासारख्या संस्थेत्तर सेवा काळजी कार्यक्रमांतर्गताच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

३. केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालय, नवी दिल्ली आणि राज्य सरकार यांना वार्षिक सामाजिक लेखापरीक्षा अहवाल सादर करणे.

सामाजिक लेखा परीक्षा यासाठी केंद्र शासनाकडून दि. १४.८.२०१५ व दि. २९.९.२०१५ रोजी नवी दिल्ली येथे सर्व राज्य व संबंधित विषयाचे तज्ज्ञ यांच्या बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. या बैठकीतील चर्चेनुसार बालगृह/बाल कल्याण समिती/बाल न्याय मंडळ/ विशेष बाल न्याय पोलिस पथक / विशेष दत्तक स्त्रोत यांच्या सामाजिक लेखा परीक्षेसाठीचे विहीत नमुने (formats) निश्चित करण्यात आले आहेत. समितीतील अशासकीय सदस्यांच्या कार्यकालाबाबत केंद्रशासनाकडून अधिक माहिती प्राप्त करण्यात आल्यानंतर यथावकाश निर्णय घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि.व.दळवी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
महिला व बाल विकास मंत्रालय , नवी दिल्ली, भारत सरकार.
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
राज्य समाज कल्याण मंडळ यांचे प्रतिनिधी
युनिसेफ, अंधेरी, मुंबई.
डॉ. अजिज अह.कादरी मानसोपचारतज्ज्ञ, मेंटल हॉस्पीटल, नाशिक रोड,पाडेगांव,औरंगाबाद,महाराष्ट्र ४३१००२.
स्नेहालय, कब नं २३९, अमोनिया प्लॅटजवळ, एम. आय. डीय सी. निंबळक , अहमदनगर.
माय होम इंडिया, ५ न्यू जगदीश भवन, कोलडोंगरी, स्वामी नित्यानंद मार्ग, कोस्टल गोवा हॉटेल मागे, अंधेरी —पूर्व मुंबई-४०० ०६९
महिला व बाल विकास विभाग सर्व कार्यासने.
निवड नस्ती-८

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
२५	२.१.५.२	**बाल काळजी व संस्थांच्या निरीक्षणातील कमतरता,** MJJ नियम २०११ च्या नियम ७(B) (६) नुसार CWC संदस्यांनी संस्थेतील मुलांच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी तीन महिण्यातून एकदा प्रत्येक CCI ला भेट देवून राज्य सल्लागार मंडळाकडे अहवाल सादर करणे आवश्यक होते. तसेच MJJ नियम २०११ च्या नियम ८२(१०) नुसार जिल्हा सल्लागार मंडळांनी संस्थांमध्ये पुरविल्या जाणाऱ्या सुविधांची आणि काळजी व संरक्षणाच्या दर्जाची तपासणी करायला तीन महिन्यातून एकदा भेट देवून त्याचा अहवाल राज्य शासनाने सादर करावयाचा होता. लेखा परीक्षेला खालील बाबी आढळून आल्या. • २०१० ते २०१५ दरम्यान निवड केलेल्या ९ जिल्ह्यापैकी फक्त CWC अहमदनगरने जानेवारी ते मार्च २०१४ या त्रैमासिक कालावधीचा तपासणी अहवाल राज्य सल्लागार मंडळाला सादर केला होता. • वर्ष २०१०-१५ दरम्यान निवड केलेल्या ९३[३३] CCI पैकी ९१ CCI मध्ये CWC ने दिलेल्या भेटीच्या संख्येत ३ ते २० भेटी इतकी तूट होती. शासनाने सांगितले की, सर्व DW&CDOs ना CWC द्वारे CCI ची तपासणी केली जाईल याची सुनिश्चीती करावी आणि राज्य सल्लागार मंडळाला अहवाल सादर करावा अशा सुचना देण्यात आल्या आहेत (जून २०१५) • निवड केलेल्या ९३ CCI पैकी ८१ CCI मध्ये वर्ष २०१४-१५[३४] दरम्यान जिल्हा सल्लागार मंडळाने एकही भेट दिली नव्हती. शासनाने असे सांगितले की, जिल्हा सल्लागार मंडळांनी CCI ला भेटी देवून शासनाला तपासणी अहवाल सादर करावयाच्या सुचना देण्यात आल्या आहेत.	जिल्हा सल्लागार मंडळाची स्थापना महिला व बाल विकास विभागाची अधिसुचना दिनांक ०९ जुलै, २०१३, अधिसुचना दि. ०१ जानेवारी, २०१४, अधिसुचना दि. २४ जुलै, २०१४, आणि अणि अधिसुचना दिनांक १८ नोव्हेंबर, २०१४ अन्वये करण्यात आली होती. सदर जिल्हा सल्लागार मंडळाने संस्थांना नियमीत भेटी द्याव्यात या बाबत वेळोवेळी आयुक्तालय स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत होता. तसेच जिल्हा सल्लागार मंडळाकडून संस्थांना दिलेल्या भेटीबाबत आढावा घेवून त्याचे संकलन आयुक्तालय स्तरावरुन करण्यता येत आहे. त्यानुसार राज्य सल्लागार मंडळाने राज्यातील १६७ संस्थांना भेटी दिल्या असून त्या भेटीचे अहवाल शासनास पत्र क्र. १२२३, दिनांक ०२/०३/२०१६ अन्वये सादर करण्यात आलेले आहेत. शासन निर्णय दिनांक १५ जून, २०१५ अन्वये राज्यातील सर्व बाल कल्याण समिती (CWC) बाबतची कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ आणि सुधारीत नियम २०११ यामध्ये जिल्हा सल्लागार मंडळाबाबत करण्यात आलेली तरतूद ही बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० आणि सुधारीत अधिनियम २००६ च्या अनुषंगाने करण्यात आलेली होती. त्यानुसार जिल्हा सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ नव्यानेच कार्यान्वीत केला असून सदरचा अधिनियम कार्यान्वीत करण्यात आल्याने यापुर्वीचा अधिनियम २००० आणि सुधारीत अधिनियम २००६ रद्दबदल करण्यात आला आहे. त्यामुळे या कायद्यांमधील

		CWC आणि जिल्हा सल्लागार मंडळाने CCI च्या जर नियमीत तपासण्या केल्या असत्या तर मुलांना भेडसावणाऱ्या अडचणी ठळकपणे निदर्शनास आल्या किंवा त्यावर उपाय योजना करण्याची संधी शासनास मिळाली असती.	तरतूदी आपोआपच रद्द झाल्या आहेत. बाल न्याय अधिनियम,२०१५ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाचे बाल न्याय नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

[३३] नऊ बाल संगोपन संस्थांव्यतिरिक्त

[३४] जिल्हा सल्लागार मंडळे ही जुलै २०१३ ते नोव्हेंबर २०१४ दरम्यान गठित केली होती.

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
२५,२६	२.१.५.३	**बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन न होणे** MJJ नियमांच्या नियम ८ (२९) नुसार, आयुक्त W&CD यांचेकडून cwc च्या कामकाजाची तपासणी आणि मूल्यमापन तीन महिन्यातन एकदा करावयाचे होते, मूल्यमापनाचा अहवाल राज्य शासनाला सादर करावयाचा होता, दस्तऐवजांची तपासणी केली असता असे दिसून आले की वर्ष २०१०-१५ दरम्यान आयुक्त, W&CD यांनी cwc च्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी त्यांची कधीच तपासणी केली नव्हती, उलट आयुक्त, W&CD यांनी cwc ची तपासणी आणि मूल्यमापनाचे अधिकार DW&CD कडे सोपविले आहेत.	MJJ नियमांच्या नियम ८ (२९) नुसार, आयुक्त W&CD यांचेकडून cwc च्या कामकाजाची तपासणी आणि मूल्यमापन तीन महिन्यातन एकदा करावयाचे होते, तथापि आयुक्तालयामध्ये कर्मचारी वर्ग अपुरा असल्यामुळे व नियमित पणे बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे मुल्यमापन करणे शक्य नसल्यामुळे आयुक्तालयाचे पत्र दिनांक १५.६.२१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हयातील कार्यरत बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे निरिक्षण व मुल्यमापन करण्याचे अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील कलम २७ (१०) नुसार बाल कल्याण समिती कामकाजाचा आढावा घेण्यासाठी सबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे, परंतु महाराष्ट्र शासनाचे या अधिनियमा अंतर्गत स्वतंत्र नियमावली कार्यन्वित करण्याची कार्यवाही सुरु असून सदर कार्यवाही पुर्ण होताच त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल. रिट पिटिशन १०२/२००७ च्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात सामाजिक लेखा परिक्षण करण्यासाठी संरचना नमूद केलेली आहे त्या प्रमाणे दिनांक २७ एप्रिल २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये. बाल गृह, बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती इत्यादी संस्थाचे सामाजिक लेखा परिक्षण करण्यासाठी राज्यसस्तरीय सामाजिक लेखा परिक्षण करण्यासाठी समिती गठित केलेली आहे, त्याची प्रत सोबत जोडली आहे.

Principal Secretary / Secretary dealing with J J Act/ICPS/ representative	Chairperson
Program Manager or Representative SARA	. Member
Representative of NIPCCD/ State Social Welfare Board	Member
NGO partner / Representative of CIF	Member
Expert (Mental Health	Member
Expert (Child Care & Protection) NGO	Member
Commissioner dealing with JJ Act /ICPS	Member Secretary

शासन स्तरावर सदर समितीची बैठक घेणेबाबत शासनाला विनंती केलेली आहे

शिफारस ४ : बाल गृहांच्या कामकाजाचे संनियंत्रण आणि मुल्यमापन करण्यासाठी नियमीत सामाजिक लेखापरीक्षा केली जाईल याची शासनाने सुनिश्चिती करावी बाल कल्याण समितीचे सदस्य आणि जिल्हा सल्लागार मंडळे बाल गृहांची आवश्यक संख्येत तपासणी करतील आणि सुधारणात्मक कारवाई करण्यासाठी नियमीत अहवाल सादर करतील यांची देखिल राज्य सल्लागार मंडळाने आणि शासनाने सुनिश्चिती करावी

शिफारसीवरील अभिप्राय :-

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामध्ये सामाजिक लेखापरिक्षण करण्यासाठी खालीलप्रमाणे समितीची संरचना केलेली आहे. सदर समितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्य असल्याचे नमुद आहे:

			Principal Secretary / Secretary dealing with J J Act/ICPS/ representative	Chairperson
			Program Manager or Representative SARA	. Member
			Representative of NIPCCD/ State Social Welfare Board	Member
			NGO partner / Representative of CIF	Member
			Expert (Mental Health	Member
			Expert (Child Care & Protection) NGO	Member
			Commissioner dealing with JJ Act /ICPS	Member Secretary

उपरोक्त नमुद संरचनेप्रमाणे शासनाने दिनांक २७.४.२०१६ रोजी बालगृहे, बाल न्याय मंडळ, बाल कल्याण समिती, इ.संस्थांचे सामाजिक लेखापरिक्षण करण्यासाठी राज्यस्तरीय सामाजिक लेखापरिक्षण समिती स्थापन केलेली आहे. त्यानुसार शासनस्तरावर सदर समितीची बैठक घेणेबाबत शासनाला विनंती केलेली आहे.

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील पृ.क्र	परिच्छेद क्रमांक	परिच्छेदाचा तपशील	विभागाचे अभिप्राय
१	२	३	४
२६	२.१.६	**निष्कर्ष-** राज्य शासनाने वर्ष २०१०-१५ दरम्यान केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदी २४ टक्क्यांनी कमी होत्या आणि म्हणून बाल काळजी संस्थांमध्ये राहणा-या मुलांच्या मुलभूत गरजा पुरविण्यासाठी त्या अपु-या होत्या. काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठीचे आणि संगोपनासाठी संस्थेत दाखल करण्यासाठीचे नियोजन ठोबळमानाने अपुरे होते. राज्य सल्लागार मंडळ, बाल कल्याण समित्या आणि बाल न्याय मंडळांचे कामकाज अपु-या सदस्यांच्या उपस्थितीत पार पाडले जात असल्यामुळे राज्यातील संस्थात्मक व्यवस्था स्वत:च कमकुवत होती. राज्यात JJ अधिनियम २००० अंतर्गत नोंदणी न झालेल्या ६३५ बाल काळजी संस्था कार्यरत होत्या. बाल काळजी संस्थामध्ये पुरवावयाच्या विविध सुविधा एकतर उपलब्ध नव्हत्या किंवा त्या पुरविण्यात कमतरता होती. राज्य शासनाने ठरवून दिलेल्या	राज्यामध्ये संस्थांची संख्या जास्त असल्याने तसेच शासनाकडून या संस्थांना देण्यात येणारा निधी अत्यंत अपूरा असल्याने विभागाकडून पुरवणी मागणी व्दारा शासनाकडे निधीची मागणी करण्यात येत होती.परंतू शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध झालेला नाही. काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी व बालकांच्या संगोपनासाठी त्यांना संस्थेत दाखल करणे हे अधिनियमातील तरतुदीनुसार संयुक्तिक नाही.राज्यामधील बालगृहे ही प्रामुख्याने बाल न्याय अधिनियमांतर्गत कार्यरत असून या अधिनियमात असलेल्या तरतुदीनुसार ज्या बालकांना सामाजिक पुन:स्थापन आणि पुनर्वसनाची गरज आहे.अशीच बालके संस्थामध्ये अंतिम पर्याय म्हणून दाखल करण्याबाबत नमुद आहे.तथापि विभागाच्या असे निदर्शनास आले आहे की,बऱ्याच बालगृहामध्ये केवळ शिक्षणासाठी मुले दाखल होत आहेत सदरची बालगृहे शिक्षणसाठी नसून ज्या बालकांना सामाजिक पुन:स्थापनेची गरज आहे अशीच बालके बालगृहात दाखल होणे अधिनियमास अभिप्रेत आहे परंतू बाल कल्याण समितीकडून अधिनियमातील तरतुदींचे काटेकारपणे पालन होत नसल्याचे दिसून आले. अधिनियमाची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आयुक्तालयाने अधिनियमातील तरतुदींचा विचार करून बालकांच्या संस्थेतील प्रवेश पदधतीबाबतच्या सुचना परिपत्रक क्र.२४२ दिनांक ०१.०६.२०१६ अन्वये निर्गमित केलेल्या होत्या.तसेच अधिनियमात नमुद केल्याप्रमाणे संस्थेत दाखल झालेल्या बालकांचा आढावा घेवून या

		कपडे आणि बाडबिस्तऱ्यांच्या प्रमाणकांचे पालन शासनाव्दारे चालविल्या जाणा-या बाल काळजी संस्थामध्ये केले गेले नव्हते. तसेच, NGO कडून चालविल्या जाणा-या संस्थासाठी पोषण आणि आहराचे प्रमाण आणि कपडे आणि बाडविस्त-याचे प्रमाण विहित केले नव्हते जे MJJ नियम, २००२ च्या विरुध्द होते. ९३ संस्थापैकी दहा संस्थांमध्ये विधिसंघर्षग्रस्त बालके आणि काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची निवास व्यवस्था एकाच जागेमध्ये केली होती, जे JJ नियम, २००७ च्या विरुध्द होते. निवड केलेल्या नऊ जिल्हयापैंकी आठ जिल्हयामध्ये वर्ष २०१०-२०१५ दरम्यान २५ गृहांतून ५५८ बालके सुरक्षेतील त्रुटीमुळे फरार झाली होती. मानसिकरित्या अपंग असलेल्या बालकांसाठीची गृहे, भारतीय पुनर्वसन मंडळ अधिनियम, १९९२ अंतर्गत आवश्यक असलेल्या प्रशिक्षित कर्मचा-याविना जसे, संभाषणतज्ञ, चिकित्सालयीन मानसोपचारतज्ञ, व्यवसाय समुपदेशक, विशेष शिक्षक, सातत्याने कार्यरत होती. ८३ बाल काळजी केंद्रांपैकी ४२ केंद्रांमध्ये २०१०-२०१५ दरम्यान सहवसियांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले गेले नव्हते. शासनाव्दारे चालविल्या जाणा-या सर्व ४३ संस्थामध्ये अधिक्षक हे महत्त्वाचे पद ४२.३० टक्के इतक्या लक्षणीय प्रमाणात रिक्त होते. निवड केलेल्या नऊ जिल्हयापैंकी एकाही जिल्हयाने बाल गृहांची वर्ष २०११-१५ दरम्यान सामाजिक लेखापरिक्षा केली नव्हती. बाल कल्याण समित्याकडून आणि जिल्हा सल्लागार मंडळांकडून बाल काळजी संस्थांची तपासणी करण्यात कमतरता होती.	बालकांचा सामाजिक तपास अहवाल प्राप्त करुन घेवून अधिनियमाच्या कलम २(१४) नुसार नमुद केलेल्या व्याख्येमध्ये जी बालके बसत आहे अशाच बालकांना अंतिम पर्याय म्हणून संस्थेत दाखल करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या.त्यामूळे बाल कल्याण समितीने कार्यवाही करून राज्यातील एकूण मान्य संख्या ९०१५७ बालकांपैकी माहे सप्टेंबर २०१६ अखेर या बालगृहातील उपस्थिती केवळ १३३५० इतकी दिसून आली.त्यामूळे मुळातच बाल कल्याण समितीने दिलेल्या चुकीच्या आदेशाने बालके संस्थामध्ये दाखल होत असल्याचे चित्र दिसून आले.सदयस्थितीत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या आणि अंतिम पर्याय म्हणून संस्थात्मक सेवा पुरविणाऱ्या बालकांची संख्या सिमीत असल्यामूळे या बालकांना बाल न्याय अधिनियमात नमूद केलेल्या तरतुदीनुसार सुविधा पुरविणे सहज शक्य होणार आहे.तसेच केंद्र शासनाने सदर अधिनियमाबाबत आदर्श नियमावली तयार केली असून सदर नियमावलीमध्ये प्रवेशितांना पुरविण्यात येणारा आहार,कपडे,बाडबिस्तारा,भौतिक सुविधा इ.बाबत निकष निश्चित करण्यात आलेले आहे.सदर निकषाच्या अधिन राहून महाराष्ट्र राज्याचे निकष तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याने राज्यातील सर्व संस्थांना सदर निकष बंधनकारक राहणार आहे. बाल न्याय अधिनियम २००० आणि सुधारित अधिनियम २००६ मध्ये जिल्हा सल्लागार मंडळ आणि राज्य सल्लागार मंडळ गठित करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली होती.तथापि सन २०१५ मध्ये नविन बाल न्याय अधिनियम लागू झाला असून सदर अधिनियमात राज्य सल्लागार मंडळ आणि जिल्हा सल्लागार मंडळ ही तरतुद नाही. केंद्र शासनाने बाल न्याय नियम प्रसिध्द केले आहेत. तसेच बाल न्याय अधिनियम,२०१५ मधील तरतूदीनुसार राज्य शासनाचे नियम करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. ४५५

Section Officer
Women and Child Development
Department
Government of Maharashtra

साक्ष :

परिच्छेद क्रमांक २.१.— महाराष्ट्रातील बाल काळजी संस्थांचे कामकाज

२.१ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ८ व ३० मे, १४ जून, १ ऑगस्ट व २६ सप्टेंबर २०१८ रोजी महिला व बालविकास विभागाचे सचिव तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महाराष्ट्रातील बाल काळजी संस्थांचे कामकाज यासंदर्भात संक्षिप्त माहिती देण्यास सांगितले असता, महिला बाल विकास खात्यांतर्गत दोन आयुक्त व आय.सी.डी.एस. आहेत. त्यांच्या अंडरमध्ये राज्यातील सर्व अंगणवाडी येतात. तसेच महिला व बाल विकास अधिकारी आहेत. त्यांच्या माध्यमातून मुलांचे व महिलांचे वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात.

पुणे आयुक्तालयांतर्गत जेवढे मुले येतात, त्या मुलांचे दोन कॅटेगरीमध्ये विभागलेले आहे. पहिला भाग म्हणजे " The chidren who are in need of care and protection " अशी मुले की, ज्यांना जे.जे. ॲक्ट अंतर्गत त्याची अशी व्याख्या केली आहे की, ज्या मुलांना काळजी व संरक्षणाची गरज आहे. त्यामुळे अनाथ, रोडवर सापडणारे, रेल्वे स्टेशनवर, पालकांनी टाकून दिलेले तसेच ज्या मुलांची काळजी घेणारे कोणीही नाही. They are categorised as children in need of care and protection. आणि दुसऱ्या प्रकारचे मुले आहेत ते " Children in conflict with law " पोलिसांना किंवा एनजीओला तसेच इतर कोणत्याही माणसांना त्याची अशी कृती होती की, They have come in conflict with law, आणि त्यांना ज्युव्हीनाईल जस्टीस बोर्डसमोर उभे करण्यात आले आहे. अशा दोन प्रकारच्या मुलांसाठी काही बालगृह आहेत. हे ४० बालगृह हे शासनाचे आहेत. तसेच इतर जे बालगृह आहेत ते एनजीओ संचलित आहेत. त्यामध्ये मुलांना Institutionalise care देण्यात येते आणि जी मुले " in conflict with law " आहेत त्यांच्यासाठी निरीक्षण गृहाची स्थापना करण्यात आली आहे. जे. जे. ॲक्ट बोर्ड त्यांना प्रस्तावित करतात. पनिशमेंट पिरिअडसाठी त्यांना निरीक्षणगृहामध्ये ठेवले जाते. अशा प्रकारच्या दोन संस्थांची स्थापना शासनाने केली आहे. शासकीय संस्था या शासनाच्या नियमानुसार चालतात. ज्या संस्था एनजीओ चालवितात त्यामध्ये अशी तरतूद आहे की, मुलांवर होणारा ९० टक्के खर्च हा शासन देतो. यामध्ये दोन प्रकारचा खर्च आहे. प्रति बालक प्रति महिना या दराने द्यावा लागतो. व दुसरा प्रशासनिक खर्च आहे. तो देखील शासन मान्यच आहे. उर्वरित १० टक्के हिस्सा त्यांनी स्वतः उभा करायचा आहे.

अशा प्रकारचा नियम हा जे. जे. ॲक्ट अंतर्गत सन २००९ मध्ये लावण्यात आला होता. त्यानंतर सन २०१५ मध्ये तो सुधारण्यात आला. सन २०१८ मध्ये केंद्र शासनाने या कायद्यामध्ये ज्या ज्या सुधारणा केल्या आहेत, त्या सर्व सुधारणा राज्य शासनास लागू आहेत. अशा प्रकारची सर्व माहिती विधानसभेमध्ये देखील सादर केलेली आहे. सन २०१८ मध्ये जे.जे. ॲक्ट हा नवीन स्वरुपात लागू करण्यात आलेला आहे. त्यामध्ये बालगृह, सी.डब्ल्यू.सी. जे.जे. आणि निरीक्षणगृह या सर्वांची नवीन नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

राज्य शासनाकडे ११५३ बालगृहे होती. अलीकडच्या काळामध्ये राज्य शासनाने २१६ बालगृहांची मान्यता रद्द केलेली आहे. उर्वरित सर्व बालगृह कार्यान्वित आहेत. परंतु नवीन नियमावलीप्रमाणे या सर्व बालगृहांना शासनाकडे पुन्हा नोंदणी करण्याची आवश्यकता आहे. त्याचे कारण असे की, त्यामध्ये कॉस्ट नॉर्मस् तसेच मुलांना सुविधा पुरवावयाच्या आहेत. The kind of employees they have to employ and kind of services they have to deliver to children यामध्ये जे. जे. ॲक्टमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आलेला आहे. नवीन नियमानुसार सर्व खात्री शासनाला पटवून दिली तरच त्या बालगृहांना मान्यता दिली जाणार आहे. अन्यथा त्या बालगृहाची मान्यता रद्द केली जाणार आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने जी २१६ बालगृहे बंद केलेली आहेत, त्यापैकी किती मान्यता प्राप्त बालगृहे होती ? अशा बालगृहांना किती अनुदान दिले जात होते ? Who will bear the 10% contribution ? अशी विचारणा समितीने केली असता, The NGO will bear 10% contribution यातील सर्व बालगृहे ही एनजीओ संचालित अनुदानित बालगृहे होती. पूर्वी पर मंथ पर चाईल्ड १२१५ रुपये दिले जात होते. आता नवीन शासन निर्णयानुसार पर मंथ पर चाईल्ड २००० रुपये दिले जात आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक २.१.२.१ अर्थसंकल्पिय तरतुदीमध्ये घट

२.२ राज्यात कार्यरत असलेल्या बाल काळजी संस्थांकरिता महिला व बालविकास विभागामार्फत सातत्याने मागणी केलेला निधी आणि उपलब्ध सुधारित अर्थसंकल्पीय तरतूद यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत आढळून येत आहे. यासंदर्भातील सन

२०१४-१५ पर्यंतची सर्व आकडेवारी समितीकडे प्राप्त आहे. मुद्दा असा आहे की, हा खूप मोठा अनुशेष आहे. एवढा मोठा अनुशेष राहण्याचे कारण काय आहे ? त्या संस्था आवश्यकतेपेक्षा जास्त निधीची मागणी करतात का ? शासन जेवढा निधी उपलब्ध करून देईल तो सर्व निधी त्या संस्था खर्च करतात का ? अशी विचारणा समितीने केली असता, ही गोष्ट खरी आहे की, आयुक्तालयाने जेवढी मागणी विभागाकडे नोंदवली त्या प्रमाणात त्या निधीची अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. त्या अनुषंगाने सन २०१० ते २०१५ पर्यंत बालगृहांचे थकीत अनुदान हा विषय मोठ्या प्रमाणावर झाला होता. याच विषयाच्या संदर्भात औरंगाबाद येथे न्यायालयीन प्रकरण देखील झालेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक १ ऑक्टोंबर २०१६ रोजी वित्त विभागाने थकीत अनुदानासंदर्भात एक विशेष मोहिम हाती घेऊन, या मोहिमेच्या माध्यमातून अशा प्रकारे किती अनुदान थकीत आहेत व या सर्व थकीत अनुदानसंदर्भात काय निर्णय घेणे आवश्यक आहे. यासाठी वित्त विभागाकडून बहु विभागीय चौकशी लावण्यात आली होती. त्यावेळी सर्व बालगृहांनी त्यांची सर्व देयके वित्त विभागाकडे सादर केली होती. त्या सर्व देयकांची तपासणी करण्यात आली होती. एकूण ११५३ बालगहांपैकी १९२ बालगृहांनी संबंधित सर्व कागदपत्रे या चौकशी समितीस सादर केली होती. या समितीमध्ये वित्त विभागातील संचालक स्तरावरील अधिकारी होते. तसेच सी.ए. ची देखील नेमणूक करण्यात आली होती. या सर्व बाबीमध्ये त्यांना बऱ्यापैकी तफावत आढळली आहे. आता परिस्थिती अशी आहे की, त्यांनी जो अहवाल सादर केला आहे. या संदर्भात वित्त मंत्री महोदयांकडे देखील बैठक झालेली आहे. विभागाकडे सन २०१० पासून २०१५ पर्यंत १५६ करोडचे देयक सादर करण्यात आले होते ते सर्व देयक नाकारण्यात आलेले आहे. त्यादृष्टीने आज शासनाकडे सन २०१० ते सन २०१५ पर्यंतची थकीत बाकी काहींच नाही. सन २०१६-१७ पासून नियमित प्रदान सुरू आहे. ही देयके शासनाने नाकारलेली आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

Whether it was approved by your Commissionarate ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये दोन मुद्दे आहेत. ज्या मुलांच्या संदर्भात ही देयके सादर करण्यात आली आहेत त्या सी.डब्ल्यू.सी. कमिटीने त्या मुलांना दाखल करण्याचे आदेश दिले होते. कोणतेही बालगृह असले तरी त्यामध्ये थेट मुलांना प्रवेश मिळत नाही. अशी काही मुले आहेत who are in need of care and protection, अशा मुलांना सी.डब्ल्यू.सी. कमिटीसमोर हजर केले जाते. त्यानंतर ती कमिटी निर्णय घेते की, या मुलांना पालकांकडे पाठवायचे आहे की, बालगृहामध्ये ठेवायचे आहे. त्यावेळी त्यांना मुलांना त्यांनी बालगृहामध्ये पाठविले होते. पण ज्यावेळी बालगृहांची तपासणी करण्यात आली त्यावेळी असे आढळून आले की, ज्या प्रकारची सोयी-सुविधा नियमाप्रमाणे करणे आवश्यक होते त्या प्रमाणात त्या मुलांना सोयी-सुविधा देण्यात आलेल्या नव्हत्या. त्यानंतर या बालगृहासंबंधी सर्व कागदपत्रे कमिटीसमोर सादर करण्यात सांगितले होते, त्यावेळी संबंधित बालगृहाच्या प्रमुखांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र सादर करू शकले नाहीत. त्यामध्ये अव्हेलेबल डोनेशन, बालगृहाला झालेला खर्च अशा प्रकारची कोणतीही माहिती त्या कमिटीला देऊ शकले नाहीत. विभागाकडे यामधील १५६ कोटी रुपये एवढी रक्कम देय होती. शिल्लक नव्हती असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

तो संपूर्ण निधी नाकारण्यात आला. विभागाकडील सर्व उपलब्ध निधी विभागाने खर्च केलेला आहे. Whether it was legitimate ? Because the expenditure bills are rejected by the Government. It is appreciable. We don't object on it. प्राप्त निधी पूर्ण खर्च केला आहे. उर्वरित सर्व निधी नामंजूर झालेला आहे. याचा अर्थ असा होतो की, ज्या ज्या वर्षी वित्त विभागाने निधी दिला त्या त्या वर्षी त्यांनी विभागाचे कोणतेही देयक पाहिलेले नाही. काही ठराविकच रक्कम वित्त विभागाने महिला व बालविकास विभागाला दिलेली नाही. वित्त विभागाकडे जेवढा निधी उपलब्ध होता तेवढा निधी महिला व बाल विकास विभागाला दिलेला आहे. जो निधी विभागास प्राप्त झाला तो संबंधित बालगृहाला वितरित केला. सदर निधी वितरित करतेवेळी त्या बालगृहाची विभागाने तपासणी केली आहे का ? त्या बालगृहामध्ये मुले आहे की, नाहीत ? या संदर्भात विभागाने चौकशी केली आहे का ? तसेच जो निधी शिल्लक होता तो निधी ना मंजूर करण्यायोग्य होते का ?. जो निधी वाटप केलेला आहे, त्यामध्ये देखील अशीच परिस्थिती असेल. या सर्व बाबींची तपासणी केली आहे का ? जर केली नसेल तर अशा प्रकारची तपासणी करणार का ? एकूण रक्कम किती होती ? अशी विचारणा समितीने केली असता, १५० कोटी रुपये नामंजूर करण्यात आले आहेत. एकूण थकबाकी ही सन २०१० ते २०१५ पर्यंतची १९१ कोटी रुपयांची होती. न्यायालयाने असे आदेश दिले होते की, त्यांना विभागाने पार्ट पेमेंट करावे. We have made the payment of Rs. 41 Crs. to them. तरी पण ते सुद्धा परत घेण्याची वेळ आलेली आहे. कारण की, ते ही विभागाला व्यवस्थित डेटा देऊ शकले नाहीत. We are in the process of recovering Rs. 41 cr which was given as per the orders of High Court. कारण की त्यांचाही डेटा विभागाला मिळालेला नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महिला व बालकल्याण विभागाचा वार्षिक आऊट-ले किती आहे ? सन १९९१ मधील थकबाकी होती. सदर काळामध्ये विभागाने चुकीने ४१ लाख रुपये दिले असे समितीने निदर्शनास आणले असता, बालगृहे व निरीक्षण गृहासाठी ५ वर्षामध्ये एकूण ५९५ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. १९९१ मधील ४१ लाख एवढा निधी हा कोर्टाच्या आदेशनुसार देण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचे जे १९७ कोटी रुपये शिल्लक होते ते फक्त चुकीचे होते असे विभागाचे मत आहे काय ? बाकी सर्व निधी बरोबर वाटप करण्यात आलेला आहे. या संदर्भातील माहिती देण्याबाबत समितीने सूचित केले असता, यामध्ये दोन गोष्टी आहेत की, मुलांचा सांभाळ त्यांनी केलेला आहे. यामध्ये कोणताही वाद नाही. त्याचे कारण असे की, मुले जी आहेत ती सी.डब्ल्यू.सी. यांच्याकडे पाठविली होती. हे देखील खरे आहे की, ज्या प्रमाणात त्या मुलांना सोयी-सुविधा पुरविणे आवश्यक होते त्या पुरविण्यात आलेल्या नाहीत. इतकेच नव्हे तर त्यांनी त्या मुलांना निकृष्ट दर्जाचे जेवण दिले. तसेच त्यांना शालेय गणवेश देखील दिलेले नाहीत, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभाग त्यांना निधी देत नसेल तर ते सर्व सुविधा कसे देऊ शकतील ? महिला व बालकल्याण विभागाचे आयुक्तांनी जेवढ्या निधीची मागणी केली ती मागणी चुकीची होती का ? This para is based on the demands made by the Commissioner to the Governement for funds. Are you saying that all the proposal sent by the Commissioner were wrong ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातुन केली असता, यामध्ये असे अपेक्षित नाही की, जर निधी दिला तरच सुविधा द्यायच्या आहेत. विभागीय आयुक्तांची ती मागणी चुकीची नव्हती.

I never said that and I stand by the proposal of the Commissioner. Because the Commissioner had made the proposal on the basis of the number of children who were available at that time according to the orders of CWC. आयुक्तांची मागणी रास्त होती. शासन स्तरावर जेवढा निधी उपलब्ध होता त्यानुसार त्यांना तो निधी देण्यात आलेला आहे. त्यासंदर्भात पुरवण्या मागण्यादेखील सादर करण्यात आलेल्या आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सदर प्रकरणी विसंगती अशी दिसते की, आयुक्तांनी योग्य मागणी केली. त्या मागणीची विभाग पूर्तता करू शकला नाही. मागणी केलेल्या निधीपैकी विभागाने फक्त ५९५ कोटी रुपयांची पूर्तता केलेली आहे. तो निधी पूर्णः खर्च झालेला आहे. मुद्दा असा आहे की, जे ५९३ कोटी रुपये दिलेले आहेत त्यापेक्षा आणखी कमी दिले असते तर आणखी निधी वाचला असता. जे ७८९ कोटीचे बिल आहे त्याची प्रामाणिकता ज्याप्रमाणे वित्त विभागाने पाहिलेली आहे, तशी पडताळून पाहणार का ? जर त्यांच्याकडून वसुली निघेल ती विभाग वसूल करणार आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक १ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार ज्याप्रमाणे चौकशी करण्यात आली, त्याच प्रमाणे चौकशी करता येते. अशा प्रकारची चौकशी करण्यासाठी विभाग तयार आहे. पण यासाठी ६ महिन्यांचा कालावधी लागेल. सदर चौकशी अहवाल पुढील ६ महिन्याने समितीला सादर करण्यात येईल. It requires lot of efforts असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सदर चौकशी ही ३ महिन्यांमध्ये पूर्ण करून त्या चौकशीचा अहवाल समितीला सादर करावा. It should be done. Becasue the balanced expenditure bills are rejected by the government. Therefore, in comittes opinion, the payment which had been made by the department is also not payable of the given amount and some part of that amount should be recovered असे समितीने सूचित केले तसेच सदर प्रकरणी विभागाने खालच्या स्तरावरुन पूर्ण चौकशी करणे अभिप्रेत आहे. प्रत्येक बालगृहाची तपासणी करून त्या बालगृहामध्ये तेवढी मुले आहेत का ? या सर्व बाबींची चौकशी करूनच विभागाने सदर निधीची मागणी करणे आवश्यक होती. खालच्या स्तरावरील कोणत्याही प्रकारची तपासणी झालेलीच नाही, म्हणूनच अशा प्रकारची अडचण निर्माण झाली. सी.डब्ल्यू.सी. कमिटीचे चेअरमन व सदस्य कोण असतात ? अशी विचारणा समितीने केली असता, सोसिअल वेलफेअर, लॉयर अशा प्रकारचे अधिकारी असतात. अशा अधिकाऱ्यांची नियुक्ती ही शासनामार्फत केली जाते. सर्व बालगृहे ही मराठवाड्यामध्येच का आहेत ? विभाग समितीच्या निर्दशनास एक विषय आणू इच्छितो की, सी.डब्ल्यू.सी. ने मुले पाठविली होती, ही गोष्ट खरी आहे. पण यामध्ये ज्या बाबी उद्‌भवल्या. ज्याच्यामुळे ही सर्व देयके नामंजूर करण्यात आली आहेत. त्याचे कारण असे आहे की, त्यांनी सर्व देणग्या ह्या रोख रकमेच्या स्वरुपात घेतल्या आहेत. नियम असा आहे की, चॅरिटीकल कमिशनरकडे जेवढे रजिस्ट्रर एन.जी.ओ. असतात, त्यांना २० हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम रोख स्वरुपात घेता येत नाही. कोणताही व्यवहार २० हजार रुपयांपेक्षा जास्त असेल तर तो रोख स्वरुपात करता येत नाही.

तसेच त्यांचे बँक खाते व इतर खर्चांचा ताळमेळ जुळलेला नाही. चॅरिटीकल कमिशनरकडे जी फाईल पाठविणे आवश्यक होती ती नस्ती देखील त्यांनी पाठविलेली नाही. अशा प्रकारचे मोठ्या प्रमाणावर बाबी आढळून आल्या. या सर्व बाबी पाहता एन.जी.ओ.चा कारभार योग्य नसल्यामुळे व बालगृहासंदर्भातील सर्व कागदपत्रे सादर करू न शकल्यामुळे त्यांची सर्व देयके ना मंजूर झालेली आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हा विभाग आज निर्माण झालेला नसून अनेक दिवसांपासूनचा आहे. विभागाला असे वाटले नाही का की, याच जिल्ह्यामध्ये का जास्त बालगृहे आहेत व यासाठी काही तरी केले पाहिजे. केवळ चार-पाच जिल्ह्यांमध्येच एवढे लोक व संस्था आहेत हे योग्य नाही. हे अवास्तविक आहे व यामध्ये विभागाने स्वत:हून तपासणी केली पाहिजे, असे विभागाला वाटले नाही का? अशी विचारणा समितीने केली असता, साधारणत: नोव्हेंबर, २००८ पासून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये याबाबत विसंगती सुरू झाली. सन २०१५ पासून विभागाने स्वत:हून तपासणी तसेच इतर बाबी सुरू केल्या. तपासणी करून अ, ब, क, ड वर्गवारी करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी औरंगाबाद न्यायालयामध्ये बऱ्याच केसेस दाखल झाल्या व औरंगाबाद न्यायालयाने स्थगिती दिला. स्थगिती विभागाने उठविली. त्यावेळी तपासणी करून कारवाई करू नका, अशी सूचना विभागाला देण्यात आली. त्या सूचनेबाबतत देखील विभागाने भरपूर अहवाल तयार केले व त्यामार्फत न्यायालयामध्ये विभागाची भूमिका मांडली. अंतिमत: न्यायालयाने कारवाई करण्याबाबतचे आदेश दिले. ही सर्व प्रक्रिया करण्यामध्ये दोन-तीन वर्षांचा कालावधी लागला. सन २०१५ मध्ये कारवाई सुरू करण्यात आली. या कारवाईची सांगता आता २०१८ मध्ये होत आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

न्यायालयाने स्थगिती दिली कारण विभागाच्या देखील काही कमतरता असतील, विभागाने जी कार्यपद्धती अवलंबिली आहे. कदाचिततती अपूर्ण असेल. त्याशिवाय न्यायालय स्थगिती देणार नाही. न्यायालयाला देखील हे समजते की, संपूर्ण महाराष्ट्रात जेवढी बालगृहे नाहीत तेवढी एकाच जिल्ह्यात आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, याची नोंद भारत सरकारने देखील घेतली. भारत सरकारने देखील याबाबत आक्षेप घेतला. त्या अनुषंगाने विभागाने हा विभागीय असमतोल दूर करण्यासाठी सर्व तपासण्या व इतर बाबी केल्या असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

" Committee did not follow the word regional imbalance" प्रादेशिक असमतोल दूर करायचा याचा अर्थ दुसऱ्या विभागांमध्ये जास्त बालगृहे करावी लागतील. तिकडे जी जास्त किंवा बोगस बालगृहे आहेत ती कमी करावी लागतील. ज्या ठिकाणी आवश्यकता आहे तेथे बालगृहे सुरू करावीत. जेथे आवश्यकता नाही व केवळ कागदोपत्री आहेत त्यांची तपासणी करून, ती अमान्य करून बंद करण्यात यावीत असे सूचित करून, सन २०१६ पासून नियमित बजेटींगची व्यवस्था आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने २१६ बालगृहे बंद केलेली आहेत. अगोदर सुमारे ९५ हजार मुले बालगृहांमध्ये होती परंतु ज्यावेळी तपासणी सुरू झाली त्यावेळी ही संख्या कमी होऊन ८४ हजारांवर आली. Department inspected each and every case and realised that there are lot of children who are actually having homes. ज्यांचे स्वत:चे घर आहे अशा मुलांना देखील बालगृहांमध्ये ठेवण्यात आले होते व या मुलांची संख्या मोठी होती. विभागाकडून या मुलांना त्यांच्या पालकांकडे सुपूर्द करण्यात आले. त्यामुळे बालगृहातील मुलांची संख्या १७ हजारांवर आली. जे.जे.ॲक्टची तरतूद अशी आहे की, The child belongs to the family. कोणत्याही परिस्थितीत मुलांनी आई-वडीलांकडे असले पाहिजे. The institution is the last resort for any child. जो अनाथ, निराधार आहे किंवा ज्यांचे पालकच मुलांना भिक मागणे, जबरदस्तीने मंजुरी करणे अशा कारणांसाठी ढकलतात त्यांच्यासाठीच या संस्था आहेत. It is not for hostel. When department has individually examined the cases we realised that 17000 cases were junuine and rest of the children have families. अशा मुलांना विभागाने त्यांच्या पालकांकडे सुपूर्द केले. सद्य:स्थितीत विभागाकडे २१ हजार मुले बालगृहांमध्ये आहेत. Now, we are monitoring every single case असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

बालगृहांमध्ये बायोमेट्रिक यंत्रणा सुरू केली आहे का ? कारण पूर्वी एकच विद्यार्थी चार-चार आठ-आठ बालगृहांमध्ये दाखविला जायचा. आता समाजकल्याण विभागाने वसतीगृहांमध्ये बायोमेट्रिक यंत्रणा सुरू केली आहे. त्याप्रमाणेच महिला व बालविकास विभागामध्ये बायोमेट्रिक यंत्रणा सुरू केली तर आता असलेली २१ हजार मुलांची संख्या आणखी कमी येईल. योग्य मुलांना याचा लाभ द्यायचा असेल तर हे करणे आवश्यक आहे. कारण ९५ हजारांवरुन आता २१ हजारांपर्यंत आलेल्या मुलांच्या संख्येचा विचार करता यामध्ये शासनाचे खूप मोठे अनुदान वाया गेले आहे. यासाठी विभागाने बायोमेट्रिक यंत्रणा सुरू करावी. हा मुद्दा न्यायालयाने कारवाई करू नका असे म्हटले, याबाबतचा आहे. ज्यावेळी विभागाचे लोक तपासणी करून वर्गीकरण करायला लागले त्यावेळी संस्थेच्या लोकांनी न्यायालयामध्ये जाऊन स्थगिती आणली. सदर स्थगिती देखील विभागाने उठविली.

यामध्ये विभागाने अतिशय चांगला पाठपुरावा केला आहे. बायोमेट्रिक यंत्रणा लागू केल्यास मुलांची संख्या आणखी कमी होईल असे समितीने सूचित केले असता, समितीची सूचना अतिशय योग्य आहे. सर्व बालगृहांमध्ये बायोमेट्रिक प्रणाली, मुलांचा आधार क्रमांक व आयडेंटिफिकेशन अनिवार्य करण्यात आले आहे. सद्यःस्थितीत ही यंत्रणा कार्यान्वित आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने आधार क्रमांक व आयडेंटिफिकेशन अनिवार्य केले आहे, परंतु ही यंत्रणा सर्व ठिकाणी सुरू आहे का ? कोणालाही बायोमेट्रिक यंत्रणा आवडत नसल्याचे दिसून येते. त्या प्रणालीची तोड-फोड करून बंद केली जाते. If the biometric system is not functioning then department should not release funds to such institution असे समितीने सूचित केले असता, ही यंत्रणा सुरू आहे. हेच विभागाचे धोरण आहे. ही यंत्रणा सर्व ठिकाणी सुरू आहे व बायोमेट्रिक यंत्रणा सुरू नसलेल्या संस्थांना अनुदान वाटप न करण्याचे विभागाचे धोरण आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

बायोमेट्रिक यंत्रणा बसविण्यात आली परंतु जर ती सुरू नसेल तर प्रदान करू नये. बायोमेट्रिक यंत्रणा बसविल्यानंतर संस्थेला मिळणारे अनुदान किंवा पगार बायोमेट्रिक यंत्रणेच्या माध्यमातूनच मिळाले पाहिजेत. ज्याप्रमाणे विधान भवन तसेच मंत्रालयामध्ये बायोमेट्रिक मशिनवर हजेरी नोंदविली तरच पगार मिळतो त्याप्रमाणेच तेथे केले पाहिजे. बायोमेट्रिक यंत्रणा बसविली नसेल तर ती विभागाची चूक आहे व बसविल्यानंतर ती चालू ठेवण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, शासनाच्या खर्चाने बायोमेट्रिक यंत्रणा बसविण्यात आली असून ती चालू ठेवण्याची जबाबदारी संबंधित संस्थांची आहे. जोपर्यंत विभागाला बायोमेट्रिक यंत्रणेची खात्री पटत नाही तोपर्यंत त्यांची देयके स्विकारली जात नाहीत. सध्या हे धोरण अस्तित्त्वात असून पुन्हा याबाबत एक शासन निर्णय नव्याने निर्गमित करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले. समितीने यास मान्यता दर्शविली.

जेव्हा चांदूर (जि. अमरावती) किंवा कोणत्याही एखाद्या जिल्ह्यामध्ये शाळांची तपासणी करण्यासाठी, विशेषतः पारधी शाळांमधील विद्यार्थी संख्या तपासण्यासाठी शिक्षण विभागाचे किंवा आदिवासी विभागाचे अधिकारी जातात तेव्हा इतर जिल्ह्यातील किंवा इतर गावातील मुले गाड्यांमध्ये भरून तेथे आणली जातात. तसा प्रकार या बालगृहांमध्ये देखील झाला आहे का, असे होऊ नये यासाठी विभाग पुढील कालखंडामध्ये काय खबरदारी घेणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबतच्या तपासणीच्यावेळी सी.डब्ल्यू.सी.ला सोबत घेण्यात येत आहे. स्वतंत्र पंच विभाग या प्रक्रियेमध्ये सोबत घेत नाही कारण विभागाची तशी पद्धती नाही. परंतु समितीने केलेली सूचना अत्यंत योग्य आहे. We will incorporate it. तपासणीच्या वेळी सीडब्ल्यूसी ला त्या भागातील प्रतिष्ठित व्यक्तींना सोबत घेण्यास सांगण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाच्या बाल कल्याण समिती वरच समितीचा संशय आहे. कारण मराठवाड्यामधील पाच जिल्ह्यांमध्येच बाल कल्याण समिती प्रो-ॲक्टीव्ह किंवा एक्स्ट्रा ॲक्टीव्ह असेल आणि इतर ठिकाणी नसेल, त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवण्यात काही अर्थच नाही. त्यांची हातमिळवणी असल्यामुळेच हे सर्व घडले आहे. यामध्ये सरप्राईज व्हिजिट महत्त्वाची आहे. विभागाने एकाच दिवशी संपूर्ण जिल्ह्याची तपासणी केली पाहिजे. महालेखाकारांनी आक्षेप काढले, विभागाने ज्ञापन दिले व महालेखाकारांनी त्यामध्ये आणखी काही मुद्दे काढले आहेत. विभागीय प्रतिनिधी म्हणत आहेत की, जेवढा निधी विभागाने दिला नाही तो सर्व निधी रद्दबातल केले आहेत व इतर चौकशी करण्यात येईल. परंतु विभागाने त्यांच्या उत्तरामध्ये जे सांगितले त्याबाबत प्रधान महालेखाकार यांचा आक्षेप असा आहे की, विभागाने दिलेल्या ज्ञापनामध्ये याचा कुठेही उल्लेख नाही असे मत समितीने व्यक्त केले.

समितीसमोरील उत्तर विभागाचे असून शासनाचे नाही. हा मुद्दा आर्थिक आणि अर्थसंकल्पाशी संबंधित आहे. A.G. has not getting into the functioining of homes. In 2014-15, why was there such a less budget provision provided to the homes, हा मुद्दा आहे. इतर वर्षांचे ठीक आहे. सन २०१४-१५ मध्ये आयुक्तांनी सुमारे २०० कोटी रुपयांची मागणी केली होती परंतु विभागाने केवळ ७८ कोटी रुपये मान्य केले. त्यामध्ये ८६ कोटी रुपये आर.ई. व खर्च ८६ कोटी रुपये होता. यामध्ये खूप मोठा फरक असून त्याबाबत शासनाने काहीही उत्तर दिलेले नाही असे महालेखापालांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, प्रत्येक वर्षाच्या विभागाच्या नियतव्यय वाटपामध्ये प्रत्येक योजनेसाठी विभागाची जी मागणी होती व त्या अनुषंगाने विभागाला ओव्हरऑल लेआउट देण्यात आला होता त्याप्रमाणात सर्व योजनांसाठी पैसे वितरित केले जातात. ज्या-ज्या योजनांना कमी तरतूद असते त्यांच्यासाठी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्याचे विभागाचे प्रयोजन असते व त्याचा पाठपुरावा केला जातो. मागणी किती होती व प्रत्यक्षात वाटप किती करण्यात आले याबाबत माननीय प्रधान महालेखाकारांनी मांडलेली बाब खरी आहे. परंतु एकूणच विभागातील आकडेवारीच्या अनुषंगानेच वाटप करण्यात आलेले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

तरतूद आणि मागणीविषयीचा हा मुद्दा आहे. परंतु विभागीय प्रतिनिधी समितीला देत असलेली माहिती वेगळी आहे. Whether the F.D. had not given you funds ? Whether department was not convinced with the demands of the Commissioner ? अशी विचारणा समितीने केली असता, The Demands of the Commissioner were based on the total number of children that were available. The total Budgetary outlay which was provided to the department, त्या प्रमाणातच प्रत्येक योजनेसाठी निधीचे वाटप करण्यात आले व त्याच अनुषंगाने बालगृहांना देखील निधीचे वितरण करण्यात आले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१४-१५ मध्ये नवीन योजना आल्यामुळे आणखी मागणी केली होती. त्यामध्ये सुकन्या तसेच इत्यादी योजनांचा समावेश होता. मागणीच्या तुलनेत विभागाने पहिल्या चार वर्षांपेक्षा कमी तरतूद केली. Departmental Secretary is telling the Committee that the claims of the institutions were fradulent. This is a different issue असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले असता, No, it is exactly the same issue असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Then the secretary has to say that the demands of the Commissioner were incorrect. Then the reply is contradictory असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले असता The commissioner were not incorrect. I will not say that the reply is not contradictory. You are not getting the gist of the matter असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महिला व बालविकास विभागाचे मत असे आहे की, बाल विकास समितीने दाखल केलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येनिहाय मागणी केली जाते. तसेच प्रत्यक्ष सुविधा आवश्यक त्या निकषापेक्षा कमी असल्यामुळे देयके नाकारली गेली. सुधारगृहामध्ये असलेली मुलांची संख्या गुणीले निकष यांच्या आधारावर ही मागणी आहे असे मत वित्त विभागाच्या सचिवांनी व्यक्त केले.

डब्ल्यू.सी.डी. ने ज्या मागण्या केल्या त्या बरोबर नसल्यामुळे शासनाने पैसे मंजूर केले नाहीत असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

विभागीय सचिव आयुक्तांच्या मागण्यांचे समर्थन करीत आहे. तपासणीअंती महालेखाकारांच्या असे लक्षात आले की, ही सर्व देयके बनावट आहेत. तत्कालीन आयुक्तांनी बरोबर तपासणी न केल्याचे यावरून सिध्द होत आहे व तपासणीअंती बनावट केस समितीसमोर आली आहे. त्यावेळच्या आर्थिक परिस्थितीनुसार पैसे उपलब्ध करून देणे शक्य झाले नाही, ही वस्तुस्थिती दिसत आहे. १९७ कोटी रुपयांच्या ऐवजी केवळ ८६ कोटी रुपये विभाग उपलब्ध करू शकला, हे मान्य करावेच लागेल. Demand is based on the number and not on inspection. The inspection must have been done. However, the inspection was not carried out by the sub-ordinates at that time. Because of this case is came befores. १९७ कोटी रुपये पूर्ण बनावट असल्याचे विभागाच्या आता लक्षात आले. आणखी जास्त असतील तर ते देखील चौकशीमध्ये लक्षात येईल. परंतु मागणीपेक्षा खूप कमी वाटप करण्यात आले ही चिंतेची बाब आहे, असे प्रधान महालेखाकार यांचे म्हणणे आहे असे समितीने निदर्शनास आणले.

विशेषतः सन २०१४-१५ मध्ये ही बाब निदर्शनास येते असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता, इतर वर्षांमध्ये वाटप ७० ते ८० टक्क्यांच्या दरम्यान आहे. परंतु यावेळी ही संख्या एकदमच ४० टक्क्यांवर गेली. हे कितपत योग्य आहे व याचे विभाग समर्थन करतो का ? ते बनावट आढळून आले, ही पुढची गोष्ट आहे. There are lapses on the part of Commissioner's also. कारण त्यांनी सर्व तपासणी करूनच मागण्या सादर केल्या पाहिजेत. वित्त विभागाकडून निधीची मागणी करताना योग्यच मागण्या असल्या पाहिजेत, तशी मागणी या प्रकरणी करण्यात आली नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, या विषयाच्या अनुषंगाने ठराविक जिल्ह्यांमध्येच संस्था असून इतर जिल्ह्यांमध्ये नाही, हा मुद्दा मांडण्यात आला. याबाबत दिनांक ३ मार्च २०१८ रोजी नवीन नियम प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्या नियमांच्या अनुषंगाने कोणत्याही एन.जी.ओ. ची बालगृहे सुरू करण्याची इच्छा असेल तर त्यासाठी संपूर्ण जिल्ह्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. समितीच्या माध्यमातून देखील विनंती आहे की, जर लोकप्रतिनिधींच्या जिल्ह्यांमध्ये चांगल्या संस्था असतील तर त्यांचा शोध घेतच आहोत, घेण्यात येत आहे. कारण प्रत्येक जिल्ह्यामध्ये २ संस्था असाव्यात असे महिला व बालविकास विभागाचा निर्देश आहेत. Because the rule also states that we should not send children far away from the place where they have found to the department. त्यांना शक्यतो त्याच जिल्ह्यातील बालगृहांमध्ये ठेवायचे आहे. याबाबत जाहिरात देखील करण्यात येत आहे.

दुसरा मुद्दा बाल कल्याण समिती बाबतचा आहे. बाल कल्याण समितीची देखील त्यावेळी भूमिका होती, असा संशय घेण्यास भरपूर वाव आहे. त्या अनुषंगाने सेवानिवृत्त न्यायाधीश श्री. रोही यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री महोदयांनी समिती स्थापन केली होती. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जाहिरात देऊन मुलाखती घेतल्या आहेत. आजघडीला जुन्या बाल कल्याण समिती बरखास्त करून नवीन ३२ बाल कल्याण समित्या निर्माण करण्यात आल्या आहेत. ३० जिल्ह्यांमध्ये ३२ बाल कल्याण समित्या आहेत. पुणे व मुंबई या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी २ बाल कल्याण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आता नवीन सी.डब्ल्यू.सी. कार्यान्वित आहेत. यामध्ये १+४ अशी रचना असते. काही ठिकाणी विभागाला कर्मचारी मिळाले नाहीत. असे ६ जिल्हे शिल्लक असून त्यासाठी पुन्हा जाहिरात दिली आहे. त्या अनुषंगाने नवीन सी.डब्ल्यू.सी. नियुक्तीची प्रक्रिया सुरू झाली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

प्रत्येक मुलामागे प्रत्येक महिन्याला अनुदान देण्यात येते. ही तरतूद मुलांच्या सर्व खर्चांच्या अनुषंगाने असते, परंतु शासनाने यासाठीचा निधीच दिला नाही. ५० टक्क्यांपेक्षा कमी निधी दिल्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय झाला नाही का ? यामध्ये एक तर शासनाचे चुकत आहे किंवा विभागाचे चुकत आहे. जर विद्यार्थी बालगृहामध्ये आहे तर बाल कल्याण समितीने त्याचे पूर्ण पैसे दिले पाहिजेत. असे केले नाही तर हे सर्व योग्य नाही. बाल कल्याण समितीने केलेली नोंदणी चुकीची आहे. हा खूप मोठा अन्याय आहे. दोन्हीपैकी एक मान्य करावे लागेल. एकतर शासनाने १९७ कोटी रुपये दिले पाहिजेत किंवा यामध्ये मुलांची संख्या वाढवून दिलेली आहे, असा त्याचा अर्थ आहे. या प्रकरणाची तत्कालीन चौकशी करण्यासाठी एस.आय.टी. स्थापन केली पाहिजे. कोणत्या आयुक्तांनी शिफारस केली, कोणत्या पद्धतीने शिफारस केली हे पाहिले पाहिजे. ५५० कोटी, ६०० कोटी रुपये हे वर्षानुवर्षे सुरू आहे. आता हे कमी झाले. यामध्ये देण्यात आलेला निधी ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे, हे बरोबर आहे. एवढ्या पैशांमध्ये मुलांची काळजी कशी घेणार, हा प्रश्नच आहे. परंतु ज्यावेळी तपासणी करण्यात आली त्यावेळी लक्षात आले की, १९० कोटींच्या वरील उर्वरित पैसे देणे योग्य नव्हते. याबाबतचे आयुक्तांनी पाठविलेला प्रस्ताव योग्य व रितसर तपासणी करून पाठविला नाही. त्यामुळे राज्य सरकारच्या तपासणीमध्ये ही देयके नाकारण्यात आली. पूर्ण ५ वर्षांची तपासणी करण्यात यावी व तपासणी अंती विभागाला आणखी जी वसूली करायची असेल ती करण्यात यावी असे समितीने सूचित केले.

विभागीय सचिवांनी सांगितलेच आहे की, १९७ कोटी रुपयांपेक्षा जास्त द्यायचे नाहीत परंतु जे देण्यात आले त्यांची देखील चौकशी करण्यात यावी. यामध्ये विद्यार्थी हा केंद्रबिंदू आहे. मुलगा-मुलगी यांच्या सोयी-सुविधांसाठी प्रति महिना दोन हजार रुपये मिळाले पाहिजेत. ते कोणत्याही परिस्थितीत मिळालेच पाहिजेत व तशी तरतूद अर्थसंकल्पामध्ये केलीच पाहिजे. या दृष्टीकोनातून सन २०१६ पासून विभागाने कोणती कार्यवाही सुरू केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रत्येक तीन महिन्यांनी मान्यता देण्यात येत असते. जे. जे. ॲक्टनुसार ज्या एन.जी.ओ.आहेत, त्यांनी स्वतःचे रिसोर्सेस तयार करावे. तसेच grant-in- -aid Rs. 2000 child हे देय शासनाला अनुज्ञेय आहे. प्रत्येक तीन महिन्यांनी बालगृहामध्ये किती मुले आहेत, याचे निरिक्षण करून आणि बाल कल्याण समित्यांचे रेकॉर्ड तपासून अहवाल देण्यात येत असतो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

The payment should be made in full and final. जर विभागाने निधी दिला नाही, तर बाल सुधारगृहाच्या सोयी-सुविधासाठी अडचणी उद्‌भवतील. मानखूर्द येथील बाल सुधारगृहातील कामगारांना नियमित वेतन मिळत नाही. याबाबत माननीय महिला व बालविकास मंत्री यांनाही विनंती केली होती. ज्या प्रमाणे शिष्यवृत्ती घोटाळ्यासाठी एस.आय.टी. स्थापन करण्यात आली, त्याचप्रमाणे यासाठीही एस.आय.टी.स्थापन करून त्याची चौकशी करण्यात यावी, अशी समितीला शिफारस करते. एकाच विभागामधील गैरव्यवहाराच्या चौकशीचा अहवाल त्याच विभागाच्या अधिकाऱ्यांनी तयार करणे आणि तो समितीने मान्य करणे, योग्य होणार नाही. आता यामध्ये सुधारणा झालेली आहे. बाल सुधारगृहातील मुलांसाठी अर्थसंकल्पामध्ये भरघोस तरतूद करण्यात यावी. जेवढा निधी लागणार आहे, तो मिळालाच पाहिजे. त्याचप्रमाणे चुकीची तपासणी करून किंवा खोटी तपासणी करून आयुक्त किंवा इतर जे संबंधित अधिकारी अहवाल देतात, त्याला आळा बसला पाहिजे. सी.डब्ल्यू.सी. समिती प्रत्येक जिल्ह्यामध्ये असते. या समितीचे अध्यक्ष कोण असतात ? अशी विचारणा समितीने केली असता, उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश हे त्यासाठीच्या निवड समितीचे अध्यक्ष असतात. त्याचप्रमाणे सी.डब्ल्यू.सी. अध्यक्ष हे सिनियर सोशल वर्कर ऑफ द डिस्ट्रिक असतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मराठवाड्यामध्ये असलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या नियुक्ती सेवानिवृत्त न्यायाधिशांनी केलेल्या आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्या नियुक्त्या सेवानिवृत्त न्यायाधिशांनी केलेल्या नाहीत. ते निवड समितीचे अध्यक्ष असतात. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

The Selection of the CWC is made by the retired High Court Judge. सी.डब्ल्यु.सी. हा वेगळा मुद्दा असून संस्था हा विषय स्वतंत्र आहे. The Child Care Institute is a different issue. The Child Care Institutes are in much more numbers in Marathwada. जिल्हा बालसंगोपन समितीच्या फॉर्मेशनसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून नावे प्रसिध्द होत असतात. त्यामध्ये निवड करून माननीय उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश मंजुरी देत असतात. The pupil cannot be enrolled unless and until he has been selected by C.W.C.. आता जे १०० ते २०० विद्यार्थी निवडण्यात आले ते बाल कल्याण समितीने निवडल्यामुळे मिळालेले आहेत. अशा प्रकारची निवड केल्यामुळे संशय निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, लातूर या ठिकाणी अशा प्रकारची मुले आहेत काय ? याच विभागाने या सर्व प्रकाराची चौकशी करण्याऐवजी ज्याप्रमाणे शिष्यवृत्ती घोटाळ्याची चौकशी करण्यात आली, त्याप्रमाणे एस.आय.टी. मार्फत या सर्व प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. यामध्ये ५५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झालेला आहे असे मत समितीने व्यक्त केले :

परंतु विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये कोणत्याही प्रकारचे अभिप्राय देण्यात आलेले नाहीत असे महालेखाकारांनी निदर्शनास आणले.

ज्यावेळी विभागाचे अधिकारी सांगत आहेत, की यामध्ये काहीही झालेले नाही, हे समितीला मान्य करावे लागेल. विभागाने ज्ञापन दिल्यानंतर महालेखाकारांसोबत त्याबाबत व्हेटींग करण्यात येत असते. त्यावर पुन्हा विभाग अभिप्राय देत असते. जर अशा प्रकारे व्हेटींग केली असती तर याबाबत अडचण उद्‌भवली नसती असे मत समितीने व्यक्त केले असता, We have given our reply at the vetting stage. याबाबत राज्य शासनाने अभिप्राय दिलेले नाहीत असे महालेखाकारांनी सांगितले.

साक्षीमध्ये विभागामार्फत जे अभिप्राय देण्यात येतात ते देखील रेकॉर्डवरच घेण्यात येत असतात असे समितीने सूचित केले.

विभागाचे अधिकारी आता जे उत्तरे किंवा माहिती देत आहेत, ती माहिती किंवा उत्तरे जर महालेखापालांच्या कार्यालयास लेखी मिळाली असती तर महालेखाकार कार्यालयानेही याबाबत चौकशी केली असती. त्यामुळे आता असे वाटत आहे की, हे सर्व आयुक्तांचे फ्रॉड्युलंट क्लेम आहेत. This is coming up before use for the first time असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

This is the reason we have instructed to make an detail enquiry of the total payments made to the institution in the entire 5 years. ज्या विभागामध्ये गैरव्यवहार झाला असेल आणि त्या विभागाचे अधिकारी जर चौकशी करीत असतील तर समितीचा आक्षेप आहे. या सर्व प्रकरणाची पोलिसांमार्फत चौकशी झाली पाहिजे. विभागाचा अहवाल आल्यानंतर त्यावर निर्णय घेता येईल. यामध्ये पूर्णपणे गैरव्यवहार झाला आहे, असे सांगू शकत नाही. किती संस्था आहेत, किती संस्थांना विभागाने निधी दिलेला आहे, त्यामध्ये किती गैरव्यवहार आहे, या सर्वांची माहिती विभागाने दिली पाहिजे. त्यानंतर समिती योग्य निर्णय घेईल. सदर चौकशी तीन महिन्याच्या आत करून त्याबाबत अहवाल दिला पाहिजे. जेणेकरून समितीला दुसऱ्या यंत्रणेद्वारे याबाबतची चौकशी करता येईल असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्रमांक २.१.२.२ शासन चालवित असलेल्या बाल काळजी संस्थांना ICPS अंतर्गत आणल्यामुळे प्रलंबित वित्तीय दायित्व.

२.३ सदरहू परिच्छेदामध्ये राज्य शासनाने मसूदा मंजूर केला असल्याचे सांगितले आहे. सदर प्रस्ताव सन २०१६ ला शासनाला सादर करण्यात आला होता. सदर विषय महालेखाकारांच्या व्हेटींगमध्ये आलेला आहे. What is the status of the proposal which has been sent to the Government ? सन २०१४-१५ आणि सन २०१५-१६ चे वार्षिक बजेट विभागाने केंद्र शासनाला पाठविले आहे काय ? अशी विचारणा समितीने सूचित केली असता, सदर प्रस्ताव सन २०१६ ला शासनाला सादर करण्यात आला होता.

आय.सी.पी.एस. अंतर्गत सदर प्रस्ताव होता. राज्य शासनाने या प्रस्तावाला मान्यता दिलेली आहे. दिनांक ३ मार्च २०१८ च्या शासन निर्णयानुसार सुधारित निकषांप्रमाणे निधी वितरित करण्यात आलेला आहे. काही प्रकरणामध्ये ज्या ठिकाणी कागदपत्रे हस्तांतरित झालेली नाहीत अशी प्रकरणे सोडून इतर सर्व थकीत प्रकरणांसह देयके देण्यात आलेली आहेत. सन २०१४-१५ आणि २०१५-१६ चे वार्षिक बजेट केंद्र शासनास पाठविले आहे. केंद्र सरकारकडून अधिकच्या निधीची मागणीदेखील करण्यात आलेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

त्याबाबतची कागदपत्रे समितीला सादर करण्यास समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

४० शासकीय बाल काळजी संस्था विभागाच्या अंतर्गत घेण्याबाबतचे प्रस्ताव होते. त्याबाबत सद्यःस्थिती काय आहे ? Now it is under same I.C.P.S. अशी विचारणा समितीने केली असता, This proposal has been turned down. Honurable Minister madam is not agreed to this proposal. Therefore, the proposal is rejected. Now It will be with I.C.P.S. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक २.१.३.१ काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना न हेरणे/ शोध न घेणे

२.४ या परिच्छेदासंदर्भात सन २०१५ ला आयुक्त कोण होते ? अशी विचारणा समितीने केली असता, श्री. नागरगोजे हे त्यावेळी आयुक्त होते. काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचा शोध घेण्याबाबतचा हा विषय आहे. स्वतःहून पथक किंवा विशेष पथक स्थापन तयार करून मुलांचा शोध घेण्याची गरज आहे, अशा प्रकारचा आक्षेप होता. सन २०१५ च्या जे. जे. ॲक्टप्रमाणे संशोधन करण्याची आवश्यकता नाही. विभागाकडे जर समजा एखाद्या एन.जी.ओ., पोलीस अधिकारी, नागरिक, सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी, बाल कल्याण अधिकारी किंवा परिविक्षा अधिकारी यांनी जर एखाद्या मुलाला विभागाकडे सुपूर्द केले तर त्या मुलाला बाल कल्याण समितीसमोर उभे करून त्या मुलाबाबत निर्णय घेण्यात येत असतो. परंतु अशा प्रकारच्या मुलांचा प्रत्यक्षात शोध घेण्याची मोहिम सन २०१५ आणि सन २०१८ च्या कायद्यामध्ये नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने अशा प्रकारची मोहिम आठ जिल्ह्यामध्ये राबविली होती असे समितीने निदर्शनास आणले असता, सन २०१५ च्या पूर्वीचा जो कायदा होता, त्या अनुषंगाने आठ जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर अशा प्रकारची मोहिम राबविण्यात आली होती. परंतु त्या मोहिमेमध्ये कारवाई करण्यासारखे काहीही आढळून आले नाही, त्याअनुषंगाने जी मुले दाखविण्यात आली. We were unable to take action on the basis of that report. आयुक्त महिला व बालविकास यांनी १ ते १५ ऑक्टोबर २०१३ दरम्यान काळजी आणि संरक्षणाची गरज आलेल्या बालकांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या त्यानुसार सर्व्हेक्षणात ६६६० बालकांना काळजी व संरक्षणाची गरज असल्याचे आढळून आले या ६६६० बालकांबाबत विभागाने काय कार्यवाही केली ? तसेच ३५ जिल्ह्यापैकी ८ जिल्ह्याचा अहवाल प्राप्त झाला. उर्वरित जिल्ह्यामध्ये अशा प्रकारची शोध मोहिम न राबविण्याचा निर्णय विभागाने घेतला होता काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सी.डब्ल्यू.सी. समोर ज्या बालकांना उभे केले होते, त्यांच्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. सर्वच बालकांना बाल कल्याण समिती समोर उभे करता आले नाही. सन २०१५ च्या कायद्याप्रमाणे शोध मोहिम राबविण्याबाबत कोणतेही प्रावधान नव्हते. त्यामुळे कोणत्याही प्रकारची शोधमोहिम नंतरच्या कालावधीत राबविण्यात आली नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

३९ हजार ६९३ ग्राम बाल संरक्षण समित्यांपैकी २० हजार ६५१ समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. याबाबत सद्यःस्थिती काय आहे ? राज्यात गठीत करावयाच्या ३९ हजार ६९३ गावस्तरीय बालसंरक्षण समित्यांपैकी फक्त १८ हजार ८५० समित्या गठीत केल्या होत्या. तसेच गठीत करावयाच्या ३३३ गटस्तरावरील बाल संरक्षण समित्यांपैकी, सप्टेंबर, २०१५ पर्यंत फक्त १३० समित्या गठीत केल्या होत्या असे समितीने निदर्शनास आणले असता, ३९ हजार ६९३ समित्यांपैकी २९ हजार समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०१५ च्या कायद्यानुसार विभागाला कोणत्याही प्रकारची शोध मोहिम राबविण्याची आवश्यकता नाही. विभागाकडे जी मुले प्राप्त होतील त्यांचा निर्णय बाल कल्याण समिती करेल, असे विभागाचे मत आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाकडून स्वतःहून तपासणी करण्यात येत नाही. परंतु जर विभागाकडे अशा प्रकारच्या बालकांची माहिती किंवा अहवाल प्राप्त झाला तर त्यावर कारवाई करण्यासाठी विभाग कटीबद्ध आहे. जर एखाद्या ठिकाणी काही मुले भिक मागत आहेत, अशा प्रकारची माहिती मिळाली तर त्यांना त्यापासून परावृत्त करणे आणि त्या मुलांना बाल कल्याण समिती समोर उभे करणे हे विभागाचे आणि विभागामधील परिविक्षा अधिकारी यांचे काम आहे. विभागाला जर माहिती मिळाली तर त्यावर कारवाई करण्यासाठी विभाग कटीबद्ध आहे. परंतु प्रत्यक्षात गावांमध्ये जाऊन सर्व्हे करणे हे विभागाचे काम नाही. यह जरुरी नहीं है कि बच्चा हमारे सामने आना चाहिए. हमें जानकारी भी मिली तो हम उस पर ध्यान देते है असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक २.१.३.२ शहरी क्षेत्रातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण न करणे

२.५ या परिच्छेदाबाबत माहिती देण्यास समितीने सूचित केले तसेच What about the Rehabilitation and Child Care Plan ? अशी विचारणा समितीने केली असता, धुळे, पुणे, मालेगाव, जळगाव, अकोला, उल्हासनगर, मिरा-भाईंदर, चंद्रपूर आणि नागपूर या महानगरपालिकांमध्ये कृती दल स्थापन करण्यात आलेले आहेत. बृहन्मुंबई महानगरपलिकेमध्ये अशा प्रकारचे कृती दल स्थापन करण्याची कारवाई सुरू आहे. इतर सर्व महानगरपालिकांसोबत विभागाने पत्र व्यवहार सुरू केलेला आहे. परंतु बृहन्मुंबई महानगरपलिकेने आतापर्यंत कृती दल स्थापन केलेले नाही. शासन संचलित बालगृहातील चाईल्ड प्लॅनमध्ये प्रत्येक मुलासाठी चाईल्ड केअर प्लॅन तयार केलेला आहे. संस्थामध्ये असलेल्या बालकांसाठी अशा प्रकारचा प्लॅन तयार करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

बालकांचे पुनर्वसन आणि चाईल्ड केअर प्लॅन महानगरपालिकेने तयार करावयास पाहिजे असे समितीने सूचित केले असता, यह जो चाईल्ड केअर प्लॅन है, बाल कल्याण समिती से विभाग को जो बच्चे मिलते है, चाहे वह एनजीओ में हो या बालगृह में हो. हर बच्चे का जो इन्डिविज्युअल प्लॅन है वह चाईल्ड केअर प्लॅन है. It is supposed to be done by the Department. कृती दलाची स्थापना प्रत्येक महानगरपालिकेने करावयाची आहे. अशा प्रकारचे यामध्ये दोन वेगवेगळे मुद्दे आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Action force for protection and care of street childern स्थापन करून त्याबाबतचा अहवाल देण्यात यावा, अशा प्रकारच्या सूचना आयुक्तांनी सर्व महानगरपालिकांना दिलेल्या होत्या असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले असता, २६ महानगरपालिकांपैकी १० महानगरपालिकांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अहवाल तयार झालेला आहे, परंतु तो विभागाला प्राप्त झालेला नाही. इतर सर्व महानगरपालिकांकडे याबाबत पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. परंतु अद्यापपर्यंत अशा प्रकारचे कृती दल स्थापन करण्यात आलेले नाहीत. यासाठी बृहन्मुंबई महानगरपलिकेच्या आयुक्तांसोबत चर्चा करण्यात आलेली आहे. त्यांनी प्रत्यक्षात कार्यवाही पूर्ण केलेली आहे. परंतु विभागाकडे सध्या अहवाल प्राप्त झालेला नाही. पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यांच्याकडून अहवाल मागवून घेण्यात येईल. अशा प्रकारच्या कार्यासाठी विभागाकडून महानगरपालिकेला निधी देण्यात येत नाही. कारण महानगरपालिकांचा १० टक्के निधी महिला बाल कल्याणासाठी समर्पित ठेवलेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक २.१.३.३ पुनर्वसन आणि काळजी आराखडा तयार न करणे

२.६ परिच्छेदाबाबत समितीला माहिती देताना जे.जे ॲक्टनुसार सर्व संस्थांमध्ये दाखल होणाऱ्या सर्व मुलांचा केअर बाल कल्याण समितीमार्फत तयार केला जातो त्यानंतर तो मुलगा संस्थेमध्ये गेल्यानंतर संस्था त्या मुलांचा केअर प्लॅन तयार करीत असते. त्यानंतर ज्या प्रमाणे त्या मुलांची प्रगती होईल त्या प्रमाणे तो केअर प्लॅन अद्ययावत केला जातो. त्या अनुषंगाने सर्व संस्थांनी केअर प्लॅन कशा प्रकारे तयार करावयाचा याचे प्रशिक्षण त्यांना देण्यात आलेले आहे. सध्या ७४९ संस्था आहेत. २१६ संस्था बंद करण्यात आलेल्या आहेत. सध्या ७४९ नोंदणीकृत संस्था असून १४९ संस्थांचे अर्ज आयुक्तालयाकडे प्राप्त झालेले होते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. सदरहू ७४९ संस्थांपैकी किती संस्थाचे रिहॅबिलेटेशन प्लॅन तयार करण्यात आलेले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, मुलांचे ॲडमिशन घेतेवेळी सी.डब्ल्यु.सी.चे रिहॅबिलेटेशन प्लॅन तयार करून घेण्यात येत असतात. संस्थांना आता सर्व मुलांची माहिती ऑनलाईन पद्धतीने अद्ययावत करावी लागते. त्यामुळे आता केअर प्लॅन होत आहेत. मुलांचा नियमित केअर प्लॅन तयार केला जातो किंवा नाही, तसेच तो अद्ययावत केला जातो किंवा नाही, हे नियमित तपासणीमध्ये पाहण्यात येत असते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक २.१.३.४ संस्थात्मक व्यवस्थेतील कमतरता

२.७ या परिच्छेदाबाबत माहिती घेताना राज्य सल्लागार मंडळाचे अध्यक्ष कोण आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, जुन्या कायद्यातंर्गत राज्यस्तरीय सल्लागार समिती होती. परंतु आता नवीन कायद्यानुसार सदर समिती अस्तित्वात नसल्यामुळे त्या समितीची स्थापना करण्यात आलेली नाही. बाल न्याय अधिनियम, २०१५ हा केंद्र शासनाचा नव्याने तरतूद आलेला अधिनियम आहे. यामध्ये राज्यस्तरीय समितीचे कोणत्याही प्रकारचे प्रावधान करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता अशा प्रकारची समिती गठीत करण्यात आलेली नाही. पूर्वी अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्यात आलेली होती, परंतु अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आलेली नव्हती. आता ही समिती अस्तित्वात नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता सद्यःस्थितीमध्ये राज्य सल्लागार मंडळाऐवजी बाल न्याय नियम, २००७ मधील कलम ९१ अन्वये निवड समिती करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. यासंदर्भात आता काय परिस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता, निवड समितीमध्ये माननीय मुख्यमंत्री यांनी निवृत्त श्री. चव्हाण यांचे नाव दिले होते. त्यांनी ते पद नाकारल्यामुळे पुन्हा ते नाव बदलण्यात आले व न्यायाधीश श्री. रोही यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यासंदर्भातील काम त्यांनी केले आहे. आज ही समिती अस्तित्वात आहे. या समितीमध्ये यामध्ये न्यायाधिश श्री. रोही, डॉ. गिरिश कुलकर्णी, श्रीमती ज्योती पठाणिया, डॉ. अर्चना गोंजळेकर, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे प्रतिनिधी आणि आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, सदस्य सचिव अशा प्रकारची ही समिती अस्तित्वात आहे. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. रोही त्या समितीचे अध्यक्ष आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

३५ CWC पैकी १४ CWC मध्ये आणि ३५ CWC पैकी एका CWC मध्ये अनुक्रमे एक आणि दोन सदस्यांची कमतरता होती. यासंदर्भात आता सध्या काय परिस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता, आज नव्याने ३० जिल्ह्यामध्ये ३२ CWC गठीत करण्यात आल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

५ जिल्हे कोणते बाकी आहेत अशी विचारणा समितीने केली असता, सिंधुदुर्ग, यवतमाळ, भंडारा, गोंदिया हे जिल्हे बाकी आहेत, यासंदर्भातील जाहिरात आता काढण्यात आली आहे. त्यांना दुसऱ्या राऊंडमध्ये घेण्यात आले आहे. या सर्व जिल्ह्यांना प्रथम राऊंडमध्ये घेतले होते परंतु सदस्य मिळाले नाहीत. ही समिती निवड करणार आहे, यामध्ये सामाजिक कार्यकर्ता, वकील, डॉक्टर आणि चाईल्ड सायकॉलॉजिस्ट यांचा समावेश आहे. आता जाहिरात काढण्यात आली आहे. यासंदर्भातील मुलाखती नागपूर व औरंगाबाद येथे घेण्यात येतात. निवड समितीसमोर आल्यावर सदस्य मिळतील. सन २०१५ मध्ये कमी सदस्य मिळत होते त्याचे कारण असे आहे की, हे काम पूर्णवेळ आहे व त्यांना प्रत्येक बैठकीला मानधन फक्त ३०० रुपये मिळत होते. आता मानधन वाढवून प्रत्येक बैठकीला १५ हजार रुपये व त्यामध्ये प्रवास खर्च व महागाई भत्त्याचा समावेश केला आहे. विभागाची अपेक्षा आहे की, आता सदस्य मिळतील असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

सन २०१० ते २०१५ दरम्यान ३५ बाल कल्याण समितीपैकी एकाही बाल कल्याण समितीने बालकांच्या प्रलंबित प्रकरणांबाबत अर्धवार्षिक अहवाल राज्य शासनाला सादर केलेले नाहीत. त्यामुळे MJJ नियमांच्या नियम ७ बी (१०) चे उल्लंघन झाले आहे याबाबत विभागाचे काय मत आहे अशी विचारणा समितीने केली असता, ही बाब खरी आहे, या अंतर्गत आयुक्त कार्यालयाने दिनांक १५ जून २०१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्ह्यातील कार्यरत बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे निरीक्षण आणि मूल्यमापन करण्याचे अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी निरीक्षण व मूल्यांकन केलेल्या बाल कल्याण समितीचे अहवाल अनुक्रमे दिनांक २६ एप्रिल २०१६ व दिनांक ३० जून २०१६ रोजी व बाल कल्याण समिती यांनी दिलेल्या संस्था भेटीचा अहवाल अनुक्रमे दिनांक २० मे २०१६ आणि दिनांक ३० जून २०१६ रोजी शासनास सादर केला आहे. बाल कल्याण समितीकडून अनुक्रमे सन २०१० ते २०११ आणि सन २०१४ ते २०१५ या वर्षातील हाताळलेली प्रकरणे आणि निकाली काढलेल्या प्रकरणांचा अहवाल दिनांक २६ एप्रिल २०१६ अन्वये शासनाला सादर केलेला आहे. बाल कल्याण समितीच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी नियमानुसार जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. तरी अर्धवार्षिक अहवाल दिला पाहिजे. तो वेळेवर देण्यात आलेला नाही. ही बाब खरी आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

काळजी व संरक्षण करण्याची गरज असलेल्या बालकांच्या संदर्भात जे निर्णय करण्यात आले त्यावेळी किमान तीन सदस्यांची आवश्यकता होती. तीन सदस्य नसताना त्यासंदर्भातील आदेश मंजूर करण्यात आलेले आहेत. आता सदस्यांची नियुक्ती केली आहे. ही बाब कायदेशीर आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जे आदेश मंजूर केले त्यामध्ये प्रामुख्याने दोन प्रकारच्या चुका होत्या. Orders should be passed individually. Every child, his history and the particular order should be passed. किमान तीन सदस्यांनी आदेश मंजूर केले. या दोन गोष्टी त्यामध्ये होत्या. त्यामुळे ही केस आढाव्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे घेण्यात आली आहे. त्यानंतर असे आढळून आले आहे की, काही आदेश सस्टेनेबल नाहीत, त्यामुळे त्यांना परत घेण्यात आले आहे. ती मुले त्यांच्या वडिलांना परत केली आहेत. ती बाब याच कारणावरून करण्यात आलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

त्याचप्रमाणे निवड केलेल्या ९ पैकी ४ बाल कल्याण समितीमध्ये मूळ दस्तऐवज, प्रकरणे नोंदवह्या, हमीच्या नोंदवह्या, अंतिम आदेशाच्या नोंदवह्या नव्हत्या. या सर्व बाबींचे उल्लंघन त्यांनी केले आहे. अशा बाबी समित्या ठेवत नाही त्यामुळे अशा बालकल्याण समितीवर कोणती कारवाई करण्यात येत आहे अशी विचारणा समितीने केली असता, त्या सर्व समित्यांवरील सदस्यांना आता बदलण्यात आले आहे. त्यांच्या जागेवर नवीन नियुक्त्या केलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मुंबई व परभणी येथील बाल कल्याण समितीकडून वार्षिक अहवाल घेण्यात आलेले नाहीत. त्यांचे दस्तावेज मिळत नाही. अशा प्रकारच्या बाल कल्याण समितीच्या कामकाजाला आळा बसला पाहिजे. त्यांच्या म्हणण्यानुसार मुलांना प्रवेश देण्यात येतो, त्याप्रमाणे काम होत नाही. त्यांच्या भरवशावर जिल्ह्यातील सर्व बालगृहे सुरू असतात. एका बाजूला त्या समितीवर विश्वास ठेवण्यात येतो परंतु त्यांचे स्वतःचे आचरण स्वच्छ दिसत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, २०१५ चा ॲक्ट व २१०८ च्या नियमानुसार बाल अधिनियमाच्या कलम २७ (८) मध्ये व कलम ३६ (४) मध्ये बालकल्याण समितीचा आढावा घेण्याचे अधिकार जिल्हा मॅजिस्ट्रेटला आहेत. त्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांना अर्धशासकीय पत्र दिले आहे. विभागीय आयुक्तांना विनंती केली आहे की, जिल्हाधिकारी यांना त्यांनी सूचना द्याव्यात. त्याचप्रमाणे बाल कल्याण समितीला तीन महिन्यातून अहवाल सादर करायचा आहे त्याच्या तारखा ठरवून देण्यात आल्या आहेत. त्या तारखेच्या आत त्यांनी तिमाही अहवाल सादर करायचा आहे. नियम आणि अधिनियमामध्ये तिमाही अहवाल सादर कालावधी ठरविण्यात आलेला नव्हता. तिमाही कोणती धरावी. याबाबत आता त्यांना १ एप्रिल ते जून व जुलै ते सप्टेंबर अशी तिमाही ठरवून देण्यात आली आहे. या तिमाहीचा अहवाल सादर करण्याची शेवटची तारीख देण्यात आलेली आहे. त्यासंदर्भातील बाल कल्याण समितीचा फार्मेट तयार करून देण्यात आलेला आहे. नवीन बाल कल्याण समितीचे यशदा, पुणे येथे प्रशिक्षण सुरू आहे. १० मे रोजी सर्व बाल कल्याण समितीचे प्रशिक्षण संपणार आहे. ११ मे पासून सर्व बाल कल्याण समित्या पूर्णवेळ कार्यरत होतील. त्यानंतर त्यांचे अहवाल सादर होतील. कायद्यानुसार बाल कल्याण समित्याचा आढावा घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

निवड समितीबाबत काय परिस्थिती आहे. नियम २००७ मधील तरतुदी महाराष्ट्र राज्यास लागू नसल्याने नियम ९१ नुसार निवड समिती गठीत करण्याची कार्यवाही केली नव्हती असे मत समितीने व्यक्त केले असता, मॉडल रुल्सच्या नियम ९१ मध्ये निवड समितीची तरतूद होती. महाराष्ट्रामध्ये राज्य सल्लागार मंडळ असल्यामुळे निवड समिती गठीत केली नव्हती. काही सदस्यांना पद मुक्त केल्यानंतर उच्च न्यायालयाने सांगितले की, शासनाच्या नियमात नसेल तरी मॉडल रुल्सनुसार नियम ९१ खाली निवड समिती गठीत करावी. त्या अनुषंगाने नवीन नियमात ती तरतूद केली व विभागाकडे आता निवड समिती आहे. निवड समिती सप्टेंबर, २०१७ मध्ये गठीत केली आहे. नियम अधिनियमाच्या कलम ८४ मध्ये निवड समितीच्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. निवड समिती CWC, JJB सदस्यांची निवड करते. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

बाल न्याय मंडळाबाबत बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळावरील राज्य निवड समिती झालेली आहे. परभणीचे काय झाले आहे. आता सध्या काय परिस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता, परभणी जिल्ह्यातून दोन नामांकने प्राप्त झाली होती. त्यानुसार शासनाने परभणी जिल्ह्यांसाठी शासन अधिसूचना दिनांक १९ एप्रिल २०१४ अन्वये एका सदस्यांची निवड त्यावेळी केली होती. अहमदनगर मध्ये दोन्ही सदस्यांची निवड केलेली आहे. यामध्ये जो प्रश्न आहे मुख्यत्वे अहमदनगर जिल्ह्याकरिता बाल न्याय मंडळ स्थापन करण्यासाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव २०१७ मध्ये आयुक्तालयाकडे सादर करण्यात आला होता. बाल न्याय मंडळ अहमदनगर येथील दोन सदस्यांपैकी श्रीमती नीलमणी गांधी यांच्या नामांकनास उच्च न्यायालय यांनी असहमती दर्शविल्यामुळे बाल न्याय मंडळाच्या एका रिक्त पदावर अन्य पात्र सामाजिक कार्यकर्त्याची नामांकने आयुक्तालयास सादर करण्याबाबतचा आदेश २०१४ मध्ये प्राप्त झाला होता. आता अहमदनगर जिल्ह्यातून दोन नामांकने प्राप्त झाली होती त्यानुसार शासन अधिसूचना दिनांक १ जानेवारी २०१४ नुसार शासनाने त्यावेळी एका सदस्यांची नियुक्ती केली होती. दंडाधिकारी यांची नियुक्ती जिल्हा न्यायाधिशांकडून केली जाते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दंडाधिकाऱ्यांची नियुक्ती जिल्हा न्यायाधीश करतात व दोन सदस्यांची नियुक्ती राज्य सरकार करते. राज्यामध्ये एकूण किती युनियन बोर्डाची स्थापना झाली आहे व किती युनियन बोर्ड स्थापन होणे बाकी आहेत. प्रत्येक जिल्ह्यासाठी युनियन बोर्ड आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रत्येक जिल्ह्यासाठी युनियन बोर्ड आहे, परंतु जाहिरात देऊनही विभागाला काही ठिकाणी पदे कमी मिळाली आहेत. मुंबई उपनगरासाठी अर्ज प्राप्त झाले नाहीत. ठाणे येथे अर्ज प्राप्त झाले नाहीत. त्यानंतर अमरावती येथे अतिरिक्त जिल्हा बोर्ड मंजूर केले आहे. नवीन जाहिरातीमध्ये ते घेण्यात आले आहे. गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोलीसाठी अर्ज प्राप्त झाले नाहीत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

ज्या जिल्ह्यांमध्ये बोर्ड नाहीत त्या जिल्ह्यातील कामकाज शेजारील जिल्ह्यातील बोर्डाकडून पाहण्यात येते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, आता असे आदेश काढण्यात आले आहेत की, जोपर्यंत नवीन नियुक्ती होत नाही तोपर्यंत जुने सदस्य तेथे कार्यरत राहतील. नवीन सदस्य आल्यावर जुने सदस्य जातील असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

अर्धवेळ काम असते का पूर्णवेळ काम असते अशी विचारणा महालेखाकार यांनी केली असता हे काम अर्धवेळ नसते मानद पद आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

तरी देखील विभागास सदस्य मिळत नाही काय ? अशी विचारणा महालेखाकारांनी केली असता, जरी हे काम अर्ध वेळ असले तरी हे काम पूर्ण वेळसारखे आहे कारण कमीत कमी ६ तास काम चालते ही न्यायालयीन प्रक्रिया आहे. यामध्ये ऑग्र्युमेंट लॉयर या सर्व बाबी कराव्या लागतात. यामध्ये कमीत कमी शैक्षणिक अर्हता सिव्हील जज्ज होण्यासाठी जे असते ते लागते. फॉर द ज्युडिशिअल ऑफिसर. त्यानंतर सोशल वर्कस् क्वॉलिफिकेशन थोडे कठीण आहे त्यामुळे लोक कमी मिळत होते. मानधनदेखील अगोदर कमी मिळत होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कमिटीसाठी जिल्हा न्यायाधिशांकडून न्यायाधीश देण्यात येतात असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यांनादेखील यातून न्यायाधीश घ्यावे लागतात. लॉयर्स पैकी कोणी तरी घ्यावे लागते ज्यांची शैक्षणिक अर्हता असते त्यांनाच नियुक्ती देण्यात येते त्यांना १५ हजार रुपये प्रत्येक सिटींगसाठी देण्यात येतात. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

बाल न्याय मंडळाचे अध्यक्ष न्याय विभागाचे न्याय दंडाधिकारी असल्यामुळे शासनाने मुंबई उच्च न्यायालयास राज्यातील बाल न्याय मंडळाकडे असणाऱ्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत विनंती केली आहे. किती प्रकरणे प्रलंबित आहेत. या विषयाबाबत विभागाने विधी व न्याय विभागास पत्र दिले आहे. त्याबाबत त्यांनी काय उत्तर दिले आहे अशी विचारणा समितीने केली असता, १७ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. हायकोर्टात जस्टीस धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बाल न्याय मंडळाचा आढावा घेण्याची समिती आहे. त्यांची तीन महिन्यांतून बैठक होते. या बैठकीत ते प्रत्येक जिल्ह्याचा आढावा घेतात. ज्या जिल्ह्यात प्रकरणे प्रलंबित आहेत. तेथील जिल्हा न्यायाधीशाला त्यांनी सूचना दिल्या आहेत की, त्यांनी प्रलंबित प्रकरणांबाबत कार्यवाही करावी असे विभागीय प्रतिनिधीनी अवगत केले.

इतक्या मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे दर वर्षाचा आऊटपूट काय आहे. किती वर्षापासून प्रकरणे प्रलंबित आहेत. या विषयाबाबत विभागाच्या माध्यमातून विधि व न्याय विभागाला बैठकीसाठी बोलविण्यात आले होते. त्यांनी विभागाला रिस्पॉन्स दिला नाही. रेकॉर्डवर पत्र आहे, त्यामध्ये असे म्हटले आहे की, सह सचिव, विधि व न्याय विभागाला दिनांक २९.११.२०१६ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे. त्यांच्याकडून विभागाला काही अहवाल आला आहे काय ? त्यांनी काही रिस्पॉन्स दिला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, या पत्राचे उत्तर त्यांनी दिलेले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले. हा विषय या स्तरावर प्रलंबित ठेवण्यात येत आहे. विधि व न्याय विभागाचे अधिकारी असताना या परिच्छेदावर चर्चा करण्यात येईल असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्रमांक २.१.३.४ संस्थात्मक व्यवस्थेतील कमतरता :

२.८ दिनांक ३० मे, २०१८ रोजीच्या साक्षीच्या वेळी या परिच्छेदामध्ये काही कायदेशीर अडचणी होत्या. ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डसंबंधी विधि व न्याय विभागाचा विषय होता. या प्रकरणी विधी व न्याय विभागाकडून काही बाबतीत मान्यता यायची होती त्याबद्दल "न्यायमंडळाचे अध्यक्ष न्याय दंडाधिकारी असल्याने शासनाने मुंबई उच्च न्यायालयास राज्यातील बाल न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत विनंती केलेली आहे. त्या मंडळाचे म्हणणे असे आहे की, यामध्ये १७ हजार केसेस प्रलंबित आहेत आणि याबाबत मंडळाने विधि व न्याय विभागाला पत्र दिले होते. जस्टीस धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बाल न्याय मंडळाची आढावा समिती आहे आणि त्या समितीची दर तीन महिन्यांतून एकदा बैठक होते व त्या बैठकीमध्ये जिल्हावार प्रलंबित प्रकरणांचा आढावा ते घेतात. ज्या जिल्ह्याच्या केसेस प्रलंबित आहेत त्यासंबंधी तेथील जिल्हा न्यायाधीशांना सूचना दिल्या आहेत की त्यांनी अशा प्रलंबित केसेसबाबत कार्यवाही करावी. इतक्या मोठ्या प्रमाणात केसेस प्रलंबित असल्यामुळे समितीने विचारले होते की दरवर्षीचे आऊटपूट काय आहे, किती वर्षांपासून केसेस प्रलंबित आहेत अशी विचारणा समितीने केली असता, ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डाचे जे काम चालते त्यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उच्च न्यायालयात ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डाची समिती आहे. जसे त्यांनी सांगितले की जस्टीस धर्माधिकारी यांची ती समिती आहे. तसेच किमान ३ महिन्यांमध्ये त्या समितीची एकदा आढावा बैठक होते. त्या बैठकीमध्ये प्रत्येक जिल्ह्यातील प्रलंबित केसेसचा आढावा ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डाच्या वतीने घेतला जातो व जेथे आवश्यक आहे तेथे त्यानुसार निर्देश किंवा सूचना दिल्या

जातात. यासंबंधी सन २०१६ मध्ये नियम केले आहेत आणि त्यानुसार दर अर्धवर्षाचे त्या समितीने राज्य शासनाच्या अंतर्गत सर्व विभागांना अहवाल पाठविले पाहिजेत. त्यांनी ते लेखी अहवाल पाठविले नाहीत. यासंबंधी विधि व न्याय विभागाने माननीय उच्च न्यायालयाकडून माहिती मागविली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोणी लेखी अहवाल पाठविले नाहीत ? जस्टीस धर्माधिकारी यांच्या समितीने हे करायचे आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, नियमानुसार या ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डाने लेखी अहवाल पाठविले पाहिजेत. त्यांनी ते पाठविले नाहीत. प्रत्येक जिल्ह्याला ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्ड आहे. त्या जिल्ह्याच्या बोर्डाने असे अहवाल पाठविले पाहिजेत. प्रत्येक महिन्याचे रिटर्न आणि क्वॉर्टरली रिटर्न माननीय उच्च न्यायालयाकडे येते. पण या नियमानुसार असे निश्चित केले होते की त्यांनी त्या व्यतिरिक्त राज्य शासनास ते रिटर्न्स दिले पाहिजे आणि डिस्ट्रीक्ट चाईल्ड प्रोटेक्शन युनिटला दिले पाहिजे. अशा विविध ॲथॉरिटींना ते देणे आवश्यक आहे. ते झालेले नसल्यामुळे विधि व न्याय विभागाने उच्च न्यायालयाशी आम्ही पत्र व्यवहार केलेला आहे आणि याबाबत खात्री आहे की पुढील १५ दिवसांच्या आत या रिटर्न्सची माहिती समितीला देण्यात येईल.

या प्रकरणी मुद्दा इतकाच आहे की, १७ हजार केसेस प्रलंबित आहेत आणि ही सर्व प्रकरणे १८ वर्षे वयांखालील बाल गुन्हेगारांची आहेत. त्यामुळे अशा बालकांच्या केसेस प्रलंबित राहिल्यामुळे त्या अवस्थेमध्ये त्या बालकांवर फार अन्याय होत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, या १७ हजार अब्सोल्यूट नंबरमध्ये केसेसची संख्या जास्त वाटते. एका एका जिल्ह्याच्या बोर्डाचा तपशील पाहिला तर तेथे ५०० केसेसच्या रेंजमध्ये प्रलंबित प्रकरणे आहेत. ही प्रलंबित प्रकरणे फ्लोटिंग स्वरूपात आहेत असे विधि व न्याय विभागाच्या सचिवांनी अवगत केले.

समितीला अशी माहिती पाहिजे की जुन्या ३ वर्षांतील किती केसेस प्रलंबित आहेत. चालू वर्षाच्या केसेस किती आहेत किंवा मागील एका वर्षाच्या केसेस किती प्रलंबित आहेत. यासंबंधी राज्यस्तरीय समितीची भूमिका काय आहे, त्यांनी कोणत्या सूचना दिल्या आहेत. ultimately, the Committee/Boards are formed to expedite the cases. तसेच प्रत्येक वर्षामध्ये इनपूट किती आहे आणि आऊटपूट किती आहे यासंबंधी सविस्तर माहिती पाहिजे. या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी उच्च न्यायालयाची जी समिती आहे त्या समितीनेसुध्दा पुढाकार घेतला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, एका महिन्यामध्ये समितीला ही संपूर्ण माहिती सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही राज्यस्तरीय समिती नेमलेली आहे. मात्र कायद्यात कोणती तरतूद आहे, सर्वोच्च न्यायालयाला अशा मार्गदर्शक सूचना देण्याची वेळ कशी आली ? जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत त्यासंबंधी विधि व न्याय विभागाच्या वतीने उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयामध्ये कोणी गेले होते काय, कशाच्या आधारे सर्वोच्च न्यायालयाला या मार्गदर्शक सूचना द्याव्या लागल्या आहेत. यामुळे याप्रकरणी विभाग कोठे तरी कमी पडला आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना या संपूर्ण देशातील राज्यांसाठी सर्वसाधारण आहेत. मात्र याचे मॉनिटेरिंग परिणामकारक व्हावे यासाठी ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डाची एक समिती गठीत करण्यात आली आहे असे विधि व न्याय विभागाच्या सचिवांनी अवगत केले

अशा मार्गदर्शक सूचना येण्यासाठी कोणते राज्य सर्वोच्च न्यायालयात गेले होते किंवा अन्य कोण गेले होते का ? कारण सुप्रीम कोर्ट अशा मार्गदर्शक सूचना सु-मोटो करीत नाही. या अनुषंगाने कोणते तरी पीआयएल वगैरे दाखल झाले असू शकेल असे मत समितीने व्यक्त केले असता, कोणत्याही प्रकरणात जर सुप्रीम कोर्टाला असे निदर्शनास आले की त्या ठिकाणी इफेक्टिव्ह मॉनिटेरिंगची आवश्यकता आहे तर तशा प्रकरणांमध्ये सुप्रीम कोर्ट निर्णय देताना त्यातील निर्णय हा त्या प्रकरणातील फॅक्टपुरता मर्यादित असतो. मात्र सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना अशा प्रकरणांमध्ये दिल्या जातात. नेमके कोणत्या प्रकरणावरुन अशा मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत ते सांगता येणार नाही असे विधि व न्याय विभागाच्या सचिवांनी सांगितले.

ते ठीक आहे. परंतु अशा प्रकारच्या केसेस आल्यानंतर सर्वोच्च न्यायालय अशा प्रकारच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करते असे मत समितीने व्यक्त केले.

यासंबंधी कायद्यात काय तरतूद आहे. एखादी केस विभागासमोर आल्यानंतर तिचा निपटारा १५ दिवसात करावा की ६ महिन्यांमध्ये करावा वा त्याला एक वर्ष इतका कालावधी घ्यावा यासंबंधी या बोर्डासंबंधी काही विशेष तरतूद आहे काय की अमुक इतक्या दिवसामध्ये हे पूर्ण झाले पाहिजे. अशी विचारणा समितीने केली असता, त्यामध्ये जनरल कालमर्यादा टाकलेली आहे. मात्र नेमकी कालमर्यादा किती असेल ते आता सांगता येत नाही असे विधी व न्याय विभागाच्या सचिवांनी अवगत केले.

या प्रकरणी विभागाला सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक सूचना दिल्या आणि त्यानुसार विभागाने समिती स्थापन केली. पण सन २०१६ ते २०१८ या दोन वर्षांचा अनुभव पाहिला तर ही समिती स्थापन झाल्यानंतर इफेक्टिव्ह कार्यवाही झाली आहे काय ? म्हणजे ज्या हेतूने माननीय सर्वोच्च न्यायालयाने या बाबी करण्यासाठी निर्देश दिले आहेत त्यासंबंधी आपण अंमलबजावणी केली असताना त्यातून काही निष्पन्न झालेले दिसत आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, याची फलनिष्पत्ती तपासताना त्यासंबंधी सन २०१६ मध्ये किती प्रकरणे प्रलंबित होती आणि आता २०१८ मध्ये किती प्रकरणे प्रलंबित आहेत त्यासंबंधी तुलनात्मक माहिती द्यावी लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

थोडक्यात माननीय सर्वोच्च न्यायालयाने जो उद्देश ठेऊन या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत त्यानुसार त्यातून फलनिष्पत्ती दिसते काय, यामागे त्यांचा जो हेतू होता तो साध्य होत आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यासंबंधी प्रत्येक जिल्ह्यामध्ये किती प्रकरणे प्रलंबित होती आणि आज त्यांची स्थिती काय आहे हे पाहिले तर ते लक्षात येईल असे विभागीय सचिवांनी

सांगितले या प्रकरणी विभागाने लक्ष देण्याची गरज आहे की त्या मार्गदर्शक सूचनांचा परिणाम होत आहे किंवा नाही विभागाने या प्रकरणी राज्यस्तरीय हायकोर्टाच्या न्यायमूर्तींची समिती स्थापन केली आणि जिल्हास्तरीय बोर्ड स्थापन केले आहेत आणि असे असताना जर या १७ हजार केसेसच्या सद्यःस्थितीचा विभागाकडे आढावा नसेल, म्हणजे मागच्या वर्षी किती केसेस होत्या, या वर्षी किती आहेत, किती केसेस प्रलंबित आहेत आणि किती नव्याने समाविष्ट झाल्या आहेत ते पाहिले पाहिजे. त्या केसेसची संख्या वर्षानूवर्षे वाढत असेल तर या समिती आणि बोर्डाची उपयोगिता काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, दरवर्षीचा हा सांख्यिकी डाटा उपलब्ध आहे. त्यामध्ये वर्षनिहाय प्रलंबित प्रकरणांचा आणि निपटारा केलेल्या प्रकरणांचा तपशील आहे तो समितीला देण्यात येईल.

त्या समितीच्या सचिवांनी विभागाला दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये अमुक इतक्या केसेस प्रलंबित आहेत अशा स्वरुपाचे पत्र पाठविले आहे. आता या साक्षीमध्ये तोच विषय असल्यामुळे यासंबंधी थोडक्यात माहिती दिली पाहिजे की अमुक अशी परिस्थिती आहे. ultimately, the issue is that the pendency of cases is too much and every year it is going to increase. त्या प्रलंबित केसेसची टक्केवारीसुध्दा समितीला हवी आहे. या विषयासंबंधी ही साक्ष होती. मात्र जे काम त्यांच्याकडून होऊ शकले नाही त्यासंबंधी आम्ही विधि व न्याय विभागाकडून विचारणा करू असा मुद्दा या साक्षीमध्ये होता. त्यानुसार विभागाकडे माहिती उपलब्ध असेल तर ती द्यावी असे समितीने सूचित केले असता, यासंबंधी थोडा वेळ द्यावा. समितीला सर्व पॅरामिटरसह ही माहिती सादर करण्यात येईल. ही माहिती संपूर्ण जिल्ह्यांकडून गोळा करावी लागेल असे विधि व न्याय विभागाच्या सचिवांनी सांगितले.

या समितीची काळजी अशी आहे की या प्रकरणी इतक्या प्रचंड प्रमाणात केसेस प्रलंबित आहेत आणि ज्युव्हेनाईल बोर्डाचा जो हेतू आहे तो साध्य होत नाही. ultimately, the cases should be decided as early as possible. कारण १८ वर्षाच्या आतील मुलांच्या बाबतीत त्यांचे वय २२ वर्षे झाल्यानंतर निकाली काढता येणार नसतील तर त्या बोर्डाची उपयोगिता राहणार नाही.

या प्रकरणी माहिती देताना असे कळवावे की माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनानंतर त्याचा इफेक्टिव्हनेस वाढला की प्रकरणे प्रलंबित राहण्याची संख्या वाढली आहे. समितीला या बाबींची माहिती अवगत होणे अपेक्षित आहे असे समितीने सूचित केले असता त्यास विधि व न्याय विभागाच्या सचिवांनी सहमती दर्शविली व आम्हाला ही माहिती गोळा करावी लागेल. कारण विधि व न्याय विभागाकडे यासंबंधीचा सांख्यिकी डाटा उपलब्ध नसतो. प्रत्येक जिल्ह्यातील बोर्डाकडून ती माहिती घ्यावी लागेल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने ही राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत त्याची मूळ संकल्पना काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डासंबंधी ॲक्टप्रमाणे ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्याचे इफेक्टिव्ह इम्पिलीमेंटेशन होते किंवा नाही हे पाहण्यासाठी माननीय सर्वोच्च न्यायालयाने ती समिती गठीत केलेली आहे असे विधि व न्याय विभागाच्या सचिवांनी सांगितले.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने आता नव्याने निर्देश दिले की रेप केसमध्ये १८ वर्षाचे वय किंवा १६ वर्षे वय असेल तर त्याला प्रौढ म्हणून मानण्यात यावे तर ते निर्देश ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डाने या निकषांमध्ये अंतर्भूत केले आहेत काय किंवा कसे ? पण ती सुधारणा पर्क्युलेट झाली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, कायद्यामध्येच तशी सुधारणा

करण्यात आलेली आहे. काही केसेसमध्ये तसे निर्णय होतात. काही केसेसमध्ये ती सुधारणा पर्क्युलेट झाली आहे म्हणजे जरी एखादा मुलगा १८ वर्षाच्या आतील असला तरी त्या आरोपीला ॲडल्ट म्हणून ती केसेस चालवावी असे निर्देश दिले जातात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्र. २.१.३.४.—संस्थात्मक व्यवस्थेतील कमतरता :

२.९ विधि व न्याय विभागाचा एक लहान परिच्छेद होता त्यासाठी समितीने विधी व न्याय विभागाच्या सचिवानी एक महिन्याची वेळ दिलेली होती. त्याबाबतची माहिती समितीला द्यावी असे समितीने सूचित केले असता, महाराष्ट्राच्या ज्युव्हेनाईल जस्टीस नियमामध्ये ४.१.१० असा नियम आहे. त्यामध्ये अशी तरतूद आहे की, प्रत्येक ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डाने सहा-सहा महिन्याला त्याच्या ॲथॉरिटी दाखवलेल्या आहेत. त्यामध्ये चाईल्ड प्रोटक्शन युनिट, स्टेट गव्हर्नमेंट आणि चीफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट आहेत त्यांना असे अहवाल पाठवायचे आहेत. हा नियम सन २०११ मध्ये सुधारणा करून आणलेला आहे.

याबाबत स्टॅस्टिकल माहिती ०४.०१.१० नुसार कोणत्याही ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डाने अहवाल सादर केलेले नाहीत असे विधि व न्याय विभागाच्या सचिवांनी अवगत केले.

गेल्या तीन वर्षांमध्ये किती केसेस प्रलंबित आहेत, चालू वर्षाच्या किती केसेस प्रलंबित आहेत किंवा मागील एका वर्षाच्या कालावधीतील किती केसेस प्रलंबित आहेत हे समितीने सांगितले होते. तसेच यासंबंधी राज्यस्तरीय समितीची काय भूमिका आहे त्यांनी कोणत्या सूचना दिलेल्या आहेत ? तसेच प्रत्येक वर्षामध्ये इनपूट आणि आऊटपूट किती आहे ? या संबंधीची सविस्तर माहिती समितीला पाहिजे असे समितीने सूचित केले असता, सन २०१३ ते सन २०१७ या मागच्या पाच वर्षांची माहिती समितीला करण्यात येईल. या पाच वर्षांमध्ये इन्स्टिट्युशन काय आहे, डिसपोजल काय आहे आणि त्याचा वर्षानुसार कसा ब्रेकअप आहे याबाबत सन २०१७ मध्ये ९८६८ नवीन केसेस दाखल झाल्या आहेत. त्यामध्ये डिसपोजल झालेल्या तीन वर्षांपर्यंत ७१२४ केसेस आहेत. तीन ते पाच वर्षांच्या १५८० केसेस, पाच ते दहा वर्षे प्रलंबित असलेल्या ३९२ केसेस आणि दहा वर्षानंतरच्या ४५ केसेस आहेत. ॲबस्युलुट नंबरमध्ये बघितले तर ९८६८ केसेसच्या अगेन्स्ट डिसपोजल केसेस ९९१० आहेत. जेवढी इन्स्टिटयुशन आहे त्याला मॅचिंग किंवा त्याच्याहून थोडे जास्त असे डिसपोजल आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दरवर्षी हीच परिस्थिती आहे काय की पाच वर्षांची आहे ? सन २०१७ रोजी ओपनिंग काय होते ? १८,२०८ पैकी पाच वर्षापेक्षा जास्त किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१७ मध्ये दाखल केलेले हे इन्स्टिट्युशन आहे. सन २०१७ चे ओपनिंग बॅलेन्स १८,२०८ आहे. १३,२२६ केसेस या तीन वर्षापेक्षाखाली आहेत आणि पाच वर्षापर्यंतच्या ३,७६९ केसेस आहेत म्हणजे पाच ते दहा वर्षांच्या १,०१५ केसेस होत्या असे विधि व न्याय विभागानी अवगत केले.

एवढ्या केसेसमध्ये त्याची वयमर्यादा संपेल आणि तोपर्यंत विधि व न्याय विभाग निर्णयच घेणार नाही, हे दुर्दैवी आहे. तीन वर्षांच्या वर जितक्या केसेस प्रलंबित आहेत त्याला बोर्डाच्या माध्यमातून टाईमबाऊंड कार्यक्रम झाला पाहिजे. न्याय संस्थेकडून तीन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या केस शेवटच्या स्टेजपर्यंत आणण्यासाठी न्यायसंस्थेकडून अशा प्रकारचा काही निर्देश देता येईल काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे विधि व न्याय विभागाच्या सचिवांनी आश्वस्त केले.

दुसरा मुद्दा असा होता की, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समित्यांनी हे काम एक्सपीडाईट करण्याचे त्यांचे काम आहे. त्यासाठी ते काय करतात ? अशी विचारणा समितीने केली असता, उच्च न्यायालयाच्या स्तरावरील ज्युव्हेनाईल जस्टीस समिती जी प्रत्येक महिन्याला केसेसचा आढावा घेते आणि तीन महिन्याला एकदा समितीची बैठक घेऊन तिथे विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावले जाते. एवढ्या मोठया प्रमाणावरील १८ हजार केसेसपैकी १३ केसेस या तीन वर्षांपेक्षा जास्त आहेत आणि पाच वर्षांपेक्षा जास्त असलेल्या अंदाजे १,००० च्या वर केसेस आहेत. ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डच्या बैठकांची फ्रिक्वेन्सी वाढविणे हा त्यावर एक उपाय आहे असे विधि व न्याय विभागाच्या सचिवांनी सांगितले.

या बोर्डाने ६ महिन्यांमध्ये एक बैठक घेतली पाहिजे तर त्याला ६ महिन्यांऐवजी ३ महिन्यांचा कालावधी करण्यात यावा किंवा एका वर्षामध्ये ४ बैठका घेण्यात याव्यात असे समितीने सूचित केले असता, हे कम्युनिकेट करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्याला ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्ड आहे तर आठवडयातून एकदा किंवा दोनदा त्यांच्या बैठका असतात. ही बैठकांची फ्रिक्वेन्सी वाढविली तर ज्युव्हेनाईल जस्टीस बोर्डापुढे प्रलंबित असलेल्या केसेस लवकर लवकर लागतील त्यासाठी ही फ्रिक्वेन्सी वाढविण्यासाठी विधि व न्याय विभागाकडून सूचना देण्यात येतील, असे विधी व न्याय विभागाच्या सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्र. २.१.३.५ मान्यता नसलेल्या बाल काळजी संस्थांचे कामकाज.

२.१० दिनांक ८ मे २०१८ रोजीच्या साक्षीच्या वेळी समितीने मान्यता नसलेल्या बाल काळजी संस्थांच्या चालकांनी दाखल केलेले दावे मोठ्या प्रमाणात न्यायालयात प्रलंबित आहेत, याबाबत उच्च न्यायालय व विधी व न्याय विभागाचा खुलासा घेतला पाहिजे. अशा प्रकारची समितीची भावना राहणार आहे. या दृष्टीकोनातून काय प्रयत्न करण्यात आले. या विषयाबाबत कोर्टात निर्णय झाला अ,ब,क,ड निर्णय झाला. मान्यता नसलेल्या बाल काळजी संस्थांचे कामकाजावर कसे काय नियंत्रण केले आहे. यासंदर्भातील निर्णय कधी झाला आहे? हायकोर्टाचा अ,ब,क,ड क्लासिफिकेशनला विरोध होता. त्यानंतर चौकशी करण्यासाठी स्टे होता. अ,ब,क,ड चा स्टे कधी उठविण्यात आला आहे? चौकशीचा स्टे कधी उठविण्यात आला आहे. अशी विचारणा समितीने केली असता, मागच्या अधिवेशनात नियम सभागृहाच्या पटलावर ठेवले व मान्य करून घेतले आहे. ३ मार्च २०१८ रोजी नियमांना मान्यता मिळाली आहे. ते नियम लागू करण्यात आले आहेत. ५ मे, २०१७ रोजी स्थगिती उठविण्यात आला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

स्थगिती उठवून एक वर्ष झाले त्यानंतर विभागाने काय कार्यवाही केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यानंतर २१४ संस्थांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात नियम तयार करून घेण्यात आले. नियमामध्ये बालगृहांसाठीचे निकष तयार करून घेण्यात आले. त्याप्रमाणे जाहिरात देण्यात आली आहे. ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणी करण्यात येते. २० मे पर्यंत अर्ज करण्याची अंतिम तारीख दिली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

यामध्ये प्रमुख तीन बदल केले आहेत, २०१८ मध्ये नवीन नियम जाहीर करून मान्य केले व लागू केले. जितके बालगृह कार्यान्वित आहेत, त्यांना एक महिन्याची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे मुलांना घरी जाण्याची किंवा बाहेर पडण्याची वेळ येणार नाही. जुन्या व सर्व नवीन संस्था मान्यता प्राप्त असो किंवा नसो त्यांच्याकडून नवीन नियमावलीप्रमाणे अर्ज मागविण्यात आले आहेत. त्याची अंतिम तारीख २८ मे अशी आहे. मान्यता देण्याच्या पद्धतीमध्ये बदल केला आहे. अगोदर अर्ज आयुक्तालयाकडे येतील व त्यानंतर प्राथमिक चौकशी करून ते अर्ज विभागाकडे सादर करणार आहेत. यामध्ये पाच सचिवांचा समावेश आहे, यामध्ये सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्रामविकास विभाग, महिला व बाल कल्याण विभाग व सामान्य प्रशासन विभाग या विभागाच्या पाच सचिवांची समिती तयार करण्यात आली आहे.

This Committee will take a review. गरज असेल तर फिजिकल व्हेरिफिकेशन करायचे आणि बालगृहांना मंजुरी देण्याचा अंतिम निर्णय माननीय मंत्री यांनी घ्यावयाचा आहे. या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. जे बालगृह नियमाला धरून नाही, त्यांची मान्यता रद्द करून केवळ नवीन मान्यता ज्या बालगृहांना देण्यात येणार आहे, त्यांनाच केले जाणार आहे. विभागाकडून दर ६ महिन्यांनी तपासणी अनिवार्य केलेली आहे. दर १ वर्षाला बालगृह नूतनीकरणाची कार्यपद्धती देखील करण्यात आलेली आहे. त्यांना बालगृहाची मान्यता ५ वर्षांसाठी दिली जाणार आहे, परंतु त्यांना दर वर्षी नूतनीकरण करावे लागणार आहे. अशा पद्धतीची नवीन नियमावली आता लागू केली जाणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

What are the norms of A,B,C,D ? What about the D category ? अशी विचारणा समितीने केली असता, तेव्हा चौकशी केली होती, it was on the basis of the facilities that were being provided to the students. C and D are terminated. यामध्ये अशी नियमावली होती की, (A) जो सर्व नियमांचे पालन करीत आहे, (ए) जे सर्व नियमांला फॉलो करू शकले नाही, परंतु अपेक्षा आहे की, they can upgrade themselves, C आणि D मध्ये एवढे निकष होते की, विभागाच्या अपेक्षेप्रमाणे त्यांची न येण्याची परिस्थिती होती. So, C and D were terminated. त्यांना अपग्रेड करण्याची संधी देऊन देखील they could not have come upto the level of expectations असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Are the cancelled 216 under C and D ? What about A and B ? अशी विचारणा समितीने केली असता, 216 were cancelled under C and D and about A and B. Till the time the final registration is done, त्यांना यासाठीच तात्पुरती मुभा दिलेली आहे की, आजही विभागाची त्यांच्याकडे १९ हजार मुले आहेत. Department cannot dislodge these students because they have nowhere to go. जेव्हा विभागाची ही प्रक्रिया पूर्ण होईल व त्यामध्ये जेवढे अपात्र होतील त्या सर्व बालगृहांना बंद केले जाणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता २१६ बालगृहांना बंद केले नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, २१६ बालगृहे बंद करण्यात आलेली आहेत. परंतु ७५० बालगृह कार्यान्वित असून त्यांना देखील पुर्ननोंदणी करण्याची गरज आहे. And if they fail, then they

also would be out of the system. As on today they are under A and B. तरी देखील मागील नियमांमध्ये आणि २०१८ मधील नियमांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

Will the B be out of system ? under the new Rule ? अशी विचारणा समितीने केली असता, जर त्यांनी अपग्रेड केले नाही तर they will be definitely be out. Yes, Sir, under the new Rule they will be out याचे कारण असे की, भारत सरकारने नवीन नियम २०१६ मध्ये कार्यान्वित केला होता. त्यामध्ये फॅसिलिटीज, किचन, ओपन ग्राऊंड, बिल्डिंग याचे कारण असे की, प्रत्येक विद्यार्थ्यामागे जेवढी स्पेस देणे आवश्यक आहे, त्यामध्ये फार मोठे चेंजेस आहेत. त्यांच्याही अधिनियमातही बदल आहेत आणि आताच्या अधिनियमातही समाविष्ट केलेले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक २.१.४.१ मूलभूत सुविधांच्या प्रमाणकांची अपर्याप्तता

२.११ या विषयासंदर्भात माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, शासन निर्णय दिनांक १३ जुलै २०१५ मधील निकषांनुसार बालगृहांची तपासणी करून त्याची 'अ', 'ब', 'क', आणि 'ड' असे श्रेणीनिहाय वर्गवारी केली होती. त्यासंदर्भातील सविस्तर अहवाल यामध्ये देण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

४.१ मध्ये जी कमतरता निदर्शनास आणली होती, out of 93 childcare institutes which was inspected along with the department, विभागाने उत्तर दिले होते की, "Action is being taken against the CCI for not adhering to the MJB Rules and WCD Resolution." असे महालेखाकारांनी निदर्शनास आणले.

यासंदर्भात ज्या बालगृह संस्थाचालकांनी अपिल दाखल केली होती, त्याच्या पूर्वी जी परिस्थिती होती, त्यावेळी विभागाने कारवाई केली किंवा कसे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने त्यावेळी १९१ बालगृहांची मान्यता रद्द केलेली होती. तसेच १९१ मध्ये त्या ९३ बाल काळजी संस्थांचा समावेश आहे. विभागाने परत संस्थांची तपासणी करून घेतली होती. ज्या ज्या संस्थामध्ये भौतिक सुविधा कमी होत्या, विभागाच्या तपासणीच्या फॉरमॅटमध्ये भौतिक सुविधा देखील समाविष्ट केलेल्या आहेत आणि ज्या संस्थांमध्ये भौतिक सुविधा नियमाप्रमाणे कमी आहेत, त्या संस्था देखील रद्द केलेल्या आहेत. तसेच तेथील मुलांना बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार इतर संस्थांमध्ये दाखल केलेले आहे. विभागाकडे ९५ हजार एवढी क्षमता होती. परंतु अशा संस्था रद्द करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी विभागाकडे केवळ १७ ते १८ हजार मुले होती. म्हणजेच त्यावेळी विभागाकडे मोठ्या संख्येत रिक्त जागा होती. त्यामुळे रद्द केलेल्या संस्थांना इतर संस्थामध्ये शिफ्ट करण्यास कोणतीही अडचण आली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक २.१.४.२ कपडे आणि बाडबिस्ताऱ्याच्या प्रमाणकांचे पालन न करणे-

२.१२ या परिच्छेदाबाबत माहिती देताना जुन्या नियमाप्रमाणे शासकीय संस्थांसाठी तेथील जेवणाचे प्रमाण काय असेल व इतर बाबींचे निकष निश्चित केलेले होते. परंतु स्वयंसेवी संस्थेसाठी कोणतेही निकष निश्चित नव्हते. त्यांना पुरेसे जेवण आणि पुरेसे साहित्य देण्यात यावे, असे नमूद केलेले होते. आता केलेल्या नवीन नियमामध्ये सर्व संस्थांसाठी निकष निश्चित केलेले आहेत. तेथे शासकीय किंवा स्वयंसेवी असा कोणताही भेद न ठेवता प्रत्येक बालकाला मिनिमम स्टँडर्ड मिळाले पाहिजे अशी तरतूद होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यामध्ये असे आहे की, डब्ल्युसीडीने विहित केलेल्या प्रमाणानुसार एनजीओ कडून चालविल्या जाणाऱ्या ७० पैकी ६५ सीसीआय मध्ये बालकांना पुरविलेले बाड बिस्तर व डब्ल्युसीसीने विहित केलेल्या प्रमाणाप्रमाणे नव्हते असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने स्वयंसेवी संस्थेसाठी नॉर्म्स निश्चित केलेले नव्हते. पूर्वीचा शासन निर्णय केवळ शासकीय संस्थांसाठी होता असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्या पॅरामध्ये असेही आहे की, शासकीय संस्था देखील स्टँडर्ड नव्हत्या असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले असता, शासकीय संस्था बंद करता येत नाहीत. अशा संस्थांमध्ये सुधारणा केलेल्या आहेत. आता एनजीओच्या संस्थांना देखील नॉर्म्स निश्चित केलेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक २.१.४.३ : पोषण आणि आहार यासाठी विहित केलेल्या प्रमाणातील अपर्याप्तता-

२.१३ संदर्भात माहिती देताना यामध्ये पोषण आहाराचा विषय आहे. पोषण आहारामध्ये हेच होते की, आपण शासकीय संस्थांना नॉर्म्स लावले होते. याचे कारण असे की, त्यासंदर्भात शासन स्तरावर समिती आहे. या समितीमध्ये सोशल वेल्फेअर,

डब्ल्युसीडी, आदिवासी व आम्ही आणि इतर त्यामध्ये सदस्य असल्यामुळे शासकीय संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना कशा पद्धतीचे जेवण दिले पाहिजे, त्या मध्ये किती कॅलरीज पाहिजे व इतर बाबी निश्चित केल्या होत्या. परंतु हे नियम एनजीओ यांना नियमाप्रमाणे लागू केले नव्हते. आता नवीन ॲक्टमध्ये ही त्रुटी सुधारलेली असून सर्वांसाठी सारखेच निकष लावण्यात आलेले आहेत व त्या नियमांचे पालन करणे त्यांना बंधनकारक आहे. असे विभागीय सचिवांनी विदित केले.

एनजीओ आणि शासकीय संस्था यांना फूड प्रोव्हाईड करण्यात येते किंवा कसे ? अशी विचारणा समितीने केली असता, एनजीओ त्यांची खरेदी स्वतः करते. शासकीय संस्थांना जिल्हा पातळीवर सप्लायर ठरविले जातात व त्यांच्याकडून पोषण आहाराचा पुरवठा केला जातो. विभाग त्यांच्यावर १०० टक्के खर्च करतो. स्वयंसेवी संस्थांकरिता फिक्स नॉर्म्स आहेत. तेथे २ हजार रूपये दिले जातात असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

माहितीमध्ये असे दिलेले आहे की, शासनाद्वारे चालविल्या जाणाऱ्या १३ सीसीआय पैकी एका मध्ये मासे, अंडी, ताक आणि दही, ताक दिले नव्हते. तसेच एनजीओ कडून चालविल्या जाणाऱ्या सीसीआयमध्ये ७० पैकी ५४ मध्ये दही, ताक दिले नव्हते. आहार विहित प्रमाणात गेलेला असून देखील ८० पैकी १४ सीसीआय मध्ये दूध दिले नव्हते. यासंदर्भात आपले निकष ठरलेले नाही काय ? You had fixed the amount for each student. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना काय प्रोव्हाईड करणार हे निश्चित केले नव्हते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यावेळी एनजीओ साठी जेवणाचे देखील निकष ठरविलेले नव्हते. त्यावेळी असे होते की, विद्यार्थ्यांना पोटभर जेवण दिले जावे, असे ठरले होते.

विद्यार्थ्यांना काय प्रोव्हाईड करणार हे ठरविण्यात आलेले होते, परंतु त्याचे प्रमाण देण्यात आले नव्हते. परंतु ते आता २०१८ मधील नवीन नियमामध्ये निश्चित करण्यात आलेले आहे. यापूर्वी एनजीओसाठी नियम ठरले नव्हते. यासंदर्भातील नियम ४० शासकीय बालगृहांसाठी होते. त्यामध्ये असे कुठेही लिहिलेले नाही की, "NGOs should also adhere to the same norms." जेव्हा कोर्ट केस झाली तेव्हा त्यांनी स्टॅण्ड घेतला की, त्याच्यावर हे बंधनकारक नाही. याचे कारण असे की, ते इम्पलाईड होता, परंतु ॲग्रेसिव्हली असे कुठेही लिहिलेले नव्हते. त्यामुळे त्यांनी असा स्टॅण्ड घेतला की, हे एनजीओला लागू नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक २.१.४.४ काळजी आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांपासून विधी संघर्षग्रस्त बालकांना वेगवेगळे न ठेवणे.

२.१४ समितीने दिनांक ३० मे २०१८ रोजी पुन्हा विभागीय सचिवांकडे साक्ष घेतली साक्षीच्यावेळीचा परिच्छेदामध्ये काळजी आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांपासून विधिसंघर्षग्रस्त बालकांना विभागाने वेगवेगळे ठेवले पाहिजे अशा प्रकारची प्रथा आणि नियम आहे. त्या बाबतीत विभाग कोठे तरी कमी पडला आहे. असा महालेखाकार यांचा आक्षेप आहे. त्यामुळे विभागाने यासंबंधी माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, राज्यामध्ये ३ एनजीओंची विशेष विधिसंघर्ष गृहे आहेत. विधिसंघर्षग्रस्त बालकांच्या Place of Safety यासाठी विभागाचे प्रस्ताव आहेत. त्यातील एक प्रस्ताव नाशिक येथील बोर्सेस स्कूलमध्ये कन्व्हर्ट करण्यासाठी महिला व बालविकास विभागाचा गृह विभागाकडे पत्र व्यवहार सुरू आहे. हा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे आणि त्याशिवाय मुंबई, पुणे आणि नागपूर या ठिकाणी Place of Safety तयार करण्यासाठी विभागाने नियोजन विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता. मात्र त्यांच्याकडून काही हरकती घेण्यात आल्या होत्या. त्यांचे निराकरण करून विभागाकडून पुन्हा तो प्रस्ताव पाठविण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यामध्ये ९३ सीसीआय पैकी १० सीसीआय मध्ये विधिसंघर्षग्रस्त बालके आणि काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची निवास व्यवस्था एकाच जागी केलेली होती असा महालेखाकार यांचा आक्षेप आहे. त्याची कारणे काय आहेत या समितीच्या प्रश्नाबाबत ती इमारत जरी एक असली तरी त्याचे सेग्रीगेशन केलेले आहे. ही मुले या मुलांच्या संपर्कात कधीही येत नाहीत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

महालेखाकार यांचे मत असे आहे की हे दोन्ही मुले एकत्र आढळली आहेत. या ठिकाणी उत्तरामध्ये सुध्दा मुलांना वेगवेगळे ठेवण्यात येत असल्याचे नमूद आहे. आपण म्हणता तसे असेल तर महालेखापालांनी त्याबद्दल सांगावे. एकाच संस्थेमध्ये विधिसंघर्षग्रस्त बालक आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक यांच्यामध्ये भेदभाव केल्यास त्याचा परिणाम बालकांच्या मनावर होऊन या बालकांची पुनर्वसन करण्यामध्ये अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. एका बाजूला असे उत्तर देऊन सांगण्यात येते की, त्यांना वेगवेगळे ठेऊ नये. On the one hand you are saying this but on the other hand Section 19(3) read with Section 48 and 49 of the Juvenile Justice Care and Protection of Children Act, 2015

provides for the special homes of place of safety for children in conflict with the law. म्हणजे विधिसंघर्षग्रस्त मुलांना वेगळे ठेवावे असे सन २०१५ चा ॲक्ट म्हणतो. असे मत समितीने व्यक्त केले असता, हे मान्य आहे. ऑब्जर्व्हेशन होम्स मधील मुलांना वेगळे ठेवले जाते. त्यांना विधिसंघर्षग्रस्त मुलांच्या संपर्कात कधीही आणले जात नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखापालांनी असा आक्षेप नोंदविला आहे की, १० ठिकाणी मुलांना एकत्र ठेवल्याचे आढळून आले, ते खरे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, कोणत्या संस्थेमध्ये मुलांना एकत्र ठेवले गेले, हे तपासण्यात येईल त्याची यादी सध्या विभागाकडे नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागीय प्रतिनिधींनी साक्षीला येण्यापूर्वी पूर्ण तयारी करून येणे अपेक्षित आहे. कोणत्या संस्थांमध्ये मुलांना एकत्र ठेवण्यात आले होते. ९३ पैकी १० संस्थांबाबत महालेखापालांनी आक्षेप नोंदविला आहे. मुलांना एकत्र ठेवावे की वेगळे ठेवावे ? आपण असे उत्तर दिले आहे की, मुलांना एकत्र ठेवणे जास्त योग्य आहे. सन २०१५ मधील कायद्यामध्ये काय तरतूद आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या मुलांना वेगळे ठेवले पाहिजे. ही मुले एका छताखाली असतात मात्र त्यांना वेगवेगळे ठेवले जाते. त्यांच्याकरिता वेगवेगळ्या खोल्या आहेत. १० संस्था कोणत्या आहेत, याची यादी महालेखापालांकडून घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महिला व बालविकास विभागाला हा कायदा मान्य आहे की नाही ? लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, बालकांसाठी मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करणे त्यांच्या विकासाच्या व पुनर्वसनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. त्यामुळे विधिसंघर्षग्रस्त बालकाच्या हातून घडलेल्या गुन्ह्यामुळे निर्माण झालेला न्युनगंड काढून टाकण्यास मदत होते असे समितीने निर्दशनास आणले.

एनजीओ मार्फत ऑब्जर्व्हेशन होम्स चालविले जातात. लातूर, नांदेड, पुणे येथील संस्थांची यादी आहे. विभाग ती यादी महालेखापाल कार्यालयाकडून घेऊ शकतो असे महालेखाकारांनी सूचित केले.

१० चाईल्ड केअर सेंटर्समध्ये मुलांना वेगवेगळे ठेवल्याचे आढळून आले नाही, असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. एकाछताखाली वेगवेगळे ठेवले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले मात्र तसे महालेखाकार यांना दिसून आले नाही. लेखी माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना वेगळे ठेवणे योग्य नाही. यामुळे समितीला असा संशय आहे की, जेजे नियम २००७ च्या नियम ४० या कायद्यानुसार अंमलबजावणी केली जाते की नाही. कायद्यानुसार अंमलबजावणी केली जाणार आहे की नाही ? विभाग स्वत:च्या मताप्रमाणे निर्णय घेऊ शकत नाही, यासंदर्भात कायद्यातील तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, हा विषय सन २०१५ च्या पूर्वीच्या कायद्याचा होता. महालेखाकार यांचा अभिप्राय असा आहे की, "Section 19(3) read with Section 48 and 49 of Juvenile Justice Care and Protection of Children Act, 2015 provides for the special homes of place of safety for the children in conflict with law. Action taken in this regard may be included in the reply to P.A.C." आताच श्रीमती निवतकर यांनी सचिव महोदयांच्या वतीने उत्तर दिलेले आहे. सध्या ४ स्पेशल होम्स असून १९५ मुले आहेत. प्लेस ऑफ सेफ्टी करिता नाशिक येथे बोस्टन स्कुलचा प्रस्ताव गृह विभागाकडे आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

ज्या मुद्यावर साक्ष आहे, त्या बाबत उत्तर दिले जात नसेल तर साक्ष का घेतली जात आहे ? आता विभागाने काय केले त्या बाबत समितीचे काही म्हणणे नाही. महालेखाकारांच्या आक्षेपाबाबत उत्तर द्यावे असे समितीने सूचित केले असता, या उत्तराने समितीचे समाधान झालेले नाही. नाशिकमध्ये सध्या काय केले आहे, या बाबत माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, विधिसंघर्षग्रस्त मुलांना वेगळे ठेवण्यासाठी स्पेशल होम्स तयार केले जातात. त्यांच्याकरिता नाशिक येथे बोस्टन स्कुल तयार करण्याचा प्रस्ताव सध्या अंतिम टप्प्यात आहे. या बाबत गृह विभागामध्ये चर्चा झालेली आहे. मुंबई, पुणे, नागपूर येथे देखील स्पेशल होम्स स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. या संबंधी नियोजन विभागाने काही शंका उपस्थित केल्या असून त्या पूर्ण केल्या जातील असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकापासून विधी संघर्षग्रस्त बालकांना वेगळे ठेवणे या विषयामध्ये महालेखाकारांचे आक्षेप असे आहेत की, ९३ बालसंगोपन गृहामध्ये अशा प्रकारची काही व्यवस्था नव्हती याबद्दल उत्तरामध्ये नमूद आहे की, त्यांना एकत्र ठेवले पाहिजे. ही भूमिका कुठपर्यंत योग्य आहे तर नियमाच्या अनुषंगाने त्यांना तसे करता येत नाही. उत्तरामध्ये

सांगितलेले आहे की, "Section 93 read with Section 48 and 49 of the Juvenile Justice Act, 2015 provides for the special homes or place of safety for child in conflict with law". विभाग सांगतो. त्यांना एकत्र ठेवले पाहिजे कारण त्यांच्यामध्ये भेदभाव केला तर बालकाच्या मनावर त्याचा परिणाम होईल. हे उत्तर कुठपर्यंत योग्य आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, डब्ल्यु.सी.डी.मार्फत ज्या मुलांची सर्वेक्षणाने काळजी घेतली जाते त्यामध्ये ब्रॉड डिव्हिजन आपण पॉइंट आऊट केले आहेत. एक म्हणजे Children in need of care and protection, ज्याचे कोणी नसते त्यांना इन्स्टिट्युशनलाईज करणे हा एक भाग आहे आणि दुसरे म्हणजे Children in conflict with law, ज्यांना इन्स्टिट्युशलाईजेशन ऑर्डर करते त्यांच्यासाठी these children are ones which are in conflict with law. ज्या १० संस्थांची तपासणी झाली त्यामध्ये संरक्षणाची आवश्यकता असलेल्या आणि विधी संघर्षग्रस्त अशा दोन्ही बालकांसाठी वेगवेगळी राहण्याची व्यवस्था करणे त्यांच्यावर बंधनकारक होते. १० पैकी ९ संस्थांनी सारख्याच इमारतीमध्ये दोन वेगवेगळे एरिया डिमार्केट केले होते. पण एका संस्थेने अशा प्रकारची वेगवेगळी व्यवस्था केली नव्हती. सन २०१७ मध्ये त्या एका संस्थेला नोटीस देऊन वेगवेगळी व्यवस्था करायला लावली आहे. त्यांनी एक भिंत बांधलेली आहे त्यामध्ये एका बाजूला Children in conflict with law आणि दुसऱ्या बाजूला Children in need of care and protection अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. तरी देखील कायद्याची तरतूद अशी आहे की, ideally they should not be mixed. याची आकडेवारी समितीसमोर सादर करण्यात आली. सन २०१४-१५ मध्ये या १० संस्थामध्ये ७५७ मुले अशी होती की, त्यांच्याकडे need of care and protection होते आणि ६८४ मुले ही in conflict with law होती.

Children in conflict with law हे क्वचित कालावधीसाठी म्हणजे १०, १२ किंवा १५ दिवसासाठी विभागाकडे येतात. कारण जेव्हा न्यायालयाचा आदेश येतो तेव्हा त्यांना त्यांच्या पालकांकडे हस्तांतरीत केले जाते. Children in need of care and protection हे कोणत्याही वयामध्ये विभागाकडे आले तरी ते १८ वर्ष वयापर्यंत त्या संस्थेमध्ये असतात. याचा अर्थ Children in need of care and protection हे दीर्घ कालावधीसाठी आणि Children in conflict with law हे क्वचित कालावधीसाठी असतात. ६८४ हा आकडा जरी मोठा दिसत असेल तरी there is constant moment of children. बऱ्याचदा १, २ किंवा ५ अशा संख्येची मुले असतात. त्यांना पूर्णपणे वेगळे ठेवणे (solitary confinement) हे संस्थेला शक्य नव्हते म्हणून ते दिवसभर त्यांना जेवायला आणि खेळायला सोबत ठेवत होते. त्यानंतर they were segragated in the evening in different sections. कायद्याच्या तरतुदीमध्ये काटेकोरपणे बघायला गेले तर कायद्यामध्ये हे बसत नाही. कारण both of them should be kept totally independent of each other. तरी सुद्धा मुलांना सॉलिटरी कन्फाईनमेंटमध्ये न ठेवता त्यांना दुसऱ्यांमध्ये मिक्स होण्याची संधी संस्था चालकांनी दिलेली आहे. पण आता सन २०१७ मध्ये कायद्याची अशी तरतूद आलेली आहे की, Children who are in the age group of 16 to 18.....१६ ते १८ वयोगटातील मुलांना वेगळे ठेवण्याची तरतूद शासनाने केलेली आहे. महाराष्ट्रामध्ये तीन ऑब्जर्वेशन होम आहेत तिथे १६ ते १८ वर्षाच्या मुलांना ठेवले जाते. कारण या वयामध्ये वेगळ्या काही प्रवृत्तीचे मुले सापडतात. त्यासाठी we have already proposed Mumbai, Pune, Nagpur and Nashik अशा चार ठिकाणी शासनातर्फे १६ ते १८ वय वर्षगटातील मुलांसाठी वेगळ्या place of safety करण्याची विभागाने शासनाकडे मागणी केलेली आहे. आयुक्त कार्यालयातून यासाठी विभागाकडे तरतूद प्राप्त झालेली आहे. We have already referred it to the government. याची मान्यता मिळल्यानंतर place of safety या वेगळ्या ४ शासकीय इमारती करण्यात येणार आहेत. आता जी बालगृहे होणार आहेत त्यामध्ये वेगवेगळ्या इमारतींचे विभाग नियोजन करीत आहे. यामध्ये children in conflict with law will be completely separated from children who are in need of care and protection असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

हे फक्त १६ ते १८ वयोगटातील मुलांसाठी आहे का १६ वर्षाखालील मुलांसाठी आहे अशी विचारना समितीने केली असता, १६ ते १८ वयोगटातील मुलांना इतर कोणत्याही ठिकाणी न ठेवता ४ ऑब्जर्वेशन होममध्ये त्यांना ठेवण्यात येणार आहे. १६ वर्षाखालील मुलांचा विचार केला तर प्रत्येक जिल्ह्यासाठी तसे बालगृहे करण्यात येणार आहे. आतापर्यंत बालगृहामध्ये अशी तरतूद होती की, दोघांना सारख्याच इमारतीमध्ये हाऊसिंग करता येत होते पण आता पूर्णपणे वेगळ्या इमारतीमध्ये हाऊस करण्याचे प्रयोजन करण्यात येत आहे. बालगृहाचे जे प्रपोजल इनव्हाईट केलेले आहे त्यामध्ये विभाग दोघांनाही सेग्रीगेट करण्यात येत आहे.

The proposal it is for the approval of the Government असे विभागीय सचिवाने अवगत केले.

As we are talking about 2014-15, even if you have put the proposal as on today, we have to follow the rule also असे समितीने सूचित केले असता, त्या बालकांना सारख्याच इमारतीत आजही वेगवेगळे ठेवण्याची तरतूद आहे. पण हे पूर्णपणे एकमेकांशी सेग्रीगेटेड असतात, असे होत नाही, ही प्रत्यक्ष परिस्थिती आहे. या १० संस्थामध्ये सुद्धा मिक्सींग होत होते. पण children less than 16, हे आहे. कायद्याच्या इंटरप्रिटेशनमध्ये हे योग्य नाही. तरी देखील २ ते ४ मुलांना वेगळे ठेवणे हे संस्थाचालकांना योग्य वाटले नाही म्हणून त्यांनी असे केले होते, ही खरी परिस्थिती आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

काळजी आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांपासून विधी संघर्षग्रस्त बालकांना वेगळे न ठेवणे यावर महालेखाकारांचे ऑब्जेक्शन आहे. पण कायद्याप्रमाणे या बालकांना वेगळे ठेवायला पाहिजे असे सांगण्यात येते. परंतु त्यांच्यामध्ये न्युनगंड होऊ नये, त्यांना वेगळेपणा वाटू नये म्हणून त्या मुलांना एकत्र ठेवण्यात येते. परंतु जी गुन्हेगारी प्रवृत्तीचे मुले आहेत त्यामध्ये काही खून केलेली असतात, काही चोऱ्या असतात किंवा काही मुले तर आईचा खून करून आलेली असतात. अशा मुलांना सुधारण्यासाठी जी खरोखरच चांगली मुले आहेत त्यांना पण विभाग बिघडवणार काय ? याबाबत विभागाचे उत्तर आहे की, 'गुन्हेगार प्रवृत्तीची फार कमी मुले येतात' त्या कमी मुलांच्या येण्याने जी चांगली मुले आहेत त्यांना एकत्र ठेवून बिघडवणार काय ? कायदा किंवा नियम काय सांगतो याप्रमाणे कायद्याचा पाठपुरावा करणार की भावनिक होणार. मुलांमध्ये न्युनगंड येऊ नये म्हणून विधी संघर्षग्रस्त मुलांना एकत्र ठेवतो असे भावनिकपणे सांगण्यात आले अशी विचारणा समितीने केली असता, काटेकोरपणे कायद्याच्या इंटरप्रिटेशनमध्ये ते योग्य नाही. पण ही ॲक्चुएल गुंडगिरी आणि खऱ्या परिस्थितीमध्ये सिनियर मुले असतात. १६ ते १८ वयोगटातील मुले ही खरी गुन्हेगार असतात. पण रेल्वे स्टेशनवर एखादी वस्तू उचलली किंवा वडापाव उचलला अशा प्रकारचे विषय लहान वयातील असतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये गंभीर स्वरुपाच्या गुन्हेगारांना या मुलांच्या बरोबर ठेवू नये. लहान मुलांची गोष्ट ठीक आहे. पण खून किंवा बलात्कार अशा प्रकारच्या घटनेला अनुसरुन जे आरोपी आहेत त्यांच्याबद्दल तसेच सर्वांसाठी सहानुभूतीची भूमिका घेतलीच पाहिजे. हा मुद्दा या ठिकाणी नाही. पण बाकीच्या मुलांवर याचा प्रभाव होऊ नये याची देखील त्या नियमाच्या अंतर्गत काळजी केलीच पाहिजे, अशी समितीची भूमिका आहे. कारण यामुळे बाकीच्या मुलांचे भविष्य का खराब करायचे ? विभागीय सचिवांनी सांगितले की आता ते वेगळी बालगृहे करीत आहेत. हे बालगृहे बांधण्यासाठी वेळ जाईल तर तपासणी किंवा त्यांनी काढलेले ऑब्जेक्शन हे वेगळे ठेवता येईल की नाही यासाठी विभागाचे कुठेतरी बंधन पाहिजे. जर असे काही केले तर त्या बालगृहाचा काटेकोरपणे वापर होईल असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्र. २.१.४.५ सुरक्षेतील त्रुटी

२.१५ यामध्ये सुरक्षेच्या त्रुटीमुळे फरार झालेली ५१८ मुले अजूनही सापडलेली नाहीत. या विषयावर सुरक्षेच्या दृष्टीने काय काय सुधारणा केलेली आहे आणि ज्या संस्थेकडून मुले पळाली आहेत त्यांच्यावर काय कारवाई केलेली आहे ? जी ५१८ मुले पळाली आहेत त्यांची सध्याची संख्या काही कमी झाली आहे काय किंवा त्या संस्थेवर यासाठी काही कारवाई केलेली आहे काय ? अशी विचारण समितीने केली असता, सुरक्षा रक्षक हे पद आणि त्यांची पगार हे दोन विषय पूर्ण विभागासाठी खूपच कठीण होते. त्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, सुरक्षा रक्षक महामंडळ आणि महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (मर्यादित) तसेच मेस्को यांच्याकडून कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने ती पदे घेण्याबाबत परवानगी देण्यात आलेली आहे. त्याच्या अनुषंगाने ५१ सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

५१ म्हणजे एका संस्थेला कमीत कमी ३ लोक लागतील. आतापर्यंत फक्त ५१ सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आहे तर तुमची संस्था सन १९९३ च्या अगोदरची आहे. या सर्वांचा पगार शासन करते काय ? अशी विचारण समितीने केली असता, सन २०१७ मध्ये एका संस्थेला शिफ्टमध्ये १२ लोक नेमण्याची संधी आम्ही दिलेली आहे.

शासकीय बालगृहांकरिता प्रशासकीय खर्चातून सुरक्षा रक्षकांच्या वेतन अदा पेमेंट करण्याची तरतूद आहे. इतर ज्या संस्था आहेत, त्या अनुदानित आहेत. त्यांना प्रशासकीय खर्च लंमसम देण्यात येते त्यांना सुरक्षा रक्षकांकरिता वेगळी तरतूद देत नाही. यामध्ये सुरक्षा रक्षकांचे वेतन अंतर्भूत असून त्यांच्यावर ते बंधनकारक आहे. त्यांनी स्वतः सुरक्षा रक्षक ठेवावे अन्यथा शासकीय पद्धतीने संस्थांकडून घेणे आवश्यक आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यांना शासन पैसे देते तरीही ते सुरक्षा रक्षक नेमत नाहीत, अशा काही संस्था आहेत का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने २०० संस्थांवर या संदर्भात कारवाई केलेली आहे. काही संस्थांना बंद करण्याच्या नोटीसेस दिलेल्या आहेत. शासकीय संस्थांमध्ये तेथे शासकीय संस्थामार्फत नेमणूक दिलेली आहे. जे खाजगी आहेत, त्यांना सुरक्षा रक्षक नेमणे बंधनकारक आहे. याच्यामध्ये सुरक्षा रक्षक नेमणे अभिप्रेत होते. त्याकरिता कलेक्टीव्ह ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ग्रांट आहे. त्यांनी एकतर सुरक्षा रक्षक या संस्थांमार्फत नेमायचे आहे अन्यथा त्यांनी स्वतः नेमायचा आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशा किती संस्थांना सुरक्षा रक्षक न ठेवल्यामुळे नोटीसा बजाविलेल्या आहेत अशी समितीने विचारणा केली असता, याची आकडेवारी उपलब्ध नाही. या संस्थांना नोटीसेस दिलेल्या आहेत. संबंधितांना सस्पेंड केलेले आहे. ज्यांच्याकडे सुरक्षा रक्षक नसल्यामुळे मुले पळून गेलेले आहेत, अशा संस्थांनाही नोटीसा बजाविलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

३६ शासकीय बालगृहांमध्ये प्रत्येकी १२ सुरक्षा रक्षक याप्रमाणे जास्त सुरक्षा रक्षक ठेवणे अभिप्रेत आहे. सर्व बालगृहामध्ये सुरक्षा रक्षक आहेत का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाची मागणी सगळीकडे आहे. जर संस्थेमार्फत सुरक्षा रक्षक मिळत नसतील तर त्यांना व्यक्तीगत निविदा काढून सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे, अशी सुरक्षा रक्षक नेमण्याची परवानगी सरसकट दिलेली आहे. प्रत्येक महामंडळांचे जिल्हानिहाय युनिट्स आहेत. जिल्हानिहाय नोंदणी करून काही नियम निश्चित करण्यात आलेले आहेत. जिल्हा पातळीवर लोक मागितलेले होते. शासकीय बालगृहांमध्ये विभागाने पर्यायी व्यवस्था केलेली आहे. खाजगी संस्थांमध्ये विभागाने त्यांना त्यांच्या पातळीवर व्यक्तीगत पद्धतीने सुरक्षा रक्षक नेमण्याचीच परवानगी दिलेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

संस्थांनी सुरू केलेल्या बालगृहांमध्ये सुरक्षा रक्षक ठेवलेले नाहीत. त्यांच्यावर कोणती कारवाई केलेली आहे, राज्याच्या शासकीय बालगृहांमध्ये आपण किती महिन्यांमध्ये सर्व सुरक्षा रक्षकांची नियुक्ती स्थानिक स्तरावर टेंडरवर किंवा सुरक्षा मंडळ यांच्याकडून कमीत कमी तीन महिन्यांच्या आत ही सर्व व्यवस्था कमीत कमी शासकीय संस्थांमध्ये सुरक्षा रक्षक नियमाप्रमाणे नेमणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त करून तिसरा मुद्दा असा आहे की, बाऊंड्री वॉल नाही असे निदर्शनास आणले असता, शासकीय बालगृहांमध्ये बाऊंड्री वॉल आहे. संस्थांच्या बालगृहांमध्ये सगळीकडे बाऊंड्री वॉल नाही. सन २०१८ च्या नियमामध्ये बालगृहांना बाऊंड्री वॉल्स आणि कुंपन सक्तीची केलेली आहे. बालगृहांसाठी नोंदणीसाठी पोर्टल ओपन केले होते. आता त्याची नोंदणीची मुदत संपलेली आहे. दोन आठवडयापूर्वी विभागाकडे या अंतर्गत ९०० अर्ज आलेले आहेत. चाचणी करून त्यांच्याकडे या व्यवस्था नाहीत विभागाकडे त्यांना मान्यता देण्यात येणार नाही. ज्यांची मान्यता सन २०२० पर्यंत आहे, त्यांनाही नवीन नियमाप्रमाणे मान्यता घेण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत. नवीन बालगृहांमध्ये बायोमॅट्रिक, बाऊंड्री वॉल, कंपाऊंड वॉल, सिक्योरिटी कव्हर, सीसीटीव्ही कॅमेराज या गोष्टींचा त्यामध्ये समावेश केलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

५५८ बालक पळाले, त्यापैकी ४० बालके मिळाली. ५१८ बालकांसाठी पोलीस एफआयआर दाखल केली होती का ? अशी विचारणा समितीने केली असता, एफआयआर केली होती, त्यानुसार ३८० मुले सापडलेली आहेत. उर्वरित बालकांचा शोध पोलिसांमार्फत सुरू आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

३८० बालके कशी मिळाली ? पोलिसांनी मिळवून दिली की ती बालके स्वतःच आलेली आहेत. ०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१८ पर्यंतच्या पळून गेलेल्या मुलांची फिगर्स आता विभागाकडे आहेत का ? अशी विचारणा समितीने केली असता, ती बालके पोलिसांना सापडलेली आहेत. ०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१८ पर्यंतच्या पळून गेलेल्या मुलांची आकडेवारी आता उपलब्ध नाही. ही आकडेवारी समितीसमोर सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यातून हे पाहायचे आहे की, याला कुठेतरी आळा बसला का, आता सुरक्षा रक्षक, सीसीटीव्ही यामुळे बालकांच्या पळून जाण्यामध्ये फरक पडला का ? या संदर्भातील माहिती समितीला पाहिजे असे समितीने सूचित केले असता, याची माहिती समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक २.१.४.६ मानसिकरित्या अपंग असलेल्या बालकांसाठीच्या गृहांचे अपर्याप्त कामकाज.

२.१६ या परिच्छेदाबाबत माहिती देताना मागील वर्षीपर्यंत प्रती माह प्रती बालक १२०० रुपये इतका निधी दिला जात होता. यामध्ये जेवण, राहणे व इतर सुविधांचाही समावेश होता. आता हा निधी वाढून २००० रुपये अधिक प्रशासकीय खर्च अधिक वैद्यकीय खर्च ५००० रुपये प्रतिवर्ष प्रतिबालक या प्रमाणे अनुदान शासनाने सुधारित केलेली आहे. हे अनुदान तिमाही दिले

जाते. ३१ मार्च, २०१८ रोजी सर्व तरतूद वापरण्यात आली होती. या नवीन आर्थिक वर्षाचा एक हप्ता दिला गेलेला आहे. दुसरा आता दिला जाईल. तसेच, मागणीनुसार डिमांडप्रमाणे ही तरतूद दिली जाते.

या मुद्यांचा इतर भाग सामाजिक न्याय विभागाशी संबंधित आहे. मानसिकदृष्ट्या अपंग मुलामुलींचे मॅटर्स २०१२मध्ये सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित केले गेलेले आहेत.

The Principal A.G.: The proposal to open rehabilitation home in every district was pending with your Department for three years. The proposal for appointment of trained staff for necessary care and rehabilitation of girls remained unattended till September, 2015 with the Commissioner, W & amp ; CD. To open at least one children home for mentally deficient children in each district to meet their special needs. हा प्रस्ताव महिला व बालविकास विभागाकडे तीन वर्षे प्रलंबित होता असा या पॅराचा निष्कर्ष आहे. त्यानंतर तो प्रस्ताव महिला व बालविकास विभागाकडे हस्तांतरीत केलेला आहे. हा प्रस्ताव महिला व बालविकास विभागाकडे पाठविण्यात आला होता असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

A proposal submitted by the Regional IDC, Pune to the Commissioner, Woman and Child Development Department in July, 2014. आता सांगण्यात येत आहे की, महिला व बालविकास विभागाने ते सन २०१२ मध्ये हस्तांतरीत केलेले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, हा एकमेव प्रस्ताव होतो मुंडवामध्ये २७ मुली होत्या. त्या मुली मानसिक रित्या अपंग होत्या. नियमाप्रमाणे या मुलांची काळजी केवळ वयाच्या अठराव्या वर्षापर्यंतच घेणे अपेक्षित आहे. परंतु आता त्यांचे कोणीही नाही. २७ पैकी एकच मुलगी १८ वयापेक्षा लहान आहे. इतर सर्व बायका ४० ते ४५ वयोगटातील आहेत. या स्त्रियांचा सांभाळ करण्याकरिता कोणीही नातेवाईक पुढे आले नाही. हे प्रकरण महिला व बालविकास विभागाकडे प्रलंबित होते. यांना कर्जत होममध्ये शासनाने शिफ्ट करण्याची परवानगी दिलेली आहे. या २७ महिला आमच्याच मुंडवा येथील होम मध्ये होते असे विभागीय सचिवानी सांगितले.

२०१४ पासून हे प्रकरण प्रलंबित आहे. यावर विभागाकडून आता चार वर्षानंतर निर्णय घेण्यात येत आहे. तेथे विभागाकडे प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नव्हता. त्यांच्याकरिता प्रशिक्षित कर्मचा-यांची मागणी केली गेली होती. त्यांना कर्जत होममध्ये कधीपर्यंत ट्रान्सफर करण्यात येणार आहे अशी विचारण समितीने केली असता, त्या २७ महिलांची कर्जत येथे सर्व व्यवस्था करण्यात आलेली आहे. ते जोपर्यंत प्रस्तावित आहेत, तोपर्यंत ते महिला व बालविकास विभागांच्या कर्जत होममध्ये राहणार आहेत. त्या २७ महिलांना मेडीकली केअरफुली हॅण्डलर्सची जास्त गरज असते. मेडीकल ट्रेन्ड स्टाफ आणि हॅण्डलर्स दोन्ही कर्जत होममध्ये ट्रान्सफर करण्यात येणार आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

परिच्छेद क्रमांक २.१.४.६. बाबत समितीने समाजकल्याण विभागाची साक्ष घेतलेली होती. त्यांच्या बरोबर महिला व बालविकास विभागाची बैठक होणे क्रमप्राप्त होते. १८ वर्षांखालील मुलांच्या बाबतीत ज्युव्हेनाईल कोर्ट लागते त्यामुळे महिला व बालविकास विभागाला काळजी घ्यायची आहे. त्या वरील मुलांकरिता त्यांचे नियम आहेत. महिला व बालविकास विभागाने ते सर्व सामाजिक न्याय विभागाला हस्तांतरीत केले. सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी आश्वासित केले होते की, महिला व बालकल्याण विभागाच्या सचिवांसमवेत बैठक घेऊन या विषयावर तोडगा काढण्यात येईल.

दिनांक १ ऑगस्ट, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत सचिवांनी असे सांगितले होते की, समितीने केलेल्या सूचनेप्रमाणे सचिव, महिला व बालकल्याण विभागाची ताबडतोब बैठक लावून या संदर्भात निश्चितपणे पर्याय काढण्यात येईल. यामध्ये शेवटी दोन विभागांचा संबंध येईल. मेंटली डिसेबल मुलांच्या संदर्भातील तो विषय होता. कर्जतच्या सर्व मुलामुलींच्या ट्रान्सफरच्या विषयाबाबतचा २.१.४.६ हा परिच्छेद आहे. सामाजिक न्याय विभाग व महिला व बालविकास विभागाच्या सचिवांची बैठक झाली आहे काय, या विषयावर तोडगा काढला आहे काय ? आज त्याच विषयावर सचिव, महिला व बालकल्याण यांना बैठकीस बोलावलेले आहे असे समितीने सूचित केले असता, ती बैठक अजून झालेली नाही असे सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी सांगितले.

सामाजिक न्याय विभागाने बैठक घेण्याचा प्रयत्न केला काय ? समितीसमोर साक्षीच्यावेळी येऊन केवळ असे-असे करतो म्हणून सांगायचे परंतु, नंतर काहीच होत नाही याचा समितीला खूप मोठा अनुभव आहे. त्याच विभागात महिला व बाल विकास विभागासोबत समवेत बैठक घेण्याचाही प्रयत्न केला नाही ? समिती समोर आश्वासित केले की, दोन्ही विभाग या

विषयावर चर्चा करू कारण हा दोन्ही विभागांचा प्रश्न आहे. या विषयावर लवकरात लवकर पुढच्या १५ दिवसांच्या आत बैठक घेऊन केलेली कारवाई किंवा बैठकीचे कार्यत्व समितीस द्यावे असे समितीने सूचित केले असता, सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

परिच्छेद क्रमांक २.१.४.७. सहवासिना व्यावसायिक प्रशिक्षण न देणे

२.१७ या परिच्छेदाबाबत माहिती देताना हा विषय तांत्रिक आणि प्रशिक्षण देण्यासंदर्भातील आहे. त्याच्यामध्येच विभागाकडे जी मुले असतात ती काळजी आणि संरक्षणाची गरज असणारी असतात. ती मुले नियमित शिक्षणाकरिता जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये किंवा जवळच्या खाजगी शिक्षण संस्थांमध्ये नोंदणी करीत असतात. चौदाव्या वर्षापर्यंत त्यांच्याकडून दहावी पूर्ण करण्याची अपेक्षा असते. परंतु ते वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत ते दहावी पूर्ण करतात. त्यानंतर ते अकरावी-बारावी पर्यंत त्यांच्या क्षमतेपर्यंत ते नियमित शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेऊन ते शिक्षण पूर्ण करतात, त्याकरिता शासनातर्फे तशी व्यवस्था केली जाते. वेकेशनमध्ये त्यांची व्यवसायिक कोर्सेस अटेंड करण्याची व्यवस्था केली जाते. आयटीआय व आदि प्रशिक्षण संस्थांमध्ये त्यांची प्रवेश १८ व्या वर्षापर्यंत घेतला जातो. परंतु बरीच मुले सतराव्या वर्षापर्यंत ते दहावी पूर्ण करतात. त्यामुळे हा परिच्छेद आलेला आहे. जी मुले महिला व बालविकास विभागाकडे अठरापेक्षा जास्त वयाची असतात ती मुले आफ्टर केअर होममध्ये असतात. महिला व बालविकास विभागाकडे प्रयत्न असा असतो की, त्यांनी अठराव्या वर्षापर्यंत त्यांनी दहावी-बारावी पूर्ण करणे आवश्यक आहे. त्याकरिता शासन त्यांना प्रेरित करीत असते. याकरिता त्यांना स्थानिक शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश देण्याची व्यवस्थाही केली जाते. व्यवसायिक प्रशिक्षणाकरिता त्यांना सुट्टीच्या कालावधीकरिता प्रवेश दिला जातो. त्यामध्ये तांत्रिक प्रशिक्षणही दिले जाते असे विभागीय सचिवांनी विदिन केले.

यामध्ये ८२ पैकी ४३ यांना विभागाने प्रशिक्षण दिलेच नाही. ४१ मध्येही अर्धवट संख्येने मुलांना प्रशिक्षण दिले. ७३५ मुलांना प्रशिक्षण दिले आणि ८७७ मुलांना प्रशिक्षण दिलेले नाही. या मुलांच्या संदर्भात नियमांचे उल्लंघन झालेले आहे. त्यांना लाभकारी योजना प्राप्त होण्यापासून ते वंचित राहिलेले आहेत असे समितीने व्यक्त केले असता, यामध्ये त्यांचे जे नियमित दहावी-बारावीचे शिक्षण सुरुच आहे. त्यांना पुढील शिक्षण घेण्यापासून कोणीही रोखत नाही. महिला व बालविकास विभागाच्या बालगृहातील मुले दहावी-बारावीमध्ये चांगले गुण मिळवितात. नियमित शिक्षण त्यांचे सुरू आहे, त्यांचे व्यवसायिक प्रशिक्षण सुट्टीच्या कालावधीतील दोन-तीन महिन्यांच्या तात्पुरत्या स्वरुपाचे देण्यात आलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१६ मध्ये आयटीआय बरोबर विभागाने एमओयू केलेला आहे. आयटीआयमध्ये त्यांच्याकरिता रिझर्व्हेशन आहे का ? अशी विचारण समितीने केली असता, ज्यांचे ॲडमिशन शक्य आहे, त्यांना तेथे ॲडमिशन देऊन त्यांना दहावी पूर्ण झाल्यानंतर जर त्यांना तेथे प्रशिक्षण देण्याबाबातचा एमओयू केलेला आहे. आता ज्यांना अनाथचे सर्टिफिकेट मिळेल, त्यांना आरक्षण लागू होईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यामुलांना नियमित शिक्षणाबरोबर तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण कोटयामधून मिळविण्याकरिता शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व आता शासनाच्या धोरणाप्रमाणे आयटीआय दोन शिफ्टमध्ये सुरू झालेले आहे. विभागाने याकरिता एमओयू केला की, जो आयटीआयच्या अर्हतेमध्ये बसतील त्या सगळ्या मुलांना विभागाने शासनाकडून निधी भरुन त्यांना आयटीआयचे कोर्सेस करून देण्यासाठी हे एमओयू केलेले आहे. अठरा वर्षानंतर त्या मुलांचा बालगृहांचा पिरियड संपतो. विभागाचे चार आफ्टर केअर होम आहेत. ज्या मुलांना अठरा वर्षानंतरही कोणी घ्यायला आले नाही, त्यांच्याकरिता हे सुरू केलेले नाही. अठरा वर्षाच्या वरील मुलांना एकवीस वर्षाच्या वयापर्यंत आफ्टर केअर होममध्ये प्रवेश घेण्याची मुभा आहे. चार आफ्टर केअर होम डिव्हीजन हेड क्वार्टरला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे प्रशिक्षण व त्यांची राहणे व खाणे पिणे हे फ्री ऑफ चार्ज आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, २१ वर्षापर्यंत शासन त्यांची राहणे, खाणे-पिणे व शिक्षण यांची व्यवस्था पाहते. शासकीय संस्थांमध्ये तो जर शिक्षण घेत असेल तर त्याला शिक्षणही फ्री ऑफ चार्जच असते वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत शासनच त्याची सर्व जबाबदारी घेते अठराव्या वर्षानंतर आफ्टर केअर होममध्ये ॲडमिशन घेतले तर त्यामध्ये बदल होईल असे विभगीय सचिवांनी सागितले.

परिच्छेद क्र. २.१.४.८-बाल काळजी संस्थामधून मुक्त केलेल्या मुलांचे अपर्याप्त पुनर्वसन

२.१८ सदर परिच्छेदामध्ये सहा शासकीय बालगृहे आणि तीन संस्थांची बालगृहे आहेत असे म्हटलेले आहे. याबाबत तपासून घ्यावे असे सचिवांनी सूचित केले असता, तीन शासकीय बालगृहांना मान्यता होती, एक बंद पडलेले आहे. एनजीओ यांनी त्यांची एक संस्था बंद केलेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

शासकीय बालगृहे सहा आहेत. शासकीय व एनजीओ बालगृहांची यादी समितीला सादर करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, शासनाची बालगृहे केवळ चार आहेत. यादी सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवानी सांगितले.

सहा पैकी चारमध्ये ४०० बालकांना सामावून घेण्याची क्षमता होती. सन २०१२-२०१५ दरम्यान निकृष्ट सुविधा अपर्याप्त पायाभूत सुविधांमुळे या चार अनुरक्षण गृहामध्ये केवळ २२ ते ४१ टक्केच मुले प्रत्यक्षात राहत होती असे समितीने निदर्शनास आणले असता, यामध्ये खरी परिस्थिती अशी आहे की, जो १०० टक्के पूर्ण ऑर्फन आहे ज्यांना कुठेही जाण्याची मुभा नाही. ते विभागाच्या आफ्टरकेअर होममध्ये असतात. तेथे सगळी मुले प्रत्यक्ष राहतात, तेथे व्यवस्था आहे. १८-२१ या किशोरवयीन वयोगटातील मुले व मुली तेथे आहेत. या धर्तीवर विभागाकडे आणखी बालगृहे सुरू करण्याची मागणी आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३९० अनाथ मुलांना अनुरक्षण गृहामध्ये प्रवेश द्यायचा होता, त्यांचा अहवाल सादर केला होता. तथापि या अनाथ मुलांना अनुरक्षण गृहामध्ये दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी कोणती कारवाई सुरू केली असल्याचे दर्शविण्याचे कोणती तरतूद होती, असे आक्षेपामध्ये तरतूद आहे. हा जो परिच्छेद आहे, यामध्ये सीडब्ल्यू ॲण्ड सीडीओ डिस्ट्रीक्ट बालकल्याण अधिकारी आणि सीडीओ यांनी अनाथ मुलांना दाखल करण्यासाठी कोणताही प्रयत्न केलेला नाही असे आक्षेप असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, मुलांचा बालगृहातील कालावधी संपल्यानंतर सर्वांना पर्याय देण्यात येतो. जे हा पर्याय स्वीकारतात त्यांचे अर्ज बालगृहातून अनुरक्षणगृहाकडे पाठविले जातात. त्यांना ॲडमिशन टेस्ट वगैरे असे काही प्रकार नसतो. जर बालगृहाची शिफारस असली तर त्यांना विभागीय पातळीवर प्रवेश मिळतो. कारण त्यांचे ॲडमिशन विभागीय पातळीवर असतात. विभागाच्या बालगृहातील मुलांसाठी वेगळे प्रयत्न करावे लागत नाहीत. बालगृहातील निरीक्षकांच्या प्रमाणपत्रावरुनच त्यांना प्रवेश मिळतो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखापालाचा आक्षेप आहे की, अनाथ मुलांना १८ वर्षानंतर कॅपॅसिटीनुसार जागा देण्यात आली नाही. महिला व बाल विकास अधिकारी किंवा बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. विभागाकडे पुरेसा कर्मचारीवृंद आहे. विभाग आफ्टर केअर सेंटरचा बरोबर उपयोग करीत नाही. तेवढी मागणी नाही असे आहे काय ? अशी विचारण समितीने केली असता, जेजेबीकडे जितके मुले अर्ज करतात त्यांचे अर्ज सीडब्ल्यूसीसमोर सादर करण्यात येतात. त्या अर्जास सीडब्ल्यूसी परवानगी देते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या मुलांना अनुरक्षणगृहामध्ये दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी कोणतीही कारवाई जिल्हास्तरावर किंवा सीडीओनी केली नाही असा महालेखपालांचा आक्षेप आहे. विभागाने कोणत्याही प्रकारचा पुढाकार घेतलेला नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, सर्वांसाठी पर्याय खुले असतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासनातर्फे पुनर्वसनचा आराखडा तयार करण्याकरिता सर्व होम्सकडून माहिती मागितली होती. एक हजार होम्सपैकी ७४० होम्सनी माहिती दिली नाही. ३६७ बाबत चर्चा सुरू आहे. या होम्समध्ये रिहॅबिलीटेड करायला पाहिजे. शासनाची कॅपॅसिटी फूलफील झालेली नाही असा आक्षेप आहे. माहिती आहे त्यांचे रिहॅबिलीटेड झालेले नाही आणि ७४० होम्समध्ये काय परिस्थिती आहे याची माहिती मागितली होती ती माहिती विभागाकडे नाही असे मत महालेखापालानी व्यक्त केले.

एखादा मुलगा बालगृहात राहतो आणि १८ वर्षे झाल्यानंतर त्याला आणखी तीन वर्षाचा पर्याय आहे असा अव्हेरनेस कॅम्पेन करण्यात येतो काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्या मुलाला बालगृहातून सोडण्यापूर्वी तो कुठे जाणार आहे, कोणाकडे जाणार आहे किंवा तो कोणाकडे देण्यात येणार आहे याची माहिती घेतली जाते. जर गरज असेल तर या मुलास पोस्ट केअर होममध्ये प्रवेश देण्याची गरज आहे असा अर्ज सीडब्ल्यूसीसमोर दिला जातो आणि त्याबाबत सीडब्ल्यूसी निर्णय घेते. जर त्या मुलाचे कुटुंब असेल तर तो कुटुंबाकडे जातो नसेल तर तो विभागाच्या होम्समध्ये येतो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जी अनाथ मुले वय वर्षे १८ झाल्यानंतर बालगृहात राहू शकत नाहीत त्या प्रत्येकाचे समुपदेशन करावे. या मुलांचे पुढील भवितव्य ठरलेले नाही त्यांची काळजी घेऊन त्यांना समुपदेशन करून बालगृहामध्ये शिफ्ट करण्याबाबतची कोणतीही कार्यवाही करण्याबाबत महिला व बालविकास विभाग पुढाकार घेत नाही असा आक्षेप आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, जरी एखाद्या मुलास १८ वर्षे पूर्ण झाली तरी त्याला बालगृहाच्या बाहेर सोडण्याचे आदेश बालसुधार समिती देते आणि बालसुधार समितीची ऑर्डर घेतल्याशिवाय विभाग कोणत्याही मुलास बाहेर सोडू शकत नाही. जेव्हा सीडब्ल्यूसीसमोर मुले हजर

होतात तेव्हा त्यांना स्पष्ट विचारण्यात येते की, त्यांना बालगृहाच्या बाहेर जायचे आहे की बालगृहात रहायचे आहे. जर बालगृहाच्या बाहेर जाणार असतील तर नेमके कुठे जाणार, त्यांची काळजी कोण घेणार आहे या गोष्टी विचारण्यात येतात आणि त्याची नोंद होते. सीडब्ल्यूसीच्या परवानगीशिवाय बालगृहातील मुलांना बाहेर सोडण्यात येत नाही. सीडब्ल्यू प्रत्येक मुलास विचारते आणि त्यांनी होकार दिल्यानंतरच त्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू होते असे विभागीय सचिवानी सांगितले.

त्यांना आफ्टर केअर होममध्ये रहायचे नाही असे विभागाने त्यांच्याकडून अंडरटेकींग घेतले तर यामध्ये आणखी सुस्पष्टता येईल असे समितीने सूचित केले असता, विभागामार्फत प्रत्येक रिलिज होणाऱ्या मुलाकडून असे अंडरटेकींग घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

चाईल्ड वेल्फेअर कमिटी कुठल्या पातळीवर असते ? या मुलांच्या पुनर्वसनाची जबाबदारी महिला व बालविकास विभागाची आहे. त्या मुलांचे वय १८ वर्षे झाल्यावर ते काय करणार याबाबत विभागाची काही भूमिका आहे की नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, चाईल्ड वेल्फेअर कमिटी जिल्हा पातळीवर असते आणि मुंबई सारख्या शहरात दोन आहेत. पुनर्वसनाबाबत अशा मुलांसाठी एक टक्का आरक्षण ठेवलेले आहे. त्यामध्ये हॉस्टेलमध्ये राहण्याची सोय, ॲडमिशनची सोय, ॲडमिशन इन आयटीआय किंवा कोणतीही शासकीय संस्थेत किंवा कोणत्याही शासकीय कॉलेजमध्ये, शासकीय हॉस्टेलमध्ये त्यांना प्राधान्याने एक टक्का आरक्षण देण्यात आलेले आहे.

ही मुले अनाथ असल्यामुळे त्यांचे कोणीच नातेवाईक नाही, मग त्यांच्या फीचे काय ? त्यांचे जेवण, कापड , राहण्याची व्यवस्था कोण करणार ? अशी विचारण समितीने केली असता, त्यांना फीमध्ये सवलत दिलेली आहे. फी, हॉस्टेल आणि कॉलेज प्रवेश या तीन ठिकाणी त्यांना आरक्षण दिलेले आहे. आज महाराष्ट्रामध्ये ३९४९ मुले पूर्णपणे अनाथ आहेत. त्यांची काळजी घेणारे कोणीही नाही. इतकी सर्टीफाईड अनाथ मुले आमच्या हॉस्टेलमध्ये आहेत. विभागाने त्यांच्यासाठी एक टक्का आरक्षण लागू केलेले आहे. या मुलांचे आधार कार्ड काढण्याचे काम विभागाचे आहे. १८ वर्षानंतर तो मुलगा ज्या परिवारामध्ये जाणार आहे त्या परिवाराची ती जबाबदारी असते किंवा ज्या मुलांचे कोणीही नातेवाईक नाही त्यांना ऑफ्टर केअर होम्स उपलब्ध आहे. ते त्या ठिकाणी २१ वर्षे होईपर्यंत राहू शकतात. मात्र २१ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना स्वतःची व्यवस्था पहावी लागते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

बालगृहातून बाहेर पडणाऱ्या मुलांचे पुनर्वसन व त्यांच्या जीवनात काय झालेले आहे, याबाबत समितीकडून विभागाची विचारणा करण्यात आली होती. महिला व बालविकास बालगृहातून बाहेर पडलेल्या मुलांपैकी ९ मुले ही ऑफ्टर केअर होम्समध्ये होती. पेरेंटस व इतर नातेवाईकांकडे ७३ मुले आहेत. ९५ मुले हॉस्टेल्समध्ये आहेत. ४४ मुलांना नोकरी लागलेली आहे. ६ मुलांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केलेला आहे. २४ मुलींचे लग्न झालेले आहे, त्यांना कुटुंब मिळालेले आहे. २ मुलांचे निधन झालेले आहे. सध्या नॉन वर्किंग स्टेटमध्ये म्हणजे ज्यांचा स्वतःचा व्यवसाय नाही किंवा जे स्वतः नोकरी करीत नाहीत अशी ८८ मुले आहेत. अशाप्रकारे ३४१ मुलांचा शोध घेऊन त्यांच्या जीवनात काय काय झाले आहे, याची माहिती विभागाने घेतलेली आहे. ही मुले त्यांच्या कुटुंबामध्ये किंवा कुठेना कुठे कुटुंबामध्ये राहतात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागीय सचिवांनी दिनांक २७ जून रोजी असे आश्वासित केले होते की, सध्या कार्यरत असलेल्या बालगृहांची यादी त्या दिवशी संध्याकाळपर्यंत देण्यात येईल. त्याच बरोबर विभागाने रि-रजिस्ट्रेशन खुले केले होते. त्या रि-रजिस्ट्रेशनची लिस्ट सादर करणार असे सांगितले होते ती देखील विभागाने सादर केलेली नाही. याबाबत समितीने निदर्शनास आणले असता, जी बालगृहे कार्यरत आहेत व जी बालगृहे बंद केलेली आहेत ती सर्व माहिती सादर केलेली आहे. रि-रजिस्ट्रेशनबाबत विभागाने रजिस्ट्रेशन ४०-४५ दिवसांसाठी ओपन केले होते. विभागाकडे ९०० अर्ज प्राप्त झाले होते. त्या सर्वांची चाचणी करण्यात आली. भरपूर अर्ज असे होते की, ज्यामध्ये ऑडिटरच्या सर्टिफिकेटमध्ये प्रॉपर शिक्का नाही वगैरे लहान सहान त्रुटी होत्या. वास्तविकताः हे सर्व नोंदणीकृत एन.जी.ओ. असल्यामुळे त्यांची नोंदणी नागपूरमध्ये झालेले आहे, ते पेपर्स त्यांनी सादर केलेले नाहीत अशाही किरकोळ त्रुटी होत्या. विभागाने परत सर्वांना संधी दिली होती व पोर्टल ओपन केले होते. ते पोर्टल आता बंद झालेले आहे. त्यांना ३० दिवसांची मुदत देण्यात आली होती. ते आता बंद झालेले आहे. त्याची चाचणी आता विभागाच्या स्तरावर सुरू आहे. आजच्या परिस्थितीत टर्मिनेट केलेली २१४ बालगृहे वगळल्यास इतर बालगृहे सध्या सुरू आहेत आणि नवीनची चाचणी सुरू आहे. दिनांक १५ ऑक्टोबर पर्यंत विभागाकडे नवीन यादी तयार होईल. जे पेपर्स तपासणीयोग्य आहेत ते समितीसमोर सादर करीत आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाची नवीन लिस्ट १५ ऑक्टोबर पर्यंत तयार होईल. ती समितीला २५ ऑक्टोबर पर्यंत द्यावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व नवीन जे सिलेक्ट होतील ती यादी सादर करण्यात येईल.

ही माहिती याकरिता मागण्यात येत आहे. कारण यादी अंतिमतः केली की नाही याची माहिती समितीला पाहिजे आहे. विभागाची कारवाई सुरू आहे. You have given extension for some compliance. विभाग आता ते १५ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करणार आहे. ते १५ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण झाले पाहिजे त्या दृष्टीने समिती विभागाकडून २५ ऑक्टोबरपर्यंत यादी अपेक्षित करीत आहे असे समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

परिच्छेद क्रमांक २.१.४.९-अनाथ प्रमाणपत्रे जारी करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी

२.१९ या परिच्छेदासंदर्भात सुधारित निकषानुसार अनाथ म्हणून घोषित केलेल्या मुलांना अनाथ प्रमाणपत्र देण्यात आली काय, असल्यास आजपर्यंत किती अनाथ मुलांना प्रमाणपत्र देण्यात आली आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, या संदर्भात काढण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये या संदर्भातील सविस्तर कार्यपद्धती दिलेली आहे. प्रमाणपत्र देण्याची पद्धत अशी आहे की, सीडब्ल्यूसीकडे अर्ज गेल्यानंतर ते त्याची खात्री करतात आणि डिव्हीजनल ऑफिसरकडे पाठवितात ते अर्ज स्वीकारतात किंवा त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास पुन्हा सीडब्ल्यूसीकडे पाठवितात. फायनल सर्टीफिकेट देण्याची जबाबदारी डिव्हीजन ऑफीसरवर आहे असे विभागीय सचिवानी सांगितले.

या संदर्भातील सर्व व्हेरिफिकेशन्स महिला व बालविकास विभागाला करायचे आहेत. कारण विभागाच्या बालगृहात ही मुले अनेक वर्षापासून राहत असतात. या अनाथ मुलांचे वय १८ वर्षे झाल्यावर त्यांची बालगृहातून सुटका होते. जर त्यांना कोणीच नातेवाईक नसतील तर ते काय करणार ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागाच्या बालगृहात वाढलेल्या मुलांच्या बाबतीत प्रश्न नाही. जे बाहेर आहेत किंवा खाजगी संस्थामध्ये वाढलेले आहेत किंवा इतर ठिकाणी आहेत त्यांच्या बाबतीत प्रश्न आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जरी खाजगी संस्था असली तरी ती शासनाशी ॲफिलेडेट असते असे समितीने निदर्शनास आणले असता, अनाथ मुलांच्या संदर्भात शासन निर्णय काढलेला आहे त्यामध्ये ज्यांच्या आईवडिलांचा पत्ता नाही, त्याचे इतर कोणतेही नातेवाईक किंवा रक्तसंबंधांची माहिती नाही ज्याच्याकडून लिनिअेज काढता येत नाही अशाप्रकारच्या मुलांना अनाथ म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. महिला व बालविकास विभागाच्या बालगृहातील मुलांचे आधारकार्ड काढणे आणि प्रमाणपत्र देणे ही विभागाची जबाबदारी आहे आणि ती विभागाकडून नेहमी पार पाडण्यात येते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अनाथ प्रमाणपत्र देण्याबाबतचे जे नियम बदललेले आहेत त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "आई-वडिलांचा शोध घेऊन, त्यापैकी कोणीच ह्यात नसल्याबाबतची खात्री संबंधित यंत्रणेस झाली असणे व त्याबाबतचे संस्थेचे अधीक्षक यांचे प्रमाणपत्र जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रमाणित करावे." यामध्ये वेळेचे बंधन टाकलेले नाही, किती दिवसामध्ये हे प्रमाणित करावे तसेच किती वेळेत आई-वडिलांचा शोध घ्यावा याचा उल्लेख नाही असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, नवीन शासन निर्णय काढलेला आहे त्यामध्ये ४५ दिवसांचे बंधन घातलेले आहे. 45 days From the date of application before CWC असे विभागीय सचिवानी सांगितले.

मुलगा १८ वर्षाचा झाल्यानंतर बालगृह सोडण्यापूर्वी त्याला निर्णय कळतो काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्या मुलास आधार कार्ड आणि सर्टीफिकेट दिल्यानंतर त्याला बालगृहातून सोडण्यात येते. समितीने प्रश्न उपस्थित केला त्याबाबत विभागाकडे जी मुले आहेत त्याला मागील १८ वर्षापर्यंत कोण भेटायला आले, कोणत्या संबंधाने भेटायला आले हे सर्व रेकॉर्ड विभागाकडे असतो. जे बाहेर राहतात त्यांच्या बाबतीत प्रश्न आहे. विभागाच्या बालगृहात राहणाऱ्या मुलांचा प्रश्न नाही असे विभागीय सचिवानी अवगत केले.

१६ जिल्ह्यांमधील १७ चाईल्ड केअर सेंटर्सनी त्यांच्या संबंधित डिस्ट्रीक्ट ऑफीसर आणि सीडीओकडून पाठविलेले ८८ प्रस्ताव आयुक्त, महिला व बाल विकास यांना केस शीट, छायाचित्र, प्रवेश डिटेल्स नाहीत अशा विविध कारणांनी परत पाठविले होते. या ८८ मुलांचे काय झाले ? अशी विचारण समितीने केली असता, हे सर्व प्रश्न समोर आल्यानंतर त्यामध्ये बदल करण्यात आलेला आहे. विभागाच्या बालगृहामध्ये जी अनाथ मुले आहेत त्यांना आधार कार्ड आणि सर्टीफिकेट दिलेले आहे. मात्र जी मुले विभागाच्या इन्स्टीट्युटमध्ये नाहीत त्यांना या नवीन प्रक्रियेमध्ये यावे लागेल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अनुदानित बालगृहांमध्ये बोगस कारभार चालतो. एका मालकाची चार बालगृहे असतील तर एक मुलगा चार बालगृहांमध्ये दाखविण्यात येतो. विभागाने त्याची तपासणी केली तर अनेक बालसुधारगृह बंद करावी लागतील. विभागाने तशी काही सुधारगृहे बंद केलेली आहेत. आता विभागाने जो शासन निर्णय काढलेला आहे त्याप्रमाणे आधारकार्ड काढणे बंधनकारक केले तर बोगसगिरीला आळा बसेल आणि ज्या योग्य संस्था आहेत त्यांना अनुदान मिळेल. आता अनुदानदेखील वाढ केलेली आहे. रुपये १२०० वरुन २००० रुपये अनुदान वाढविले आहे आणि ही रक्कम तशी पुरेशी आहे. संस्थांना बाहेरुन देणगी मिळाली नाही तरी त्यांना बालगृहे चालविता येतील. विभागाचे इन्स्पेक्शन आणि सुपरव्हीजन असेल तर विभागाच्या पैशाचा योग्य विनियोग होईल असे मत व्यक्त करून आताच ३९४९ अनाथ मुले आहेत असे सांगितले. त्या सर्वांना प्रमाणपत्र दिलेली आहेत काय ? अशी विचारण समितीने केली असता, या सर्वांची आधारकार्डावर नाव नोंदणी केलेली आहे. आधार कार्ड काढण्यासाठी त्यामध्ये जातीचा उल्लेख असतो, विभागाने तेथे त्यांची अनाथ म्हणून नोंदणी केलेली आहे. मिन्स वुई डोन्ट नो. त्यामुळे तो आरक्षणासाठी पात्र होत आहे. आता विभागाने प्रमाणपत्र देण्याची पद्धत बदलली आहे. आता आयुक्त कार्यालयाकडे कोणतेही अर्ज जाणार नाहीत. यामध्ये सीडब्ल्यूसीला मुख्य रोल दिलेला आहे. सीडब्ल्यूसीला खात्री पटली की, डिव्हीजनल ऑफीसला शिफारस करतील. सर्व डिव्हीजनल हेडक्वार्टर्समध्ये डिव्हीजनल ऑफीस आहे तेथून सर्टीफिकेट मिळाल्यानंतर ते सीडब्ल्यूसीकडे पाठविणार, सीडब्ल्यूसी सर्टीफिकेट देईल. दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी नवीन शासन निर्णय काढलेला आहे. Now, we are issuing certificates on the basis of our own records. त्यांचे आधारकार्ड काढले पण सर्टीफिकेट काढायचे आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समिती आरक्षणाच्या शासन निर्णयाबाबत बोलत नाही तर अनाथ प्रोसिजरसंबंधी नवीन शासन निर्णय केव्हा काढला ? Who will receive the orders now ? अशी विचारणा समितीने केली असता, अनाथ प्रोसिजर संबंधी नवीन शासन निर्णय एप्रिल, २०१८ मध्ये काढला. सन २०१६ मध्येदेखील शासन निर्णय काढलेला आहे. पंरतु अगोदर असा इश्यू होता की, जेबीबीने सर्व पेपर्स स्टेट कमिशनर, डब्ल्यूसीडीकडे पाठवावयाचा. तेथील उपायुक्त त्रुटी काढून ते परत पाठवीत होते. त्यामुळे पुढील प्रोसेस होण्यासाठी खूप वेळ लागत होता. त्या पद्धतीमध्ये बदल केलेला आहे. Now, there is no need to give any certificate to the Commissioner's office. यापूर्वी सीडब्ल्यूसीचा काहीच रोल नव्हता परंतु आता CWC is the quasi judicial body. तेच रिकमेंड करतील आणि त्यांना पाहिजे असेल तर पोलीस विभागाची मदत घेईल. डिव्हीजन ऑफीस. सहा डिव्हीजनमध्ये डिव्हीजन ऑफीस आहेत. ते सीडब्ल्यूसीला सर्टीफिकेट सादर करतील आणि सीडब्ल्यूसी सर्टीफिकेट त्या मुलांना देतील. If they refuse to give certificate then there is a provision of Appeal also at the Commissioner and secondly at the Government level. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक २.१.४.१० - बाल काळजी संस्थामध्ये अधीक्षकांची कमतरता

२.२० सदर परिच्छेदाबाबत ४४ पैकी ४३ अधीक्षकांची पदे २ ते ९ वर्षांच्या कालावधीसाठी रिक्त होती. अधिकारी नसल्यामुळे ही मुले बालगृहातून पळून जात आहेत. याबाबत विभागाने स्पष्टीकरण दिलेले आहे की, १४७ पदासंबंधीची निवड यादी प्राप्त झालेली आहे. हे सर्व रुजू झाले काय, आजची परिस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, बालगृहांमध्ये अधीक्षकांची वर्ग-२ ची एकूण २६ पदे आहेत. आजच्या स्थितीत ११ पदे कार्यरत आहेत तर १५ पदे रिक्त आहेत. गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये निवृत्त झाल्यामुळे ही पदे रिक्त झालेली आहेत. विभागाने एमपीएससीकडे ४५ पदे भरण्याबाबत मागणी केलेली आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

या ठिकाणी दिलेले उत्तर दोन वर्षांपूर्वीचे आहे. स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे की, १४७ पदासंबंधीची निवड यादी प्राप्त झालेली आहे. सदर उमेदवारांच्या चारित्र्य पडताळणी, वैद्यकीय तपासणी इत्याबाबत अहवाल मागविण्यात आलेला आहे. दोन वर्षांमध्ये या बाबींची पूर्तता झालेली नाही काय, त्यांची नेमणूक झाली नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, निवडयादीमध्ये १४५ आले त्यापैकी १५ पदे भरलेली आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

समितीला १४७ पदांची आकडेवारी सांगण्यात येते. मग ती पदे भरली का नाहीत ? अशी विचारणा समितीने केली असता, १४७ पदे ही केडर पोस्ट आहेत. डब्ल्यूसीडीची पोस्ट आहे. यामध्ये सीडीओ वर्ग-२ आणि अधीक्षक या दोन पदांचा समावेश आहे. एकच कॉमन पूल आहे. इथेही पोस्टींग होते आणि तेथेही पोस्टींग होते. विभागाकडे सीडीओंची फारच कमतरता आहे. ५५३ पैकी ४०० सीडीओ रुरलचे आणि ट्रायबलचे होते. १४७ ची जी लिस्ट आली त्यामध्ये सीडीओ प्राधान्याने ट्रायबल विभागात भरण्यात आले. एमपीएससीने जे १४७ उमेदवार निवडले ते सर्व भरले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१४७ पैकी त्यांनी आदिवासी विकास विभागाच्या बालगृहासाठी फक्त १०-१५ जण घेतले. बाकीचे सीडीओ म्हणजे तालुक्याचे बाल विकास अधिकारी जे पोषण आहार वगैरे बाबी पाहतात ती पदे त्यांनी भरली असे आदिवासी विकास विभागाचे म्हणणे आहे. मग महिला व बालविकास येथे १४७ ची आकडेवारी कशाला दाखवितो ? समितीला वाटले की, १४७ पदांसाठी उमदेवार मिळाल्यास महिला व बालविकास विभागाकडील सर्व पदे भरली जातील असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये १४७ केडर पोस्ट आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एकूण २६ पदांपैकी ११ पदे भरलेली आहेत. म्हणजे ४५ टक्के पदे भरली आहेत. ही रिक्त पदे केव्हा भरणार ? आपण ही पदे भरली नाहीत तर बालगृहातून मुले अशीच पळून जाणार आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाकडे जी १५ रिक्त आहेत. त्याबाबत ४५ पदांची मागणी केलेली आहे. ४५ पदे मिळाल्यानंतर १० पदे इथे देण्यात येतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या ठिकाणी १५ पदे रिक्त आहेत. १० पदे का भरण्यात येत आहेत. विभागाने ४५ ऐवजी ५० पदांची मागणी करावी असे समितीने सूचित केले असता, अन्य ठिकाणी देखील सीडीओंची पदे भरावयाची आहेत. हा एकच संवर्ग आहे. ही सेम पोस्ट आणि सेम केडर आहे. इथेही पोस्टींग होते आणि तिथेही पोस्टींग होते. सीडीपीओंची पदे भरुन सुद्धा ६० टक्के पदे भरलेली आहेत. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

Percentage should be equal at both the places. ६० टक्के तिकडे आणि ४० टक्के इकडे. विभागाने इकडे ६५ टक्के केले पाहिजे असे सूचित करून शासनाकडून टोटल पोस्टना सँक्शन मिळाली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता पोस्ट सँक्शनच आहेत परंतु, त्या भरलेल्या नाहीत. सँक्शन पोस्ट १४७ आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांनी केलेल्या शिफारशींवर विभागाने खूपच चांगले उत्तर दिलेले आहे. शिफारशी अशा होत्या की, सर्व बाल काळजी संस्थांसाठी भौतिक पायाभूत सुविधा वगैरे बाबींचा किमान दर्जा राखला जाईल आणि त्याचे काटेकोर पालन केले जावे. विधी संघर्षग्रस्त बालके योग्य प्रकारे वेगळी ठेवली जातील आणि बाल काळजी संस्थांमधील सुरक्षा बळकट करावी. मानसिकरित्या दुर्बल बालकांसाठी प्रशिक्षित कर्मचारी ठेवावेत. त्यावर आपण मानसिकदृष्ट्या दुर्बल बालकांसाठीची मतिमंद बालगृहे आपण सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग केली. इतर शिफारशींवर आपण काहीच उत्तर दिलेले नाही. ३ विषयांवर शिफारस असताना विभागाने केवळ एकाच विषयाचे उत्तर दिले आहे असे समितीने सूचित केले असता, व्हॅकंट पोस्टबाबत विभागाने सर्व माहिती दिलेली आहे. त्यामध्ये क्लास २ च्या २६ पोस्टची माहिती दिलेली आहे. क्लास ३ च्या १७ पैकी १५ पदे भरलेली आहेत ती माहितीही दिलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला ती माहिती प्राप्त झालेली नाही. यादी जोडलेली आहे असे नमूद आहे. मात्र यादी प्राप्त झालेली नाही. ही पदे लवकरात लवकर भरावी असे समितीने सूचित करून, एन.जी.ओं. च्या बालगृहांमध्येही मोठ्याप्रमाणात पदे रिक्त आहेत, विभाग त्यांना पदे भरण्याची परवानगी का देत नाही ? अशी विचारणा समितीने केली.

They are taking grants from the Government असे महालेखकारांन नमूद केले. खाजगी संस्थांमध्ये रिक्त असलेल्या पदांबाबत समितीने विभागाचे मत विचारले असता, नव्याने मान्यता देताना तेथील पदे भरलेली नसतील तर त्यांना मान्यताच द्यायची नाही, अशी सुरूवाती पासूनच काळजी घेण्यान येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने ज्यांना मान्यता दिलेली आहे, त्याबाबत विभागाचे काय मत आहे ? अशी विचारणा महालेखापालांनी केला असता, नवीन लिस्ट ज्या दिवशी प्रकाशित होईल त्या दिवशी सरसकट सर्वांची मान्यता रद्द होईल. त्यासाठी विभागाकडे जास्तीत जास्त १ महिन्याचा वेळ आहे. १ महिन्यामध्ये नवीन लिस्ट जाहीर करण्यात येणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

All these years, we have released grants to them when these institutions are headless असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता, ते हेडलेस नाहीत. जेवढे कर्मचारी त्यांना नियुक्त करायचे होते त्यांच्या पेक्षा कमी कर्मचाऱ्यांमध्ये त्यांनी काम केलेले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

This audit para is on the subject matter of Superintendant, who is the head of the institution. विभाग सी.डी.पी.ओ. व सुपरिटेंडंट लिंक करता. This compliance is not satisfactory असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता, This is the fact असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने त्यावर दुसरा काही तरी पर्याय काढला पाहिजे. You can employ on contract basis for 2 to 3 years till the appointment of regular person. You cannot keep these institution headless. कितीही सिक्युरिटी गार्ड डिप्लॉय केला, भिंतीची उंची कितीही वाढविली तरी ती मुले काही तेथे राहणार नाहीत, if there is no proper care in the institution असे मत महालेखापालांनी व्यक्त केले.

somebody must have been given with additional charge असे वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी सूचित केले असता, प्रत्येक संस्थेमध्ये अधीक्षकांच्या खाली सबऑर्डिनेट प्रोबेशन ऑफिसर आहेत. प्रोबेशन ऑफिसरना त्याचे ॲडिशनल चार्ज दिले आहेत. जेथे दोन संस्था जवळ आहेत तेथे शेजारच्या सुपरिटेंडंटकडे त्याचा ॲडिशनल चार्ज दिलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

This is not the way you are supposed to run these institution. You are having specific norms for this purpose. Each of these institution must have the Superintendant. त्या संस्थांच्या कॅपॅसिटीनुसारच तेथे सुपरिटेंडंट असावेत असे विभागाने ठरविले आहे ना ? असे महालेखापालांनी निदर्शनास आणले.

परिच्छेद क्रमांक २.१.५.१ सामाजिक लेखापरिक्षा न करणे

२.२१ सन २०११ ते सन २०१५ या कालावधीत सामाजिक लेखापरीक्षा करण्यातच आली नाही. विभागाने समिती घटीत केली परंतु, सन २०११ ते सन २०१५ या कालावधीत ९ पैकी एकाही जिल्ह्याची सामाजिक लेखापरीक्षा केली नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व हे सोशल ऑडिट करण्यात आले नाही. आता नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईट्स यांना सोशल ऑडिट करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यांच्या मार्फत आता मागचे व नवीन सोशल ऑडिट सुरू करण्यात आलेले आहे. मात्र त्या कालावधीत ९ जिल्ह्यांचे सोशल ऑडिट झालेले नाही हे खरे आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

केवळ ९ नाही तर इतर जिल्ह्यांचेही सोशल ऑडिट झालेले नाही. महालेखापालांनी फक्त ९ जिल्ह्यांचे ऑडिट केले असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी ते मान्य केले व इतर जिल्ह्यांचेही सोशल ऑडिट झालेले नाही. हे ऑब्झर्व्हेशन ९ जिल्ह्यांबाबत होते. मात्र हे खरे आहे की, त्या कालावधीमध्ये सोशल ऑडिट करण्यात आलेले नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सोशल ऑडिट का झाले नाही, त्याची कारणे काय आहेत ? याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यावेळेस ज्या समित्या स्थापन करावयाच्या होत्या त्या अपुरा स्टाफ व इतर कारणांमुळे केलेल्या नाहीत. मात्र हे खरे आहे की, सोशल ऑडिट केलेले नाही. नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईट्स यांना नेमण्यात आलेले आहे. त्यांच्या ॲकॅडेमी ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मार्फत आता सर्व ऑडिट करून घेण्यात येत आहे. हे सोशल ऑडिट आहे. हे काम सरसकट करण्याबाबत आम्ही सूचना केलेल्या आहेत. हे काम काही महिन्यांचा कालावधी लागेल कारण ते मोठे काम आहे. याबाबतचा अहवाल विभाग रिपोर्ट शासनाकडे सादर करीत असतो. This report is completely tabled असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक २.१.४.१० मध्ये नमूद केलेली रिक्त पदे विभागाने लवकरात लवकर भरण्याचा प्रयत्न करावा. तसेच, ज्या संस्थांनी पदे भरली नाहीत त्यांचे नूतनीकरण करण्यात येऊ नये अशाप्रकारची भूमिका घेतली पाहिजे. हा विषय गांभीर्याने घ्यावा असे समितीने सूचित केले त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

परिच्छेद क्रमांक २.१.५.२ बाल काळजी व संस्थाच्या निरिक्षणातील कमतरता

२.२२ चाईल्ड वेल्फेअर कमिटीच्या कामकाजाचे निरिक्षण करणे, याबाबतचा हा परिच्छेद आहे. चाईल्ड वेल्फेअर कमिटीच्या कामकाजाचे निरिक्षण करणे हे एक तर कलेक्टर लेव्हलवर व दुसरे म्हणजे कमिशनर लेव्हलवर अभिप्रेत असते. त्या कालावधीमध्ये जे कॉन्स्टंट मॉनिटरिंग अँड इव्हॅल्यूएशन करायचे होते तो रिपोर्ट उपलब्ध झालेला नाही. याबाबत सन २०१६ च्या शासन निर्णयानुसार त्याच्या सामाजिक लेखा परीक्षणाची कारवाई सुरू करण्यात आलेली आहे. आता विभागाने नियमसुद्धा ठरवलेला आहे की, प्रत्येक ३ महिन्यांमध्ये सी.डब्ल्यू.सी. आढावा बैठक घेतली जाईल, and it has to be submitted even to the High Court असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तसा निर्णय केला मात्र आतापर्यंत त्याची अंमलबजावणी केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सी.डब्ल्यू.सी. नवीन आलेली आहे, चेंज झालेली आहे. विभागाकडून आता मागच्यांचे कम्पायलेशन करण्यात येत आहे. नवीनचे दर ३ महिन्यांनी कम्पायलेशन करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जिल्हाधिकाऱ्यांची जिल्हास्तरिय समिती यांचा आढावा घेत नाही काय ? त्यांची व्हिजीट झाली पाहिजे, त्यांनी निरीक्षण केले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, सी.डब्ल्यू.सी. क्वासी ज्युडिशिअल बॉडी असल्यामुळे त्यांचे निर्णय व अपील जिल्हाधिकाऱ्याकडे आहे. परंतु, कलेक्टर त्यांच्या निर्णयामध्ये जास्तीत जास्त हस्तक्षेप करीत नाहीत. व्हिजटिबाबत त्याबाबत त्यांना स्पष्ट सूचना व कल्पना देण्यात आली आहे. आता आयुक्त कार्यालय व महिला व बालविकास विभागाच्या स्तरावर सी.डब्ल्यू.सी.ची रिव्ह्यू मिटिंग घेण्याचा आणि कॉन्स्टंट ट्रेनिंग अँड इंटरअॅक्शन घेण्याचा प्रकार विभागाने सुरू केलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हा सल्लागार समित्यांचे काम कसे चालते, त्यामध्ये कोण असते ? अशी विचारणा समितीने केली असता, जुन्या नियमानुसार प्रत्येक जिल्ह्याला जिल्हा सल्लागार समिती स्थापन करण्याची तरतूद होती. त्यामध्ये जिल्हाधिकारी समाजसेवकांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करीत होते. तसेच, दोन सदस्यांची नियुक्ती करीत होते. ते त्या जिल्ह्यातील बालविकासशी संबंधित संस्थांना व्हिजीट करून त्यांच्या कामकाजामध्ये सुधारणा करण्याबाबतचे अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना व जिल्हा महिला बालविकास अधिकाऱ्यांना सादर करीत होते. नवीन नियमामध्ये राज्यस्तरिय सल्लागार समिती व जिल्हास्तरिय सल्लागार समितीची तरतूद नाही. आता राज्य तपासणी समिती व जिल्हा तपासणी समिती केलेली आहे. जिल्हा तपासणी समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांनी २ सोशलवर्कर नेमायचे आहेत. त्याप्रमाणे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना डी.ओ. देऊन विनंती केलेली आहे. जुन्या समितीमध्ये जिल्हाधिकारी नव्हते नवीन समितीमध्ये जिल्हाधिकारी आहेत. राज्य तपासणी समितीसाठी विभागाने जाहीरात देऊन अर्ज मागविले आहेत. त्याची शेवटची तारीख १५ आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

जिल्हास्तरिय समितीबाबत काय केले जाते ? अशी विचारणा समितीने केली असता, जिल्हास्तरीय समितीचे काम जिल्हाधिकारी त्यांच्या स्तरावर करतात. बऱ्याचशा जिल्ह्यांमध्ये आता त्याची कारवाई सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अशी समिती प्रत्येक ठिकाणी फॉर्म झाली पाहिजे. कांदिवली उपनगर जिल्ह्यामध्ये ही चाईल्ड वेल्फेअर कमिटी फॉर्म झाली आहे काय, असे वाटते की ती फॉर्म झालेली नाही. त्यामध्ये नगरसेवकांना घ्यायचे होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, होय, ती ३ महिन्यांपूर्वी फॉर्म झाली आहे. त्यामध्ये नगरसेवकांना घेण्यात येत नाही. बालकल्याण समितीवर ५ समाजसेवक घेतात. त्याची जाहिरात देण्यात येते. सेवानिवृत्त जज यांच्या अध्यक्षतेखाली विभागाची राज्यस्तरिय समिती आहे. ती समिती त्यांची मुलाखत घेते व त्यांच्यातून निवड करते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

५ लोकांची आयडियल समिती असते. त्यामध्ये लॉयर, डॉक्टर्स, सोशल रिप्रेझेंटेटिव्हज, समाज कल्याण क्षेत्रातील लोक असतात. ३० जिल्ह्यांमध्ये सी.डब्ल्यू.सी. स्थापन झालेली आहे. परंतु, काही ठिकाणी विभागाला पूर्ण ५ लोक मिळालेले नाहीत. त्याची परत जाहिरात काढलेली आहे व उर्वरित ६ जिल्ह्यांसाठीही आता जाहिरात व मुलाखतीची प्रोसेस सुरू आहे. ५ लोकांना घेण्याची तरतूद असून आज प्रत्येक ठिकाणी ३ किंवा ४ लोकांवर सी.डब्ल्यू.सी.सुरू आहे. त्यांचे जाहिरात व अॅडमिशनचे कंटिन्यूअस प्रोसेस सुरू केलेले आहे. यामध्ये अगोदर विभागाला लोक सापडत नव्हते. आता नियमामध्ये बदल करून त्यांचा भत्ता वाढविलेला आहे. आता त्यांना पर सिटिंग, पर मिटिंगसाठी १५०० रुपये देण्यात येतात. लहान जिल्ह्यामध्ये दर आठवड्याला किमान २ बैठका आणि मुंबईसारख्या ठिकाणी तर त्यांनी नियमीत बैठक घेतली पाहिजे. कारण प्रत्येक वेळेस नवनवीन केसेस येत असतात. सी.डब्ल्यू.सी.ला बैठका घ्याव्याच लागतात. त्यासाठी मुंबईमध्ये २ व इतर जिल्ह्यांमध्ये १-१ समिती स्थापन केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही समिती जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली असते काय ? अशी विचारणा समितीने केली असता ही समिती जिल्हाधिकाऱ्यांचा अध्यक्षतेखाली नसते. डिस्ट्रिक्ट लेव्हलवर मूल्यमापन आहे त्यामध्ये कलेक्टर व सोशलवर्कर यांची समिती आहे व त्यांनीच नेमायचे आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जिल्हास्तरिय सी.डब्ल्यू.सी. मध्ये ५ सदस्य आहेत. सोशलवर्कर हे त्याचे अध्यक्ष आहेत. जिल्हाधिकारी हे रिव्ह्यूईंग ऑथॉरिटी आहेत. सी.डब्ल्यू.सी.चा रिव्ह्यू घेण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जिल्हा समितीला ऑनररीअम काम करावे लागते की, त्यांना काही भत्ता वगैरे दिला जातो ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांना पर सिटिंग १५०० रुपये देण्यात येतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जिल्हा समिती म्हणजेच तपासणी समिती नसून जिल्हास्तरिय बालकल्याण समिती वेगळी आहे. जिल्हा तपासणी समिती वेगळी आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

जिल्हास्तरीय बालकल्याण समिती व जिल्हा तपासणी समिती या दोघांचे काम कोणते आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, जिल्हा तपासणी ही सर्व बालगृहांची तपासणी करून शिफारस करणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

तपासणी समितीचे अध्यक्ष कोण आहेत, बालकल्याण समितीचे अध्यक्ष कोण आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, जिल्हाधिकारी हे तपासणी समितीचे अध्यक्ष आहेत. बालकल्याण समितीचे अध्यक्ष हे सोशलवर्कर आहेत. ते क्वासी ज्युडिशिअल आहेत. महिन्यातून २० बैठका आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्यांनी किती वेळ काम करायचे आहे ? तपासणी समिती व सल्लागार समिती अशा २ समित्या आहेत ना ? अशी विचारणा समितीने केली असता, आता नवीन नियमानुसार सल्लागार समिती नाही. बालकल्याण समिती आहे. बालकल्याण समिती ही मुलांशी संबंधित निर्णय घेते व तिचे अध्यक्ष सोशलवर्कर असतात असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

तपासणी समितीचे अध्यक्ष हे जिल्हाधिकारी असतात. बालकल्याण समितीचे फक्त रिव्ह्यू करण्याचे अधिकार हे जिल्हाधिकाऱ्यांना आहेत, ना ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

या बालकल्याण समितीनेही महिन्यातून २० वेळा बैठका घेतल्या पाहिजेत काय, त्यामध्ये त्यांनी काय-काय काम करणे अपेक्षित आहे ? अशी विचारणा समितीने केली असता बालकल्याण समितीने २० बैठका घेतल्या पाहिजेत. त्यांनी बालसुधारगृहातील सर्व मुलांचे ॲडमिशन, मुलांच्या संदर्भातील सर्व निर्णय घेण्याचे अधिकार बालकल्याण समितीला आहेत. ॲडॉप्शनसाठी मुलांना फ्री करणे. मुलांना पालकांच्या ताब्यात देणे, वगैरे त्यांची कामे आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सी.डब्ल्यू.सी.कडे मुलांचे सर्व निर्णय आहेत जसे की, नवीन ॲडमिशन, रिलिज ऑर्डर, ॲडॉप्शनसाठी मुलांना फ्री करणे, होम व्हिजीटसाठी टिम पाठविणे, तपासणी करणे आणि काही ठिकाणी व्हिजीटिंगसाठी येणाऱ्या मुलांना परवानगी देणे हे सर्व काम सी.डब्ल्यू.सी. चे आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने सर्व जिल्ह्यांमध्ये या सर्व समित्यांची स्थापना केली आहे काय ? बालकल्याण समिती सर्व जिल्ह्यांमध्ये स्थापन झाली आहे काय, बाल तपासणी समिती सर्व जिल्ह्यांमध्ये स्थापन झाली आहे काय, राज्यस्तरिय समिती स्थापन झाली आहे काय, याबाबत थोडक्यात माहिती देण्याबाबत समितीने सूचित केले असता, ३१ जिल्ह्यांमध्ये नवीन सी.डब्ल्यू.सी. झालेली आहे. इतर जिल्ह्यांची जाहिरात सुरू आहे. तेथे जुन्यांना समित्या पुढे सुरू ठेवल्या आहे. सी.डब्ल्यू.सी. अस्तित्वात आहे परंतु, त्यांचे नवीनसाठी ऑलरेडी इंटरव्ह्यू सुरू आहेत. तेथे नवीन येणार आहेत. तपासणी समितीबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी जाहिरात दिलेली आहे आणि १ महिन्यांमध्ये सर्वच्या सर्व गठीत होतील. राज्यस्तरीय कमिटीची जस्टिस रुहींकडे ऑलरेडी मागणी केलेली आहे. ते नाव देत आहेत. नावे आल्यानंतर राज्य स्तरीय समितीही स्थापन होईल. रिटायर्ड जस्टीस रुही हे सिलेक्शन कमिटीचे अध्यक्ष आहेत. स्टॅटयुटरी प्रोव्हीजन अशी आहे की, एक रिटायर्ड हायकोर्ट जज असले पाहिजेत व त्यांची नेमणूक मुख्यमंत्री महोदय करतात अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

जिल्हास्तरिय बालहक्क समिती यामध्ये सोशलवर्करची व्याख्या काय केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांची अर्हता दिलेली आहे. समाजसेवक सदस्याचे वय ३५ वर्षांहून कमी नसेल. त्याला शिक्षण, आरोग्य व कल्याण कार्याच्या क्षेत्रातील बालकांसोबत काम करण्याचा किमान ७ वर्षांचा अनुभव असेल. तसेच, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र किंवा मानसशास्त्रामध्ये पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.बी.एस. किंवा कायद्यातील पदवी अशी शैक्षणिक अर्हता असेल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अशा अर्हतेचे लोक मिळतात काय, त्यावर सदस्य कोण असतात ? अशी विचारणा समितीने केली असता, अशा अर्हतेचे लोक मिळतात व पाचही सदस्यांसाठी सारखीच पात्रता आवश्यक आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक : २.१.५.३ - बालकल्याण समित्यांच्या कामाचे मूल्यमापण न होणे.

२.२३ बालकल्याण समित्यांच्या कामाकाजाचे मूल्यमापन न होणे. याबाबत माहिती देताना बालकल्याण समित्यांच्या मूल्यमापनाबाबत आम्ही सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करीत आहोत. सी.डब्ल्यू.सी.ने जे क्वार्टरली रिपोर्ट सबमिट करावयाचे आहेत त्याची टाईमफ्रेम ठरवून दिलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने दिलेल्या माहितीतील दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र शासनाची या अधिनियमांतर्गत स्वतंत्र नियमावली कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू असून सदर कार्यवाही पूर्ण होताच त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येईल असे नमूद केल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, दिनांक १६ मे २०१८ रोजी कळविलेले आहे. त्या आधी फेब्रुवारी महिन्यातही डी.ओ. दिलेले आहेत. विभागाकडे त्याच्या कॉपीज देखील आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना डी.ओ. दिलेले आहेत. विभागीय आयुक्तांनाही डी.ओ. दिलेले आहेत की, त्यांना याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचित करावे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

बालगृहाच्या कामकाजाचे सनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी शासनाने सुनिश्चिती करावी असे म्हटले होते. यावर माहितीतील शेवटच्या परिच्छेदामध्ये असे नमूद केले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामध्ये सामाजिक लेखा परीक्षण करण्यासाठी खालील समितीची संरचना केलेली आहे. दिनांक २७ एप्रिल २०१६ रोजी आपण लेखा परीक्षण समिती नेमलेली आहे. त्यांच्या या २ वर्षांमध्ये किती बैठका झाल्या आहेत ? सर्व अपॉईंटमेंट झाली का ? अशी विचारणा समितीने केली असता, याची एक बैठक झाली. या समितीमध्ये प्रधान सचिव अध्यक्ष आहेत, कार्यक्रम व्यवस्थापक आय.सी.पी.एस. चे सदस्य आहेत, नीपसिडचे प्रतिनिधी किंवा राज्य समाज कल्याण मंडळाचे प्रतिनिधी सदस्य आहेत. स्वयंसेवी संस्था व चाईल्ड लाईन फाऊंडेशनचे प्रतिनिधी आहेत. त्यामध्ये विभागाने युनिसेफला प्रतिनिधी म्हणून घेतले आहे. मानसिक आरोग्य तज्ज्ञ आहेत. डॉ.अजिज अहमद काद्री, मानसोपचार तज्ज्ञ हे त्याचे सदस्य आहेत. आपण त्यामध्ये स्नेहालय व माय होम इंडिया अशा २ स्वयंसेवी संस्था घेतल्या आहेत. आयुक्त, महिला व बालविकास हे या समितीचे सदस्य सचिव आहेत. त्या समितीची एक बैठक झाली त्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेमध्ये असे ठरले की, महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र शासनाचे नवीन बालन्याय नियम तयार करीत आहे. त्या नवीन नियमांमध्ये लेखा परीक्षणाबाबत शासनाच्या नियमामध्ये जी काही तरतूद असेल त्यानुसार सामाजिक लेखा परीक्षण करायचे. मार्च, २०१८ मध्ये विभागाचे नवीन नियम आलेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०१६ मध्ये समिती स्थापन केली तर, सन २०१८ मध्ये नियम तयार केले. आता याच्या पुढचे म्हणजे तपासणी करण्याचे काम सुरू केले पाहिजे. अशीच वर्षे जात राहिली तर काम काय करणार ? अशी विचारणा समितीने केली असता, एन.सी.पी.सी.आर. ला हे काम देण्यात आलेले आहे. त्यांनी काम सुरू सुद्धा केलेले आहे. ते बॅकवर्ड व आता सन २०१८ पर्यंतचे सर्व इव्हॅल्युएशन यामध्ये करत आहे. रिपोर्ट आल्यानंतर विभाग तो रिपोर्ट सादर करणार आहे. हे काम ऑलरेडी सुरू झालेले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

निष्कर्षावरील अभिप्रायामध्ये असे नमूद केले आहे की, राज्यातील संस्थांची संख्या जास्त असल्यामुळे विभागाकडून पुरवणी मागणीद्वारे निधीची मागणी करण्यात येत आहे. परंतु, निधी उपलब्ध होत नाही म्हणून ही साधनसामग्री उपलब्ध करता येत नाही. It is mandatory that you should arrange the funds for this work. कोणत्याही परिस्थितीमध्ये ज्याप्रकारे शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन देणे आपल्याला बंधनकारक आहे, त्याच प्रकारे या सर्व मुलांची काळजी घेण्यासाठी आवश्यक खर्च कोणत्याही परिस्थितीमध्ये विभागाला उपलब्ध करून दिला पाहिजे, अशी समितीची भूमिका असल्याचे समितीस नमूद केले.

केंद्र शासनाने आदर्श नियमावली तयार केली असून, प्रवेश देताना आहार, कपडे, बाडबिस्तरा, भौतिक सुविधांचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. परंतु, महाराष्ट्र राज्यामध्ये निकष तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे म्हणजे नेमकी कोणती व कशाप्रकारे कार्यवाही सुरू आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, निकष निश्चित करण्याचे काम पूर्ण झालेले असून, ते प्रसिद्ध देखील करण्यात आले आहेत. सन २०१५ रोजीचा नियम होता. त्या नियमामध्ये पुरशा सुविधा घ्याव्यात, अशी नियमावली होती. मिनिमम क्वॉंटिटी ऑफ फुड यासंदर्भातील निकषामध्ये सर्व व्याख्या दिलेली आहे. त्या अनुषंगाने पालन करणे गरजेचे आहे. आता विभाग कोणाच्या मनावर किंवा कोणाच्या अभिप्रायावर अवलंबून राहिलेला नाही. नियम तयार करून ते सभागृहास सादर केले आहेत आणि सभागृहाची मान्यता घेऊन त्याची अंमलबजावणी सुरू केलेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

शासनाने बाल नियम प्रसिद्ध केल्याचे सांगण्यात आले आहे. बाल न्याय अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसारर राज्य शासनाने नियम करण्याबाबतची कार्यवाही सुरू केलेली आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, ते काम पूर्ण झालेले असून, प्रसिद्ध केलेले आहे. नोव्हेंबर महिन्यात नियमांचे प्रारुप तयार करण्यात आले आहेत. फेब्रुवारीपर्यंत ते नेटवर उपलब्ध होते. मार्च महिन्यापर्यंत ते अंतिम केलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्र. २.१.६ निष्कर्ष

२.२४ सदर परिच्छेदात नमूद केले आहे की, राज्यामध्ये संस्थांची संख्या जास्त असल्याने शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध झालेला नाही. शासनाची याबाबतची सध्याची भूमिका काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, आज विभागाकडे निधीची अडचण नाही. दिनांक १ एप्रिल ते सप्टेंबर महिन्यापर्यंतचे सर्व बिल पे करूनही आज विभागाकडे २३ कोटी रुपये अर्थसंकल्प विवरण प्रणालीवा (B.D.S.) उपलब्ध आहेत. बालगृहांमध्ये १८ ते १९ हजार मूले आहेत. ही परिस्थिती दर आठवड्याला बदलत असते. त्यांच्यासाठी विभागाकडे मार्चपर्यंत २८ कोटी रुपये आहेत. या आर्थिक वर्षामध्ये हा विषय विभागासमोर येईल असे वाटत नाही. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

प्रवेशितांना पुरविण्यात येणारा आहार, कपडे, बाडबिस्तर, भौतिक सुविधा इत्यादी बाबत निकष निश्चित करण्यात येत आहे, असे विभागीय सचिवांनी म्हटले होते. ते निकष निश्चित करण्यात आले आहेत काय ? त्या निकषांची प्रत समितीला द्यावी. केंद्र शासनाने बाल न्याय नियम प्रसिद्ध केले आहेत तसेच बाल न्याय अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाची नियम करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे, असे माहितीमध्ये नमूद केले आहे, याबाबत माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी विभागाने विधानसभेसमोर नियम ठेवून ते अंतिम केलेले आहेत. ते कार्यान्वित झालेले आहेत. त्याच्याच अनुषंगाने विभागाने सर्व अर्ज मागविलेले आहेत. ज्यांच्याकडे या सुविधा नाहीत त्यांना शासन बालगृह चालविण्यास अनुमती देणार नाही. बाल न्याय अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाची नियम करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. ते नियम डिक्लेअर झालेले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले. (विभागाकडून प्राप्त झालेली परिपत्रक, आदेश इ. विवरण क्र. १ मध्ये समाविष्ट केली.)

अभिप्राय व शिफारशी

परिच्छेद क्र. २.१ महाराष्ट्रातील बाल काळजी संस्थांचे कामकाज

परिच्छेद क्र. २.१.२.१ :- अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये घट

अभिप्राय

३.१ सन २०१०-२०१५ दरम्यान आयुक्त, महिला व बाल विकास यांनी मागणी केलेल्या एकूण रु. ७८१.६ कोटी ऐवजी फक्त रु. ५९५.६६ कोटींची (७६%) तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली. परिणामी, स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविल्या जाणाऱ्या ७०५ बाल काळजी संस्थांमधील ७९,१५२ लाभार्थ्यांची गरज भागविण्यासाठी द्यावयाच्या निधीत मार्च, २०१५ अखेरीस रु. १५६.४५ कोटीची संचित तूट होती. तसेच, निवड केलेल्या नऊ जिल्ह्यांपैकी चार जिल्ह्यांमध्ये स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविल्या जाणाऱ्या ३३४ बाल काळजी संस्थांना देय असलेल्या रक्कमेत रु. ३४.२८ कोटींची तूट होती. उक्त चार जिल्ह्यांपैकी सन २०१०-२०१५ दरम्यान उस्मानाबाद जिल्ह्यासाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद सर्वात कमी म्हणजे ५१% इतकी होती. सन २०१४-१५ मध्ये तर परिस्थिती अधिकच भयावह होऊन मागणी केलेल्या रु. १९७.६४ कोटी ऐवजी फक्त रु. ८६.७ कोटीची (४४%) तरतूद करण्यात आली होती. उक्त वर्षी महिला व बाल विकास विभागाने सुकन्या, मनोधैर्य यासारख्या नविन योजनांची सुरूवात केल्यामुळे तसेच एकात्मिक बालविकास योजनेच्या बळकटीमुळे ही परिस्थिती उद्‌भवल्याचे महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

उक्त आक्षेपाच्या अनुषंगाने विभागाने आपल्या खुलाश्यात नमूद केले आहे की, राज्यांमध्ये एकूण ९६३ बालगृहे ही अनुदानित असून या संस्थांना शासनामार्फत सहायक अनुदान वितरित करण्यात येते. राज्यात संस्थांची संख्या जास्त असल्यामुळे विभागाने केलेल्या मागणीनुसार शासनाकडून अनुदान प्राप्त होत नाही. विभागाकडून सादर करण्यात येणाऱ्या पुरवणी मागण्यादेखील मंजूर होत नाहीत. त्यामुळे दरवर्षी प्रलंबित अनुदानाच्या रकमेत वाढ होत आहे. विभागाच्या मागणीनुसार तरतूद उपलब्ध होत नसल्याने शासनाकडून प्राप्त झालेला निधी आणि जिल्हास्तरावरुन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी केलेली मागणी याचा विचार करून समप्रमाणात जिल्हा स्तरावर निधी वितरित करण्यात येतो. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये संस्थांची संख्या जास्त असल्याने जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी केलेली मागणी व प्राप्त निधी यानुसारच उस्मानाबाद जिल्ह्यासाठी अनुदान वितरित करण्यात आले आहे.

साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी समितीस असे कथन केले की, सन २०१० ते २०१५ या कालावधीत उक्त प्रयोजनार्थ विभागाने मागणी केलेल्या निधीच्या तुलनेत शासनाकडून अर्थसंकल्पामध्ये निधीची अपुरी तरतूद करण्यात आल्यामुळे उक्त कालावधीत बालगृहांच्या थकीत अनुदानाचे प्रमाण खूप वाढले. या विषयासंदर्भात औरंगाबाद उच्च न्यायालयात न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यानंतर वित्त विभागामार्फत एक विशेष मोहिम हाती घेऊन बहुविभागीय चौकशी करण्यात आली होती. उक्त चौकशीकामी एकूण ११५३ बालगृहांपैकी १९२ बालगृहांनी संबंधित कागदपत्रे चौकशी समितीस सादर केली होती. समितीस चौकशीदरम्यान याप्रकरणी काही प्रमाणात तफावत आढळून आली होती. उक्त प्रकरणी समितीने चौकशी करून आपला अहवाल सादर केला होता. समितीच्या उक्त अहवालाच्या अनुषंगाने वित्त मंत्री महोदयांकडे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे उक्त सन २०१० ते २०१५ या कालावधीतील रुपये १५६ कोटींची सर्व देयके नाकारण्यात आलेली आहेत. सन २०१६-२०१७ पासून नियमित प्रदाने सुरू आहेत.

ही बाब आयुक्तालयाने मान्य केली आहे काय, अशी समितीने पृच्छा केली असता, समितीस असे अवगत करण्यात आले की, कोणत्याही बालगृहात मुलांना थेट प्रवेश मिळत नाही. ज्या बालकांना काळजी आणि संरक्षणाची गरज असते अशा बालकांना बाल कल्याण समितीसमोर हजर केले जाते. बाल कल्याण समितीच्या निर्णयानुसार बालकांना बालसुधारगृहात प्रवेश दिला जातो. ज्या बालकासंदर्भात देयके सादर करण्यात आली आहेत, त्या बालकांना बाल कल्याण समितीच्या आदेशान्वयेच बालगृहामध्ये दाखल करण्यात आलेले होते. तथापि, बालगृहांची तपासणी केली असता बालगृहांमध्ये नियमानुसार बालकांना सोयी-सुविधा उपलब्ध करून दिलेल्या नव्हत्या. त्यामुळे या बालगृहासंबंधी सर्व कागदपत्रे चौकशी समितीसमोर सादर करण्यास त्यांना सूचित करण्यात आले होते. तथापि, संबंधित बालगृहांचे प्रमुख चौकशी समितीकडे कोणतीही कागदपत्रे सादर करू शकले नाहीत, तसेच उपलब्ध अनुदान / देणगी व बालगृहाला झालेला खर्च याबाबतची देखील कोणतीही माहिती देऊ शकले नाही. वित्त विभागाकडून प्राप्त झालेला निधी संबंधित बालगृहांस वितरित करतेवेळी विभागाने बालगृहांची तपासणी तसेच त्यामधील मुलांची

संख्या निश्चिती इत्यादी बाबतीत चौकशी केली होती काय, तसेच जो निधी वितरित करण्यात आलेला आहे, त्यामध्ये सुद्धा अशाच प्रकारची अनियमितता झाली आहे किंवा कसे, याबाबतच्या तपासणीसंदर्भात समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी असे निदर्शनास आणून दिले की, सन २०१०-२०१५ या कालावधीकरीता एकूण रु.१९१ कोटी इतकी थकबाकी होती. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार बालगृहांना रु.४१ कोटी इतके अंशतः भुगतान (Part Payment) करण्यात आले. तथापि, संबंधित बालगृहांकडून आवश्यक ती माहिती व कागदपत्रे सादर न केली गेल्याने अदा करण्यात आलेली उपरोक्त रक्कमसुद्धा आता वसूल करावी लागणार असून त्यासंदर्भातील कार्यवाही सुरू केली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

त्यावर बालगृहांची रु.१९१ कोटी रुपयांची शासनाकडे थकबाकी होती, ही बाब खरी नाही, असे विभागाचे मत आहे का, अशी समितीने विचारणा केली असता, बालगृहांनी मुलांचा सांभाळ केलेला आहे, मात्र त्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविलेल्या नाहीत तसेच बालकांना निकृष्ट दर्जाचे जेवण दिले असून त्यांना गणवेश देखील दिलेला नाही, असे समितीस सांगण्यात आले. सदरहू परिच्छेद हा आयुक्तांनी शासनाकडे मागणी केलेल्या रकमेवर आधारित असून आयुक्तांनी केलेली मागणी ही योग्य वा रास्त नव्हती काय, अशी समितीने आणखी पुढे पृच्छा केली असता, आयुक्तांनी केलेली मागणी ही बाल कल्याण समितीने शिफारस केलेल्या बालकांच्या संख्येवर आधारित असून त्यादृष्टीने ती योग्य होती. बालगृहांमधील असलेल्या मुलांची संख्या गुणिले निकष यांच्या आधारावर ही मागणी केली जाते. बालगृहांमध्ये प्रत्यक्ष सुविधा आवश्यक त्या निकषापेक्षा कमी असल्याने देयके नाकारली गेली आहेत, असे समितीस अवगत करण्यात आले.

समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, ज्या बालगृहांची देयके नामंजूर करण्यात आली त्या स्वयंसेवी संस्थांद्वारे रु.२० हजारांपेक्षा जास्त रकमेच्या देणग्या रोख स्वरुपात स्विकारलेल्या आहेत. ही बाब नियमानुकूल नाही. तसेच उक्त स्वयंसेवी संस्थांच्या बँक खाते व इतर खर्चांचा ताळमेळ जुळलेला नाही. उक्त स्वयंसेवी संस्थांचा कारभार योग्य नसल्याने व बालगृहासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे ते सादर करू न शकणे या कारणांस्तव देखील त्यांची देयके नामंजूर झालेली आहेत.

विभागाने सन २०१० ते २०१५ या कालावधीसाठी रु.७८१.०६ कोटी इतक्या निधीची मागणी केली असता, शासनाकडून फक्त रु. ५९५.६६ इतक्या निधीची तरतूद करण्यात आली. सन २०१४-२०१५ मध्ये तर विभागाने शासनाकडे मागणी केलेल्या रु. १९७.६४ कोटीपैकी फक्त रु.८६.०७ कोटींची अत्यल्प तरतूद करण्यात आली, म्हणजेच मागणी केलेल्या रकमेपैकी फक्त ४४% इतकी अल्प तरतूद उपलब्ध करून देण्यात आली.

वास्तविक, सदरहू निधीची शासनाकडे मागणी करण्यापूर्वीच विभागाने क्षेत्रीय स्तरावरुन बालगृहातील मुलांची अचूक संख्या निश्चिती व इतर तदनुषंगिक तपासणी करूनच त्यावर आधारित योग्य अशा निधीची मागणी करणे आवश्यक होते. तत्कालीन आयुक्तांनी शासनाकडे कोणतीही छाननी व तपासणी न करताच रक्कमेची मागणी केलेली आहे. मात्र शासन स्तरावरील तपासणीत ही देयके नाकारण्यात आलेली आहेत. योग्य छाननी अंती जर निधीची मागणी करण्यात आली असती तर विभागास उपलब्ध करून देण्यात आलेली रक्कम आणखी कमी होऊ शकली असती, असे मत प्रदर्शित करून सन २०१६ या वर्षापासून निधीची अर्थसंकल्पीय मागणी योग्य प्रकारे करण्यासाठी विभागाकडे काय व्यवस्था आहे, अशी समितीने पुढे विचारणा केली असता, विभागाने राज्यातील एकूण १,१५३ बालगृहांपैकी तपासणीअंती २१६ बालगृहे बंद केलेली आहेत. यापूर्वी सुमारे ९५ हजार मुले बालगृहामध्ये होती ती संख्या तपासणीदरम्यान १७ हजारांवर आली. सद्यःस्थितीत बालगृहांमध्ये एकूण २१ हजार मुले असल्याचे समितीस सांगण्यात आले. समितीच्या पुढे असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, सर्व बालगृहांमध्ये बायोमॅट्रिक यंत्रप्रणाली, मुलांचा आधार क्रमांक व ओळख (Identification) अनिवार्य करण्यात आले असून सद्यःस्थितीत सदरहू यंत्रणा कार्यान्वित आहे. ज्या बालगृहांमध्ये बायोमॅट्रिक यंत्रप्रणाली कार्यान्वित असल्याची खात्री पटत नाही तोपर्यंत त्या बालगृहांची देयके स्विकारली जात नाहीत, असे शासनाचे धोरण अस्तित्वात असून यासंदर्भात नव्याने शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

तसेच समितीने केलेल्या सूचनेनुसार बालगृहांमधील बालकांची संख्या तपासणीप्रसंगी बाल कल्याण समितीमधील सदस्यांसमवेत त्या-त्या भागातील प्रतिष्ठीत व्यक्तींना देखील सामावून घेण्यात येईल, असे समितीस आश्वस्त करण्यात आले.

शिफारस

३.२ आजचा बालक उद्याचा नागरिक होणार असल्याने देशाच्या भवितव्यासाठी बालकांचे संगोपन योग्यरित्या होणे आवश्यक आहे. नेमक्या याच विचाराने समाजातील ० ते १८ वयोगटातील अनाथ, निराश्रित, बेघर व वाममार्गाला लागण्याच्या सीमेवर असलेल्या बालकांचे कौटुंबिक वातावरणात संगोपन करणे, त्यांना योग्य संरक्षण व शिक्षण देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून भावी आयुष्यात जबाबदार नागरिक बनविण्याच्या स्तुत्य हेतूने त्यांना बालगृहात दाखल केले जाते. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत राज्यात महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत बालकांच्या शासकीय व अनुदानित स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समित्यांमार्फत संस्थेत प्रवेश दिल्यानंतर प्रवेशितांना संस्थेतील वास्तव्याच्या कालावधीमध्ये अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय मदत, शिक्षण व प्रशिक्षणाच्या सुविधा पुरवून त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला जातो.

३.३ सन २०१०-२०१५ दरम्यान आयुक्त, महिला व बालविकास विभाग यांनी शासनाकडे केलेल्या मागणी पैकी केवळ ७६% निधी शासनाने अर्थसंकल्पित केला. महालेखापरिक्षकांनी घेतलेल्या आक्षेपात ७८१.६ कोटी ऐवजी शासनाने फक्त ५९५.६६ कोटी रुपयांची तरतूद केल्यामुळे सदरहू योजनेत १५६.४५ कोटींची संचित तूट होती. अहवाल कालावधीमध्ये सदरहू योजनेवर कमी अर्थसंकल्पीय तरतूद केल्यामुळे योजनेची अंमलबजावणी प्रभावित झाली. सदर कालावधीत ९६३ अनुदानित बालगृहे असतांना या संख्येच्या आधारे विभागाने केलेल्या मागणीनुसार अनुदान प्राप्त झाले नसल्याचा खुलासा विभागाने समितीकडे केला आहे. विभागाने काही वेळेस इतर योजनेतील शिल्लक तरतूद समायोजनाने उपलब्ध करून देऊन सदर योजनेवरील खर्च भागविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३.४ थकित अनुदानासंदर्भात प्रकरण ज्यावेळी औरंगाबाद उच्च न्यायालयात गेलं त्यावेळी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वित्त विभागाने थकित अनुदानासंदर्भात विशेष मोहिम हाती घेऊन याबाबत बहुविभागीय चौकशी केली. सन २०१० ते २०१५ या कालावधीत एकूण १,१५३ बालगृहांमध्ये सुमारे ९५ हजार बालके सदर योजनेचा लाभ घेत होती. तपासणी दरम्यान ज्या बालकांना स्वतःचे घर आहे अशा बालकांना देखील बालगृहांमध्ये प्रवेश देण्यात आलेला होता व अशा बालकांची संख्या खूपच मोठी होती. विभागाने तपासणी दरम्यान प्रत्येक बालक निहाय प्रकरणाची ज्यावेळी छाननी केली त्यावेळी केवळ १७ हजार बालकेच बालगृहांत ठेवण्याकरिता अर्हताप्राप्त असल्याचे आढळले. उर्वरित सर्व बालकांना त्यांच्या पालकांकडे सुपूर्द करण्यात आले. सद्यःस्थितीत बालगृहांमध्ये एकूण २१ हजार बालके असल्याचे साक्षी दरम्यान समितीस विदित केले. याचा अर्थ सुमारे ७५ हजारांहून अधिक बोगस किंवा अपात्र बालकांची नोंद या बालगृहांमध्ये करण्यात येऊन शासनाच्या कोट्यावधी रुपयांचा अनावश्यक बाबींवर अनाठायी खर्च करण्यात आला. यासंदर्भात समितीच्या भावना अतिशय तीव्र आहेत. काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांबाबत संस्था प्रवेशाबाबतचा निर्णय घेताना अधिनियमाला अभिप्रेत असलेली बालगृहांची संकल्पना आणि बाल न्याय कार्यक्रमांतर्गत आलेल्या बालकांचे पुनर्वसन आणि सामाजिक पुनःस्थापन याची गरज या बाबींकडे पूर्णतः जाणते अजाणतेपणे बाल कल्याण समित्यांनी दुर्लक्ष केल्याचे समितीच्या निदर्शनास येते. बाल कल्याण समित्यांच्या कामकाजांवर पर्यवेक्षण ठेवणे व त्यांचे मूल्यमापन करण्यासाठी जिल्हास्तरावर व राज्यस्तरावर निर्माण करण्यात आलेल्या द्विस्तरीय यंत्रणेने देखील आपल्या पर्यवेक्षकीय कामकाजात फारच हयगय केल्याचे दिसते. महिला व बालविकास विभाग देखील याकामी पूर्ण निद्रिस्त राहिला. याची परिणती अखेर बाल न्याय कार्यक्रमावर अनावश्यक ताण पडून कार्यक्रमाचा दर्जा खालावण्यात झाली असे समितीचे स्पष्ट मत झालेले आहे.

बालगृहांत बालकांना प्रवेश देतांना प्रवेश प्रक्रियेच्या वेळीच बालक निहाय प्रत्येक प्रकरणाची सखोल छाननी होऊन फक्त खऱ्या अर्थाने पात्र असणाऱ्या बालकांनाच जर प्रवेश दिला गेला असता तर बालकांची संख्या खचितच सिमित राहून अर्थसंकल्पात उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीचा उक्त बालकांच्या पुनर्वसनाच्या कामी अधिक परिणामकारकरित्या उपयोग करता आला असता व पर्यायाने शासनाच्या निधीची बचत देखील झाली असती. महत्वाचे म्हणजे अशा बचत झालेल्या निधीचा वापर अन्य महत्वाच्या शासकीय योजनांवर करून त्या योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य झाले असते. एकूणच या संपूर्ण प्रकरणात शासनाच्या करोडो रुपयांचा अनाठायी खर्च झाला असून अजाणतेपणे किंवा निव्वळ दुर्लक्षामुळे हे संपूर्ण प्रकरण घडल्याचे समिती कदापिही मानायला तयार होणार नाही. सदरहू प्रकरण अतिशय गंभीर असून यामध्ये संगनमताने गैरव्यवहार झाला असल्याची शक्यता नाकारता येत नसून याची सखोल तपासणी करणे अगत्याचे आहे, असे समितीचे ठाम मत झालेले आहे.

३.५ अतः, सन २०१० ते २०१५ या पाच वर्षांच्या कालावधीत राज्यातील सर्व बालगृहांकरिता अर्थसंकल्पीत करण्यात आलेला निधी, उक्त निधीचे करण्यात आलेले प्रत्यक्ष वितरण आणि विनियोग याची सखोल तपासणी विभागाने करून त्याबाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल समितीस तीन महिन्यांत उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून सदर चौकशी अहवालातील निष्कर्षांच्या आधारे समितीस SIT सारख्या स्वतंत्र यंत्रणेमार्फत प्रस्तुत प्रकरणात सखोल चौकशी करण्याचा निर्णय घेणे सुकर होईल, अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

३.६ दुसरी महत्वाची बाब म्हणजे बाल काळजी संस्थांच्या प्रलंबित रु. १९१ कोटी इतक्या देयकांपैकी मा. न्यायालयाच्या आदेशान्वये रु. ४१ कोटी इतके संस्थांना करण्यात आलेले अंशतः भूगतान, उक्त संस्थांनी आवश्यक ती माहिती व कागदपत्रे सादर न केल्यामुळे, पुन्हा वसूल करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याबाबत समितीस विदित करण्यात आले. अतः उक्त रक्कम रु. ४१ कोटी इतक्या रकमेच्या वसुलीची कार्यवाही तातडीने पूर्ण करून त्याबाबतची विस्तृत माहिती समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून द्यावी, अशी देखील समिती शिफारस करत आहे.

३.७ तदवतच बालकांचा आधार क्रमांक व बायोमॅट्रिक यंत्रणा राज्यातील शासकीय व स्वयंसेवी संचलित सर्वच बालगृहांना सक्तीची करण्यात यावी. स्थापित बायोमेट्रिक यंत्रणा कायमस्वरुपी कार्यान्वित राहील याबाबतची दक्षता घेण्याबाबत सर्व बालगृहांना सूचित व बाध्य करण्यात यावे.

३.८ त्याचप्रमाणे सदरहू योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीकरिता आयुक्त, महिला व बालविकास, यांनी दिनांक १ जून, २०१६ रोजी परिपत्रक निर्गमित करून राज्यातील बाल न्याय अधिनियम, २०१५ अंतर्गत दाखल होणाऱ्या आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या संस्था प्रवेशाबाबत बाल कल्याण समितीने अवलंबवावयाच्या कार्य पद्धतीबाबत सूचित केले आहे. सदर परिपत्रकातील बाबींची यापुढील काळात काटेकोर अंमलबजावणी करून केलेल्या कार्यवाहीचा कालबध्द आढावा विभागाने घ्यावा व सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सुयोग्य असे पर्यवेक्षण करावे. तसेच बाल न्याय अधिनियम, २०१५ मधील उद्देश खऱ्या अर्थाने फलद्रुप होण्याकरिता विभागाने सातत्यपूर्ण व कसोशिने प्रयत्न करावेत, अशी समितीची आग्रही शिफारस आहे. शिफारशीनुरुप केलेला कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत उपलब्ध करून द्यावा.

परिच्छेद क्र. २.१.२.२ :- शासन चालवित असलेल्या बाल काळजी संस्थांना एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत (ICPS) आणल्यामुळे प्रलंबित वित्तीय दायित्व.

अभिप्राय

३.९ महिला व बालविकास विभागाने मे, २०१२ मध्ये ९५ बाल काळजी संस्थांना (एकूण १३८६ बाल काळजी संस्थांपैकी) एकात्मिक बाल संरक्षणा योजनेंतर्गत अंमलबजावणीसाठी आणले. एकात्मिक बाल सरंक्षण योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारी अनुदाने ही राज्याच्या अर्थसंकल्पाद्वारे मार्गस्थ करून एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत अंमलबजावणीसाठी ती आयुक्त, महिला व बालविकास यांचेकडून MSCPS ना वितरित केली जातात. केंद्र शासनाने २००९-१० मध्ये जारी केलेल्या एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये बाल काळजी संस्थांनी आवर्ती स्वरुपाच्या विविध बाबीवर जसे की, आहार, कपडे, बाडबिस्तरा, भाडे, पाणी, वीज इत्यादींवर करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादा (५० बालकांची क्षमता असलेल्या बाल काळजी संस्थांची कमाल मार्यादा ही रु. २०.२९ लाख होती.) विहीत केली होती. लेखा परिक्षेला असे आढळून आले की, २०११-१५ दरम्यान शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या ९५ पैकी ४० बाल काळजी संस्थांमध्ये ज्या एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या कक्षेत आणल्या होत्या, त्यांनी जागेचे भाडे, आहारावरील खर्च, पाणी आणि वीज शुल्क इत्यादींवर केंद्र शासनाने विहीत केलेल्या खर्चाच्या मर्यादेपेक्षा ६.८७ कोटी अधिक खर्च केला होता. राज्य शासनाने सप्टेंबर, २०१५ पर्यंत ६.८७ कोटीचे प्रलंबित दायित्व चुकते केले नव्हते. निवड केलेल्या नऊ जिल्ह्यापैकी सहा जिल्ह्यामध्ये १३ बाल काळजी संस्थांमधील प्रलंबित दायित्व ३.६९ कोटी होते.

एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत केले जाणारे आवर्ती आणि अनावर्ती खर्च (उदा. पाणी आणि वीज शुल्क, जागेची भाडेपट्टी कंत्राटावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे प्रदान, निवास सुविधेची श्रेणीवाढ, संगणक आणि फर्निचरची खरेदी, भांडवली कामे इत्यादी) बाबत असलेली वित्तीय प्रमाणके एप्रिल, २०१४ पासून केंद्र शासनाच्या महिला आणि बालविकास मंत्रालयाकडून सुधारित

केल्याचे (मार्च, २०१४) लेखापरीक्षेला आढळून आले. तथापि, सन २०१५ करिता यासाठीचा सुधारित प्रमाणकांच्या आधारावर केंद्र शासनाच्या बालविकास मंत्रालयाकडे पाठविणे आवश्यक असलेला कोणताही वित्तीय प्रस्ताव महिला व बाल विकास विभागाने माहे जून, २०१५ पर्यंत पाठविला नसल्याचे लेखापरिक्षणात निदर्शनास आले. परिणामी एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या कक्षेत आणलेल्या ९५ बाल काळजी संस्था पुर्व सुधारित दरानेच कार्यरत राहिल्या. सुधारित दर हे जुन्या दरापेक्षा लक्षणीयरित्या अधिक असल्याने (आवर्ती खर्चासाठी ७८ टक्के आणि अनावर्ती खर्चासाठी १९८ टक्के) बालकांच्या हितासाठी वाढत्या दराचा उपयोग लाभदायकरीत्या करण्याची संधी महिला व बाल विकास विभागाने वाया घालविली. निवड केलेल्या नऊ जिल्ह्यांपैकी मुंबई शहर वगळून आठ जिल्ह्यांमध्ये ९५ बाल काळजी संस्थांपैकी २९ बाल काळजी संस्था सुधारित दराच्या लाभापासून वंचित राहिल्या. परिणामी महिला व बाल विकास विभागाला सन २०१५ दरम्यान बालकांच्या फक्त अनुरक्षण खर्चापोटी मिळणारी अंदाजे रु.३.७६ कोटी रक्कम सोडून द्यावी लागली. सन २०१५-१६ करिता सुद्धा महिला व बाल विकास विभागाने मंत्रालयाकडे कोणताही वित्तीय प्रस्ताव पाठविलेला नव्हता, असे महालेखाकारांनी लेखापरिक्षणात नमूद केले आहे.

विभागाच्या खुलाश्याप्रमाणे, उक्त प्रयोजनार्थ शासन पत्र क्रमांक ७७६, दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ अन्वये पूरक मागणी प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यानुसार शासन पत्र क्र. पूरक २०१५ / प्र.क्र. ३२६/ का-८, मुंबई-३२, दिनांक ३० मार्च, २०१६ अन्वये रु. १४,५३,९८,००० एवढी पुरक मागणी मंजूर करण्यात येऊन त्यानुसार आयुक्तालयाचे आदेश क्र. १८९५, दिनांक ३० मार्च, २०१६ अन्वये शासकीय संस्थांचे प्रलंबित देयके अदा करण्यासाठी सदर तरतूद सर्व शासकीय संस्थांना वितरित करण्यात आलेली आहे. निवड केलेल्या ९ जिल्ह्यांची रक्कम रुपये ३.६९ कोटी एवढी रक्कमसुद्धा सदर आदेशान्वये अदा करण्यात आली आहे.

तसेच, केंद्र शासनाच्या सुधारित वित्तीय प्रमाणकानुसार माहे एप्रिल, २०१४ पासून खर्च करण्यास मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव पाठविण्यास दिनांक ०२ जून २०१५ रोजीच्या प्रकल्प मंजुर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्या अनुषंगाने राज्य शासनास दिनांक २२ जानेवारी २०१६ अन्वये मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. राज्य शासनाने उक्त प्रस्तावास मान्यता दर्शविलेली असून दिनांक ३ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारित निकषाप्रमाणे निधी वितरित करण्यात आला असून कागदपत्रे हस्तांतरित झालेली नाहीत अशी प्रकरणे सोडून इतर सर्व प्रकरणी थकीत देयके अदा करण्यात आल्याचे साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले. सन २०१४-१५ व २०१५-१६ करिता वार्षिक अंदाजपत्रके विभागाने केंद्र शासनाला पाठविली आहेत काय, अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर देऊन केंद्र शासनाकडून अधिकच्या निधीची मागणी देखील केल्याचे नमूद केले. त्याबाबतची कागदपत्रे समितीला सादर करण्याबाबत समितीने निदेशित केलेले असतानाही आजमितीपर्यंत उक्त कागदपत्रे समितीस सादर करण्यात आलेली नाहीत, असे येथे खेदाने नमूद करण्यात येत आहे.

शिफारशी

३.१० (१) एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये ४० शासकीय बालगृहे माहे मे, २०१२ मध्ये वर्ग करण्यात आली. उपरोक्त बालगृहे एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये वर्ग करण्यापूर्वी संस्थेने केलेला प्रत्यक्ष खर्च व मागणी यानुसार राज्य शासनाकडून तरतूद उपलब्ध करून देण्यात येत होती. मात्र एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत आहार, कपडे, भाडे, पाणी, वीज इत्यादीवर करावयाची खर्चाची कमाल मर्यादा केंद्र शासनाने विहित केल्यामुळे उक्त संस्थांना त्यानुसार खर्च भागविणे शक्य नसल्याने रु.६.८७ कोटी इतका झालेल्या अधिकच्या खर्चाची प्रलंबित देयके माहे मार्च, २०१६ मध्ये संबंधित संस्थांना शासनामार्फत वितरित करण्यात आली आहेत. तसेच लेखापरिक्षणाकरिता निवड केलेल्या ९ जिल्ह्यांपैकी ६ जिल्ह्यांची प्रलंबित दायित्वाची असलेली रुपये ३.६९ कोटी इतकी रक्कमसुद्धा सदर आदेशान्वये अदा करण्यात आल्यामुळे समिती समाधान व्यक्त करते.

३.११ (२) केंद्र शासनाच्या सुधारित वित्तीय प्रमाणकानुसार माहे एप्रिल, २०१४ पासून खर्च करण्यास मंजुरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव विभागाने राज्य शासनास सुमारे दोन वर्षांच्या विलंबाने म्हणजेच दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी सादर केला. उक्त प्रस्तावास प्रकल्प मंजुरी समितीच्या बैठकीत दिनांक २ जून, २०१५ रोजी मान्यता मिळाल्यानंतर देखील प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यास विभागाने सुमारे सात महिन्यांचा विलंब लावला. एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत समावेश केलेल्या बालगृहांसाठी केंद्र शासनाने घोषित केलेली सुधारित वित्तीय प्रमाणके अंमलात

आणण्याबाबत राज्य शासनाने मान्यता दिलेली असून दिनांक ३ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार आता सुधारित निकषांप्रमाणेच निधी वितरित करण्यात येत असल्याने समिती समाधान व्यक्त करते. तथापि, राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावयाच्या प्रस्तावास विभागस्तरावर झालेला उपरोल्लेखित विलंब टाळला गेला असता तर सुधारित वित्तीय प्रमाणकांची त्वरेने अंमलबजावणी होऊ शकली असती. प्रस्तुत प्रकरणी विभागस्तरावर प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्याकामी झालेल्या विलंबाबाबत समिती खेद व्यक्त करते.

परिच्छेद क्र. २.१.३.१.— काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना न हेरणे / शोध न घेणे.

अभिप्राय

३.१२ भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या माहे मार्च, २०१२ मध्ये संपलेल्या वर्षाच्या अहवालाच्या (सामान्य आणि सामाजिक क्षेत्र) परिच्छेद ४.१.६.१ मध्ये काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची संख्या निर्धारीत करण्यासाठी यंत्रणेचा अभाव असल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यानुरूप तत्कालीन प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांनी, संस्थात्मक काळजी घेण्याची गरज असणाऱ्या मुलांचा शोध घेण्यासाठी अंगणवाडी कार्यकर्ते आणि व्यावसायिक (तज्ञ) व्यक्तींची मदत घेऊन काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची गणना केली जाईल, असे माहे ऑक्टोबर, २०१२ मध्ये आश्वासित केले होते. त्यानुसार महिला व बाल विकास विभागाने माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये अंगणवाडी कार्यकर्त्यांच्या मदतीने ०१ ऑक्टोबर, २०१३ ते १५ ऑक्टोबर, २०१३ या कालावधीत काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना जारी केल्या होत्या. हा सर्वेक्षण अहवाल आयुक्त, महिला व बाल विकास यांनी माहे डिसेंबर, २०१३ पर्यंत एकत्रित करावयाचा होता. आयुक्तांना माहे मे, २०१५ मध्ये एकूण ३५ जिल्ह्यांपैकी फक्त ८ जिल्ह्यांमधून हा अहवाल प्राप्त झाला होता, ज्यामध्ये ६,६६० बालकांना (मुले : ३,४८२ ; मुली : ३,१७८) काळजी आणि सरंक्षणाची गरज असल्याचे आढळून आले होते. आयुक्तांना २७ जिल्ह्यांसंबंधी कोणताही अहवाल प्राप्त झाला नसूनही महिला व बाल विकास विभागाकडून ६,६६० बालकांना संस्थात्मक काळजीसाठी दाखल करण्याची कुठलीही कारवाई केली गेली नव्हती.

यावर, प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे आणि निधीच्या कमतरतेमुळे अंगणवाडी कार्यकर्त्यांना अडचणीचा सामना करावा लागत असून MSCPS च्या मदतीने सर्वेक्षण केले जाईल, असे सांगितले.

शासनाने सादर केलेले उत्तर वस्तूस्थितीवर आधारीत नव्हते कारण, लेखापरीक्षेने पुढे केलेल्या तपासणीत असे आढळून आले की, MSCPS सुध्दा काळजी आणि संरक्षणची गरज असलेल्या बालकांना शोधण्यास पर्याप्तपणे सक्षम नव्हती, कारण, काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना शोधण्याची आणि निम्न आणि जिल्हा पातळीवर बाल संरक्षण आराखडा तयार करण्याची जबाबदारी असलेले तिच्या नियंत्रणाखालील जिल्हा बाल संरक्षण कक्ष (DCPU) आणि विविध बाल संरक्षण समित्या अशा प्रकारची कार्ये पार पाडण्यास, मनुष्यबळाच्या आणि निधीच्या अतीव कमतरतेमुळे किंवा गाव / प्रभाग आणि गटस्तरावर आवश्यक तितक्या संख्येत समित्या न गठित केल्यामुळे सुसज्ज नव्हत्या, असे लेखापरिक्षणामध्ये महालेखाकारांनी नमूद केले आहे.

विभागाच्या खुलाश्याप्रमाणे सदर सर्वेक्षणामध्ये ६,६६० बालकांना काळजी व संरक्षणाची गरज असल्याचे आढळून आले, ही बाब खरी आहे. मात्र काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या सर्वच बालकांना संस्थात्मक काळजीची गरज असते, असे नाही. अशी बालके संबंधित जिल्ह्यांच्या बाल कल्याण समिती यांचे समोर सादर होऊन बाल कल्याण समिती या मुलांच्या सामाजिक पुनःस्थापन आणि पुनर्वसन या दृष्टीकोनातून निर्णय घेते. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील कलम ३ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार मुलांचा कुटुंबातील हक्क यास प्राधान्य देण्यात आलेले असून अशा मुलांना अंतिम पर्याय म्हणून संस्थात्मक काळजीसाठी दाखल करण्याची तरतूद आहे. तसेच बाल कल्याण समितीला सदर अधिनियमांतर्गत प्रथम न्याय दंडाधिकारींचे अधिकार असल्याने अशा बालकांच्या बाबतीत संपूर्ण निर्णय घेण्याकरिता सदरची समिती ही सक्षम प्राधिकरण आहे.

महिला व बाल विकास विभागास काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना संस्थेमध्ये दाखल करण्याबाबत कोणतेही अधिकार नाहीत. काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके शोधणे ही विभागाची जबाबदारी नाही. अधिनियमांतर्गत अशी बालके निदर्शनास आल्यास, त्यांना बाल कल्याण समितीसमोर सादर करण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. अशा प्रकारची बालके नियमितपणे बाल कल्याण समितीसमोर सादर होऊन समितीने निर्णय घेतल्यास या बालकांना संस्थात्मक काळजीसाठी दाखल करण्याची कार्यवाही बाल कल्याण समितीकडून करण्यात येते.

समितीने साक्षी दरम्यान एकूण ३९ हजार ६९३ ग्राम बाल संरक्षक समित्या स्थापन करण्यासंदर्भात सद्यःस्थिती काय आहे, अशी पृच्छा केली असता, एकूण ३९ हजार ६९३ समित्यांपैकी २९ हजार समित्या स्थापन करण्यात आल्याचे समितीस अवगत करण्यात आले.

शिफारशी

३.१३ (१) उन्मार्गी, अवखळ, भटक्या, निराश्रित व वाममार्गाला लागण्याच्या सीमेवर असलेल्या मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय सेवा, शालेय शिक्षण, धंदे शिक्षण इत्यादी प्रकारचे सहाय्य देऊन त्यांना समाजात मानाने जगण्यासाठी योग्य असे बनविणे या उद्देशासाठी खऱ्या अर्थाने बालगृहांची निर्मिती करण्यात आली आहे. तथापि, लेखा परिक्षणात काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना शोधण्याचे आणि त्यांना बाल काळजी संस्थांमध्ये दाखल करण्याचे नियोजन कमकुवत असल्याचा महालेखाकारांनी अत्यंत महत्त्वाचा आक्षेप नोंदविला आहे. काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना संस्थेमध्ये दाखल करण्याचा कोणताही अधिकार महिला व बाल विकास विभागास नसून अशी बालके शोधणे ही विभागाची जबाबदारी नसून अधिनियमांतर्गत तशी तरतूद देखील नसल्याचा विभागाने साक्षी दरम्यान खुलासा केला. विभागाच्या उक्त खुलाशाशी समिती कदापीही सहमत होऊ शकत नाही. वास्तविक, भारतीय राज्यघटनेमध्ये '*राज्य धोरणांविषयक निदेशक तत्वांचा*' (Directive Principles of State policy) अंतर्भाव करून आपण कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेली असल्याने अधिनियमांतर्गत तरतुदींकडे अंगुलीनिर्देश करून विभाग अशाप्रकारे आपली जबाबदारी झटकू शकत नाही. शासनाने काळजी आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकांचे सर्वेक्षण करून शोध घेण्यासाठी एक भक्कम पथदर्शी आराखडा आखून याकामी एक सक्षम व्यवस्था तातडीने उभारणे नितांत आवश्यक आहे, अशी समितीची आग्रही भूमिका व शिफारस आहे. समितीच्या उक्त शिफारशीनुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत अवगत करण्यात यावी.

३.१४ (२) एकूण ३९,६९३ ग्राम बालसंरक्षण समित्यांपैकी २९ हजार समित्या स्थापन करण्यात आल्याचे समितीस साक्षी दरम्यान अवगत करण्यात आले. उर्वरित ग्राम बालसंरक्षण समित्या तातडीने गठित करण्यात याव्यात व त्याबाबतची अद्ययावत माहिती ३ महिन्यांत समितीस अवगत करण्यात यावी.

परिच्छेद क्र. २.१.३.२ :- शहरी क्षेत्रातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण न करणे.

अभिप्राय

३.१५ शहरी क्षेत्रात रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे संरक्षण करण्यासाठी तसेच त्यांना सामान्य आयुष्य जगण्यास मदत करण्याच्या दृष्टीने राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आणि महिला व बाल विकास विभागाचे प्रधान सचिव हे सदस्य सचिव असलेल्या माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये १० सदस्यांच्या गठित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृतीदलाने राज्यातील सर्व महानगरपालिकांना १५ दिवसांच्या आत **एक विशेष कृती दल** स्थापित करून त्यांच्या क्षेत्रातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण करून त्यांना एक अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

लेखा परीक्षा तपासणीत असे आढळून आले की, माहे मे, २०१५ पर्यंत राज्यातील २६ महानगरपालिकांपैकी फक्त पुणे महानगरपालिकेने सर्वेक्षण करून रस्त्यावर राहणाऱ्या १,७५४ मुलांना हुडकून काढले होते आणि त्यांनी अंमलबजावणी केलेल्या "नेस्ट" योजनेखाली/कार्यक्रमांतर्गत त्यांच्या निवाऱ्याची सोय केली होती.

विभागाने आपल्या खुलाश्यात नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय कृती दलाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे नागरी भागात रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनाची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित महानगरपालिकांची असून सर्व महानगरपालिकांनी यासंदर्भात विशेष कृती दल स्थापन करून प्रत्येक महापालिकेने त्यांच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण करून घ्यावे व अहवाल राज्य कृती दलास सादर करावा. त्यानुरुप धुळे, पुणे, मालेगांव, जळगांव, अकोला, उल्हासनगर, मिरा-भाईंदर, चंद्रपूर आणि नागपूर या महानगरपालिकांमध्ये विशेष कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेने यासंदर्भातील प्रत्यक्ष कार्यवाही पूर्ण केलेली असून पुढील १५ दिवसांत त्यांचेकडून अहवाल मागविण्यात येईल, असे साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. अशाप्रकारच्या प्रयोजनांसाठी विभागाकडून महानगरपालिकांना निधी देण्यात येतो काय, अशी समितीने विचारणा केली असता, महानगरपालिकांचा १०% निधी हा महिला व बालकल्याणासाठी समर्पित ठेवलेला असतो, असे विभागीय सचिवांनी कथन केले.

शिफारस

३.१६ शहरी क्षेत्रात रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे संरक्षण करून त्यांना सामान्य आयुष्य जगण्यास मदत करण्याच्या उदात्त हेतूने राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृती दलाने, राज्यातील सर्व महानगरपालिकांना विशेष कृती दलाची स्थापना करून रस्त्यावर राहणाऱ्या बालकांचे सर्वेक्षण करावे व उक्त कृती दलाच्या माध्यमातून बालकांच्या पुनर्वसनासंदर्भात उपाययोजना कराव्यात व त्यासंदर्भातील अहवाल राज्य कृती दलाकडे सादर करावा, असे सूचित केले होते. त्यानुरूप राज्यातील २६ महानगरपालिकांपैकी फक्त १० महानगरपालिकांनी आपले विशेष कृती दल स्थापन केलेले आहेत. मुंबई महानगरपालिकेने यासंदर्भात प्रत्यक्ष कार्यवाही पूर्ण केली आहे. तथापि, त्यांचेकडून यासंदर्भातील अहवाल राज्य कृती दलास अप्राप्तच होता. वास्तविक, मुंबई शहर हे खूप मोठ महानगर असून मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे प्रमाण खचितच जास्त आहे. शहरी क्षेत्रात रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण व संरक्षण करून त्यांना सामान्य आयुष्य जगण्यास मदत करण्याच्या या उदात्त कामात खरे पाहता मुंबई महानगरपालिकेसारख्या एका प्रमुख महानगरपालिकेने प्राधान्याने पुढाकार घेऊन प्रभावी उपाययोजना करून यासंदर्भातील अहवाल राज्य कृती दलाकडे सादर करणे अपेक्षित व आवश्यक होते. मुंबई महानगरपालिकेने अशाप्रकारे सत्वर कार्यवाही केली असती, तर इतर महानगरपालिकांना देखील यातून प्रेरणा व स्फूर्ती मिळाली असती व मुंबई महानगरपालिकेने या कामी केलेला अहवाल इतर महानगरपालिकांना पथदर्शी ठरला असता. तथापि, या उदात्त कामी मुंबई महानगरपालिकेकडून अशी तत्परता दाखविण्यात आली नसल्याचे समिती येथे सखेद नमूद करते. उक्त प्रयोजनार्थ महापालिकांकडे अर्थसंकल्पात १०% निधी हा राखून ठेवलेला असून देखील महानगरपालिका या कामी म्हणाव्या तितक्या सजग नाहीत, याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

राज्य कृती दलाच्या निदेशानुरुप मुंबई महानगरपालिकेसहित उर्वरित सर्व महानगरपालिकांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण व संरक्षण करून त्यांना सामान्य जीवन जगण्याच्या कामी मदत करण्याच्या दृष्टीने तातडीने विशेष कृती दले स्थापन करून पुनर्वसनात्मक उपाययोजना सत्वर हाती घ्याव्यात व तत्संदर्भातील आपापले अहवाल राज्य कृती दलाकडे तातडीने सादर करावेत अशा सक्त सूचना संबंधित सर्व महानगरपालिकांना देण्यात याव्यात. समितीच्या शिफारशीनुरुप केलेल्या कार्यपूर्ततेचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा.

परिच्छेद क्र. २.१.३.३ :- पुनर्वसन आणि काळजी आराखडा तयार न करणे.

अभिप्राय

३.१७ महिला व बाल विकास विभागाने सर्व बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना भावनिक आणि मानसिक आधाराच्या गरजा, शैक्षणिक आणि प्रशिक्षणाच्या गरजा, आरोग्य विषयक गरजा, कौशल्य, धार्मिक विश्वास इ. बाबी विचारात घेऊन बाल काळजी संस्थांच्या सर्व परिविक्षा अधिकाऱ्यांनी स्वतंत्र पुनर्वसन आणि काळजी आराखडा तयार करणे असे निर्देश माहे डिसेंबर, २०११ मध्ये दिले होते. उक्त आराखडे हे वैद्यकीय अधिकारी, शिक्षक, व्यवसाय प्रशिक्षण निदेशक आणि बाल काळजी संस्थांचे अधीक्षक यांचा समावेश असलेल्या समितीने मंजूर करावयाचे होते. तथापि, लेखापरिक्षणात निवड केलेल्या एकूण ९३ बाल काळजी संस्थांपैकी ८४ बाल काळजी संस्थांनी उक्त आराखडे तयार केले नसल्याचे आढळून आले. लेखापरिक्षेने पडताळणी केलेल्या बाल काळजी संस्थांपैकी ९०% बाल काळजी संस्थांनी पुनर्वसन व काळजी आराखडे तयार केलेले नसणे यावरुन बालकांना आवश्यक असलेल्या विशिष्ट गरजांविषयी महिला व बाल विकास विभागासह अंमलबजावणी करण्यास जबाबदार असणाऱ्या इतर संस्थांची यातून असंवेदनशीलता दिसते, असे महालेखाकारांनी लेखापरिक्षणात नमूद केलेले आहे.

विभागाच्या अभिप्रायानुसार बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत निरीक्षणगृह/विशेषगृह/बालगृह/दत्तक संस्था/अनुरक्षणगृह या संस्थामध्ये दाखल होणाऱ्या बालकांच्या बाबतीत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमातील तरतुदीनुसार दाखल मुलांच्या काळजी व पुर्नवसनासाठी सर्वांगिण काळजी व संरक्षण आराखडा (Comprehensive Care Plan) शासन निर्णय दि. २२ डिसेंबर २०११ अन्वये निश्चित करण्यात आला आहे. उक्त शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याकरिता सर्व **बाल कल्याण समिती** तसेच **बाल न्याय मंडळ** यांना सूचित करण्यात आलेले आहे. सद्यःस्थितीत २६४

संस्थांनी पुनर्वसन व काळजी आराखडे तयार केलेले असून, उक्त शासन निर्णयाची परिणामकारक अंमलबजावणी संबंधित यंत्रणांनी करण्याबाबत आयुक्तालयाने दिनांक १ जून, २०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये पुन:श्च कळविलेले आहे.

बाल न्याय अधिनियमानुसार संस्थांमध्ये दाखल होणारा सर्व मुलांचा काळजी आराखडा बाल कल्याण समितीमार्फत तयार केला जातो. बालके संस्थेमध्ये गेल्यानंतर त्या-त्या संस्था त्या-त्या बालकांचा काळजी आराखडा तयार करतात. बालकांची ज्याप्रमाणे प्रगती होते त्याप्रमाणे काळजी आराखडे अद्ययावत केले जातात. संस्थांनी काळजी आराखडे कशाप्रकारे तयार करावेत याचे प्रशिक्षण सर्व संस्थांना देण्यात आल्याचे साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले. एकूण किती संस्था असून त्यातील किती संस्थानी पुनर्वसन योजना तयार केलेली आहे, अशी समितीने साक्षी दरम्यान पृच्छा केली असता, एकूण ७४९ संस्था असून संस्थांना आता सर्व बालकांची माहिती ऑनलाईन पद्धतीने अद्ययावत करावी लागत असल्याने आता काळजी आराखडे तयार होत आहेत. बालकांचे नियमित काळजी आराखडे तयार केले जात आहेत किंवा कसे तसेच ते वेळोवेळी अद्ययावत केले जात आहेत किंवा कसे याची नियमित तपासणी करण्यात येत असल्याबाबत समितीस अवगत करण्यात आले.

शिफारस

३.१८ बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत निरीक्षणगृह / विशेषगृह / बालगृह / दत्तक संस्था/ अनुरक्षणगृह या संस्थामध्ये दाखल होणाऱ्या बालकांच्या बाबतीत अधिनियमातील तरतुदीनुसार दाखल मुलांच्या काळजी व पुनर्वसनासाठी सर्वांगीण काळजी व संरक्षण आराखडा दिनांक २२ डिसेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे. लेखापरिक्षणाच्यावेळी नमुन्या दाखल निवड केलेल्या ९३ बाल काळजी सस्थांपैकी ८४ बाल काळजी संस्थांनी पुनर्वसन व काळजी आराखडे तयार केलेले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. उर्वरित संस्थांच्या संदर्भात देखील सर्वसाधारणपणे हीच परिस्थिती असणार आहे. खुद्द विभागाने देखील नोंदणीकृत एकूण ७४९ संस्थांपैकी फक्त २६४ संस्थांनी पुनर्वसन व काळजी आराखडे तयार केले असल्याचे मान्य केलेले आहे. प्रस्तुतचा शासन निर्णय निर्गमित करून सुमारे सात वर्षांचा कालावधी उलटूनही उर्वरित संस्थांकडून बालकांसंदर्भातील पुनर्वसन व काळजी आराखडे तयार न होणे, ही बाब बालकांच्या हिताच्या दृष्टीने चिंताजनक अशीच म्हणावी लागेल. आता सर्व बालकांची माहिती ऑनलाईन पद्धतीने अद्ययावत करावी लागत असल्याने आता काळजी आराखडे तयार होत आहेत असे समितीस विदित करण्यात आले आहे. सबब, त्यानुसार उपरोक्त शासन निर्णयाची तातडीने परिणामकारक अंमलबजावणी करून पुनर्वसन व काळजी आराखडे त्वरेने तयार करण्याबाबत उर्वरित सर्व संस्थांना सक्त सूचना निर्गमित करण्यात याव्यात व यासंदर्भातील कार्यपूर्तीचा अहवाल समितीस ३ महिन्यांत सादर करण्यात यावा, अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

परिच्छेद क्र. २.१.३.४ :- संस्थात्मक व्यवस्थेतील कमतरता

अभिप्राय

बाल न्याय अधिनियमात विहित केलेल्या संस्थात्मक व्यवस्थेबरोबर तुलना केली असता लेखा परिक्षकांना या योजनेतील व्यवस्थेत पुढीलप्रमाणे कमतरता आढळून आल्या. :-

राज्य सल्लागार मंडळ

३.१९ राज्य शासनाने महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या नियम ११ (1A) चे उल्लंघन करून चार शासकीय व पाच अशासकीय सदस्यांऐवजी फक्त तीन शासकीय सदस्य असलेले सल्लागार मंडळ माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये पुनर्गठीत केले होते. तसेच शासनाचे निवृत्त सचिव किंवा न्यायालयाच्या न्यायाधिशांऐवजी सेवेत असलेल्या महिला व बाल विकास विभागाच्या प्रधान सचिवांना अध्यक्ष म्हणून पदनिर्देशित केले. परिणामी फक्त महाराष्ट्र बाल न्याय नियमांचेच उल्लंघन झाले असे नाही, तर हितसंघर्षाची परिस्थिती निर्माण झाली असे लेखापरिक्षणादरम्यान आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

त्यावर, केंद्र शासनाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ नव्यानेच कार्यान्वीत केला असून सदरचा अधिनियम कार्यान्वीत करण्यात आल्याने यापुर्वीचा अधिनियम २००० आणि सुधारित अधिनियम, २००६ रद्दबातल करण्यात आला आहे. त्यामुळे या कायद्यांमधील तरतुदी आपोआपच रद्द झाल्या आहेत. बाल न्याय अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाचे नियम तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. तसेच सद्य:स्थितीत राज्य सल्लागार मंडळाऐवजी बाल न्याय (मुलांची

काळजी व संरक्षण) नियम, २००७ मधील नियम ९१ अन्वये निवड समिती गठित करण्यात आलेली आहे, असे साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

बाल कल्याण समिती

(i) ३५ बाल कल्याण समितींपैकी १४ बाल कल्याण समितीमध्ये आणि ३५ बाल कल्याण समितींपैकी एक बाल कल्याण समितीमध्ये २०११ पासून अनुक्रमे एक आणि दोन सदस्यांची कमतरता होती. ही बाब बाल न्याय अधिनियमाच्या कलम २९ (१) च्या विरुद्ध होती, असा महालेखापरिक्षणात आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे.

यासंदर्भात साक्षीच्या दरम्यान समितीस विभागीय सचिवांनी अवगत केले की, याबाबतीत नव्याने ३० जिल्ह्यांमध्ये ३२ बाल कल्याण समिती गठित करण्यात आलेल्या असून सिंधुदुर्ग, यवतमाळ, भंडारा व गोंदिया हे जिल्हे अद्यापही बाकी आहेत. यासंदर्भातील जाहिराती आता निर्गमित करण्यात आल्या असून, यासंदर्भातील मुलाखती लवकरच घेण्यात येत आहेत. बैठकीच्या मानधनात आता वाढ करण्यात आली असून प्रती बैठक रु.३००/- इतक्या मानधनावरून आता प्रती बैठक रु.१,५००/- इतके मानधन निश्चित करण्यात आलेले आहे. मानधनातील उक्त वाढीमुळे समितीवर सदस्य म्हणून काम करण्यास इच्छुक व्यक्ती आता सहज उपलब्ध होतील.

(ii) सन २०१०-१५ दरम्यान ३५ बाल कल्याण समितींपैकी एकाही बाल कल्याण समितीने बालकांच्या प्रलंबित प्रकरणांबाबत अर्धवार्षिक अहवाल राज्य शासनाला सादर केले नव्हते ज्यामुळे महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या नियम ७B (१०) चे उल्लंघन झाले होते, असे लेखापरिक्षणात नमूद करण्यात आले आहे.

त्यावर, साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी असे कथन केले की, बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे निरीक्षण व मूल्यमापन करण्याचे अधिकार बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियमान्वये आयुक्त, महिला व बाल विकास यांना होते. तथापि, आता आयुक्त कार्यालयाने दिनांक १५ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये सदरील अधिकार, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. त्यानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी निरीक्षण व मुल्यांकन केलेल्या बालकल्याण समितीचे अहवाल दिनांक २६ एप्रिल, २०१६ व ३० जून, २०१६ रोजी व बाल कल्याण समिती यांनी दिलेल्या संस्था भेटीचा अहवाल दिनांक २० मे, २०१६ आणि दिनांक ३० जून, २०१६ रोजी शासनास सादर केला आहे. बाल कल्याण समितीकडून सन २०१० ते २०११ आणि सन २०१४ ते २०१५ या वर्षातील हाताळलेली प्रकरणे आणि निकाली काढलेल्या प्रकरणांचा अहवाल दिनांक २६ एप्रिल, २०१६ अन्वये शासनाला सादर केलेला आहे. बाल कल्याण समितीच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी नियमानुसार जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

(iii) महाराष्ट्र बाल न्याय नियम, २०११ च्या नियम ८ (८) नुसार, काळजी व संरक्षण करण्याची गरज असलेल्या बालकांच्या संबंधातील प्रकरणांचा अंतिम निकाल किमान तीन सदस्यांच्या आदेशाव्दारे देण्यात यावा असे अपेक्षित असतांना सन २०१४-१५ दरम्यान, नऊ पैकी पाच बाल कल्याण समितींनी निकाली काढलेल्या ६७५ प्रकरणांत निर्धारित तीन सदस्यांऐवजी फक्त दोन सदस्यांकडून निर्णय घेण्यात आला.

विभागाच्या खुलाश्यामध्ये, नियुक्त झालेल्या बाल कल्याण समितीतील काही जिल्ह्यातील सदस्यांनी त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव राजीनामा दिला तर काही सदस्यांच्या बाबत तक्रारी असल्याने त्यांचे निलंबन करण्यात आले. त्यामुळे काही ठिकाणी २ सदस्य असल्याचे दिसून येत आहे.

बाल कल्याण समितीने दिलेला राजीनामा आणि नवीन नियुक्ती करण्यासाठी लागणारा कालावधी यामुळे बाल कल्याण समितीतील सदस्यांची पदे रिक्त राहतात. तथापि, जिल्हामध्ये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची प्रकरणे प्रलंबित राहू नये तसचे बालकांचे हक्क अबाधित ठेवण्याच्या दृष्टिने या बालकांच्या प्रकरणी त्वरीत निर्णय घेणे आवश्यक आहे, अन्यथा सदर प्रकरणे प्रलंबित राहिल्याने त्याचा परिणाम बालकाच्या एकंदरीत विकासावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच बालकांच्या बाबतीत असणाऱ्या कायद्याचा विचार करता तसेच बाल हक्क संहिताचे In the best intertest of child हे तत्व विचारात घेता अशा प्रकारची कृती बालकाच्या हिताच्या दृष्टिने शासनाने केलेली आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

काळजी व संरक्षण करण्याची गरज असलेल्या बालकांच्या संदर्भात तीनपेक्षा कमी सदस्यांनी जे निर्णय घेतलेले आहेत ते कायदेशीर ठरतात काय, अशी समितीने साक्षीदरम्यान विचारणा केली असता, अशा प्रकरणांचा जिल्हाधिकारी आढावा घेत असून जे निर्णय टिकणारे नाहीत ते रद्द करण्यात आले असून, अशी बालके त्यांच्या पालकांकडे सुपूर्द करण्यात आलेली आहेत, असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

(iv) लेखापरिक्षणासाठी नमुन्यादाखल निवड केलेल्या नऊ पैकी चार बाल कल्याण समितीमध्ये मूळ दस्तऐवज (प्रकरणे नोंदवह्या, हमीच्या नोंदवह्या, अंतिम आदेशांच्या नोंदवह्या इत्यादी) ठेवले नव्हते, ज्यामुळे महाराष्ट्र बाल न्याय नियम २०११ च्या नियम ८ए चे उल्लंघन झाले.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात आयुक्तालयाचे दिनांक १५ जून २०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना मुल्यमापन करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत त्यानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडून त्याबाबतची खात्री करण्यात येत आहे. बाल कल्याण समितीने नियमानुसार दस्तावेज ठेवावे याकरीता ३१ बाल कल्याण समित्यांच्या कामकाजात मदत करण्यासाठी एकात्मिक बाल संरक्षण योजना अंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटरची नेमणूक करण्यात आलेली आहे. ज्या बाल कल्याण समित्यांनी आवश्यक ते दस्ताऐवज ठेवण्याबाबत कुचराई केलेली आहे, अशा सर्व समित्यावरील सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या आहेत, असे साक्षीदरम्यान समितीस अवगत करण्यात आले.

(v) महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या नियम ८(२३) नुसार प्रत्येक बाल कल्याण समितीने बाल काळजी संस्थांमधल्या प्रत्येक बालकाच्या प्रगतीचा वार्षिक आढावा घेणे आवश्यक असते, तथापि, लेखापरिक्षणाकरीता निवड केलेल्या नऊ पैकी चार बाल कल्याण समितींनी सन २०१०-१५ दरम्यान वार्षिक आढावा घेतला नव्हता. मुंबई शहर व परभणी येथील बाल कल्याण समितींमध्ये वार्षिक आढाव्याचे दस्ताऐवज ठेवले जात नव्हते तर अहमदनगर येथे वर्ष २०१३-१४ पासून पुढे वार्षिक आढावा घेतला गेला होता.

यावर सन २०१५ च्या अधिनियमातील कलम २७ (८) व कलम ३६ (४) मध्ये बाल कल्याण समितीचा आढावा घेण्याचा अधिकार जिल्हा मॅजिस्ट्रेट यांना आहेत. त्यानुसार सर्व जिल्हाधिकारी यांना अर्ध-शासकीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. बाल कल्याण समित्यांना तीन महिन्यांनी अहवाल सादर करण्याबाबत बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यासंदर्भात बाल कल्याण समिती त्यांना नमुना तयार करून देण्यात आलेला आहे. नवीन बाल कल्याण समितींचे यशदा, पुणे येथे सुरू असलेले प्रशिक्षण दिनांक १० मे, २०१८ रोजी संपणार आहे. दिनांक ११ मे, २०१८ रोजीपासून बाल कल्याण समित्या पूर्णवेळ कार्यरत होतील. त्यानंतर त्यांचे अहवाल उपरोक्तप्रमाणे सादर केले जातील, असे साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी सांगितले.

निवड समिती

बाल न्याय अधिनियमांच्या नियम ९१ नुसार राज्य शासनाने अधिकृत राजपत्रात अधिसूचीत करून सात सदस्य असलेली एक निवड समिती पाच वर्षासाठी गठीत करावी, या निवड समितीने राज्य बाल संरक्षण कक्ष किंवा राज्य शासनाला राज्य सल्लागार मंडळ किंवा जिल्हा सल्लागार मंडळावर नियुक्त करण्यासाठी एका क्रमनामिकेची निवड करून शिफारस करावयाची होती. तथापि, सप्टेंबर २०१५ पर्यन्त राज्य शासनाकडून एकही निवड समिती गठित करण्यात आली नव्हती.

उपरोक्त आक्षेपाच्या अनुषंगाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००७ मधील नियम ९१ नुसार निवड समितीचे गठन करण्यात आले नसल्याबाबत साक्षी दरम्यान समितीने विभागीय सचिवांकडे विचारणा केली असता उक्त नियमातील तरतुदी महाराष्ट्र राज्यास लागू नसून राज्यात सल्लागार मंडळ अस्तित्वात असल्यामुळे निवड समिती गठीत करण्यात आलेली नव्हती. उक्त मंडळावरील काही सदस्यांचे सदस्यत्व काही कारणामुळे रद्द केल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने नियमात तरतूद नसेल तरी देखील उपरोक्त नियम ९१ प्रमाणे निवड समिती गठीत करण्याबाबत न्यायालयीन प्रकरणात आदेश दिले. त्यानुरुप नविन नियमांत आवश्यक ती तरतूद करून माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निवड समितीचे गठन करण्यात आलेले आहे.

बाल न्याय मंडळ

(i) बाल न्याय अधिनियमाच्या कलम ४(२) नुसार, बाल न्याय मंडळामध्ये एका न्यायीक दंडाधिकाऱ्याचा आणि दोन समाजसेवकांचा सदस्य म्हणून समावेश असावा, ज्या ३० जिल्ह्यांमध्ये बाल न्याय मंडळ ही पूर्ण क्षमतेने काम करीत होती त्या व्यतिरिक्त पुणे, परभणी आणि बीड या जिल्ह्यांमध्ये या मंडळात दोन सदस्यांची तर अहमदनगर आणि जालना या जिल्ह्यांमध्ये एका सदस्याची कमतरता होती.

विभागाच्या अभिप्रायानुसार शासन अधिसूचना दि. ५ नोव्हेंबर, २०१५ अन्वये पुणे आणि बीड येथील बाल न्याय मंडळाच्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली असून दोन्हीही बाल न्याय मंडळे पूर्ण क्षमतेने सुरू आहेत. बाल न्याय मंडळ परभणी येथे नविन सदस्य नियुक्तीचा प्रस्ताव मागविण्यात आला असून यापूर्वी नियुक्त करण्यात आलेल्या सदस्यांकडून तूर्त बाल न्याय मंडळाचे कामकाज पाहिले जात आहे. बाल न्याय मंडळ अहमदनगर येथील दोन सदस्यांपैकी एका सदस्याच्या नामांकनास उच्च न्यायालयाने असहमती दर्शविली असल्याने बाल न्याय मंडळाच्या उक्त एका रिक्त पदासाठी अन्य पात्र सामाजिक कार्यकर्त्यांची नामांकने आयुक्तालयास सादर करण्याबाबत दि. १७ जुलै, २०१४ व दि. २६ नोव्हेंबर, २०१४ अन्वये जिल्हा महिला व बाल विकास विभाग अहमदनगर यांना स्मरणपत्र पाठविण्यात आली होती. अहमदनगर जिल्ह्याकरीता आता दोन नामांकने प्राप्त झाली आहेत. जालना सल्लागार मंडळाच्या दि. ३१ ऑगस्ट, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत बाल न्याय मंडळ जालना करीता दोन सामाजिक कार्यकर्त्यांची शिफारस करण्यात आली होती. त्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयामार्फत दि. ७ ऑक्टोबर, २०१३ अन्वये शासनास सादर करण्यात आला होता. तथापि, शासन अधिसूचना दि. ३ मे, २०१४ नुसार सामाजिक कार्यकर्त्यांची इतर दोन सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(ii) महाराष्ट्र बाल न्याय नियमाच्या नियम ६(९C) नुसार, विधीसंघर्षग्रस्त बालकांची चौकशी, पोलीसांकडून अंतिम अहवाल प्राप्त झाल्याच्या तारखेपासून चार महिन्याच्या (जो पुढे दोन महिन्यांकरीता वाढविता येतो) आत पूर्ण करावयाची असते. राज्यात २०१० मध्ये JJB कडे प्रलंबित असलेल्या २६,११६ प्रकरणांमध्ये घट होऊन एप्रिल २०१५ अखेरीस ती १४,७५३ एवढी राहीली. लेखापरिक्षणाकरीता निवड केलेल्या नऊ जिल्ह्यांपैकी तीन जिल्ह्यात, डिसेंबर २०१३ मध्ये असलेल्या २,६७६ प्रकरणांत वाढ होवून एप्रिल २०१५ च्या अखेरीस ती ३,१८८ इतकी झाली होती. बाल न्याय मंडळांकडून प्रलंबीत प्रकरणांचे कालावधीनिहाय विश्लेषण मागविणेत आले होते, जे जानेवारी २०१६ पर्यंत प्रतिक्षेत होते.

विभागाने आपल्या खुलाशात बाल न्याय मंडळाचे अध्यक्ष हे न्याय विभागाचे न्याय दंडाधिकारी असल्याने, शासनाने मुंबई उच्च न्यायालयास राज्यातील बाल न्याय मंडळाकडे असणाऱ्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत विनंती केली आहे, असे नमूद केले आहे.

(iii) महाराष्ट्र बाल न्याय नियमाच्या नियम ४ A(१०) नुसार, बाल न्याय मंडळाने राज्य शासनांस तसेच, मुख्य न्यायिक दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांना प्रलंबित प्रकरणांचे अर्धवार्षिक अहवाल त्यांच्या बैठकीत पुनर्विलोकनासाठी किंवा आवश्यकता असल्यास अतिरिक्त मंडळे गठीत करणेसाठी सादर करावयाचे असतात. वर्ष २०१०-१५ दरम्यान ३५ पैकी एकाही बाल न्याय मंडळाने कोणतेही अर्धवार्षिक अहवाल राज्य शासनास सादर केलेले नव्हते.

साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी सांगितले की, बाल न्याय मंडळांकडे एकूण १८,२०८ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी, १३,२२६ प्रकरणे ही तीन वर्षापेक्षा कमी कालावधीपासून प्रलंबित आहेत तर ३,७६९ प्रकरणे ही पाच वर्षांपासूनच्या कालावधीकरिता प्रलंबित आहेत. पाच ते दहा वर्षांपासूनच्या कालावधीकरीता सुमारे १,०१५ प्रकरणे प्रलंबित आहेत. उच्च न्यायालयाच्या स्तरावरील एक समिती बाल न्याय मंडळांकडील प्रलंबित प्रकरणांचा दर महिन्याला आढावा घेते आणि समितीची तीन महिन्यातून एकदा बैठक होते.

शिफारशी

३.२० (१) राज्य सल्लागार मंडळ

बाल काळजी संस्थांच्या वर्ष २०१०-२०१५ या कालावधीतील कामकाजाची संपादणूक लेखापरीक्षा करण्यात आली असता त्यामध्ये आढळून आलेल्या संस्थात्मक व्यवस्थेतील कमतरता या निश्चितच गंभीर स्वरुपाच्या आहेत.

बालगृहांची स्थापना आणि अनुरक्षण, साधन संपत्तीस चालना देणे, विधी संघर्षग्रस्त बालके त्याचप्रमाणे काळजी आणि संरक्षणाची गरज असलेली बालके अशा दोन्ही प्रकारच्या बालकांसाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि त्यांच्या पुनर्वसनासंदर्भातील उपाययोजना इ. बाबीसंदर्भात शासनास सल्ला देणे तसेच बाल कल्याण समित्या व बाल न्याय मंडळावरील सदस्यांच्या नियुक्त्यांकरिता शिफारशी करणे या उद्देशांकरिता राज्य सल्लागार मंडळाची स्थापना झालेली आहे. तथापि, माहे मार्च २०१० ते माहे डिसेंबर, २०१४ या कालखंडात राज्य सल्लागार मंडळाच्या झालेल्या एकूण १३ बैठकांमध्ये बाल कल्याण समित्या व बाल न्याय मंडळावरील सदस्यांच्या नियुक्ती पलीकडे कोणतेही कामकाज बाल

सल्लागार मंडळाने केलेले नाही. बालकांच्या संरक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन इत्यादि वर उल्लेखित बाबींसंदर्भात शासनास उपयुक्त सल्ला देण्याबाबत कोणतेही कामकाज सदरहू मंडळाकडून झालेले नाही. तसेच, नियमाप्रमाणे उक्त मंडळावर चार शासकीय आणि पाच अशासकीय सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक असताना तद्वतच उक्त मंडळावर निवृत्त सचिव वा निवृत्त न्यायाधिशांची 'अध्यक्ष' म्हणून निवड होणे आवश्यक असताना या मंडळावर फक्त तीन शासकीय सदस्यांची नियुक्ती करून महिला व बालकल्याण विभागाच्या प्रधान सचिवांना 'अध्यक्ष' म्हणून पदनिर्देशित करून या मंडळाचा कारभार चालविला गेला. ही बाब निश्चितच गंभीर व दखल पात्र आहे. जुन्या नियमांतर्गत सदरहू मंडळाचे गठन करण्यात आले असून, सन २०१५ च्या नवीन अधिनियमांतर्गत या मंडळाबाबत कोणतेही प्रावधान करण्यात आलेले नाही, हा विभागाने यासंदर्भात केलेला खुलासा पूर्णतः असमाधानकारक आहे. वास्तविक, वर्ष २०१० ते २०१५ या कालावधीत अस्तित्वात असलेल्या नियमांप्रमाणे राज्य सल्लागार मंडळाने काम करणे अपेक्षित व बंधनकारकच होते, याबाबत दुमत असूच शकत नाही. विभागाकडून यासंदर्भात कोणताही योग्य असा खुलासा प्राप्त झालेला नसून लेखापरिक्षणाच्या कालावधीतील राज्य सल्लागार मंडळाच्या कामकाजावर समिती असमाधान व्यक्त करते.

(ii) बाल कल्याण समिती

३.२१ बाल कल्याण समित्यांच्या कामकाजासंदर्भात लेखापरिक्षणादरम्यान तपासणी करताना समित्यांवर पुरेश्या संख्येत सदस्यांच्या नियुक्त्या केलेल्या नसणे, समित्यांनी बालकांच्या प्रलंबित प्रकरणांबाबतचे अर्ध वार्षिक अहवालच शासनास सादर केलेले नसणे, निर्धारित केलेल्या सदस्य संख्येपेक्षा कमी सदस्यांनी काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या संबंधातील अंतिम निर्णय घेणे, समित्यांनी मूळ दस्तऐवज, नोंद वह्या, हमीच्या नोंद वह्या, अंतिम आदेशाच्या नोंद वह्या इत्यादींचे जतन केलेले नसणे, बालकांच्या प्रगतीचा वार्षिक आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर न करणे, इत्यादि लेखापरिक्षणात आढळून आलेल्या त्रूटी या अतिशय गंभीर स्वरुपाच्या असून, बाल कल्याण समित्यांच्या मुलभूत कामकाजावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या आहेत. वास्तविक बालगृहातील बालकांची काळजी, संरक्षण, पुनर्वसन आणि बालकांच्या एकूणच प्रगतीच्या सनियंत्रणाच्या कामात जिल्ह्यातील बाल कल्याण समितीची भूमिका आत्यंतिक महत्वाची आहे. जिल्ह्यातील बालगृहांच्या कामकाजाची पूर्ण भिस्त बाल कल्याण समित्यांवर असते. असे असताना लेखापरिक्षणात मात्र या बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाच विदारक वास्तव समोर आलेले असून ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. विभागाने साक्षी दरम्यान यासंदर्भात केलेला खुलासा हा पूर्णतः असमर्थनिय असून समिती त्याबाबत अजिबात समाधानी नाही. राज्यातील बाल कल्याण समित्यांच्या कामकाजात कार्यक्षमतेचा पूर्णतः अभाव असून विभागाचे देखील या समित्यांच्या कामकाजावर पर्याप्त संनियंत्रण नसल्याबाबत समितीचे ठाम मत झाले असून समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत आहे.

साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे आता सर्व जिल्ह्यांतील बाल कल्याण समित्यांच्या पुनर्घटनांची कार्यवाही पूर्ण होऊन 'यशदा' या संस्थेद्वारे समित्यांना द्यावयाच्या प्रशिक्षणाचे काम देखील पूर्ण झालेले असून या समित्या आता अंतिमतः कार्यरत झालेल्या असतील. राज्यातील सर्वच बाल कल्याण समित्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन त्यामध्ये सुसूत्रता निर्माण होण्याच्या दृष्टीने व त्यांच्या कामकाजावर सातत्यपूर्ण निगराणी राहण्याच्या दृष्टीने सर्व बाल कल्याण समित्यांना त्यांच्या कामकाजासंदर्भातील त्रैमासिक अहवाल सादर करण्याबाबत सक्त सूचना देण्यात याव्यात. तद्वतच जिल्हा दंडाधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या जिल्हा तपासणी समितीने प्रत्येक तिमाहीतून एकदा तपासणीसह समितीच्या कामकाजाचे सनियंत्रण आणि पुनर्विलोकन करावे. त्याचप्रमाणे समितीच्या कामकाजातील सहभागाच्या आधारे समितीचे अध्यक्ष व सदस्य यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करून त्याचा अहवाल महिला व बाल विकास विभागास सादर करावा. त्याचप्रमाणे महिला व बाल विकास विभागाने देखील राज्यातील सर्व बाल कल्याण समित्यांच्या कामकाजावर स्वतंत्र यंत्रणेमार्फत त्यांच्या स्तरावर सातत्यपूर्ण व प्रभावी असे दुहेरी पर्यवेक्षण ठेवण्याकामी योग्य ती व्यवस्था करावी, अशी समिती आग्रही शिफरस करत आहे. शिफारशीनुरुप केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत उपलब्ध करून द्यावा.

(iii) निवड समिती

३.२२ बाल न्याय अधिनियम ९१ नुसार 'निवड समिती' गठित न करण्यात आल्याबाबत लेखापरिक्षणात घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत समितीच्या निदर्शनास आले की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००

तसेच सुधारित अधिनियम, २००६ नुसार शासनाने अनुक्रमे सन २००२ व सन २०११ मध्ये राज्यासाठी स्वतंत्र नियमावली लागू केली होती. यास्तव, बाल न्याय अधिनियम, २००७ मधील तरतूदी महाराष्ट्र राज्यास लागू नसल्याने 'नियम समिती' गठीत करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नव्हती. मात्र राज्यासाठी कार्यान्वित केलेल्या नियमावलीतील तरतूदीप्रमाणे राज्य सल्लागार मंडळाचे गठन करण्यात येऊन ते कार्यरत करण्यात आले होते. तथापि, उक्त मंडळावरील काही सदस्यांचे सदस्यत्व रद्द केल्यामुळे न्यायालयात गेलेल्या प्रकरणात न्यायालयाने 'निवड समिती' गठीत करण्यासंदर्भात आदेश दिले. सबब, त्यानुसार माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निवड समिती गठित करण्यात आलेली आहे. तसेच नविन अधिनियम, २०१५ अंतर्गत राज्याने सन २०१८ मध्ये लागू केलेल्या नवीन नियमावलीमध्ये 'निवड समितीचे' प्रावधान केलेले असून निवड समिती अस्तित्वात असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. जिल्ह्यातील बाल कल्याण समित्या व बाल न्याय मंडळांवर सदस्यांची निवड करण्याबाबतचे महत्वाचे कार्य या 'निवड समिती' ला करावयाचे असल्याने भविष्यकाळात निवड समिती ही पूर्ण कार्यक्षमतेने कार्यरत राहिल, याबाबत विभागाने आवश्यक ती दक्षता घ्यावी, अशी समिती शिफारस करत आहे.

(iv) बाल न्याय मंडळ

३.२३ बाल न्याय मंडळाच्या कामकाजासंदर्भात लेखापरिक्षणात नोंदविलेले आक्षेप हे अतिशय मूलभूत स्वरुपाचे असुन बाल न्याय मंडळांच्या कामकाजामधील नेमक्या त्रुटींवर बोट ठेवणारे आहेत. लेखापरिक्षणात पुणे, परभणी, बीड, अहमदनगर आणि जालना या जिल्ह्यांतील बाल न्याय मंडळांवरील सदस्यांची पदे रिक्त असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे नियमानुसार आवश्यक असुनही राज्यातील सर्व बाल न्याय मंडळांनी वर्ष २०१०-२०१५ या कालावधीत प्रलंबित प्रकरणांचे अर्धवार्षिक अहवाल मुख्य न्याय दंडाधिकारी किंवा मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांच्या बैठकीत पुनर्विलोकनासाठी सादर केलेले नाहीत, तसेच शासनास देखील सादर केलेले नाहीत. आणखी महत्वाची गंभीर बाब म्हणजे राज्यातील बाल न्यायालय मंडळांकडे एकूण सुमारे १८ हजार प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब साक्षी दरम्यान निदर्शनास आली. त्यामध्ये सुमारे १३ हजार २२६ प्रकरणे ही गेली सुमारे तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याचे, सुमारे ३ हजार ७६९ प्रकरणे ही गेल्या पाच वर्षांपासून प्रलंबित असल्याचे तर सुमारे १ हजार १५ प्रकरणे ही गेल्या सुमारे पाच ते दहा वर्षांपासून प्रलंबित असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. बाल न्याय मंडळाकडे प्रलंबित असलेल्या उपरोक्त प्रकरणांची आकडेवारी ही निश्चितच एक चिंतेचा विषय आहे.

वास्तविक, विधिसंघर्षग्रस्त बालकांसंबंधातील खटल्यांवर अभिनिर्णय करणे व खटले निकालात काढणे, अशा बालकांच्या प्रगतीबाबतचा अहवाल मागविणे, बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थांची तपासणी करणे, त्यामध्ये आवश्यकतेनुरुप सुधारणा सुचवून त्याचे अनुपालन करण्यास भाग पाडणे याच्यासारखे बालकांच्या हिताच्या दृष्टीने आत्यंतिक महत्वाची कार्ये या मंडळास पार पाडावयाची असतात. असे असताना समितीसमोर आलेल्या माहितीच्या आधारे राज्यातील बाल न्याय मंडळाच्या कामात भरीव सुधारणा करण्याबाबत खूपच वाव असल्याचे समितीचे मत झालेले आहे. विभागाचे देखील या मंडळाच्या कामकाजावर कोणतेही नियंत्रण नसल्याचेच समोर येते.

अतः राज्यातील बाल न्याय मंडळे पूर्ण क्षमतेने कार्यरत राहण्यासाठी राज्यातील बाल न्याय मंडळाचा जिल्हानिहाय आढावा घेऊन रिक्त असलेल्या पदांवर सदस्यांच्या तातडीने नेमणूका करण्याबाबत विभागाने योग्य तो पाठपूरावा करावा. तसेच, बाल न्याय मंडळांकडे प्रलंबित प्रकरणांची एकत्रित आकडेवारी पाहता ती खूपच मोठी आहे. या मंडळांकडील प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली एक समिती कार्यरत असल्याचे समितीस साक्षी दरम्यान अवगत करण्यात आले. उक्त समिती बाल न्याय मंडळांकडील सर्व प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेईलच. तथापि, प्रलंबित प्रकरणांचा त्वरेने निपटारा करावयाचा झाल्यास बाल न्याय मंडळाच्या बैठकांच्या वारंवारितेत लक्षणीय सुधारणा करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे. विशेषतः जी प्रकरणे तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित आहेत ती प्राथम्याने हाती घेऊन एका कालबध्द मर्यादेत त्यांचा निपटारा होणे आवश्यक असल्याचे प्रामुख्याने समितीचे मत आहे.

सबब, विभागाने बाल न्याय समित्यांकडील प्रलंबित प्रकरणांचा जिल्हानिहाय आढावा घेऊन प्रलंबिततेच्या प्रमाणानुसार त्या त्या जिल्ह्यांच्या बाल न्याय समित्यांच्या बैठकांच्या संख्येत पर्याप्त वाढ करण्याबाबत संबंधितांना सुचित करावे व राज्यभरातील या मंडळांकडील एकूण प्रलंबित प्रकरणांचा नजीकच्या कालावधीत शिघ्रगतीने निपटारा करण्याच्या

दृष्टीने विभागाने एक विशेष मोहिम हाती घ्यावी अशी समितीची आग्रही शिफारस आहे. शिफारसीनुरुप केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत उपलब्ध करून द्यावा.

परिच्छेद क्र. २.१.३.५ :- मान्यता नसलेल्या बाल काळजी संस्थांचे कामकाज

अभिप्राय

३.२४ बाल न्याय अधिनियमाच्या कलम ३४(३) मधील तरतूदीनुसार बाल काळजी गृहातील मुलांना सेवा पुरविताना संगोपनाचा किमान दर्जा राखण्याच्या उद्देशाने काळजी आणि संरक्षणाची गरज असलेली मुले दाखल करण्यात येणाऱ्या सर्व बाल काळजी संस्थांची नोंदणी करणे अनिवार्य असून अशाप्रकारे नोंदणी न केलेल्या बाल काळजी संस्थांमध्ये बालकांबरोबर मोठ्या प्रमाणावर झालेले गैरवर्तन आणि उपेक्षा यांच्या घटना लक्षात घेता केंद्रीय मंत्रालयाने माहे जुलै, २०१४ मध्ये ज्या संस्था काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी निवासाची सोय उपलब्ध करून देतात त्यांनी त्यांची बाल न्याय अधिनियमांतर्गत नोंदणी करण्याच्या जबाबदारी विषयी त्यांचे ध्यानाकर्षण करण्याबद्दल सर्व राज्य सरकारांना विनंती करून हे काम दोन महिन्यात पूर्ण करून याबाबतची माहिती केंद्रीय मंत्रालयाला सादर करण्याबाबत सूचित केले होते.

त्यानुसार आयुक्त, महिला व बाल विकास यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून शासकीय अनुदानीत/विनाअनुदानीत अशा राज्यातील सर्वच बाल काळजी संस्थांना माहे ऑक्टोबर, २०१४ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन दि. १५ डिसेंबर, २०१४ पर्यंत १८६५ बाल काळजी संस्थांनी ऑनलाईन नोंदणीसाठी आवेदने सादर केली होती. त्यापैकी १,२३० बाल काळजी संस्थांची संस्था चालविण्यासाठी बाल न्याय अधिनियमांतर्गत किंवा इतर दुसऱ्या अधिनियमांतर्गत आधीच नोंदणी झाल्याचे आढळून आले. अशाप्रकारे राज्यातील उर्वरित ६३५ बाल काळजी संस्था या बाल न्याय अधिनियमांतर्गत नोंदणीविना कार्यरत होत्या. उक्त बाब पाहता, राज्यात कुठल्याही वैध नोंदणीशिवाय कार्यरत असलेल्या बाल काळजी संस्थांचा शोध घेण्याबाबत महिला व बाल विकास विभागाने त्यांचे स्तरावर कुठलेही प्रयत्न केले नसल्याचे दिसून येते, असे आक्षेपात नमूद करण्यात आले आहे.

साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, दि. १३ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयानुसार त्रयस्त विभागामार्फत बाल गृहाची तपासणी करून उक्त तपासणी अहवालानुसार बाल गृहांची अ,ब,क,ड श्रेणीमध्ये वर्गवारी करण्याचे काम सुरू करण्यात आले. तथापि, दरम्यानच्या कालावधीत बालगृहे संस्था चालकांनी यास मा. न्यायालयात आव्हान देवून या प्रक्रियेवर मा. न्यायालयाचा स्थगिती आदेश मिळविला. तथापि, विभागाने न्यायालयात पाठपुरावा करून दि. ५ मे, २०१७ रोजी सदरहू स्थगिती आदेश उठविलेला आहे. स्थगिती आदेश उठविल्यानंतर विभागाने सुमारे २१४ संस्थांची मान्यता रद्द केलेली आहे.

तथापि, आता विभागाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत दि. ३ मार्च, २०१८ रोजी राज्याकरिता नव्याने नियमावली तयार करून बालगृहांच्या नोंदणीसाठी सुधारीत निकष तयार केलेले आहेत. नवीन नियमावली अंतर्गत संस्थांनी नव्याने अर्ज सादर करण्याकरिता दि. २८ मे, २०१८ ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली. मान्यता प्रदान करण्याच्या प्रक्रियेतही आता बदल करण्यात आले आहेत. संस्थांचे अर्ज प्रथम आता आयुक्तालयाकडे प्राप्त होतील. आयुक्तालय स्तरावर अर्जांची प्राथमिक तपासणी होऊन तद्नंतर पाच विभागांच्या सचिवांचा अंतर्भाव असलेली समिती उक्त अर्जांची फेरछाननी करेल व मंत्री महोदयांच्या मान्यतेने बालगृहांना अंतिम मंजुरी देण्यात येईल. जी बालगृहे नियमानुसार नसतील त्यांची मान्यता रद्द करण्यात येईल. बाल गृहांची दर सहा महिन्यांनी तपासणी करणे विभागावर बंधनकारक केले असून दरवर्षी बालगृहांच्या मंजुरीचे नुतनीकरण करणे आवश्यक करण्यात आले आहे. तथापि, बाल गृहांना मान्यता देताना ती पाच वर्षांसाठी दिली जाणार आहे.

शिफारशी

३.२५(१) बाल काळजी गृहातील मुलांना सेवा पुरवितांना संगोपनाचा किमान दर्जा राखण्याच्या उद्देशाने काळजी व संरक्षणाची गरज असलेली मुले दाखल करण्यात येणाऱ्या सर्व बाल काळजी संस्थांची बाल न्याय अधिनियमांतर्गत नोंदणी करणे बंधनकारक आहे. असे असतांना राज्यात एकूण ६३५ बाल काळजी संस्था नोंदणीविना कार्यरत असल्याचा गंभीर आक्षेप लेखापरिक्षणात नोंदविण्यात आलेला आहे. अनधिकृत संस्थांमध्ये बालकांसमवेत झालेले गैरवर्तन आणि उपेक्षांच्या घटना लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने केलेल्या सूचनेनुसार राज्यांतर्गत कार्यरत

असलेल्या सर्व संस्थांची नव्याने ऑनलाईन नोंदणी करण्याचे काम सुरू करण्यात आले. उक्त प्रयोजनार्थ विभागाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत दि. ३ मार्च, २०१८ रोजी राज्याकरीता नव्याने नियमावली तयार करून बालगृहांच्या नोंदणीसाठी सुधारीत निकष तयार केलेले आहेत. नवीन नियमावली अंतर्गत संस्थांनी नव्याने अर्ज सादर करण्याकरिता दि. २८ मे, २०१८ ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली. मान्यता प्रदान करण्याच्या प्रक्रियेतही आता बदल करण्यात आले आहेत. संस्थांचे अर्ज प्रथम आता आयुक्तालयाकडे प्राप्त होतील. आयुक्तालय स्तरावर अर्जांची प्राथमिक तपासणी होऊन तद्नंतर पाच विभागांच्या सचिवांचा अंतर्भाव असलेली समिती उक्त अर्जांची फेरछाननी करेल व मंत्री महोदयांच्या मान्यतेने बालगृहांना अंतिम मंजुरी देण्यात येईल. समितीस आश्वस्त केल्याप्रमाणे राज्यांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व संस्थांच्या पुर्ननोंदणीची उपरोक्त प्रक्रिया त्वरेने राबवून निकष व नियमांची पूर्तता न करणाऱ्या संस्थांची मान्यता तातडीने रद्द करण्यात यावी. तथापि, असे करताना नोंदणी रद्द करण्यात येणाऱ्या संस्थांमध्ये दाखल मुलांच्या संगोपनाच्या व पुनर्वसनाच्या कामात व्यत्यय येणार नाही, याची काळजी घेऊन अशा मुलांचे अन्य बालगृहात समायोजन करावे. समितीस आश्वस्त केल्यानंतर साधारणतः आता एक वर्षाचा कालावधी पूर्ण होत असल्याने ही प्रक्रिया निश्चितच पूर्ण झाली असेल अशी समितीची अपेक्षा आहे. यास्तव याबाबतची अद्ययावत माहिती समितीस एक महिन्यांत सादर करावी.

३.२६(२) नवीन नियमावलीनुसार पुर्ननोंदणी प्रक्रियेत बालगृहांना पाच वर्षांच्या कालावधीसाठी जरी मान्यता प्रदान करण्यात येणार असली तरी दरवर्षी नव्याने मान्यतेचे नूतनीकरण करावे लागणार आहे. तसेच प्रत्येक बालगृहांची दर सहा महिन्यांची तपासणी करणे विभागाने बंधनकारक केलेले आहे. समितीस अवगत केल्याप्रमाणे या प्रयोजनाकरीता विभागाने एक सक्षम अशी व्यवस्था/यंत्रणा उभारुन राज्यातील सर्व बालगृहे ही विभागाच्या निरंतन व शाश्वत निगराणी खाली राहण्याच्या दृष्टीने एक कृती आराखडा तयार करून याकामी आत्यंतिक संवेदनाशील व सजग राहावे. विभागाने याकामी एकूणच सर्वंकष व सर्वस्पर्शी असे धोरण तयार करावे व केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करावा.

परिच्छेद क्र. २.१.४.१ :- मुलभूत सुविधांच्या प्रमाणकांची अपर्याप्तता

अभिप्राय

३.२७ महाराष्ट्र बाल न्याय नियम, २०११ आणि महिला व बाल विकास विभागाच्या डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयात बाल काळजी संस्थांमध्ये द्यावयाच्या सुविधांबाबत वेगवेगळे विनिर्देश दिलेले आहेत. लेखापरिक्षणा दरम्यान लेखापरिक्षेने विभागीय अधिकाऱ्यांबरोबर नमुन्यादाखल निवड केलेल्या ९३ बाल काळजी संस्थांची संयुक्त तपासणी केली असता, निवड केलेल्या ९३ बाल काळजी संस्थांमध्ये शयनशाला होत्या मात्र त्यापैकी ५७ शयनशालांमध्ये विनिर्देशित प्रती बालक ४० चौ. फुट एवढी आवश्यक जागा नसणे; ९३ पैकी ३४ बाल काळजी संस्थांमध्ये वर्गखोल्याच नसणे तर उर्वरीत ५९ बाल काळजी संस्थांपैकी ३६ बाल काळजी संस्थांमध्ये दर २५ मुलांसाठी विनिर्दिष्ट असलेली ३०० चौ.फुटाची वर्ग खोली नसणे; ८३ बाल काळजी संस्थांपैकी ४४ संस्थांमध्ये कार्यशाळा नसणे तर उर्वरीत ३९ बाल काळजी संस्थांपैकी २३ मध्ये कार्यशाळेची जागा विनिर्दीष्टीत प्रती बाल काळजी संस्था ५०० चौ.फुट एवढी नसणे; ९३ बाल काळजी संस्थांपैकी ३५ बाल काळजी संस्थांमध्ये शौचालये विनिर्दीष्टीत सात मुलांस एक या आवश्यक प्रमाणात नसणे; ९३ बाल काळजी संस्थांपैकी २७ बाल काळजी संस्थांमध्ये विनिर्दीष्ट १० मुलांस एक या आवश्यक प्रमाणात स्वच्छतागृहे नसणे; ९३ पैकी ४५ बाल काळजी संस्थांमध्ये अग्नीशमन व्यवस्था नसणे इत्यादि गंभीर त्रुटी निदर्शनास आल्या. विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस सांगण्यात आले की, शासन निर्णय दि. २२ डिसेंबर, २०११ च्या परिशिष्ट अ मधील अनुक्रमांक ९ तसेच शासन निर्णय दि. १३ जुलै, २०१५ मध्ये नमूद निकषानुसार त्रयस्थ विभागामार्फत बालगृहांची तपासणी करून तपासणी अहवालानुसार अ,ब,क,ड श्रेणीमध्ये बालगृहांची वर्गवारी करण्यात आली. तथापि, विभागाने कारवाई सुरू करण्यापूर्वीच बालगृह संस्था चालकांनी मा. न्यायालयात यास आव्हान देऊन त्यावर स्थगिती आदेश मिळविला. उक्त स्थगिती आदेश मिळविण्यापूर्वी किती संस्थांवर कारवाई करण्यात आली अशी समितीने पृच्छा केली असता निकषांची पूर्तता न करणाऱ्या १९१ बालगृहांची मान्यता रद्द केल्याचे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

३.२८ लेखापरीक्षेने विभागीय अधिकाऱ्यांसमवेत लेखापरीक्षणाकरीता निवडलेल्या निवडक ९३ बाल काळजी संस्थांच्या संयुक्त पाहणीत महाराष्ट्र बाल न्याय नियम, २०११ व महिला व बाल विकास विभागाच्या माहे डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयातील बालगृहांना द्यावयाच्या सुविधांबाबतच्या विनिर्देशांचे मोठ्या प्रमाणांवर उल्लंघन झाल्याचे निदर्शनास येऊन त्यासंदर्भात लेखापरीक्षणात महत्त्वाचे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. त्यात प्रामुख्याने शयनशाळांकरिता अपूरी जागा, वर्ग खोल्यांचा अभाव, कार्यशाळांचा अभाव, शौचालये व स्वच्छतागृहे विनिर्दिष्टीत मुलांच्या पर्याप्त संख्येइतकी नसणे इ. गंभीर त्रुटीकडे बोट ठेवण्यात आलेले आहे. विभागाने शासन निर्णय दि. २२ डिसेंबर, २०११ व शासन निर्णय दि. १३ जुलै, २०१५ मधील नमूद निकषांप्रमाणे बालगृहांची प्रथम त्रयस्थ विभागामार्फत तपासणी करून तपासणी अहवालानुसार अ, ब, क, ड श्रेणींमध्ये बालगृहांची वर्गवारी केली. तथापि, काही संस्थांनी यासंदर्भात न्यायालयात प्रकरणे दाखल करून यास स्थगिती आदेश मिळवला होता. तथापि, विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान उक्त स्थगिती आदेश मा. न्यायालयाने माहे मे, २०१७ मध्ये उठविला असल्याचे समितीच्या निदर्शनास आणून देऊन त्यानंतर आवश्यक निकषांची पूर्तता न करणाऱ्या एकूण १९१ संस्थांची मान्यता रद्द केली असल्याचे समितीत कथन केले आहे.

लेखापरीक्षणा दरम्यान निवडक ९३ संस्थांची तपासणी करून लेखापरीक्षणात उपरोक्त असुविधांबाबतचे चित्र रेखाटले आहे. तथापि, राज्यातील सर्वच बाल काळजी संस्थांची जर तपासणी केली तर यापेक्षाही विदारक परिस्थिती समोर येण्याची शक्यता नाकरता येत नाही, असे समितीचे मत झालेले आहे. बालगृहांतील सेवासुविधा हा खरेतर एक सामाजिक जिव्हाळ्याचा विषय असून विभाग यासंदर्भात अतिव दक्ष असणे आवश्यक आहे. सबब, राज्यांतील सर्व बालगृहांमध्ये मुलांना विहित निकषांप्रमाणे मुलभूत सुविधा पुरविण्यात येत आहेत किंवा कसे याची खातरजमा करून घेण्यासाठी विभागाने एक विशेष तपासणी मोहिम सत्वर हाती घ्यावी. तपासणी दरम्यान विर्निदिष्ट मानकांपेक्षा अपूऱ्या मुलभूत सुविधा पुरविणाऱ्या संस्थांवर नोटीस बजावण्यात येऊन विशिष्ट कालावधीत पर्याप्त मुलभूत सुविधांची पूर्तता करण्याबाबत त्या संस्थांना बाध्य करावे. याउपरही सकारात्मक प्रतिसाद न देणाऱ्या संस्थांवर विभागाने कडक कारवाई करून प्रसंगी अशा संस्थांची मान्यता रद्द करण्यासारखी कारवाई करावी, अशी समितीची शिफारस आहे. समितीच्या शिफारशीनुसार विभागाने केलेल्या कारवाई संदर्भातील विस्तृत माहिती समितीस ३ महिन्यांत उपलब्ध करून द्यावी.

परिच्छेद क्र. २.१.४.२ :- कपडे आणि बाडबिस्तऱ्यांच्या प्रमाणकांचे पालन न करणे

अभिप्राय

३.२९ महाराष्ट्र बाल न्याय नियम ३६ अनुसार, राज्य शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार बालकांना कपडे आणि बाडबिस्तरा पुरवावयाचा होता. महिला व बाल विकास विभागाने कपड्यांकरिता म्हणजेच मुलांसाठी शर्ट व पॅण्ट तसेच मुलींसाठी सलवार कमीज, शाळेचा गणवेश, बुट/चप्पल, मोजे, दप्तर याकरिता तसेच बाडबिस्तऱ्यासाठी म्हणजेच गाद्या, उशा, बिछाने, चादरी इत्यादी करिताचे प्रमाण माहे ऑगस्ट, २००६ मध्ये विहित केलेले होते. तथापि, उक्त प्रमाणे हे फक्त शासनाने चालविलेल्या बाल काळजी संस्थांकरिताच लागू होते. लेखापरीक्षणासाठी शासनाने चालविलेल्या १३ व स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविल्या जाणाऱ्या ७० अशा एकूण नमुन्यादाखल निवड केलेल्या ८३ बाल काळजी संस्थांच्या दस्तऐवजांची लेखापरिक्षणा दरम्यान तपासणी केली असता वर्ष २०१०-१५ दरम्यान शासनाद्वारे चालविलेल्या १३ बाल काळजी संस्थांपैकी सर्वच बाल काळजी संस्थांमध्ये बाडबिस्तऱ्याच्या प्रमाणाचे संपूर्णतः पालन केले गेले नव्हते तर याच कालावधीत स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या ७० बाल काळजी संस्थांपैकी ६४ बाल काळजी संस्थांमध्ये बालकांना पुरविलेले कपडे तर ६५ बाल काळजी संस्थांमध्ये बालकांना पुरविलेला बाडबिस्तरा हा महिला व बाल विकास विभागाने विहित केलेल्या प्रमाणानुसार नव्हता. याबाबी निरीक्षण आणि संनियंत्रणातील अपर्याप्तता दर्शवित असून महाराष्ट्र बाल न्याय नियमांमध्ये तरतूद असूनही महिला व बाल विकास विभागाने स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या बाल काळजी संस्थांसाठी बाडबिस्तरा आणि कपड्यांचे कोणतेही प्रमाण विहित केले नव्हते, असे गंभीर निरीक्षण लेखापरीक्षणात नोंदविलेले आहे. विभागाच्या खुलाशाप्रमाणे शासन निर्णय दि. १३ जुलै, २०१५ मधील निकषानुसार त्रयस्थ विभागामार्फत बालगृहांची तपासणी करून तपासणी अहवालानुसार बालगृहांची अ,ब,क,ड श्रेणीमध्ये वर्गवारी करण्यात आली. मात्र विभागाने कारवाई सुरू करण्यापूर्वीच बालगृह संस्थांनी मा. न्यायालयात प्रकरण दाखल करून मा. न्यायालयाचा स्थगिती आदेश मिळविला.

विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी कथन केले की, जुन्या नियमांप्रमाणे बालकांना पुरवावयाच्या कपडे आणि बाडबिस्तऱ्यासंदर्भात निश्चित केलेली प्रमाणके ही फक्त शासनामार्फत चालविलेल्या बालगृह संस्थांना लागू होती. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविलेल्या बालगृह संस्थांकरिता जुन्या नियमात प्रमाणके निश्चित करण्यात आली नव्हती. मा. न्यायालयाने याप्रकरणात दिलेले स्थगिती आदेश आता उठविण्यात आले आहेत. तसेच आता केलेल्या नवीन सुधारित नियमांमध्ये शासकीय किंवा स्वयंसेवी असा भेदभाव न करता सर्वच संस्थांसाठी यासंदर्भात निकष निश्चित करण्यात आले आहेत.

शिफारस

३.३० लेखापरीक्षणासाठी नमुन्यादाखल निवड केलेल्या शासन संचलित १३ आणि स्वयंसेवी संस्थांद्वारे संचलित ७० अशा एकूण ८३ बाल काळजी संस्थांच्या दस्तऐवजांच्या तपासणीत महिला व बाल विकास विभागाने कपडे आणि बाडबिस्तऱ्याच्या विहित केलेल्या प्रमाणाचे सर्रास उल्लंघन झाल्याचा महत्त्वपूर्ण आक्षेप लेखापरीक्षणात नोंदविण्यात आला आहे. वर्ष २०१०-१५ दरम्यान शासन संचलित १३ पैकी सर्वच बाल काळजी संस्थांमध्ये बाडबिस्तऱ्यांच्या प्रमाणाचे पालन केले गेले नाही. तर स्वयंसेवी संस्था संचलित ७० पैकी ६४ बाल काळजी संस्थांमध्ये बालकांना पुरविलेले कपडे तर ७० पैकी ६५ बाल काळजी संस्थांमध्ये पुरविलेला बाडबिस्तरा विहित प्रमाणानुसार आढळला नाही. स्वयंसेवी संस्था संचलित संस्थांसाठी तर या प्रयोजनार्थ कोणतीही प्रमाणके महिला व बाल विकास विभागाने विहित न केल्याचे लेखापरीक्षणांत दिसून आले. विभागाने आपल्या खुलाशात, बालगृहातील बालकांना पुरवावयाच्या कपडे, बिछाना-बाडबिस्तारा याबाबत शासन निर्णय दि. १३ जुलै, २०१५ मधील निकषांनुसार प्रथम विभागामार्फत बालगृहाची तपासणी करून तपासणी अहवालानुसार अ,ब,क,ड श्रेणीमध्ये बालगृहांची वर्गवारी केली. तथापि, काही संस्थांनी यासंदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल करून त्यावर स्थगिती आदेश मिळवला, असे नमूद केले. तथापि, न्यायालयाचा उक्त स्थगिती आदेश न्यायालयाने मे, २०१७ मध्ये उठविला असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस साक्षी दरम्यान सांगितले. साक्षी दरम्यान, नवीन नियमांनुसार शासकीय अथवा स्वयंसेवी असा भेदभाव न करता सर्वच संस्थांना सारखेच निकष आता विहित करण्यात आले असल्याचे देखील विभागीय सचिवांनी पुढे कथन केले.

लेखापरीक्षणाच्या उद्देशाने नमुन्याकरिता निवडलेल्या उक्त ८३ संस्थांच्या तपासणीत सरासरी ९० टक्क्यांपेक्षा जास्त संस्थामध्ये कपडे आणि बाडबिस्तऱ्याच्या विहित प्रमाणकाचे सर्रास उल्लंघन झाल्याचे दिसते. जर संपूर्ण राज्यातील सर्वच संस्थांची तपासणी केली तर त्यामध्ये यापेक्षाही तीव्र स्वरुपाचे विदारक चित्र समोर येण्याची दाट शक्यता असल्याची समितीस आशंका आहे. लेखापरीक्षणातील यासंदर्भातील आक्षेप विभागाच्या बालकांप्रती असणाऱ्या उदासिनतेवर प्रखर प्रकाशझोत टाकणारे आहेत. बालगृहातील बालकांना पुरविण्यात येणाऱ्या कपडे, बाडबिस्तर यासारख्या मुलभूत सुविधा पुरविणे ही बाब जिव्हाळ्याची असून त्यासंदर्भातील कोणतीही तडजोड समिती कदापिही मान्य करणार नाही. सबब, राज्यातील सर्वच बालगृहांमध्ये बालकांना पुरविण्यात येणाऱ्या कपड्यांच्या व बाडबिस्तऱ्याच्या विहित प्रमाणकांचे पालन केले जात आहे किंवा कसे याची तपासणी करण्यासाठी देखील विभागाने एक विशेष मोहिम हाती घ्यावी. तपासणी दरम्यान ज्या संस्था विहित प्रमाणकानुसार बालकांना कपडे आणि बाडबिस्तऱ्याचा पुरवठा करीत नसतील अशा संस्थांना विहित प्रमाणकांचे अनुपालन करण्यास बाध्य करावे अन्यथा त्यांचेविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी. प्रसंगी उक्त संस्थांची मान्यता रद्द करण्याबाबत देखील विभागाने विचार करावा, अशी समितीची शिफारस आहे. समितीच्या शिफारशीनुसार यासंदर्भात विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा.

परिच्छेद क्र. २.१.४.३ :- पोषण आणि आहार यासाठी विहित केलेल्या प्रमाणातील अपर्याप्तता

अभिप्राय

३.३१ महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या तरतुदीनुसार बाल काळजी संस्थांमध्ये राहणाऱ्या बालकांसाठी आहाराचे प्रमाण राज्य शासनाने निश्चित करावयाचे होते. संतुलीत आणि पोषक आहाराच्या सुनिश्चितीसाठी आहाराचे प्रमाण हे पोषण आहार तज्ञांच्या सल्ल्यानुसार ठरवायचे होते. लेखापरीक्षणाकरिता नमुन्या दाखल निवड केलेल्या, शासनाद्वारे चालविल्या जाणाऱ्या १३ आणि स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या ८० अशा एकूण ९३ बाल काळजी संस्थांच्या दस्तऐवजांची तपासणी केली असता माहे ऑगस्ट २००६ मध्ये जारी केलेल्या निर्णयाव्दारे महिला व बाल विकास विभागाने शासनाद्वारे चालविल्या जाणाऱ्या बाल काळजी संस्थांसाठी आहाराचे प्रमाण विहित केलेले होते मात्र महाराष्ट्र बाल न्याय नियमांमध्ये तरतूद असतांनाही, स्वयंसेवी

संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या बाल काळजी संस्थांसाठी आहाराचे कोणतेही प्रमाण विहित करण्यात आलेले नसणे; माहे ऑगस्ट, २००६ मध्ये महिला व बाल विकास विभागाकडून जारी केलेल्या आहाराच्या प्रमाणामध्ये बालकाला त्याच्या वयानुसार किती उष्मांक द्यावे याचे प्रमाण विहीत केलेले नसणे; वर्ष २०१०-१५ दरम्यान शासनाव्दारे चालविल्या जाणाऱ्या १३ बाल काळजी संस्था पैकी एका बाल काळजी संस्थेने आहारात चिकन/मटण/मासे/अंडी आणि चार बाल काळजी संस्थेने दही/ताक दिलेले नसणे; स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या बाल काळजी संस्थांच्या वर्ष २०१०-१५ च्या साठा आणि आहार नोंदवह्यांच्या तपासणीत ७० बाल काळजी संस्थांपैकी ५४ बाल काळजी संस्थांमध्ये दही/ताक दिले नसल्याचे आढळणे तसेच शासनाव्दारे चालविल्या जाणाऱ्या बाल काळजी संस्थांसाठीच्या आहार प्रमाणात विहीत केले असूनही ८० पैकी १४ बाल काळजी संस्थांमध्ये दूध दिले गेले नव्हते आणि २४ बाल काळजी संस्थांमध्ये चिकन/मटण/मासे/अंडी दिली गेली नसल्याचे आक्षेपात नमूद करून अशा प्रकारे महाराष्ट्र बाल न्याय नियमांखाली आवश्यक असूनही स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या बाल काळजी संस्थांसाठी आहाराचे प्रमाण विहीत केले नसल्यामुळे, बालकांना संतुलित आणि पोषक आहार पुरविला जाण्याची खात्री होऊ शकली नसल्याबाबत लेखापरिक्षणात निरीक्षण नोंदविण्यात आलेले आहे.

विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान बालकांच्या पोषण आणि आहार यासाठी विहित करण्यात आलेली प्रमाणके ही फक्त शासकीय संस्थांसाठीच लागू असून उक्त प्रमाणके ही स्वयंसेवी संस्था संचलित संस्थांना त्यावेळी लागू नसल्याचे विभागीय सचिवांनी मान्य केले. तथापि, समितीच्या पुढे निदर्शनास आणून दिले की, आता बाल न्याय अधिनियम, २०१५ अधिनियमित झाला असून त्याअंतर्गत केंद्र शासनाने 'मॉडेल रुल्स' माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये प्रसिध्द केले असून त्यामध्ये आहाराचे प्रमाण विहित केलेले आहे. तसेच त्यानुरुप राज्य शासनाने देखील सन २०१८ मध्ये सुधारीत नियमावली तयार केली असून त्यानुसार आता सर्वच बालगृह संस्थांसाठी पोषण व आहारासंदर्भात एकसारखे निकष विहित करून लागू करण्यात आले आहेत.

शिफारस

३.३२ लेखापरिक्षणाच्या प्रयोजनार्थ नमून्या दाखल निवड केलेल्या शासन संचलित १३ आणि स्वयंसेवी संस्था संचलित ८० अशा एकूण ९३ बाल काळजी संस्थांच्या दस्ताऐवजांच्या तपासणीत गंभीर स्वरुपाच्या त्रुटी लेखापरिक्षणा दरम्यान निदर्शनास आल्या. महिला व बाल विकास विभागाकडून माहे ऑगस्ट, २००६ मध्ये जारी केलेल्या निर्णयाद्वारे आहारांच्या प्रमाणामध्ये बालकांना त्यांच्या वयानुसार किती उष्मांक द्यावे याचे प्रमाण नियमानुसार बंधनकारक असूनही निश्चित न करणे, महाराष्ट्र बाल न्याय नियमांमध्ये तरतूद असूनही स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या बाल काळजी संस्थांसाठी आहाराचे कोणतेही प्रमाण विहित न करणे यासारखे गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. नमून्या दाखल निवड केलेल्या शासन तसेच स्वयंसेवी संस्था संचलित अशा दोन्ही प्रकारच्या संस्थांपैकी काही संस्थांमध्ये चिकन/मासे/मटण/अंडी/दुध/दही/ताक दिले गेले नसल्याचे देखील लेखापरिक्षणात निदर्शनास आले. बालगृहांतील बालकांच्या पोषण आणि आहारांसारख्या मुलभूत आणि जिव्हाळ्याच्या तसेच बालकांच्या आरोग्याशी निगडीत अतिशय संवेदनशिल विषयाबाबत विभाग किती उदासिनतेने काम करत आहे याचेच हे द्योतक आहे.

विभागाच्या खुलाशाप्रमाणे बाल न्याय अधिनियम, २०१५ अंतर्गत केंद्र शासनाने Model Rules माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये प्रसिध्द केले असून त्यामध्ये आहाराचे प्रमाण विहित करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाचे उक्त Model Rules राज्याला लागू आहेत. त्यामुळे आता बालकांच्या संतुलित आणि पोषण आहाराच्या सुनिश्चिततेकरिता आहाराचे प्रमाण आणि वयानुसार बालकांना द्यावयाचा आहारातील उष्मांक इ. बाबी सर्वच संस्थांकरिता एकसमान लागू झालेल्या आहेत. सबब, लेखापरिक्षणात उपरोल्लेखित काही निवडक संस्थांमधील दृष्टीक्षेपात आलेल्या त्रूटींच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शासकीय तसेच स्वयंसेवी संस्था संचलित सर्वच संस्थांची तपासणी करणे आता नितांत गरजेचे असल्याचे समितीचे मत झालेले आहे. सबब, राज्यातील सर्वच बालगृहांमध्ये पोषण आणि आहार यासाठी विहीत करण्यात आलेल्या प्रमाणकांचे पालन केले जात आहे किंवा कसे याची तपासणी करण्याकरिता विभागाने एक धडक कृती कार्यक्रम तातडीने सुरू करावा. तपासणी अंती ज्या संस्थांकडून पोषण आणि आहारांसंदर्भातील प्रमाणकांचे पालन करण्याबाबत कुचराई झालेली असेल अशा संस्थांप्रती कोणताही दयाभाव न दाखविता अशा संस्थांच्या व्यवस्थापनांवर कडक कारवाई करावी आणि उक्त संस्थांची नोंदणी तातडीने रद्द करण्यात यावी.

तसेच बालकांच्या आहार व पोषणांबाबत विहित प्रमाणकांचे सर्व संस्थांकडून काटेकोरपणे पालन केले जात असल्याबाबत खातरजमा करण्यासाठी अशा संस्थांवर यासंदर्भात सातत्यपूर्ण व प्रभावी संनियंत्रण ठेवण्यासाठी विभागाने

एक समर्पित अशी यंत्रणा तातडीने कार्यान्वीत करावी, अशी समितीची शिफारस आहे. यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची अद्ययावत माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी.

परिच्छेद क्र. २.१.४.४ :- काळजी आणि संरक्षणाची आवश्यकता असलेल्या बालकांपासून विधिसंघर्षग्रस्त बालकांना वेगळे न ठेवणे.

अभिप्राय

३.३३ बाल न्याय अधिनियम, २००७ च्या नियम ४० अनुसार विधिसंघर्षग्रस्त बालके आणि काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची निवास व्यवस्था ही वेगवेगळ्या जागी असावी, अशी तरतूद आहे. महाराष्ट्र बाल न्याय नियमांत मात्र या संदर्भात वेगळी व्यवस्था असण्याबद्दल विहित केलेले नव्हते. बाल न्याय अधिनियमाच्या कलम ६८ अनुसार कुठल्याही बाबीवर जर राज्याने नियम केले नसतील तर बाल न्याय अधिनियम, २००७ लागु होण्याबाबत तरतूद आहे. असे असताना, लेखापरीक्षणा दरम्यान असे आढळून आले की, ९३ बाल काळजी संस्थांपैकी १० बाल काळजी संस्थांमध्ये विधिसंघर्षग्रस्त बालके आणि काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांची निवास व्यवस्था एकाच जागी केलेली होती.

विभागाच्या खुलाशाप्रमाणे, बऱ्याच निरिक्षण गृहात विधीसंघर्षग्रस्त बालकांची संख्या अत्यंत अल्प आढळून आली असून काही निरिक्षण गृहांमध्ये तर बालकांच्या संख्येपेक्षा कर्मचाऱ्यांची संख्या अधिक आढळून आली. निरिक्षण गृहातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील संपूर्ण खर्च हा शासन करीत असल्याने या कर्मचाऱ्यांच्या सेवा पूर्णपणे वापरात याव्यात म्हणून दिनांक २५ फेब्रुवारी, २००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व निरिक्षण गृहे ही निरिक्षण गृहे/बालगृहे म्हणून घोषित करण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला. तथापि, असे करताना 'विधी संघर्षग्रस्त बालके' व 'काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके' यांची स्वतंत्र निवास व्यवस्था असावी अशा सूचना निर्गमित केलेल्या होत्या.

निरीक्षणगृह हे एकाच संस्थेमार्फत कार्यरत असल्याने तसेच सदर संस्थेला निरीक्षणगृह/बालगृह अशा मान्यता असल्याने *विधीसंघर्षग्रस्त* आणि *काळजी व संरक्षणाची गरज असलेले* अशा दोनही प्रकारची बालके या संस्थेमध्ये दाखल होतात. त्यामुळे एकाच संस्थेमध्ये **विधीसंघर्षग्रस्त बालके** आणि **काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालके** यांच्यामध्ये भेदभाव केल्यास त्याचा परिणाम बालकांच्या मनावर होऊन या बालकांचे पुनर्वसन करण्यामध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी सांगितले की ज्या १० संस्थांची लेखापरिक्षणात तपासणी झाली त्या संस्थांवर दोन्ही प्रकारच्या बालकांसाठी वेगवेगळी व्यवस्था करणे बंधनकारकच होते. उक्त १० पैकी ९ संस्थांनी या दोन प्रकारच्या बालकांसाठी एकाच इमारतीत पण वेगवेगळी क्षेत्रे निश्चित केलेली होती. मात्र एका संस्थेने अशा प्रकारची वेगवेगळी व्यवस्था केलेली नव्हती. उक्त संस्थेला सन २०१७ मध्ये नोटीस देवून वेगवेगळी व्यवस्था करायला बाध्य केले आहे. विधी संघर्ष ग्रस्त मुले ही बाल गृहामध्ये अल्प कालावधीसाठी येत असतात. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार प्रकरणपरत्त्वे त्यांना पालकांकडे हस्तांतरीत करण्यात येत असते. मात्र काळजी व संरक्षणाची गरज असणारी मुले ही वयाच्या १८ वर्षेपर्यंत म्हणजेच दीर्घ कालावधीसाठी बालगृहात राहत असतात. विधी संघर्ष ग्रस्त बालकांची संख्या तुलनेने कमी असून त्यांच्या वास्तव्याचा कालावधी देखील अल्प असल्याने अशा मुलांना पूर्णपणे वेगळे ठेवणे संस्थांना शक्य झालेले नाही. मात्र ही बाब निश्चितच कायद्याचे उल्लंघन करणारी आहे. मात्र आता नविन अधिनियमाच्या तरतूदीनुसार वय वर्षे १६ ते १८ या वयोगटातील अशा मुलांना पूर्णतः वेगळे ठेवावयाचे आहे. उक्त प्रयोजनार्थ मुंबई, पुणे, नागपूर आणि नाशिक या चार ठिकाणी स्वतंत्र निरिक्षण गृहे उभारण्यासाठी विभागाने शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. तद्वतच आता बालगृहांच्या नविन प्रस्तावात उपरोक्त दोन्ही प्रकारच्या बालकांची स्वतंत्र निवास व्यवस्था करण्याचे विभागाने प्रयोजन केलेले आहे.

शिफारस

३.३४ महालेखाकारांनी लेखापरीक्षणात नोंदविलेले उपरोक्त आक्षेप हे आत्यंतिक महत्त्वाचे व गंभीर आहेत. काळजी आणि संरक्षणाची गरज असलेली बालके ही विधि संघर्षग्रस्त बालकांच्या संपर्कात आल्यास ती सहज प्रभावित होऊ शकतात. नेमकी हीच बाब टाळण्यासाठी उक्त दोन्ही प्रकारच्या मुलांना एकमेकांपासून वेगवेगळे ठेवण्याची कायद्यामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. असे असतांनाही लेखापरिक्षणाच्या उद्देशाने निवडलेल्या ९३ बाल काळजी

संस्थांच्या लेखापरिक्षणात ९३ बाल काळजी संस्थांपैकी १० बाल काळजी संस्थांमध्ये उपरोक्त दोन्ही प्रकारच्या बालकांची राहण्याची एकाच जागेत व्यवस्था केल्याचे निदर्शनास आले. एकाच संस्थेतील दोन्ही प्रकारच्या बालकांमध्ये भेदभाव करून त्यांच्या राहण्याची वेगळी व्यवस्था केल्यास त्यांच्या पुनर्वसनाच्या कामात अडचण निर्माण होईल हा विभागाचा खुलासा कदापीही स्विकारार्ह नसून ही बाब कायद्याच्या तरतूदींची सर्रास उल्लंघन करणारी ठरते. तद्वतच विधीसंघर्षग्रस्त बालकांची संख्या कमी असल्याने तसेच त्यांचे बालगृहातील वास्तव्य मर्यादीत कालावधीसाठी असल्याने संस्थांना अशा मुलांना पूर्णपणे वेगळे ठेवणे शक्य झाले नाही, हे विभागाचे म्हणणे देखील समितीस कदापि मान्य नाही. तसेच खुन, बलात्कारासारख्या गंभीर स्वरुपाच्या आरोपांतील मुलांना काळजी व संरक्षणाची आवश्यकता असणाऱ्या इतर सर्वसामान्य मुलांसमवेत ठेवणे ही बाब अधिनियमातील मुळ उद्देशालाच तिलांजली देणारी ठरते.

लेखापरिक्षणाकरीता नमून्या दाखल निवड केलेल्या संस्थांमध्ये आढळलेल्या उपरोक्त त्रुटी व अनियमितता राज्यातील इतर सर्वच संस्थांमध्ये थोड्या फार फरकाने अशाच आढळण्याची दाट शक्यता आहे. सबब, विभागाने राज्यातील सर्वच बालगृहांची एकवार पुनःश्च तपासणी करून विधीसंघर्षग्रस्त बालकांची राहण्याची व्यवस्था ही काळजी व संरक्षणाची गरज असणाऱ्या इतर सर्वसामान्य बालकांपेक्षा वेगळी केलेली असल्याबाबत खातरजमा करावी. ज्या संस्थांमध्ये अशा त्रुटी आढळून येतील अशा संस्थांना उपरोक्तप्रमाणे सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत बाध्य करावे अन्यथा त्यांचेविरुध्द योग्य ती कठोर कारवाई करावी.

साक्षी दरम्यान समितीला अवगत केल्याप्रमाणे १६ ते १८ वयोगटातील विधीसंघर्षग्रस्त मुलांकरीता मुंबई, पुणे, नागपूर व नाशिक या चार ठिकाणी प्रस्तावित केलेली 'संरक्षण गृहे' विभागाने पाठपूरावा करून शासनाकडून मंजूर करून घ्यावीत व शक्य तितक्या लवकर ती कार्यान्वित करावीत. तसेच समितीस आश्वस्त केल्याप्रमाणे यापूढील काळात बालगृहांचे प्रस्ताव मान्य करताना उक्त दोन्ही प्रकारातील बालकांना राहण्याच्या व्यवस्थेचे वेगवेगळे प्रयोजन केलेले आहे, याची खातरजमा करूनच प्रस्तावांना मंजूरी अदा करण्यात यावी किंबहुना याबाबीचा मंजुरीच्या प्रमुख निकषांमध्ये अंतर्भाव करावा, अशी समितीची आग्रही शिफारस आहे. शिफारशीनुरुप केलेल्या कार्यवाहीचा अद्ययावत अहवाल समितीस तीन महिन्यात उपलब्ध करून द्यावा.

परिच्छेद क्र. २.१.४.५ :- सुरक्षेतील त्रृटी

अभिप्राय

३.३५ महिला व बाल विकास विभागाने माहे डिसेंबर, २०११ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार, बाल काळजी संस्थेने बालकांच्या संरक्षण आणि सुरक्षेसाठी जागेभोवती भिंतीचे कुंपण घालावे आणि २४ तास सुरक्षा रक्षक आणि योग्य प्रकाश व्यवस्था ठेवणे आवश्यक आहे. लेखापरिक्षणासाठी निवड केलेल्या अहमदनगर, लातूर, मुंबई शहर, नागपूर, पुणे, परभणी, उस्मानाबाद आणि यवतमाळ या आठ जिल्ह्यांतील दस्तऐवजांची तपासणी केली असता ७७ बाल काळजी संस्थांपैकी २५ बाल काळजी संस्थांमधून वर्ष २०१०-१५ दरम्यान एकुण ११,६६८ बालकांपैकी ५५८ बालके फरार झाली होती. ५५८ बालकांपैकी फक्त ४० बालकांचा शोध लागला होता तर उर्वरीत ५१८ बालकांचा जून २०१५ पर्यंत शोध लागला नव्हता. पळून गेलेल्या बालकांची टक्केवारी नागपूर येथे सर्वाधीक ४७ टक्के होती तर त्या खालोखाल टक्केवारी पुण्याची ३३ टक्के होती. लेखापरिक्षेने विभागीय कर्मचाऱ्यांबरोबर केलेल्या संयुक्त निरीक्षणात, २५ बाल काळजी संस्थांपैकी २२ बाल काळजी संस्थांमधील सुरक्षा व्यवस्थेत सुरक्षा रक्षक उपलब्ध नसणे, कमी उंचीच्या कुंपणांच्या भिंती आणि कुंपणाच्या भिंतींना काटेरी तार नसणे इत्यादि गंभीर स्वरुपाच्या त्रुटी आढळल्या. २५ संस्थांपैकी शासनाद्वारे चालविल्या जाणाऱ्या चार आणि स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या तीन अशा एकूण ७ बाल काळजी संस्थांमध्ये वर्ष २०१०-१५ दरम्यान दर वर्षी मुले पळून गेली होती, जे अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांचा अभाव असल्याचे दर्शविते असे लेखापरिक्षणात आक्षेप घेण्यात आलेले आहेत.

विभागीय सचिवांनी साक्षी दरम्यान समितीस अवगत केले की, सुरक्षा रक्षकांची पदे आणि त्यांचे वेतन हे दोन विषय विभागासाठी खुपच जिकरीचे बनलेले होते. त्यातुन मार्ग काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळ, सुरक्षा रक्षक मंडळ आणि महाराष्ट्र सैनिक महामंडळ तसेच मेस्को या संस्थांकडून कंत्राटी पद्धतीने ही पदे घेण्याबाबत आता अनुमती देण्यात आली असून त्यातून ५१ सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. एकुण बालगृह संस्थांची संख्या पाहता नियुक्त करण्यात आलेले

५१ सुरक्षा रक्षक हे खुपच अपूरे असल्याचे समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले. सुरक्षा रक्षकांच्या वेतनावरील खर्च कशाप्रकारे भागविला जातो अशी समितीने विचारणा केली असता, शासकीय बालगृहातील सुरक्षा रक्षकांचे वेतन प्रशासकीय खर्चातून केले जाते तर अनुदानीत संस्थांच्या बालगृहातील सुरक्षा रक्षकांचे वेतन हे त्या संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमेतून भागविण्यात येत असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. ज्या संस्थांना निधी उपलब्ध करून देवूनही त्यांनी सुरक्षा रक्षक नेमण्याच्या कामी कुचराई केलेली आहे अशा एकूण २०० संस्थांवर विभागाने कारवाई केली असल्याचे समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले. साक्षी दरम्यान समितीच्या पुढे असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, शासकीय संस्थांद्वारे चालविल्या जाणाऱ्या बालगृहांमध्ये संरक्षक भिंत (Boundry Wall) उभारण्यात आलेल्या आहेत मात्र इतर संस्थांमार्फत चालविलेल्या सर्वच बालगृहांमध्ये संरक्षक भिंती उभारण्यात आलेल्या आहेत असे नाही. तथापि आता महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मध्ये सर्वच बालगृहांसाठी संरक्षक भिंती आवश्यक केलेल्या आहेत. बाल गृहांच्या नव्याने पुर्नमान्यता देण्याच्या प्रक्रियेत ज्या संस्था उक्त निकषाचे पालन करीत नसतील अशा संस्थांना मान्यता देण्यात येणार नाही. नविन बालगृहांना मान्यता देताना बायोमॅट्रिक, संरक्षक भिंत, पुरेशी सुरक्षा व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे इत्यादि गोष्टी आवश्यक करण्यात आलेल्या आहेत. तसेच फरार ५५८ मुलांपैकी न सापडलेल्या ५१८ मुलांसंदर्भात पोलीस एफ.आय.आर. दाखल केल्यानंतर ३८० मुलांचा शोध लागला असून उर्वरित मुलांचा शोध पोलिसांमार्फत सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले. ज्या २२ बालगृहांमध्ये सुरक्षा रक्षक आढळले नाही त्या संस्थांवर काय कारवाई करण्यात आली अशी समितीने पृच्छा केली असता उक्त संस्थांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्यात आलेले असल्याचे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

३.३६ महिला व बाल विकास विभागाच्या माहे डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयातील बालकांच्या संरक्षण आणि सुरक्षेसंदर्भातील विनिर्दीष्ट तरतूदींच्या आधारे लेखापरिक्षणाच्या प्रयोजनार्थ निवड केलेल्या अहमदनगर, लातूर, मुंबई शहर, नागपूर, पुणे, परभणी, उस्मानाबाद आणि यवतमाळ या जिल्ह्यांतील दस्तऐवजाची लेखापरिक्षणामध्ये तपासणी केली असता वर्ष २०१०-१५ दरम्यान ७७ बाल काळजी संस्थांपैकी २५ बाल काळजी संस्थांमधून एकूण ११,६६८ बालकांपैकी ५५८ बालके फरार झाली होती. पळून गेलेल्या बालकांची टक्केवारी नागपूर येथे सर्वाधिक ४७ टक्के अशी असून त्याखालोखाल पुणे येथे ३३ टक्के होती. लेखापरिक्षणा दरम्यान केलेल्या पाहणीत निवड केलेल्या २५ बाल काळजी संस्थांपैकी २२ बाल काळजी संस्थांमध्ये सूरक्षा रक्षक उपलब्ध नसणे, कमी उंचीच्या कुंपणाच्या भिंती, त्यांना काटेरी तार नसणे अशा सुरक्षा व्यवस्थेतील उणीवा आढळून आल्या. लेखापरिक्षणातील उपरोक्त आक्षेप हे अतिशय गंभीर स्वरुपाचे आहेत.

साक्षी दरम्यान, फरार ५५८ बालकांपैकी ४० बालकांचा शोध लागला होता. उर्वरित ५१८ बालकांसंदर्भात पोलिसांकडे FIR नोंदविल्यानंतर ३८० मुले सापडली असल्याचे समितीस सांगण्यात आले. हे जरी खरे मानले तरी बालगृहांतील सुरक्षा व्यवस्था ही अत्यंत विकलांग व खिळखिळी असल्याचे विदारक सत्यच समोर येते. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, सुरक्षा रक्षक महामंडळ, माजी सैनिकांचे महामंडळ तसेच मेस्को यांचेकडून कंत्राटी पद्धतीने सुरक्षा रक्षक नेमण्यास परवानगी देण्यात आली असून त्यानुसार ५१ सुरक्षा रक्षकांच्या नेमणूका करण्यात आल्याचे समितीस साक्षी दरम्यान सांगण्यात आले. शासकीय बालगृहांतील सुरक्षा रक्षकांच्या वेतनावरील खर्च हा प्रशासकीय खर्चातून तर अनुदानीत संस्थांच्या बालगृहातील सुरक्षा रक्षकांच्या वेतनाचा खर्च हा त्यांना देय असलेल्या एकत्रित अनुदानाच्या रकमेतून भागविला जातो असे समितीच्या निदर्शनास आले. शासनाची या प्रयोजनार्थ भरीव रक्कम खर्ची पडत असूनही बालगृहांच्या सुरक्षा व्यवस्थेतील हा कमालीचा ढिसाळपणा खचितच मनात उद्वेग निर्माण करणारा आहे.

निवडक ८ जिल्ह्यांतील ७७ बाल काळजी संस्थांची तपासणी करताना फरार बालकांची ५५८ इतकी संख्या समोर आलेली आहे. तर मग राज्यातील सर्वच बालगृहांमध्ये ढिसाळ सुरक्षा व्यवस्थेमुळे फरार बालकांची संख्या लक्षणीय असल्याची दाट शक्यता असल्याचे समितीचे मत झालेले आहे. सबब, राज्यातील शासकीय बालगृहांसहित सर्वच बालगृहांमध्ये सुरक्षा रक्षक नियुक्ती, बालगृहांभोवती पर्याप्त उंचीच्या कुंपणाच्या भिंती, उक्त भिंतींना काटेरी तारा लावणे, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे स्थापित करणे तसेच पुरेशी अशी प्रकाश व्यवस्था करणे या व त्याअनुषंगिक इतर सुरक्षा व्यवस्थेतील आवश्यक निकषांची पूर्तता होत आहे किंवा कसे याची खातरजमा करण्यासाठी विभागाने विशेष मोहिमेंतर्गत राज्यातील सर्वच बालगृहांची सखोल तपासणी करावी. जी बालगृहे सुरक्षा व्यवस्थे संबंधीत आवश्यक त्या सर्व निकषांची पूर्तता व कोटेकोर पालन करीत असतील अशाच बालगृहांना पुनःनोंदणी प्रक्रियेत तपासणीअंती अंतिम मान्यता प्रदान

करण्यात यावी. जी बालगृहे सुरक्षे व्यवस्थेची मानके पूर्ण करीत नसल्याचे आढळतील त्यांची मान्यता तातडीने रद्द करावी. नवीन बालगृहांना देखील मान्यता देताना सुरक्षा विषयक निकषांची परिपूर्णपणे पूर्तता करणाऱ्या बालगृहांनाच यापुढे विभागाने मान्यता द्यावी. याबाबतीत विभागाने अतिशय दक्ष असावे. तसेच ज्या बालगृहांमधून बालके फरार होण्याच्या घटना घडलेल्या आहेत अशा बालगृहांवर / त्यांच्या व्यवस्थापनांवर कडक कारवाई करावी व प्रसंगी त्यांची मान्यता रद्द करण्याबाबत देखील विचार करण्यात यावा. त्याचप्रमाणे एकंदरीतच बालगृहातील बालकांच्या फरार होण्याच्या सातत्यपूर्ण घटनांवर प्रभावीपणे पायबंद घालण्यासाठी राज्यातील बालगृहांतील सुरक्षा व्यवस्थेचा एक फेर आढावा घेऊन अभेद्य व भक्कम अशी सुरक्षा व्यवस्था निर्माण करण्यासाठी विभागाने नव्याने एक धोरण आखावे अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावा.

परिच्छेद क्र. २.१.४.६ :- मानसिकरित्या अपंग असलेल्या बालकांसाठीच्या गृहांचे अपर्याप्त कामकाज.

अभिप्राय

३.३७ अपंग व्यक्ति (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ च्या अंमलबजावणीसाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहायता विभाग (SJSA) हा नोडल विभाग असल्याचे विचारात घेऊन राज्यातील मानसिकरित्या अपंग असणाऱ्या बालकांसाठीच्या (MDC) १९ गृहांचे प्रशासकीय नियंत्रण महिला व बालविकास विभागाकडून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला हस्तांतरित करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाने माहे मे २०१२ ते जानेवारी २०१४ दरम्यान शासन निर्णय निर्गमित केले.

लेखापरिक्षणासाठी निवड केलेल्या ९३ बाल काळजी संस्थांमध्ये मानसिकरित्या अपंग असणाऱ्या बालकांसाठी (MDC) सहा बालगृहे होती. लेखापरिक्षणात असे आढळून आले की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे नियंत्रणाचे हस्तांतरण होऊनही मानसिकरित्या अपंग असणाऱ्या बालकांसाठीची (MDC) ही सहा गृहे संभाषणतज्ञ, चिकित्सालयीन मानसोपचारतज्ञ, व्यवसाय समुपदेशक, विशेष शिक्षक अशा प्रशिक्षित कर्मचाऱ्याविंना कार्यरत होती. वास्तविक, उक्त प्रशिक्षीत कर्मचारी भारतीय पुनर्वसन मंडळ अधिनियम, १९९२ अंतर्गत, मानसिकरित्या अपंग असणाऱ्या बालकांच्या बालगृहामध्ये कार्यरत असणे आवश्यक होते. सबब, मानसिकरित्या अपंग असणाऱ्या बालकांसाठीची ही बालगृहे सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा मुख्य हेतुच त्यामुळे असफल झाला आणि मानसिकरित्या अपंग असणाऱ्या बालकांच्या समस्या तशाच कायम राहिल्या. लेखापरिक्षणात पुढे असेही आढळून आले की, मानसिकरित्या अपंग असणाऱ्या बालकांसाठीची सामाजिक न्याय विभागाकडे वर्ग केलेली ही १९ बालगृहे अगोदरच पूर्ण कार्यक्षमतेने कार्यरत असल्याने वर उल्लेखित ६ सर्वसाधारण बालगृहात रहात असणाऱ्या ९४ मानसिकरित्या अपंग असलेल्या बालकांना MDC साठी विशेषत्वाने निर्धारित केलेल्या या १९ बालगृहांमध्ये सामावून घेता आले नाही.

तसेच लेखापरिक्षणात पुढे आणखी असेही आढळून आले की, मानसिकरित्या अपंग असलेल्या १८ वर्षांवरील ३० मुली पुणे येथील मुलींसाठीच्या एका शासकीय बाल काळजी संस्थांमध्ये राहात होत्या व त्याठिकाणी विशेष शौचालयाची आणि स्नानगृहाची सोय नव्हती. सबब, तेथे भोजनकक्षाचे विशेष शौचालय आणि स्नानगृहात रुपांतर करण्यात आले होते तर शयनशालेचा वापर जेवणासाठी आणि झोपण्यासाठी करण्यात येत होता. प्रादेशिक उपायुक्त, पुणे यांनी या मुलींच्या आवश्यक काळजी आणि पुनर्वसनासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्याबाबत माहे जुलै, २०१४ मध्ये सादर केलेल्या प्रस्तावाची आयुक्त, महिला व बालविकास विभाग, पुणे यांनी माहे सप्टेंबर, २०१५ पर्यंत साधी दखलही घेतली नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे मानसिकरित्या अपंग असणाऱ्या मुलांच्या विशेष गरजा पूर्ण होण्याच्या दृष्टीने फक्त अशा मुलांकरिता प्रत्येक जिल्ह्यात किमान एक बालगृह उघडण्याचा सामाजिक न्याय विभागाचा निर्णय माहे जून, २०१५ पर्यंत फलद्रूप झाला नव्हता. महालेखापरिक्षणात नोंदविण्यात आलेले आक्षेप हे अत्यंत महत्वपूर्ण व मूलभूत स्वरुपाचे आहेत.

शिफारस

३.३८ राज्यातील मानसिकरित्या अपंग असणाऱ्या बालकांसाठीच्या (MDC) १९ गृहांचे प्रशासकीय नियंत्रण महिला व बाल विकास विभागाकडून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे (SJSA) हस्तांतरीत करण्यासाठी

महिला व बाल विकास विभागाने माहे मे, २०१२ ते माहे जानेवारी, २०१४ या दरम्यान शासन निर्णय निर्गमित केले होते. लेखापरिक्षणादरम्यान नमून्या दाखल निवड केलेल्या ९३ बाल काळजी संस्थांमधील मानसिकरित्या अपंग असणाऱ्या बालकांसाठीच्या (MDC) सहा बालगृहांची तपासणी करण्यात आली असता ही गृहे संभाषणतज्ञ, मानसोपचारतज्ञ, व्यवसाय समुपदेशक, विशेष शिक्षक अशा प्रशिक्षित कर्मचाऱ्यांविनाच कार्यरत होती. त्याचप्रमाणे मानसिकरित्या अपंग असलेल्या बालकांसाठी (MDC) असलेली उपरोक्त १९ बालगृहे ही अगोदरच पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याने उक्त सहा सर्वसाधारण बालगृहात राहात असलेल्या ९४ (MDC) ना उक्त १९ बालगृहांत समावून घेता आले नाही. तसेच १८ वर्षांवरील ३० MDC मुली पुणे येथील मुलींसाठीच्या एका शासकीय बाल काळजी संस्थेमध्ये राहत होत्या. तिथे विशेष शौचालय आणि स्नानगृहाची सोय नव्हती. महालेखापरिक्षणातील उपरोक्त आक्षेप हे आत्यंतिक गंभीर व महत्वपूर्ण आहेत.

साक्षी दरम्यान सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी, सदरहू १९ बालगृहांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया ही सन २०१३-१४ मध्ये सुरू झाली मात्र या १९ बालगृहांचे सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरण हे एका सार्वजनिक हित याचिकेवरील सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे प्रत्यक्षात दि. २२ जून, २०१५ पासून झाले असल्याचे कथन केले. हस्तांतरणाच्या दोन वर्षांच्या कालावधीत उक्त १९ बालगृहे नेमक्या कोणत्या विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत होती याबाबत दोन्ही विभागांमध्ये समन्वयाचा पूर्णतः अभाव व तितकीच संभ्रमावस्था समितीस आढळून आली. मतिमंद मुलांसारख्या सामाजिक दृष्ट्या अतिव जिव्हाळ्याच्या असलेल्या विषयाबाबत दोन्ही विभाग संपूर्ण उदासिन असल्याचे समिती येथे सखेद नमूद करते.

सामाजिक न्याय विभागाकडे मतिमंद प्रवर्गाचे बालगृह हस्तांतरित झाल्यावर उक्त ९४ MDC ना दरवर्षी टप्याटप्याने १४ अनुदानित मतिमंद प्रवर्गाच्या बालगृहांत समाविष्ट करण्यात आल्याबाबत साक्षी दरम्यान समितीस आश्वस्त करण्यात आले आहे. विभागाने उपरोक्त ९४ MDC चे वर्षनिहाय टप्याटप्याने केलेल्या समायोजनाबाबतची सविस्तर माहिती समितीस तातडीने उपलब्ध करून देण्यात यावी.

३.३९ तसेच लेखापरिक्षणात नमूद करण्यात आलेलया मुंढवा, पुणे येथील मुलींसाठीच्या शासकीय बालगृहातील १८ वर्षे वयावरील ३० MDC ना कर्जत येथील बालगृहात हस्तांतरीत करून मतीमंद मुलां-मुलींच्या संदर्भात सामाजिक न्याय विभागाचे प्रामुख्याने दायित्व असल्याने तसेच मतिमंद मुलांकरिता लागणारे आवश्यक ते प्रशिक्षित कर्मचारीवृंद या विभागाकडे उपलब्ध असल्याने कर्जत येथील बालगृहाची जबाबदारी सामाजिक न्याय विभागाने घ्यावी. याप्रकरणी महिला व बाल विकास विभाग तसेच सामाजिक न्याय विभाग या विभागांच्या सचिवांनी एकत्र बसुन योग्य त्या समन्वयाने उपरोक्त ३० MDC चा प्रश्न अंतिमः निकाली काढावा अशी समितीची आग्रही शिफारस असून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत उपलब्ध करून द्यावी.

३.४० मतिमंद मुलांकरिता प्रत्येक जिल्ह्यात किमान एक बालगृह असणे खरे पाहता नितांत आवश्यक आहे. सामाजिक न्याय विभागाने तसा आशयाचा प्रस्ताव तयार करून मान्यतेकरिता वित्त विभागाकडे पाठविला असता वित्त विभागाने तो अमान्य केल्याचे साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आणले गेले. मानसिकदृष्ट्या अपंग असलेल्या बालकांचे संरक्षण व संवर्धन हा खरं पाहता सामाजिक दृष्ट्या अत्यंत जिव्हाळ्याचा व संवेदनशिल असा विषय असल्याने सामाजिक न्याय विभागाचे व पर्यायाने शासनाचे प्रत्येक जिल्ह्यात किमान एक बालगृह असे खऱ्या अर्थाने धोरणच असणे अपेक्षित व आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता सामाजिक न्याय विभागाने तशा आशयाचा पुनःश्च एक प्रस्ताव तयार करून वित्त विभागास सादर करावा व सदरहू प्रस्ताव शासनाकडून मंजूर करून घेण्याबाबत आवश्यक तो सर्व पाठपुरावा करावा.

३.४१ तथापि, उपरोक्त प्रमाणे सर्व जिल्ह्यांमध्ये मतीमंद मुलांकरिता बालगृहे कार्यान्वित होण्याकरीता निश्चित काही कालावधी लागणार असल्याने दरम्यानच्या कालावधीत पर्यायी व्यवस्था म्हणून समितीस आश्वासित केल्याप्रमाणे सामाजिक न्याय विभागाने अस्तित्वात असलेल्या मतिमंद अनुदानित बालगृहांच्या क्षमतेत गरजेनुरुप वाढ करण्याबाबत तसेच १८ वर्षांवरील मतिमंद मुलामुलींचे पुनर्वसन करण्यासाठी नवीन ५ मतिमंद बालगृहे संलग्न कार्यशाळा सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव तातडीने तयार करून वित्त विभागास सादर करावेत व उक्त प्रस्तावांच्या मंजुरीसाठी आवश्यक तो सर्व पाठपूरावा करावा. शासनाने देखील या प्रस्तावाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

३.४२ तसेच आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांच्या धर्तीवर मतीमंद मुलांसाठी बांधावयाची बालगृहे, मतीमंद मुलांकरीता लागणारे आवश्यक साहित्य या व तदनुषंगिक प्रयोजनांसाठी 'सीएसआर' निधीचा वापर करता येऊ शकेल किंवा कसे याबाबतची शक्यता विभागाने तपासून त्यादृष्टीने विभागाने आवश्यक ते सर्व सकारात्मक प्रयत्न करावेत, अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

३.४३ उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करून कार्यपूर्तीचा अद्ययावत अहवाल समितीस ३ महिन्यांत सादर करावा.

परिच्छेद क्र. २.१.४.७ :- सहवासिंना व्यावसायिक प्रशिक्षण न देणे

अभिप्राय

३.४४ महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या नियम १६(९) आणि २९ (४) नुसार बाल काळजी संस्थांमध्ये राहणाऱ्या सहवासींना, प्रशिक्षकांकडून किंवा बाह्य स्त्रोतांकडून उपयोगी, आधुनिक आणि व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देणे बंधनकारक आहे. वर्ष २००७-१२ या दरम्यान बाल काळजी संस्थांच्या सहवासींना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात न आल्याविषयी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या, अहवालाच्या (सामान्य आणि सामाजिक क्षेत्र) परिच्छेद ४.१.१४.१ मध्ये भाष्य करण्यात आले होते. असे असतांनाही सन २०१०-१५ या दरम्यान देखील लेखापरिक्षणासाठी निवड केलेल्या ८३ बाल काळजी संस्थांच्या संयुक्त तपासणीत मागील वर्षाच्या तुलनेत कुठलीही लक्षणीय सुधारणा लेखापरिक्षकांना दिसून आली नाही. ८३ बाल काळजी संस्थांपैकी ४२ बाल काळजी संस्थांमध्ये (शासनाकडून चालविलेल्या नऊ आणि स्वयंसेवी संस्थांकडून चालविलेल्या ३३) २०१०-१५ दरम्यान प्रशिक्षण सुविधेची व्यवस्था न केल्याने (गृहांतर्गत किंवा खाजगी संस्थांद्वारे) नियोजित २,३७१ मुलांपैकी एकालाही व्यावसायिक प्रशिक्षण दिले न गेल्याचे निदर्शनास आले. उर्वरित ४१ बाल काळजी संस्थांमध्ये, या बाल काळजी संस्थांमध्ये राहणाऱ्या सरासरी १,५१३ मुलांपैकी फक्त ७३५ मुलांना म्हणजेच फक्त ४९ टक्केच मुलांना प्रशिक्षण दिले गेल्याचे आढळून आले. मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण न दिल्यामुळे फक्त महाराष्ट्र बाल न्याय नियमांचे उल्लंघन झाले आहे असे नाही तर, त्यांना लाभकारी रोजगार प्राप्त होण्याच्या शक्यता वाढण्यासाठीच्या संधीपासून मुले वंचित राहिली असे गंभीर निरीक्षण लेखापरिक्षणात नोंदविण्यात आले आहे.

विभागीय सचिवांनी साक्षी दरम्यान समितीस अवगत केले की, काळजी आणि सरंक्षणाची गरज असणाऱ्या बालगृहातील मुलांची नियमित शिक्षणाकरीता जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये किंवा जवळच्या खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळांमध्ये नोंदणी करण्यात येत असते. वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत त्यांनी १०वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करावे अशी अपेक्षा असते. तथापि, वयाच्या साधारण १६ व्या वर्षापर्यंत अशी मुले १०वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करतात. त्यानंतर त्यांच्या त्यांच्या क्षमतेनुसार अशी मुले १२वी पर्यंतचे शिक्षण नियमित शिक्षण संस्थांमधून पूर्ण करतात. आता विभागाने निरीक्षण गृहे, विशेषगृहे, अनुरक्षणगृहे व शासकीय बालगृहांमधील मुलांसाठी नियमित शिक्षणासमवेत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत व्यावसायिक प्रशिक्षण देण्याकरीता सन २०१६ मध्ये सामंजस्य करार केलेला आहे. उक्त करारानुसार आवश्यक निकषांची पूर्तता करणाऱ्या सर्व मुलांना शासनाकडून निधी भरून व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते. जी मुले 'अनाथ' असल्याचे प्रमाणपत्र धारण करतात अशा मुलांना प्रवेशामध्ये आरक्षण लागू करण्यात आले आहे.

शिफारस

३.४५ लेखापरिक्षकांनी लेखापरीक्षणात नमूद केलेले आक्षेप अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. वास्तविक महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या नियम १६(९) व २९(४) नुसार बाल काळजी संस्थांमध्ये राहणाऱ्या सहवासींना, प्रशिक्षकांकडून किंवा बाह्य स्त्रोतांकडून उपयोगी, आधुनिक आणि व्यावसायाभिमुख प्रशिक्षण देण्याबाबत तरतूद आहे. तथापि, लेखापरिक्षणाच्या उद्देशाने नमुन्यादाखल निवड केलेल्या ८३ बाल काळजी संस्थांपैकी वर्ष २०१०-१५ दरम्यान शासन संचलित ९ तर स्वयंसेवी संस्था संचलित ३३ अशा ४२ बाल काळजी संस्थांमध्ये प्रशिक्षणाची व्यवस्था न केल्याने एकूण २,३७१ मुले व्यावसायिक प्रशिक्षणापासून वंचित राहिली तर उर्वरित ४१ बाल काळजी संस्थांमध्ये राहणाऱ्या १,५१३ मुलांपैकी फक्त ७३५ मुलांनाच प्रशिक्षण दिले गेले. याचा अर्थ निम्मी मुले व्यावसायिक प्रशिक्षणापासून वंचित राहिली. विशेष म्हणजे माहे मार्च, २०१२ मध्ये संपलेल्या वर्षासाठीच्या अहवालात सुद्धा लेखापरिक्षणात हेच आक्षेप नोंदविलेले असतांना देखील पुढील काळात याबाबत कोणतीच सुधारणा झाली नसल्याचेच आढळून आले आहे. यासंदर्भात समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.

साक्षी दरम्यान समितीस अवगत करण्यात आले की, मुले वयाच्या साधारणतः १८ वर्षांपर्यंत बालगृहात राहत असून वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत मुले साधारणतः १० वी पर्यंतचे शिक्षण नियमित शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेऊन पूर्ण करत असतात. याकरीता शासनातर्फे तशी व्यवस्था केली जाते. हे जरी खरं असलं तरी मुले बालगृहामध्ये असताना ते घेत असलेल्या नियमित शिक्षणास व्यावसायिक शिक्षणाची (उदा.- पार्लर प्रशिक्षण, मेहंदी प्रशिक्षण, शिलाई, ज्वेलरी, पेपर बॅग्ज तयार करणे इत्यादी) जोड दिल्यास मुले वयाची १८ वर्ष पूर्ण केल्यानंतर बालगृहातून बाहेर पडल्यानंतर ती स्वतःचा चरितार्थ उत्तम प्रकारे चालवू शकण्याकरिता सक्षम होऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊन एक चांगले जिवनमान जगू शकतील. तथापि, महाराष्ट्र बाल न्याय नियमांमागील नेमका हाच स्तुत्य व प्रामाणिक हेतू विभागाच्या उदासिनतेमुळे वा नाकर्तेपणामुळे फलद्रूप होऊ शकलेला नाही, असे समिती येथे सखेद नमूद करते. राज्यातील इतरही सर्वच संस्थांमध्ये मुलांना व्यावसायिक शिक्षण देण्याबाबत यापेक्षाही काही वेगळी परिस्थिती असेल असे समितीला वाटत नाही.

सबब, राज्यातील सर्वच बालगृहांतील बालकांना नियमित शिक्षणासमवेत व्यावसायिक शिक्षण प्रदान करण्याकरिता शासकीय बालगृहांसह इतर संस्थांना देखील उत्प्रेरित तथा प्रोत्साहित करण्यासाठी विभागाने विशेष प्रयत्न करावेत. त्यासाठी विभागाने एक सर्वंकष कृती आराखडाच तयार करून त्याची त्वरेने अंमलबजावणी करावी, अशी समिती आग्रही शिफारस करीत आहे. समितीच्या शिफारशीनुसार विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस २ महिन्यांत अवगत करण्यात यावे.

परिच्छेद क्र. २.१.४.८ :- बाल काळजी संस्थांमधून मुक्त केलेल्या मुलांचे अपर्याप्त पुनर्वसन

अभिप्राय

३.४६ बालकांची विशेषगृहे/बाल गृहांतून मुक्तता झाल्यावर अनुरक्षण गृहे त्यांची काळजी घेतात जेणेकरून त्यांना सचोटीने, उद्योगी आणि उपयोगी जीवन जगता येईल. महाराष्ट्र बाल न्याय नियम, २०११ च्या नियम १८ (२) आणि (४) मध्येही १८ वर्षांवरील मुलांसाठी अनुरक्षण गृहे प्रस्थापित करण्याविषयी तरतूद आहे. शासनाद्वारे चालविल्या जाणाऱ्या सहा आणि स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या तीन अशा एकूण राज्यातील नऊ अनुरक्षणगृहांच्या लेखापरिक्षणादरम्यान असे आढळून आले की, शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या सहा अनुरक्षण गृहांपैकी चार अनुरक्षण गृहांमध्ये ४०० बालकांना सामावून घेण्याची क्षमता असताना देखील २०१२-१५ दरम्यान निकृष्ट सुविधा आणि पर्याप्त पायाभूत सुविधांच्या अभावामुळे या चार अनुरक्षण गृहांमध्ये फक्त २२ ते ४१ टक्केच मुले प्रत्यक्षात रहात होती. परिणामी, या चार अनुरक्षण गृहांनी विविध शासकीय, अशासकीय, खाजगी आणि इतर सामाजिक अभिकरणांशी प्रभावी समन्वय साधून अशा मुलांना समाजात एकरूप करून त्यांचे पुनर्वसन करावयाचे असूनही मोठ्या प्रमाणात ते साध्य होऊ शकले नव्हते. त्याचप्रमाणे महिला व बाल विकास विभागाने, माहे डिसेंबर, २०१३ मध्ये मुलांच्या पुनर्वसनाची भविष्यातील योजना आखण्याच्या हेतुने १,१०७ बाल काळजी संस्थांकडून बाल काळजी संस्थांमध्ये राहणारी १६ ते १८ वयोगटातील मुलांची संख्या, गेल्या पाच वर्षांत बाल काळजी संस्था सोडलेली मुले आणि त्यांच्या पुनर्वसनाच्या स्थिती इ. विषयीची माहिती मागितली होती. तथापि, माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यंत १,१०७ बाल काळजी संस्थांपैकी ७४० बाल काळजी संस्थांकडून ही माहिती प्रलंबित होती. तसेच, १,१०७ बाल काळजी संस्थांपैकी ३६७ बाल काळजी संस्थांनी ज्या ३९० अनाथ मुलांना अनुरक्षण गृहांमध्ये प्राथम्याने प्रवेश द्यावयाचा होता त्यांचा स्थिती दर्शक अहवाल सादर करूनही संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी या अनाथ मुलांना अनुरक्षण गृहांमध्ये दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी कोणतीही कार्यवाही सुरू केली असल्याचे दर्शविणारे कोणतेही पुरावे लेखापरिक्षणादरम्याने आढळले नव्हते.

यावरून, बाल काळजी संस्थांमधून मुक्त केलेल्या किंवा मुक्त होण्याची शक्यता असणाऱ्या मुलांच्या पुनर्वसनाचा प्रश्न जिल्हा पातळीवर किंवा वरिष्ठ (Apex) पातळीवर गंभीरपणे हाताळला गेला नव्हता हे स्पष्ट होते असे गंभीर निरीक्षण लेखापरिक्षणात नोंदविण्यात आलेले आहे.

साक्षीदरम्यान समितीस कथन करण्यात आले की, बालगृहातील काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या ज्या बालकांचे योग्य प्रकारे पुर्नवसन झाले नाही अथवा जी बालके पूर्णपणे अनाथ आहेत अशा १८ ते २१ वयोगटातील बालकांना बाल कल्याण समितीमार्फत अनुरक्षण गृहामध्ये प्रवेश दिला जातो. शासन संचलित एकूण ४ अनुरक्षण गृह असून स्वयंसेवी संस्थांमार्फत संचलित ३ अनुरक्षण गृहे आहेत. त्यापैकी १ संस्था बंद झालेली आहे. मुलांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर त्यांचा बालगृहातील कालावधी संपतो. त्यानंतर अशा मुलांना बाल कल्याण समितीसमोर हजर केले जाते. बाल कल्याण समितीमार्फत

अशा मुलांना बालगृहात राहायचे की बालगृहाच्या बाहेर जायचे याबाबत त्यांची इच्छा जाणून घेतली जाते. ज्या मुलांना बाल गृहाच्या बाहेर जाण्याची इच्छा असेल अशी मुले नेमकी कुठे जाणार किंवा त्यांची काळजी नेमके कोण घेणार याबाबतची माहिती घेऊन त्याची नोंद केली जाते. त्यानंतर बाल कल्याण समितीच्या अनुमतीनेच बालकांना बालगृहातुन मुक्त केले जाते. जी मुले अनुरक्षण गृहामधील प्रवेशास संमती दर्शवितात अशा मुलांच्या प्रवेशाची प्रक्रिया लगेच सुरू केली जाते. त्यावर, ज्या मुलांना अनुरक्षण गृहात राहायचे नाही अशा मुलांकडून त्यासंदर्भात लेखी हमी (Under taking) घेऊनच त्यांना बालगृहातुन मुक्त केल्यास याबाबत अधिक सुस्पष्टता येईल असे समितीने सुचित केले असता विभागाने यापुढील काळात अशाप्रकारचे हमीपत्र घेण्याबाबत सकारात्मकता दर्शविली.

शिफारस

३.४७ बालगृहातील बालकांनी वयाची १८ वर्षे पूर्ण केल्यानंतरही ज्या बालकांचे पालनपोषण करण्यासाठी कोणीही नाही किंवा जी पूर्ण निराश्रीत आहेत अशा मुलांसाठी अनुरक्षण गृहे प्रस्थापित करण्यात आलेली आहेत. उक्त बालकांना सचोटीने, उद्योगी आणि उपयोगी जीवन जगता यावे या शुद्ध हेतूने ही अनुरक्षण गृहे चालू असतात. सद्यःस्थितीत शासकीय चार आणि स्वयंसेवी संस्था संचलित तीन अनुरक्षक गृहे आहेत. तथापि, लेखापरिक्षणादरम्यान शासनाच्या चार अनुरक्षण गृहांमध्ये ४०० बालकांना सामावून घेण्याची क्षमता असतांना देखील पर्याप्त पायाभूत सुविधांच्या अभावामुळे तसेच इतर निकृष्ट दर्जाच्या सुविधांमुळे सुमारे २२ ते ४१ टक्केच मुले राहत होती. लेखापरीक्षणातले हे आक्षेप अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहेत. तसेच, माहे डिसेंबर, २०१३ मध्ये महिला व बालविकास विभागाने १,१०७ बाल काळजी संस्थांकडून गेल्या पाच वर्षात बाल काळजी संस्था सोडून गेलेली मुले आणि त्यांच्या पुनर्वसनाची स्थिती याविषयी माहिती मागवली असता ऑक्टोबर, २०१५ पर्यंत १,१०७ पैकी ७४० बाल काळजी संस्थांनी उक्त माहितीच महिला व बालविकास विभागाला पाठविलेली नाही. उर्वरीत ३६७ बाल काळजी संस्थांनी त्यांचेकडील ३९० अनाथ मुलांचा स्थिती दर्शक अहवाल सादर करूनही संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी मुलांना अनुरक्षण गृहांमध्ये दाखल करण्यासंदर्भात कोणतीही प्रक्रिया सुरू केलेली नव्हती. आक्षेपात उपस्थित केलेल्या उपरोक्त बाबी खरोखरच चिंताजनक आहेत. विभागाच्या निष्क्रियतेमुळे तसेच नकारात्मक प्रवृत्तीमुळे अनुरक्षण गृहे प्रस्थापित करण्यामागील शासनाचा मूळ उद्देशच त्यामुळे फलद्रुप होऊ शकलेला नाही, असे समितीचे मत झालेले आहे. ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. सबब, विभागाने एक कालबद्ध कार्यक्रम हाती घेऊन शासन संचलित तसेच स्वयंसेवी संस्था संचलित सर्वच अनुरक्षण गृहांची सखोल तपासणी करून आवश्यक त्या सर्व सोईसुविधा तसेच पर्याप्त पायाभूत सुविधांची उपलब्धता आहे किंवा कसे याची खातरजमा करावी. अपुऱ्या सोईसुविधा असणाऱ्या अनुरक्षक गृहांना एका ठराविक कालमर्यादेत पर्याप्त सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बाध्य करावे.

तसेच विभागाने पुनश्च एकदा सर्व बाल काळजी संस्थांकडून गेल्या पाच वर्षात बाल काळजी संस्थांमधून मुक्त करण्यात आलेली मुले आणि त्यांच्या पुनर्वसनाच्या स्थिती याविषयी आवश्यक ती माहिती संकलित करून त्याचा सखोल अभ्यास करून यापुढील काळात बाल काळजी संस्थांमधून बाहेर पडणाऱ्या मुलांच्या पुनर्वसनासंदर्भात एक बृहत आराखडा त्वरेने तयार करून त्याची सुयोग्य अंमलबजावणी करावी, अशी समितीची शिफारस आहे. यासंदर्भात विभाग स्तरावरुन करण्यात आलेली कार्यवाही समितीस तीन महिन्यांत अवगत करण्यात यावी.

परिच्छेद क्र. २.१.४.९ :- अनाथ प्रमाणपत्रे जारी करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी न करणे.

अभिप्राय

३.४८ वयाच्या १८ वर्षानंतर बाल काळजी संस्था सोडणारी अनाथ मुले कुठल्याही कायदेशीर अधिकारपत्राच्या अभावी, विविध शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक फायद्यांपासुन वंचित राहतात. या अनाथ मुलांना येणाऱ्या अडचणी विचारात घेता, महिला व बालविकास विभागाने माहे जून, २०१२ मध्ये एक शासन निर्णय जारी करून **बाल कल्याण समिती** (CWC) व **बाल न्याय मंडळ** (JJB) यांनी जारी केलेल्या प्रवेश आदेशात 'अनाथ' म्हणून घोषीत केलेल्या मुलांना अनाथ प्रमाणपत्रे जारी करण्यात यावीत असा निर्णय घेतला.

मात्र माहे सप्टेंबर, २०१२ ते फेब्रुवारी, २०१५ दरम्यान अनाथ प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी १६ जिल्ह्यांमधील १७ बाल काळजी संस्थांनी त्यांच्या संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत पाठविलेले ८८ प्रस्ताव आयुक्त, महिला व बालविकास यांनी पार्श्वभूमी पत्रिका, छायाचित्र, बाल कल्याण समिती / बाल न्याय मंडळ यांचे प्रवेश आदेश इत्यादी उपलब्ध

नाहीत अशा विविध कारणांनी परत पाठविले होते. परिणामी सप्टेंबर, २०१५ पर्यंत ८८ मुलांना अनाथ प्रमाणपत्रे जारी केली गेली नव्हती. अनाथ प्रमाणपत्रे जारी न करण्यासाठी शासनाने प्रामुख्याने, बाल काळजी संस्थांमध्ये प्रवेश घेताना बाल कल्याण समित्या व बाल न्याय मंडळांनी त्यांचेकडून जारी करण्यात आलेल्या दाखल आदेशात 'अनाथ' असे नमूद केले नव्हते, बाल काळजी संस्थांमध्ये प्रवेश घेतल्यानंतर मुले अनाथ झाली होती, ही कारणे दिली होती. मात्र महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या नियम ८ (१२) नुसार बाल काळजी संस्थांमध्ये प्रवेश घेतेवेळी बाल कल्याण समितीने मुलांच्या माता-पिता किंवा पालकांचा पूर्ण तपशील प्रपत्र VIII मध्ये नमूद करणे आवश्यक असल्याने उक्त कारण पटणारे नव्हते असे आक्षेपात नमूद करण्यात आले आहे. तसेच जून, २०१२ मध्ये महिला व बालविकास विभागाने शासनास निर्णय आखताना, एखादे मूल त्याच्या बाल काळजी संस्थेच्या वास्तव्यादरम्यान अनाथ होवू शकते ही शक्यता विचारात घ्यायला हवी होती आणि त्याजोगे अनाथ प्रमाणपत्र जारी होण्यातील विलंब टाळावयास हवा होता असेही पुढे लेखापरिक्षणात निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

विभागाच्या खुलाशामध्ये, दि. १६ जुन, २०१२ रोजीच्या शासन निर्णयाच्या तरतुदीप्रमाणे बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळ यांच्यामार्फत प्रवेशितांना संस्थेमध्ये दाखल करण्यासाठी देण्यात यावयाच्या आदेशामध्ये **अनाथ** असल्याचा निर्देश असणे आवश्यक करण्यात आले. तथापि, सदरहू शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी बालक अनाथ असल्याबाबतचा दाखल आदेशात उल्लेख नमूद करण्याबाबत कोणत्याही सूचना बाल कल्याण समिती वा बाल न्याय मंडळ यांना दिलेल्या नसल्यामुळेच प्रस्तुत अडचण उद्‌भवली आहे. याचा विचार करूनच शासनाने दि. ६ जुन, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनाथ प्रमाणपत्र देण्यासाठी निकषांमध्ये काही बदल केलेले आहेत. त्यानुसार आता प्रवेशितांचे आई-वडील हयात नसल्याबाबतची खात्री संबंधीत यंत्रणेने करणे व त्याबाबतचे संस्थेचे अधीक्षक यांचे प्रमाणपत्र जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी प्रमाणित करावे. त्यानंतर संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीने लाभार्थी अनाथ असल्याचे चौकशी अंती प्रमाणित करून देणे आवश्यक आहे, असे नमूद करण्यात आले.

साक्षी दरम्यान, बालक अनाथ असल्याची प्रक्रिया निश्चित किती कालावधीत पूर्ण करावयाची आहे, त्याबाबत कोणतीच तरतुद नसल्याचे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात दि. २ एप्रिल, २०१८ रोजी आता नविन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यामध्ये ही प्रक्रिया ४५ दिवसांत पूर्ण करण्याचे बंधन घालण्यात आलेले आहे, असे सांगितले. तसेच उक्त नवीन शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार प्रमाणपत्र देण्याच्या पद्धतीत कालापव्यय टाळण्यासाठी सुधारणा करण्यात आलेली असून सुधारित प्रक्रियेनुसार आता कोणताही अर्ज आयुक्तालयाकडे जाणार नाही. अनाथ प्रमाणपत्र देण्याबाबत बाल कल्याण समितीची आता मुख्य भूमिका आहे. बाल कल्याण समिती अर्जाची तपासणी व छाननी करून आपली शिफारस संबंधीत विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास विभाग यांच्याकडे पाठवेल. बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास यांचेकडून अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येईल. शिफारस अमान्य करण्यात येऊन अनाथ प्रमाणपत्र नाकारण्यात आल्यास विभागीय उपायुक्त यांचेकडून कारणासहीत सदर अर्ज बाल कल्याण समितीकडे परत पाठविण्यात येईल. प्रमाणपत्राच्या अनुषंगाने जर काही तक्रार असल्यास या संदर्भात आयुक्त, महिला व बाल विकास हे अपिलीय प्राधिकारी राहतील.

शिफारस

३.४९ लेखापरीक्षणातील उपरोक्त आक्षेप हे आत्यंतिक मुलभूत व महत्वाचे आहेत. माहे सप्टेंबर, २०१२ ते फेब्रुवारी, २०१५ या दरम्यान अनाथ प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी १६ जिल्ह्यांमधील एकूण १७ बाल काळजी संस्थांनी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्यामार्फत आयुक्त, महिला व बालविकास यांचेकडे पाठविलेले ८८ प्रस्ताव विविध कारणांनी परत पाठविण्यात आले. परिणामी माहे सप्टेंबर, २०१५ पर्यंत उक्त ८८ मुलांना 'अनाथ' प्रमाणपत्रे देण्यात येऊ शकली नव्हती. दि. १६ जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे 'बाल कल्याण समिती' व 'बाल न्याय मंडळ' यांचेमार्फत बालकांना संस्थेमध्ये दाखल करण्यासाठी देण्यात येत असलेल्या दाखल आदेशामध्येच प्रवेशित अनाथ असल्याचा उल्लेख असणे आवश्यक केलेले आहे. तथापि, उक्त शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी अशा प्रकारच्या कार्यवाही संदर्भात 'बाल कल्याण समिती' वा 'बाल न्याय मंडळ' यांना विवक्षित आदेश निर्गमित न झाल्याने सदरची परिस्थिती निर्माण झाली असल्याचा विभागाचा खुलासा समितीस मान्य नाही. वास्तविक महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या नियम ८ (१२) नुसार बाल काळजी संस्थांमध्ये प्रवेश घेते वेळी बाल कल्याण समितीकडून प्रपत्र VIII मध्ये बालकाच्या माता-पिता किंवा पालकांचा पूर्ण तपशील भरणे आवश्यक आहे. तथापि, बाल कल्याण समिती स्तरांवर

अशा प्रकारची कार्यवाही केली न गेल्यामुळेच ही सर्व परिस्थिती उद्‌भवलेली आहे व याचा नाहक त्रास उक्त ८८ बालकांना भोगावा लागलेला आहे, समिती यासंदर्भात नाराजी व्यक्त करते.

साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून शासनाने आता दि. ६ जून, २०१६ रोजीचा नवा शासन निर्णय करून त्याअन्वये बालकांना अनाथ प्रमाणपत्र देण्याबाबतचे सुधारीत निकष व कार्यपद्धती विहित केला. खरे पाहता, अनाथ बालकांना शासकीय/स्वयंसेवी संस्थांच्या बालगृहातून बाहेर पडताना त्यांचे जवळ जातीचे प्रमाणपत्र नसल्याकारणाने त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक सवलती तसेच अनुदान व विशेष लाभ मिळण्याबाबत त्यांच्या भावी आयुष्यात अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून 'अनाथ' असल्याचे प्रमाणपत्र निर्गमित करावयाचे आहे. हा शुद्ध हेतू लक्षात घेऊन यापुढील काळात वर उल्लेखित शासन निर्णयान्वये विहित केलेल्या सुधारीत निकष व कार्यपद्धतीचे विभागाने आत्यंतिक काटेकोरपणे पालन करावे व शासकीय/ स्वयंसेवी संस्थांमधून यापुढील काळात बाहेर पडणारी अनाथ मुले प्रमाणपत्रावाचून वंचित राहणार नाहीत यासाठी योग्य ती सर्व दक्षता घ्यावी. तसेच एखादा बालक शासकीय/स्वयंसेवी संस्थेत दाखल झाल्यानंतर जर तो अनाथ झाला तर कोणती कार्यपद्धती अंगिकारण्यात यावी या संदर्भात देखील शासनाने योग्य ते धोरण तातडीने ठरवावे अशी समितीची आग्रही शिफारस आहे. समितीच्या शिफारशीनुरुप केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांत सादर करावा.

परिच्छेद क्र. २.१.४.१० :- बाल काळजी संस्थांमध्ये अधीक्षकांची कमतरता.

अभिप्राय

३.५० बाल काळजी संस्थांचे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी बाल काळजी संस्थेचा अधीक्षक हा महत्त्वाचा कार्यकारी अधिकारी असून तो बाल काळजी संस्थेच्या संस्थात्मक कार्याचे कार्यक्रमांचे आणि कामकाजाचे नियोजन, अंमलबजावणी आणि समन्वय साधणे; मुलांना चांगल्या दर्जाचा आणि योग्य प्रमाणात आहार देणे, मुलांना त्यांच्या नैसर्गिक आणि गरजेनुसार शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण मिळेल याची सुनिश्चिती करणे; मुलांना प्रेम, ममता देणारे आणि काळजी घेणारे घरगुती वातावरण देणे आणि नियम आणि विनियमांच्या कक्षेत राहून शक्य त्या सर्व पद्धतीने बालहक्कांची खात्री व रक्षण करणे आणि संस्थेत सुरक्षित पिण्याचे पाणी, योग्य स्वच्छता आणि आरोग्य राखणे, बालकांच्या स्वास्थ्याची पुरेशी काळजी घेतली जाईल याची खात्री करणे इत्यादींसाठी जबाबदार असतो.

लेखापरिक्षणादरम्यान माहे मार्च २०१५ पर्यंत शासनाद्वारे चालविल्या जाणाऱ्या सर्व ४३ बाल काळजी संस्थांमध्ये अधीक्षकांच्या महत्त्वाच्या पदांवर ४२.३ टक्के इतकी लक्षणीय कमतरता होती. शासनाकडून चालविलेल्या बाल काळजी संस्थांपैकी लेखापरिक्षणाकरिता नमुना म्हणून निवड केलेल्या १३ बाल काळजी संस्थांमध्ये, मार्च २०१५ पर्यंत अधीक्षकांचे महत्वाचे पद ३८ टक्क्यांपर्यंत रिक्त होते. तसेच, १३ पैकी पाच बाल काळजी संस्थांमध्ये अधीक्षकाचे पद पाच ते आठ वर्षे या काळाकरीता रिक्त होते. स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या व वेतन आणि वेतनेतर प्रयोजनासाठी १०० टक्के अनुदान प्राप्त होत असलेल्या ४४ पैकी ४३ बाल काळजी संस्थांमध्ये अधीक्षक हे महत्त्वाचे पद दोन ते नऊ वर्षाच्या कालावधीसाठी ४२.३० टक्के प्रमाणात रिक्त होते. उपरोक्त आक्षेप निश्चितच मुलभूत व महत्त्वाचे आहेत.

विभागाने आपल्या खुलाशात, महिला व बाल विकास विभागांतर्गत गट-ब संवर्गातील सरळ सेवेच्या कोट्यातील १४७ पदासंबंधीची निवड यादी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासनास प्राप्त झाल्याने यादीत समावेश असलेल्या शासकीय संस्थेत कार्यरत असलेली वर्ग २ ची पदे भरण्याबाबत आयुक्तालयाचे पत्र क्र. ४९८६, दि. १४/९/२०१६ व अ.शा. पत्र क्र.५७६६,दि.२७/१०/२०१६ अन्वये शासनास कळविणेत आलेले आहे. सदर उमेदवारांच्या चारित्र्य पडताळणी, वैद्यकीय तपासणी इ.बाबत संबंधितांकडून अहवाल मागविण्यात आला आहे, असे नमूद केले आहे.

साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, बाल गृहांमध्ये अधीक्षक वर्ग-२ ची एकूण २६ पदे आहेत. त्यापैकी ११ पदे कार्यरत आहेत तर १५ पदे रिक्त आहेत. सदरहू पदे ही निवृत्तीमुळे रिक्त झाली असून विभागाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे ४५ पदे भरण्याबाबत मागणीपत्र सादर केलेले आहे. त्यावर, विभागाच्या खुलाशात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झालेल्या निवड यादीतील १४७ उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली किंवा कसे अशी पृच्छा केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सदरहू १४७ पदे ही संवर्ग पदे आहेत. या संवर्ग पदातून 'सिडीओ वर्ग-२' व 'अधीक्षक' या दोन पदांवर सामायिक नियुक्त्या होतात. सिडीओ या पदांची खुपच कमतरता असल्याने

१४७ उमेदवारांच्या निवड यादीतून सिडीओंची प्राधान्याने आदिवासी विकास विभागात नियुक्ती करण्यात आलेली आहे. विभागाने लोकसेवा आयोगाकडे ४५ पदांसाठीचे मागणी पत्र पाठविले असून त्यातुन अधीक्षकांची रिक्त १५ पदे भरण्यात येतील. स्वयंसेवी संस्था संचलित बालगृहांमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत त्यासंदर्भात काय कार्यवाही करण्यात येत आहे अशी समितीने विचारणा केली असता स्वयंसेवी संस्था संचलित संस्थांना शासनाकडून वेळोवेळी अनुदान प्राप्त होत असून त्यांच्याकडून पदे भरण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. ज्या संस्थांमध्ये रिक्त पदे भरण्याची कार्यवाही केलेली नसल्याचे निदर्शनास येईल अशा संस्थांची मान्यता नव्याने पुर्नमान्यता देण्याच्या प्रक्रियेत रद्द करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी कथन केले. अधीक्षकांची पदे रिक्त ठेवून विभाग अशाप्रकारे बालगृहे पर्यवेक्षणाहीन ठेवू शकत नसून रिक्त असलेल्या अधीक्षकांच्या पदांवर, लोकसेवा आयोगाकडून उमेदवार प्राप्त होईपर्यंत पर्यायी व्यवस्था म्हणून कंत्राटी पद्धतीने उमेदवारांच्या नेमणूका करण्याच्या पर्यायावर विचार करण्यात यावा असे समितीने सुचविले असता, त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, रिक्त असलेल्या अधीक्षकांच्या पदांचा अतिरिक्त कार्यभार त्यांच्या अधिनस्त असलेल्या 'परिविक्षाधिन अधिकारी' यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे तसेच दोन संस्था नजिक असतील तर रिक्त असलेल्या अधीक्षकाचा कार्यभार नजिकच्या संस्थेच्या अधीक्षकाकडे सोपविण्यात आलेला आहे.

शिफारस

३.५१ लेखापरीक्षणादरम्यान शासन संचलित ४३ बाल काळजी संस्थांमध्ये अधीक्षकांची सुमारे ४२.३ टक्के पदे रिक्त आढळली. लेखापरिक्षणाच्या उद्देशाने नमुन्यादाखल निवड केलेल्या शासन संचलित १३ बाल काळजी संस्थांमध्ये माहे मार्च, २०१५ पर्यंत अधीक्षकांची पदे रिक्त असण्याचे प्रमाण ३८ टक्क्यांपर्यंत आढळले. तसेच उक्त १३ बाल काळजी संस्थांपैकी ५ बाल काळजी संस्थांमध्ये अधीक्षकाचे पद सुमारे ५ ते ८ वर्षांइतक्या दीर्घ कालावधीसाठी रिक्त असल्याचे निदर्शनास आले. त्याहुनही गंभीर बाब म्हणजे स्वयंसेवी संस्थांकडून चालविलेल्या तथापि, वेतन व वेतनेतर प्रयोजनांकरिता १०० टक्के अनुदानित ४४ पैकी ४३ बाल काळजी संस्थांमध्ये अधीक्षकांची ४२.३० टक्के पदे सुमारे २ ते ९ वर्षांइतक्या दिर्घ कालावधीसाठी रिक्त असल्याचे आढळून आले. लेखापरिक्षणातील उपरोक्त आक्षेप हे निश्चितच गंभीर स्वरुपाचे आहेत.

वास्तविक बाल काळजी संस्थांचे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी अधीक्षकाचे पद हे महत्वाचे असून मुलांना चांगल्या प्रकारचा व योग्य प्रमाणात आहार देणे, स्वच्छ पाण्याची उपलब्धता करणे, मुलांना गरजेनुसार शिक्षण व व्यावसायिक शिक्षण मिळणेबाबत सुनिश्चिती करणे तसेच महत्वाचे म्हणजे मुलांना प्रेम आणि ममत्व देणारे असे घरगुती वातावरण तयार करणे ही अधीक्षकांची मुख्यत्वे जबाबदारी असल्याने अधीक्षकाचे पद हे आत्यंतिक महत्वाचे आहे. असे असतानाही अधीक्षकांची इतक्या मोठ्या पदावर पदे रिक्त राहणे ही बाब विभागाचे बालगृहांप्रती व पर्यायाने बालकांप्रती असले औदासिनत्व अधोरेखित करते.

बालगृहांसाठी अधीक्षकांची एकूण २६ पदे मंजूर असून त्यापैकी ११ पदे कार्यरत होती, तर १५ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे गट-ब ची एकूण ४५ संवर्ग पदे भरण्याबाबत मागणीपत्र सादर केलेले असून उक्त पदांमधून अधीक्षकांची रिक्त पदे भरण्यात येतील असे समितीस साक्षी दरम्यान सांगण्यात आले. तथापि, समिती यावर समाधानी नाही. बालगृहांचे दैनंदिन कामकाज योग्यप्रकारे चालवून बालकांचे उत्तमरित्या संगोपन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतांना अधीक्षकासारखे महत्त्वाचे पद बाल काळजी संस्थांमध्ये कार्यरत असणे अतिआवश्यकच असल्याबाबत समितीचे ठाम मत आहे. यास्तव, विभागाने शासन संचलित तसेच स्वयंसेवी संस्था संचलित अशा सर्वच बालगृहांमध्ये रिक्त असलेल्या अधीक्षकांच्या पदांचा तातडीने फेर आढावा घ्यावा. फेर आढाव्या अंती रिक्त असलेल्या अधीक्षकांच्या पदाचे लोकसेवा आयोगाकडे तातडीने मागणीपत्र पाठवून सातत्यपूर्ण पाठपुरावा करून लोकसेवा आयोगाकडून अधीक्षक या पदावर उमेदवार प्राप्त करून घ्यावेत.

तसेच स्वयंसेवी संस्था संचलित ज्या संस्थांमध्ये अधीक्षकांची पदे रिक्त असतील अशा संस्थांची, विभाग राबवित असलेलया पुनर्नोंदणी प्रक्रियेत नोंदणी रद्द करण्यात यावी. तसेच यापुढील काळात नव्या बालगृहांना मान्यता देताना अधीक्षक पद भरतीच्या निकषाची पूर्तता होत असल्यासच अशा बालगृहांच्या मान्यतेचे प्रस्ताव विचारात घेण्यात यावेत, अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

समितीच्या शिफारशीनुरुप केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल समितीस ३ महिन्यात उपलब्ध करून द्यावा.

परिच्छेद क्र. २.१.५.१ :- सामाजिक लेखापरीक्षा न करणे

अभिप्राय

३.५२ महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या, नियम ८१ नुसार, राज्य शासनाने टाटा सामाजिक विज्ञान संस्था, राष्ट्रीय सार्वजनिक सहकार आणि बाल विकास संस्था, चाईल्ड लाईन इंडिया फाऊंडेशन इत्यादी स्वायत्त संस्थांसह बालकांसाठी काम करणाऱ्या अग्रगण्य संस्थांच्या मदतीने बालगृहांच्या कामकाजाचे संनियंत्रण आणि मुल्यमापन करण्यासाठी दरवर्षी सामाजिक लेखापरीक्षा करणे आवश्यक होते तथापि, आयुक्त, महिला व बाल विकास विभागाकडून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना सामाजिक लेखापरीक्षा करण्याच्या सूचना उशीराने म्हणजे ऑगस्ट २०११ मध्ये दिल्या गेल्या. सूचना जारी केल्या असूनही, वर्ष २०११-१५ दरम्यान, लेखापरिक्षणाकरिता नमूना म्हणून निवड केलेल्या नऊ जिल्ह्यांपैकी एकाही जिल्ह्याने सामाजिक लेखापरीक्षा केले नव्हते. परिणामी, बालगृहांच्या कामकाजाचे संनियंत्रण आणि मुल्यमापन करण्याच्या महत्वाच्या यंत्रणेची अंमलबजावणी होऊ शकली नाही, असे लेखापरिक्षणात आक्षेपित करण्यात आले आहे.

साक्षी दरम्यान, उक्त नऊ जिल्ह्यांमध्ये सामाजिक लेखापरिक्षण झाले नसल्याची बाब विभागीय सचिवांनी मान्य करत अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे तसेच इतर काही कारणांमुळे सामाजिक लेखापरिक्षणाकरिता आवश्यक त्या समित्या घटीत होऊ न शकल्यामुळे उपरोक्त प्रमाणे सामाजिक लेखापरिक्षण करणे शक्य न झाल्याबाबत समितीस विदित केले. तसेच लेखापरिक्षणाकरिता निवड केलेल्या नऊ जिल्ह्यांव्यतिरिक्त उर्वरित अन्य जिल्ह्यांतही सामाजिक लेखापरिक्षण न झाल्याची बाब मान्य केली.

सामाजिक लेखापरिक्षण करण्यासंदर्भातील आजची सद्यःस्थिती काय आहे असे समितीने साक्षीदरम्यान विचारले असता, आता या प्रयोजनाकरिता 'नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईट्स' या संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून या संस्थेने सामाजिक लेखापरिक्षणाच्या कामास सुरवात केली आहे. ही संस्था प्रलंबित असलेल्या सामाजिक लेखापरिक्षणासह सरसकट सर्वच कालावधीचे आता सामाजिक लेखापरिक्षण करीत असून हे लेखापरिक्षण पूर्ण होण्यासाठी काही महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याचे समितीसमोर प्रतिपादित करण्यात आले.

शिफारस

३.५३ समितीच्या असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या नियम ८१ नुसार बालगृहांच्या कामकाजाचे सनियंत्रण आणि मूल्यमापन करण्यासाठी दरवर्षी सामाजिक लेखा परिक्षण करणे आवश्यक असतानाही आयुक्त, महिला व बाल कल्याण यांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना सामाजिक लेखापरीक्षण करून घेण्याबाबतच्या सूचना उशीराने म्हणजेच ऑगस्ट २०११ मध्ये दिल्या. एकतर सूचना उशीराने निर्गमित करण्यात आल्या, त्यात परत सूचना निर्गमित करूनही लेखा परिक्षणाच्या प्रयोजनार्थ निवड केलेल्या ९ जिल्ह्यांपैकी एकाही जिल्ह्यात वर्ष २०११-१५ या कालावधी दरम्यान सामाजिक लेखापरिक्षण करण्यात आलेले नव्हते. महालेखाकारांचे यासंदर्भातील आक्षेप मुलभूत व अत्यंत महत्त्वाचे आहेत. लेखापरिक्षणाकरिता निवड केलेल्या ९ जिल्ह्यांव्यतिरिक्त उर्वरित जिल्ह्यांतही सामाजिक लेखापरिक्षण न झाल्याची बाब साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आली. बालगृहांच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सामाजिक लेखापरिक्षणांच्या कामासंदर्भातील विभागाची निष्काळजी पाहता समिती तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करते.

विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान समितीला आश्वस्त करण्यात आले होते की, सामाजिक लेखापरिक्षण करण्याच्या कामी 'नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईट्स' या संस्थेस नियुक्त करण्यात आले आहे. सदरहू संस्थेने सामाजिक लेखापरिक्षणाचे काम सुरू केले असून काही महिन्यांतच ते काम पूर्णत्वास नेण्यात येईल. समितीला उपरोक्तप्रमाणे आश्वस्त केल्यानंतर आता सुमारे एक वर्षाचा कालावधी उलटून गेलेला असल्याने उक्त संस्थेकडून सामाजिक लेखापरिक्षणाचे काम निश्चितच पूर्ण झाले असेल अशी समितीची अपेक्षा आहे. सबब, सामाजिक लेखापरिक्षणाबाबतच्या नेमक्या सद्यःस्थितीचा विभागाने तातडीने आढावा घेऊन त्यासंदर्भातील परिपूर्ण माहिती समितीस एक महिन्याच्या आत अवगत करावी, अशी समिती आग्रही शिफारस करीत आहे.

परिच्छेद क्र. २.१.५.२ :- बाल काळजी व संस्थांच्या निरीक्षणातील कमतरता

अभिप्राय

३.५४ महाराष्ट्र बाल न्याय नियम २०११ च्या नियम ७(B)(६) नुसार बाल कल्याण समिती संदस्यांनी संस्थेतील मुलांच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी तीन महिन्यांतून एकदा प्रत्येक बाल काळजी संस्थेला भेट देवून राज्य सल्लागार मंडळाकडे अहवाल सादर करणे आवश्यक होते. तसेच महाराष्ट्र बाल न्याय नियम २०११ च्या नियम ८२(१०) नुसार जिल्हा सल्लागार मंडळांनी बाल काळजी संस्थांमध्ये पुरविल्या जाणाऱ्या सुविधांची आणि काळजी व संरक्षणाच्या दर्जाची तपासणी करायला तीन महिन्यांतून एकदा भेट देवून त्याचा अहवाल राज्य शासनाला सादर करावयाचा होता.

वर्ष २०१० ते २०१५ दरम्यान लेखापरिक्षणाकरिता निवड केलेल्या नऊ जिल्ह्यांपैकी फक्त बाल कल्याण समिती अहमदनगरने माहे जानेवारी ते मार्च २०१४ या त्रैमासिक कालावधीचा तपासणी अहवाल राज्य सल्लागार मंडळाला सादर केला होता. वर्ष २०१०-१५ दरम्यान लेखा परिक्षणाकरिता निवड केलेल्या ९३ बाल काळजी संस्थांपैकी ९१ बाल काळजी संस्थांमध्ये बाल कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या संख्येत ३ ते २० भेटी इतकी तूट आढळून आली तर निवड केलेल्या ९३ बाल काळजी संस्थांपैकी ८१ बाल काळजी संस्थांमध्ये वर्ष २०१४-१५ दरम्यान जिल्हा सल्लागार मंडळाने एकही भेट दिली नव्हती. बाल कल्याण समिती आणि जिल्हा सल्लागार मंडळाने बाल काळजी संस्थांच्या जर नियमित तपासण्या केल्या असत्या तर मुलांना भेडसावणाऱ्या अडचणी ठळकपणे निदर्शनास आल्या असत्या व त्यावर उपाययोजना करण्याची संधी शासनास मिळाली असती असे लेखापरिक्षणामध्ये आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, बाल कल्याण समितीच्या कामकाजाचे निरिक्षण हे जिल्हाधिकारी तथा विभागीय आयुक्तांच्या स्तरावर होणे अभिप्रेत आहे. तथापि, लेखापरिक्षणात नमूद केलेल्या कालावधीत निरीक्षण व मूल्यमापनाचा अहवाल लेखापरिक्षणादरम्यान आढळून आलेला नाही. विभागीय सचिवांनी समितीस साक्षी दरम्यान कथन केले की, विभागाने आता यासंदर्भात सामाजिक लेखा परिक्षणाचे कामदेखील एप्रिल, २०१६ च्या शासन निर्णयान्वये सुरू केले आहे. तसेच नवीन नियमांनुसार बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाचा दर तीन महिन्यांनी आढावा घेण्याबाबत बंधनकारक करण्यात आले आहे. विभागीय सचिवांनी पुढे असेही सांगितले की, आता ३१ जिल्ह्यांमध्ये नव्याने बाल कल्याण समिती गठीत करण्यात आल्या असून उर्वरित जिल्ह्यांसाठी जाहिरात देण्याचे काम सुरू आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये नवीन बाल कल्याण समित्या गठीत करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे, तेथे जुन्या समित्या कार्यरत ठेवलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जुन्या नियमांप्रमाणे 'राज्यस्तरीय सल्लागार समिती' व 'जिल्हास्तरीय सल्लागार समिती' स्थापन करण्याबाबत तरतूद होती. तथापि नवीन नियमांप्रमाणे आता या समित्यांऐवजी 'राज्य तपासणी समिती' व 'जिल्हा तपासणी समिती' या दोन समित्या स्थापन करावयाच्या आहेत. जिल्हा तपासणी समितीचे अध्यक्ष हे जिल्हाधिकारी असतात. याव्यतिरिक्त या समितीवर अन्य दोन सामाजिक कार्यकर्त्यांची नेमणूक करावयाची आहे. याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी जाहिराती निर्गमित केलेल्या आहेत. राज्य तपासणी समितीकरिता विभागाने निवृत्त न्यायाधिश श्री. रुही यांचेकडे मागणी नोंदविलेली असून या समितीकरिता विभागाकडे लवकरच नावे प्राप्त होतील.

शिफारस

३.५५ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी आक्षेपित केलेल्या बाबी अतिशय महत्वाच्या आहेत. महाराष्ट्र बाल न्याय नियम, २०११ मध्ये तरतूद असुनही लेखापरिक्षणाकरिता निवड केलेल्या ९ जिल्ह्यांपैकी अहमदनगर वगळता एकाही जिल्ह्यांतील बाल कल्याण समितीने बाल काळजी संस्थांमधील मुलांच्या स्थितीचा आढावा घेऊन एकदाही त्रैमासिक कालावधीचा तपासणी अहवाल राज्य सल्लागार मंडळाला सादर केला नव्हता. अहमदनगर जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीनेसुध्दा फक्त माहे जानेवारी ते मार्च, २०१४ या कालावधीचाच त्रैमासिक अहवाल सादर केला. तसेच निवड केलेल्या ९३ पैकी ९१ बाल काळजी संस्थांमध्ये वर्ष २०१०-१५ या दरम्यान बाल कल्याण समितीने दिलेल्या भेटींच्या संख्येत ३ ते २० भेटींची तूट आढळली.

तद्वतच निवडलेल्या ९३ बाल काळजी संस्थांपैकी ८१ बाल काळजी संस्थांमध्ये जिल्हा सल्लागार मंडळांनी बाल काळजी संस्थांमध्ये पुरविल्या जाणाऱ्या सुविधांची आणि काळजी व संरक्षणाच्या दर्जाची प्रत्यक्ष भेट देऊन एकदाही तपासणी न केल्याचे निदर्शनास आले. उपरोक्त बाबी अतिशय गंभीर स्वरुपाच्या आहेत. साक्षीदरम्यान विभागीय

सचिवांनी समितीस अवगत केले की, सर्व जिल्ह्यांमध्ये नवीन बाल कल्याण समिती गठीत करण्याचे काम प्रगतीत आहे. एकूण ३१ जिल्ह्यांमध्ये बाल कल्याण समिती गठीत झालेली असून उर्वरीत जिल्ह्यांसाठी जाहीरात देण्याचे काम सुरू आहे. नवीन बाल कल्याण समिती गठीत होईपर्यंत जुन्या बाल कल्याण समिती सुरू ठेवण्यात आल्या आहेत. आता प्रत्येक जिल्ह्यांतील बाल कल्याण समितीच्या कामाचा आढावा दर तीन महिन्यांनी घेण्याबाबत नवीन नियमांत तरतूद देखील करण्यात आलेली आहे. तर बाल कल्याण समितीच्या सदस्यांच्या भत्त्यांमध्ये सुधारणा करण्यात आली असून दर बैठकीमागे आता रु. १,५०० इतका भत्ता करण्यात आलेला आहे. यापुढे बाल कल्याण समितीच्या आता नियमित बैठका होतील.

तसेच नवीन नियमांनुसार आता जिल्हा सल्लागार समित्या रद्द करण्यात आल्या असून त्याऐवजी आता 'जिल्हा तपासणी समिती' गठीत करण्यात येत आहेत. जिल्हा तपासणी समितीचे जिल्हाधिकारी हे आता अध्यक्ष असून त्यांनी अजून दोन सामाजिक कार्यकर्त्यांची समितीवर नेमणूक करावयाची आहे. जिल्हा तपासणी समित्या गठीत करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी जाहिराती निर्गमित केल्या असून १ महिन्यामध्ये जिल्हा तपासणी समिती गठीत करण्याची कार्यवाही पूर्ण होईल. तसेच राज्य तपासणी समितीकरीतासुध्दा निवड समितीच्या अध्यक्षांकडून लवकरच नावे प्राप्त होतील, असेही समितीस पुढे कथन करण्यात आले.

समितीच्या **उपरोक्त प्रमाणे निदर्शनास आणल्यानंतर आता सुमारे एक वर्षाचा कालावधी झाला असल्याने सर्व जिल्ह्यांमध्ये बाल कल्याण समिती तसेच जिल्हा तपासणी समित्या गठीत करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली असेल अशी समिती अपेक्षा करते. तसेच दरम्यानच्या कालावधीत आता राज्य तपासणी समितीसुध्दा अस्तित्वात आली असणार. उपरोक्त प्रमाणे समित्या गठीत करण्याचा कार्यवाहीची इत्भूंत माहिती समितीस तातडीने उपलब्ध करून द्यावी.**

तसेच भविष्यात सर्व बाल कल्याण समितीच्या नियमित बैठका होतील व बाल कल्याण समितीच्या कामकाजाचा जिल्हा तपासणी समितीकडून दर तीन महिन्यांनी आढावा घेतला जाईल, याबाबत विभागाने खातरजमा करावी व याकामी सातत्यपूर्ण सनियंत्रण ठेवावे. तसेच आजमितीपर्यंत एकूणच याकामी झालेल्या कार्य प्रगतीचा आढावा घेऊन त्याची अद्ययावत माहिती समितीस १ महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

परिच्छेद क्र. २.१.५.३ :- बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन न होणे

अभिप्राय

३.५६ महाराष्ट्र बाल न्याय नियमांच्या नियम ८ (२९) नुसार, आयुक्त, महिला व बाल विकास यांचेकडून बाल कल्याण समितीच्या कामकाजाची तपासणी आणि मूल्यमापन तीन महिन्यांतून एकदा करावयाचे असून मूल्यमापनाचा अहवाल राज्य शासनाला सादर करावयाचा होता. लेखापरिक्षणामध्ये दस्तऐवजांची तपासणी केली असता असे दिसून आले की वर्ष २०१०-१५ दरम्यान आयुक्त, महिला व बाल विकास यांनी बाल कल्याण समितीच्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी त्यांची कधीच तपासणी केली नव्हती. उलट आयुक्त, महिला व बाल विकास यांनी बाल कल्याण समितीची तपासणी आणि मूल्यमापनाचे अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे सोपविले आहेत.

विभागाने खुलाशात नमूद केले की, आयुक्त महिला व बाल विकास यांनी बाल कल्याण समित्यांची दर तीन महिन्यांनी तपासणी करावयाची होती. तथापि, आयुक्तालयातील अपूऱ्या कर्मचारी वर्गामुळे नियमितपणे बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाचे मुल्यमापन करणे शक्य नसल्याने दि. १५ जुन, २०१५ च्या पत्रान्वये आयुक्तालयाने ही जबाबदारी आता जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे प्रदान केलेली आहे. तसेच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ हा केंद्र शासनाने नव्याने अधिनियमीत केलेला असून त्यान्वये बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासनाने या अधिनियमांतर्गत स्वतंत्र नियमावली कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू केली असून ती पूर्ण होताच सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तसे सूचित करण्यात येईल. तद्वतच मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्रमांक १०२/२००७ मधील आदेशात नमूद केलेल्या संरचनेप्रमाणे राज्यस्तरीय सामाजिक लेखापरिक्षण करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

साक्षी दरम्यान समितीस अवगत करण्यात आले की, केंद्र शासनाच्या उपरोक्त सन २०१५ च्या नविन अधिनियमांतर्गत राज्य शासनाने नविन नियमावली तयार करण्याचे सुरू केलेले काम आता पूर्ण झाले असून सदरहू नियमावली माहे मार्च,

२०१८ पासून कार्यान्वित झालेली आहे. त्यास अनुसरुन बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना माहे मे, २०१८ मध्ये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच विभागीय आयुक्तांनाही देखील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना उपरोक्त प्रमाणे आढावा घेण्याबाबत सूचित करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

दि. २७ एप्रिल, २०१६ रोजी सामाजिक परिक्षण करण्यासाठी विभागाने गठीत केलेल्या समितीने दोन वर्षाच्या कालखंडात आजमितीपर्यन्त किती बैठका घेतल्या अशी समितीने पृच्छा केली असता उक्त समितीची एक बैठक झाली असून उक्त बैठकीत केंद्र शासनाच्या सन २०१५ च्या नवीन अधिनियमांतर्गत राज्य शासन तयार करीत असलेल्या नवीन बाल न्याय नियमांत ज्या तरतूदी करण्यात येतील त्याप्रमाणे सामाजिक लेखापरिक्षणाबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

सन २०१६ मध्ये विभागाने सामाजिक परिक्षणाकरीता समिती गठीत केली, त्यानंतर माहे मार्च, २०१८ मध्ये केंद्र शासनाच्या अधिनियमांतर्गत नवीन नियम देखील राज्य शासनाने कार्यान्वित केले आहेत, असे असूनही विभाग स्तरावर सामाजिक लेखापरिक्षणाच्या कामात कोणतीच प्रगती दिसत नसून विभाग याबाबतीत अनाठायी कालापव्यय करत असल्याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले सामाजिक परिक्षणाचे काम आता 'एन.सी.पी.सी.आर.' या संस्थेला देण्यात आले असून उक्त संस्थेने हे काम सुरू केलेले आहे. या संस्थेने मागील काळातील प्रलंबित असलेल्या सामाजिक लेखापरिक्षणासह सन २०१८ पर्यंत सरसकट लेखापरिक्षणाचे काम हाती घेतलेले असून उक्त काम पूर्ण होताच विभाग सामाजिक लेखापरिक्षणाचा अहवाल सादर करेल.

शिफारस

३.५७ आयुक्त, महिला व बाल विकास यांनी बाल कल्याण समितीच्या कामकाजाची तपासणी व मूल्यमापन करून मूल्यमापनाचा त्रैमासिक अहवाल राज्य शासनास सादर करणे महाराष्ट्र बाल न्याय नियम ८(२९) नुसार आवश्यक असतांनाही आयुक्तांनी बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाची कधीच तपासणी न करणे, ही बाब निश्चितच अतिशय गंभीर स्वरुपाची आहे.

साक्षी दरम्यान समितीस अवगत केल्याप्रमाणे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील कलम २७(१०) नुसार बाल कल्याण समितींच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी आता संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले असून या अधिनियमांतर्गत स्वतंत्र नियमावली देखील कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सर्व जिल्हाधिकारी यांना संबंधित बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेण्याबाबत अर्धशासकीय पत्रांद्वारे सूचित करण्यात आले असून सर्व विभागीय आयुक्तांना देखील त्यांच्या स्तरावरुन त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांना बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेण्याबाबत स्वतंत्र सूचना निर्गमित करण्यात याव्यात असे अर्धशासकीय पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

तसेच या संस्थांचे सामाजिक लेखापरिक्षण करण्याचे काम 'एन.सी.पी.सी.आर.' कडे सोपविण्यात आलेले असून उक्त संस्था याआधीच्या कालावधीतील प्रलंबित असलेल्या सामाजिक लेखा परिक्षणासह आजमितीच्या कालखंडापर्यंत सामाजिक लेखापरिक्षण पूर्ण करणार आहे. समितीस उपरोक्तप्रमाणे आश्वस्त करण्यात आल्यानंतर आता सुमारे १ वर्षाचा कालखंड उलटलेला आहे. सबब, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व त्याअंतर्गत शासनाने तयार केलेल्या नियमांतर्गत सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आजमितीपर्यंत त्या त्या जिल्ह्यातील बाल कल्याण समित्यांच्या कामकाजाची केलेली तपासणी व मूल्यमापन याचा विभागाने यथोचीत आढावा घेऊन त्याबाबतची विस्तृत अद्ययावत माहिती समितीस एक महिन्यात सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे. त्याचप्रमाणे 'एन.सी.पी.सी.आर.' या संस्थेकडून करण्यात येत असलेल्या सामाजिक लेखापरिक्षणाच्या कामकाजाच्या प्रगतीची देखील विभागाने अद्ययावत माहिती घेऊन समितीस १ महिन्यात उपलब्ध करून द्यावी, अशी देखील समितीची आग्रही शिफारस आहे.

*_*_*_*_*

परिशिष्ट-अ

...यातील स्वयंसेवी बालगृहांची शासन निर्णय
... १३ जुलै, २०१५ नुसार त्रयस्थ यंत्रणेमार्फत
...ण्यात आलेल्या तपासणीमधील 'क' व 'क'
...तिरिक्त ('ड') वर्ग प्राप्त संस्थांच्या
...गृहांची मान्यता रद्द करणेबाबत.

महाराष्ट्र शास...
महिला व बाल विकार... िभाग
शासन निर्णय क्र. बालगृ- २०१/५प्र.क्र.५०/का-८,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा ... गुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ ऑक्टोबर, ०१७.

वाचा:
१. शासन निर्णय म व बा वि विभाग बालगृ २०१५/... क्र.५०/का-८ दि. १३, जुलै २०१५.
२. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय... यांचे जा.क्र.मबाविआ/बावि/बालगृ/का-५/प्र.७/१५-१६/६३१५, दि. १.१२.२०१५.
३. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबा... येथे दाखल रिट याचिका क्र. ६५७२/२०१५ व रिट याचिका ६५२६/२०१५ मध्ये मा. न्यायालयाचे दि. ३०.६.२०१५ रोजीचा अंतरिम व दि. ५.५.२०१७ रोजीचा अंतिम आदेश.

प्रस्तावना :

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाच्या तरतुदीनुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या पुनर्वसन व पुनर्स्थापनेच्या उद्देशाने निवासी व इतर अत्यावश्यक सेवा सुविधा पुरविण्यासाठी स्वयंसेवी संस्थाना बालगृह चालविण्यास शासन मान्यता देते. शासनाने संदर्भ क्र. १ अन्वये महिला व बाल विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांच्या एकूण ९६३ बालगृहांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करण्याचा निर्णय घेतला होता.

त्यानुसार राज्यातील बालगृहांची तपासणी करण्यात येऊन महिला व बाल विकास आयुक्तालयाकडून संदर्भ क्र. २ अन्वये अंतिम अहवाल शास... प्राप्त झाला होता. या तपासणी अंती एकूण ९६३ बालगृहांपैकी 'अ' वर्गामध्ये ४७६ बालगृह, 'ब' वर्गामध्ये २७... बालगृह तर 'क' व 'क' व्यतिरिक्त ('ड') २१४ बालगृह असल्याचे निष्पन्न झाले आहे.

'अ' वर्गामधील बालगृहांना नियमानुसार अनुदान देणे, 'ब' वर्गामधील बालगृहांचे अनुदान थांबवून त्यांना 'अ' वर्गामध्ये येण्यासाठी सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सहा महिन्याचा अवधी देण्यात यावा तर 'क' व 'क' व्यतिरिक्त ('ड') २१४ बालगृहांना कारणे दाखवा नोटीस देऊन मान्यता रद्द करण्यात यावी असा शासनाचा मानस होता. मात्र सदर तपासणी विरोधात मा. उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६५२६/२०१५ व रिट पिटीशन क्र.६५७९/२०१५ दाखल होत्या. सदर याचिकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दि. ३०.६.२०१५ रोजी, 'तपासणी करण्यात यावी, मात्र अंतिम निर्णय घेण्यात येऊ नये' असे निर्देश दिले होते.

त्यानुसार तपासणीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली होती, मात्र त्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात आला नव्हता. दरम्यानच्या काळात बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० हा निरसित करण्यात येऊन १५ जानेवारी, २०१६ पासून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ हा लागू झाला आहे. सदर अधिनियमाचा उद्देश, बालगृह व इतर बालगृहात मुलांना द्यावयाच्या सेवासुविधा बाबतच्या तरतूदींच्या अनुषंगाने उहापोह करून, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगबाद यांनी,

शासन निर्णय क्रमांकः बालगृ- २०१५/प्र.क्र.५०/का-८

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७१०२७१६५५२८०९३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e028518ffe98f619187a1ef6da2d457c16934e9cb6672cc32ea25f3d08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2017.10.27 16:51:27 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत-परिशिष्ट-अ

प्रत,

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.

४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.

५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ,मुंबई.

६) मा.मंत्री (म व बा वि)/राज्यमंत्री (म व बा वि),यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव, मंत्रालय,मुंबई.

८) प्रधान सचिव, नियोजन विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.

९) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०) प्रधान सचिव (ले व का), वित्त विभाग,मंत्रालय ,मुंबई.

११) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१२) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर.

१३) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

१४) वित्त विभाग (व्यय-६), (अर्थसंकल्प-७), नियोजन विभाग (का.१४७२) मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई.
